# अजिंठा

## AJINTHA MISCELLANY

वर्ष १६ वे | मार्च १९६२ | अंक १६ वा


: संपादक :

प्रा. म. ना. अदवंत

: विद्यार्थी-प्रतिनिधि :

अरुण वि. नेहेते






नियतकालिक

मूळजी जेठा आर्ट्स् व सायन्स कॉलेज, जळगांव.

आमचेकडे :– सर्व प्रकारचीं सुती व जरी

★ पातळें व प्रिंटेड साड्या ★

० कोईमतुर ० म्हैसूर ० हॅण्डलुम साड्या ०

—तसेंच—

सर्व प्रकारचे फॅन्सी कापड, आकर्षक मद्रास चादरी

—: किफायत भावाने मिळेल :—

एकवेळ अवश्य पहा—

★ प्रदीप क्लॉथ सेंटर ★

पो. ऑफिस जवळ, महात्मा गांधी रोड,

ज ळ गां व.

महाराष्ट्रांत सर्वांत जास्त खप असलेले मराठी दैनिक

❊ लोकसत्ता ❊ वाचण्यास विसरूं नका !

जळगांवांतील एकमेव एजंट—

श्री. ए. जे. गोरे

नवी पेठ, जळगांव.

❊ लोकसत्ता ❊ रविवारची लोकसत्ता ❊ इंडियन एक्सप्रेस
❊ सन्डे स्टॅन्डर्ड ❊ फायनान्सियल एक्सप्रेस ❊ स्क्रीन

या सर्व प्रकाशनांचे जळगांवांतील एकमेव विक्रेते....

श्री. ए. जे. गोरे, जळगांव.



# मूळजी जेठा आर्ट्स् व सायन्स कॉलेज

-❊- नि य त का लि क -❊-

# ❊ अ जिं ठा ❊

—०— मुख्य संपादक —०—

प्रा. म. ना. अदवंत

—०— विद्यार्थी–प्रतिनिधी —०—

श्री. अरुण वि. नेहेते

वर्ष १६ वें )०— मार्च १९६२ —०( अंक १६ वा

## संपादक मंडळ

प्राचार्य या. शि. महाजन

प्रा. म. ना. अदवंत

प्रा. अं. गं. चिपळूणकर

प्रा. शं. र. पुणतांबेकर

प्रा. पं. तु. महाजन

प्रा. ज. वि. महाजन

प्रा. इफ्तिकार अहमद

श्री. अरुण वि. नेहेते


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| संपादकीय | .... | .... | १ ते ८ |
| मराठी विभाग | .... | ... | १ ते ७६ |
| हिंदी विभाग | .... | ... | १ ते २० |
| इंग्रजी विभाग | .... | .... | १ ते ३६ |
| उर्दू विभाग | ... | .... | १ ते ६ |




MORNING WALK



# संपादकीय

## पुणे विद्यापीठाचे नवे उपकुलगुरु

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी पुणे विद्यापीठाचें उपकुलगुरुपद विभूषित केलें ही पुणे विद्यापीठाच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाची घटना समजली पाहिजे. दि. ३० जून १९६१ रोजीं भरलेल्या पुणे विद्यापीठाच्या कोर्टाच्या बैठकींत हा निर्णय एकमतानें घेण्यांत आला. म. म. दत्तो वामन पोतदार यांची विविध क्षेत्रांतील भरीव कामगिरी लक्षांत घेता कोर्टाच्या सभासदांनी एकमताने घेतलेला हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हटला पाहिजे. साहित्य व इतिहाससंशोधन हीं म. म. पोतदार यांच्या व्यासंगाचीं खास दालनें. या दोन्हीहि दालनांत त्यांनी घातलेली भर व केलेली कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी आहे. महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना पूर्वीच मिळाला आहे पण नव्याने स्थापन झालेल्या साहित्य महामंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांचीच निवड झाली आहे. शिवाय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, शिक्षण प्रसारक मंडळी, भारतीय संशोधन मंडळ, भारतीय संस्कृति मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद इत्यादि अनेक संस्थांच्या कार्याला व प्रगतीला म. म. पोतदार यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हातभार लागला आहे. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेला अनेकांप्रमाणे म. म. पोतदार यांचेहि श्रम कारणीभूत झालेले आहेत हें विसरून चालावयाचे नाही. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतरहि या ना त्या नात्याने म. म. पोतदार विद्यापीठाच्या कार्याशी संलग्न आहेत. म. म. पोतदारांची बहुविध क्षेत्रांतील ही निरलस व निःस्वार्थ कामगिरी विचारांत घेता 'महाराष्ट्राचा महापुरुष' म्हणून त्यांचा करण्यांत येत असलेला गौरव यथार्थ वाटतो. अशी ही महाराष्ट्राची चैतन्यशक्ति आज पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरुपद भूषवित आहे याबद्दल कुणालाहि अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या कारकिर्दीत पुणे विद्यापीठाचें पाऊल निश्चित प्रगतिपथावर पडेल याविषयी शंका वाटत नाही.

## माननीयांचा गौरव

यंदा प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपतींनी 'पद्मभूषण' ही पदवी देऊन डॉ. रा. ना. दांडेकर व प्रा. ना. सी. फडके या दोघांचा जो सत्कार केला त्याबद्दल त्या दोघांचें हे मनःपूर्वक अभिनंदन करतांना आम्हाला अतिशय अभिमान वाटत आहे. डॉ. रा. ना. दांडेकर हे पुणें विद्यापीठाच्या संस्कृतविभागाचे प्रमुख. आर्ट विभागाचे डीन म्हणून गेली ५ वर्षे त्यांची अविरोध निवड होते आहे. डॉ. दांडेकर यांचा व्यासंग, संशोधन क्षेत्रांतील त्यांची कामगिरी व त्यांचें अध्यापन क्षेत्रांतील

नैपुण्य आज साऱ्या महाराष्ट्राला ज्ञात आहे. प्राच्य विद्या विषयक व भारतीय संस्कृति विषयक त्यांनी केलेल्या संशोधनाला आज जागतिक मान्यता मिळाली आहे. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिराचें ते १९३९ पासून कार्यवाह आहेत. या शिवाय International University Association व Academy of Human Rights या दोन आंतरराष्ट्रीय संस्थांचें समासदत्व त्यांना लाभलें आहे. International Union of Orient.lists चें उपाध्यक्षपदहि त्यांनी भूषविलें आहे. प्राच्य विद्या संशोधनाच्या क्षेत्रांत प्रभावाने तळपणाऱ्या या विद्वानाला 'पद्मभूषण' ही पदवी देऊन राष्ट्रपतींनी त्यांचा जो गौरव केला आहे तो त्यांचा तर गौरव आहेच पण अप्रत्यक्षपणे तो ते ज्या विद्यापीठांत कार्य करतात त्या विद्यापीठाचाहि गौरव आहे.

प्रा. ना. सी. फडके यांनी मराठी साहित्याच्या क्षेत्रांत जी कामगिरी केली आहे तिला तर तोड नाहीं. सतत गेलीं चाळीस वर्षें त्यांनी आपल्या लालित्यपूर्ण शैलीने साहित्याची विविध दालनें समृद्ध केलीं आहेत. कादंबरी हें त्यांचें खास दालन. पन्नासाच्या वर त्यांनी कादंबऱ्या लिहिल्या व वाचकांना मोठ्या गोडीने त्या वाचावयास लावल्या. कादंबरीच्याच नव्हे तर गद्य ललित साहित्याच्या सर्व क्षेत्रांत त्यांनी चोखंदळ सौन्दर्यदृष्टि आणली. मराठी वाचकांना ललित साहित्याच्या तंत्राचे धडे प्रथम त्यांनीच दिले. मराठी वाचकवर्गाला प्रा. फडके यांनी सौन्दर्याभिमुख बनविले हें त्यांचें फारच मोठें कार्य. आजहि सातत्याने चालू असलेल्या त्यांच्या लेखनांत त्याच्या चोखंदळ सौन्दर्यदृष्टीचा प्रत्यय येतो. त्यांना मिळालेल्या या पदवीने केवळ त्यांचाच गौरव झाला नाहीं तर महाराष्ट्रीय रसिकतेचाहि गौरव झालेला आहे.

या उभयता 'पद्मभूषणां' चें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## माजी विद्यार्थ्यांचें यश

आपल्या कॉलेजांतील कु. प्रतिभा पाटील व श्री. चव्हन तडवी हे दोघे माजी विद्यार्थी यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकींत महाराष्ट्र राज्य सभेच्या विधान सभेवर बहुमतानें निवडून आले. कु. प्रतिभा पाटील ह्या अर्थशास्त्र हा विषय घेऊन १९५८ साली या कॉलेजमधून एम. ए. झाल्या. श्री. तडवी हेहि अर्थशास्त्र हा विषय घेऊन १९६० सालीं बी. ए. झाले. सार्वजनिक जीवनाच्या उंबरठ्यावर असतांनाच त्यांना मिळालेल्या या यशाबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. व त्यांना त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनांत सुयश चिन्तितों.

## पुणें विद्यापीठ–वार्ता

गेल्या वर्षापासून विद्यापीठाने प्रि–डिग्री परीक्षेसाठीं मॉडरेटर नेमण्याची पद्धत सुरू केली होती. या पद्धतीचा इष्ट परिणाम गेल्या वर्षीच्या प्रि–डिग्री परीक्षेच्या निकालावर दिसून आला होता. यंदापासून विद्यापीठाने प्रि–डिग्रीच्या प्रत्येक पेपरांतील वीस गुण कॉलेजमध्ये विद्यार्थ्याने दाखविलेल्या प्रगतीसाठी राखून ठेवले आहेत. तिमाही, सहामाही व पूर्वपरीक्षा या परीक्षांत विद्यार्थ्यांना जे गुण मिळतील त्याची सरासरी काढून ते विद्यापीठाच्या परीक्षेत मिळणाऱ्या गुणांत मिळविले जाणार आहेत. या नियमामुळे विद्यार्थ्यांचा गुणाच्या दृष्टीने फायदा तर होईलच पण वर्षभर नियमित अभ्यास करण्याची शिस्त या नियमामुळे विद्यार्थ्यांना लागली आहे ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. तिमाही, सहामाही व पूर्वपरीक्षा या परीक्षांकडे उपेक्षेने पहाण्याची विद्यार्थ्यांची दृष्टी पण बदलली आहे. हा नवा नियम विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चांगलाच उपकारक ठरला आहे.

तीन वर्षांच्या पदवीपरीक्षेच्या अभ्यासक्रमांतहि या विद्यापीठाने केलेला एक बदल महत्वाचा आहे. या अभ्यासक्रमाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांतील आवश्यक विषयांचा अभ्यास प्रथम वर्षात करावयाचा आहे. व दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात वैकल्पित विषयांचा अभ्यास करावयाचा आहे. आतापर्यंत प्रथम वर्षातील विषयांची परीक्षा न दिली किंवा देऊनहि विद्यार्थी सर्व विषयांत अनुत्तीर्ण झाला तरी तो दुसऱ्या वर्षात प्रवेश करीत असे. त्यामुळे पहिल्या वर्षाच्या विषयांचें ओझें घेऊनच विद्यार्थी दुसऱ्या वर्षात प्रवेश करी. त्याचा परिणाम नकळतच दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमावर होत असे. पण यंदापासून विद्यापीठाने पहिल्या वर्षाच्या परीक्षांबद्दल नवीन नियम केला आहे. त्या नियमाप्रमाणे पहिल्या वर्षाच्या सर्व परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्याला दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळावयाचा नाही. मात्र सर्व विषयांत चांगले गुण मिळवून विद्यार्थी एखाद्या विषयांत अनुत्तीर्ण झाला तर त्याला दुसऱ्या वर्षाच्या



टर्मस् भरण्याची परवानगी देण्यांत आली आहे. त्यांतील विशेष नियम असेः– (१) बी. ए. प्रथम वर्षाच्या परीक्षेत चार पेपरामध्ये तो पास झाला किंवा तीन पेपरांत ४५ टक्क्याच्या वर गुण मिळवून दोन पेपरांत अनुत्तीर्ण झाला तर त्याला बी. ए. द्वितीय वर्षाची टर्म भरण्याची परवानगी देण्यांत येईल. (२) विज्ञान शाखेंत तीन विज्ञानांचे विषय धरून कमींत कमी चार पेपरांमध्ये विद्यार्थी पास झाला तर त्याला बी. एससी. द्वितीय वर्षाच्या टर्मस भरण्याची परवानगी देण्यांत येईल. (३) अकाउंटन्सी, अर्थशास्त्र, वाणिज्य संघटना व कोणताही एक वैकल्पिक विषय यासह पांच विषयांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास बी. कॉम. दुसऱ्या वर्षाच्या टर्मस् भरण्याची परवानगी देण्यांत येईल.

बी. ए. बी. एससी. व बी. कॉम. यांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचा निकाल विद्यापीठ जाहीर रीत्या प्रगट करील. मात्र बक्षिसें, शिष्यवृत्त्या व विद्यार्थ्यांनी मिळविलेला वर्ग हा दुसऱ्या विभागांत मिळालेल्या गुणांवरच ठरविला जाईल.

बी. ए. प्रथम व व्दितीय विभागांत केलेला आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने प्रत्येक पेपर हा स्वतंत्र घटक समजला जाईल. आतापर्यंत इंग्रजी दोन पेपर्स मिळून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याइतकें गुण मिळवावे लागत. यापुढे प्रत्येक पेपरांमध्ये त्याला स्वतंत्रपणे उत्तीर्ण होण्याइतके गुण मिळविणें आवश्यक आहे.

वरील बी. ए. प्रथम वर्षाच्या परीक्षा पद्धतींतील हा बदल १९६३ च्या परीक्षेपासून सुरू होईल. या निर्णयामुळे पदवी परीक्षेच्या पहिल्या भागांतील विषयाचें ओझें विद्यार्थ्यांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षापर्यंत बाळगावें लागणार नाही व त्यामुळे त्या त्या वर्षाच्या मुख्य अभ्यासक्रमाकडे लक्ष देणें त्यांना शक्य होईल.

## नव्या योजना

जून १९६२ पासून कॉलेजने T. Y. B. Com. चा अभ्यासक्रम शिकविण्याची विद्यापीठाकडे परवानगी मागितली आहे. ते वर्ग सुरू झाले म्हणजे बी. कॉम. चा पदवी परीक्षेपर्यंतचा अभ्यासक्रम शिकविण्याची सोय कॉलेजमध्ये होऊन व्यापारशाखा स्वयंपूर्ण होईल. त्याच प्रमाणे पुढील वर्षापासून इंग्रजी स्पेशलहि सुरू करण्या-बद्दल कॉलेजने विद्यापीठाकडे परवानगी मागितली आहे. आतापर्यंत अर्थशास्त्र व मराठी ह्या दोनच विषयांतील स्पेशल पेपर शिकविण्याची कॉलेजमध्यें सोय होती. त्यांत या नव्या विषयाची भर पडल्याने विद्यार्थ्यांची चांगली सोय झाली आहे.

हल्ली असलेल्या वसतिगृहाच्या शेजारीच नवे तीन मजली भव्य वसतिगृह उभारलें जात आहे. मर्यादित जागेमुळे आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना वसतिगृहांत प्रवेश नाकारावा लागत होता. या नव्या वसतिगृहाने विद्यार्थ्यांची एक मोठीच गरज भरून निघेल. हें वसतिगृह पूर्ण झालें म्हणजे आणखी जवळ जवळ शंभर विद्यार्थ्यांची वसतिगृहांत सोय करता येईल. कॉलेजच्या समोरच दुसरे एक बांधकाम पूर्ण होत आले आहे. ती व्यापारशाखेची इमारत. आपले दानशूर शेटजी गोवर्धनदास चत्रभूज यांनी दिलेल्या देणगींतून ही इमारत उभारली जात आहे. व्यापारशाखेचे वर्ग त्या ठिकाणी भरविण्यांत येतीलच. पण त्यातील भव्य हॉल हा अनेक सभा वाद-विवाद इत्यादि प्रसंगासाठीं उपयोगी पडेल. कॉलेजच्या वाढत्या व्यापाला जागा पुष्कळच अपुरी पडत होती. या नव्या इमारतीने आता पुष्कळच सोय होईल.

## कॉलेज वार्ता

दरवर्षाप्रमाणे कॉलेजचें काम यंदाहि २० जूनला सुरू झालें. गेल्या वर्षाप्रमाणेच यंदाहि प्रत्येक वर्गातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची व कॉलेजमध्ये चालणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती देणारीं व्याख्यानें आयोजित करण्यांत आलीं होतीं. विद्यार्थ्यांमध्ये नव्या वर्षाचा नवा उत्साह दिसत होता. प्रि–डिग्रीचे नवे चेहेरे व वरील वर्गाचे सराईत चेहेरे यांची कॉलेजच्या व्हरांड्यांतून एकच गर्दी झालेली दिसत होती. रंगीबेरंगी पातळांच्या गोड गुंजारवाने कॉलेजचा परिसर भरून गेला होता. प्राध्यापकांच्या खोलींत ताजेतवाने होऊन आलेल्या प्राध्यापकांच्या काव्यशास्त्रविनोदाने त्या उत्साही वातावरणांत नवीच भर पडत होती. कॉमन रूममधील बहुतेक चेहेरे परिचितच होते. त्यापैकी कांहीचें चेहेरे त्यांनी नव्या आश्रमांत प्रवेश केल्याने अधिक उजळलेले दिसत होते. नव्या असह्य उकाड्यांतहि कॉलेजचे सर्व परिसर चैतन्याने व उत्साहाने फुलून गेलें होतें.

त्यांत यंदा कॉलेजचें निकालहि समाधानकारक होते. अपूर्व यश कुणी मिळविलें नव्हतें तरी वर्षभर केलेल्या श्रमाचा निकालाच्या रुपाने योग्य तो मोबदला मिळाल्याचें समाधान सर्वांनाच वाटत होतें. त्यांत विशेष उल्लेखनीय यशाचे कांही मानकरी आहेत. बी. एससी. एप्रिलच्या परीक्षेत श्री. लीखंडे यांनी पहिला वर्ग मिळविला. श्री. बी. एन. पाटील हा विद्यार्थी बी. एससी. च्या आक्टोबरच्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला आला. कु. सुलभा आरस या विद्यार्थिनीने एम. ए. च्या परीक्षेत मराठीच्या सहा पेपरांत ६५ टक्के गुण मिळवून ती विद्यापीठांत त्या विषयाच्या विद्यार्थ्यांत दुसरी आली. या सर्व विद्यार्थ्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## नवागतांचें स्वागत

डॉ. शानभाग हे बगदादला गेले असल्याने पदार्थ–विज्ञानशास्त्राच्या विभागांत यंदा प्रा. पुरोहित यांची विभागप्रमुख म्हणून नेमणूक झाली. प्रा. पुरोहित यांनी गेलीं १६ वर्षे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये व सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केलें आहे. व एक अत्यंत विद्वान व तळमळीचा शिक्षक म्हणून तेथे त्यांनी नांवलौकिकहि मिळविला आहे. पदार्थविज्ञानशास्त्रावरील त्यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहिलेलीं पुस्तकें आज सर्वमान्य झालीं आहेत. अशा अनुभवी व व्यासंगी प्राध्यापकाचा कॉलेजला लाभ झाला ही गोष्ट अतिशय आनंदाची म्हटली पाहिजे. त्याचप्रमाणे यंदा इंग्रजीसाठी प्रा. तासे व अर्थशास्त्रासाठी प्रा. चिरमाडे या तरुण प्राध्यापकांची नेमणूक झाली. शारीरिक शिक्षणासाठी पी. टी. इन्स्ट्रक्टर म्हणून यंदा श्री. एस्. वाय्. कुळकर्णी यांची केवळ त्याच कामासाठी नेमणूक करण्यांत आली. त्याचप्रमाणे विज्ञानाच्या शाखेंत डेमॉन्स्ट्रेटर म्हणून श्री. झोपे, श्री. बी. के. पाटील, श्री. सराफ, श्री. लांडगे, श्री. पंडीत, श्री. नावल यांची नेमणूक करण्यांत आली. या सर्वांचें आम्ही मनापासून स्वागत करतों व कॉलेजच्या उज्ज्वल परंपरेंत ते चांगली भर घालतील असा विश्वास प्रगट करतों.

## निरोप

गेल्याच वर्षी पीएच. डी. पदवी मिळविलेले डॉ. कार्णिक हे त्यांना विक्रम विद्यापीठामध्ये रीडरच्या मानाची जागा मिळाल्याने कॉलेज सोडून गेले. डॉ. कार्णिक गेलीं दहा वर्षे कॉलेजमध्ये काम करीत होते व आपल्या मनमोकळ्या व प्रेमळ स्वभावाने त्यांनी सर्वांचीं मनें जिंकलीं होतीं. त्यांच्या विषयांत त्यांचें संशोधन तर सतत चाललेलेंच असे. त्यासाठी त्यांनी जवळ जवळ सर्व सातपुडा पालथा घातला होता. एन्. सी. सी. मध्येहि सेकंड लेफ्नंट म्हणून त्यांची निवड झाली होती व त्या क्षेत्रांत आपली कार्यक्षमताहि त्यांनी प्रगट केली होती. डॉ. कर्णिक आता मोठ्या मानाच्या जागेवर जात आहेत. तेथे त्यांच्या व्यासंगी वृत्तीला योग्य तो वाव मिळून त्यांचा त्या क्षेत्रांतील नांवलौकिक वाढेल अशी आशा वाटते. त्यांना आम्ही सुयश इच्छितों. प्रा. कर्णवार प्रा. परड्डी व श्री. जोशी हेहि इतरत्र अधिक चांगला वाव मिळाल्यामुळे कॉलेज सोडून गेले. डेमॉन्स्ट्रेटर्सपैकीं श्री. परांजपे, श्री. व्ही. जी. पाटील, श्री. चौधरी, श्री. वाणी, श्री. खडके, श्री. बी. व्ही. पाटील हे कुणी उच्च शिक्षणासाठी तर कुणी अधिक चांगली नोकरी मिळाली म्हणून संस्थेतून बाहेर पडले. त्या सर्वांना आम्ही सुयश इच्छितों.

## माननीयांच्या भेटी

आपल्या कॉलेजांतील विविध संस्थांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक माननीय व्यक्तींनी यंदा कॉलेजला भेट दिली. मराठींतील सुप्रसिद्ध लेखिका सौ. मालतीबाई बेडेकर ( विभावरी शिरूरकर ), महाराष्ट्र कवि यशवंत, सुप्रसिद्ध कथाकार वामन चोरघडे, धुळे येथील कॉलेजांतील मराठीचे प्राध्यापक ह. श्री. शेणोलीकर, अमळनेर येथील प्रा. ल. के. कुळकर्णी, अकोल्याचे प्रसिद्ध शायर वा. वा. पाटणकर, भुसावळचे प्रसिद्ध कवि श्री. के. नारखेडे इत्यादी साहित्यिकांनी वादविवाद सभा व मराठी वाङ्मय मंडळ यांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने भेटी दिल्या प्लॅनिंग फोरमच्या निमित्ताने मराठवाडा विद्यापीठाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. बोरकर व जळगांव येथील जिल्हाधिकारी श्री. सुब्रम्हण्यम् हेहि कॉलेजांत येऊन गेले. स्नेहसंमेलनाचे मुख्य पाहुणे म्हणून मराठींतील प्रसिद्ध लेखक व पंजाबचे राज्यपाल माननीय श्री. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांच्या भेटीचा लाभ झाला. त्याचवेळीं महाराष्ट्र राज्याचे उपमंत्री श्री. मधुकरराव चौधरी हेहि हजर होते.



विद्यापिठीय तपासणी–समित्यांच्या भेटीः–कॉलेजच्या तपासणीसाठी निरनिराळ्या विभागांकरिता विद्यापीठाच्या निरनिराळ्या समित्या तपासणीसाठी आल्या होत्या. त्यांतील प्रमुख अशा

झुऑलॉजी–प्रिन्सिपलः– प्रा. बी. जी. शिरोळे,
फर्ग्युसन कॉलेज

बी. कॉम्. तृतीय वर्षः– प्राचार्य एन्. ए. मावळणकर
बी. एम्. कॉलेज ऑफ
कॉमर्स–पुणें

प्राचार्य एल. एन्. वेलिंगकर
आर. ए. पोदार कॉलेज
ऑफ कॉमर्स

इंग्रजी स्पेशलः– प्रा. आर. आर. मालेगांवकर
स. प. कॉलेज

त्रैवार्षिक तपासणीः– विज्ञान शाखा
प्रा. एन. आर. कुळकर्णी
फर्ग्युसन कॉलेज

डॉ. एम्. डब्ल्यू. चिपलोनकर
पुणे विद्यापीठ

डॉ. एन. एन. गोडबोले

प्रि. एस. ए. परांडेकर, जनता
महाविद्यालय, अर्जुननगर

## स्नेहसंमेलन

प्रा. सौ. नलिनी तारळेकर यांच्या नेतृत्वाखालीं यंदाचें स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहाने पार पडलें. या वर्षी मुख्य पाहुणे म्हणून मराठींतील नामवंत साहित्यिक श्री. न. वि. गाडगीळ यांचा लाभ झाला होता. त्यांच्या सोयीसाठीं त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य समारंभ शनिवार दि. २५ नोव्हेंबर १९६१ रोजीं घेण्यांत आला. श्री. काकासाहेबांचें त्यावेळचें भाषण म्हणजे त्यांच्या उत्कृष्ट व प्रभावी वक्तृत्वाचा एक नमुनाच होता. प्रचलित राजकीय व अर्थशास्त्रीय अनेक समस्यांना स्पर्श करीत त्यांनी आपले विचार अतिशय परिणामकारक रीतीने विद्यार्थ्यांसमोर मांडले. प्राचार्य महाजन यांचें काकासाहेबांचा परिचय करून देणारें भाषण व काकासाहेबांचें अत्यंत विचारपरिप्लुत व प्रभावी असें व्याख्यान हीं या वर्षांतील दोन उत्कृष्ट भाषणें. स्नेहसंमेलनाचा दुसरा हप्ता दि. २३ व २४ या तारखांना पार पडला. कलामंडळाने श्री. पु. ल. देशपांडे यांचें ‘अंमलदार’ हें नाटक सादर केलें. दुसऱ्या दिवशीच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत विद्यार्थ्यांनी बसविलेले निरनिराळे कार्यक्रम सादर करण्यांत आले. स्नेहसंमेलन यशस्वी रीतीने पार पडलें याचें श्रेय संमेलनाच्या कार्याध्यक्ष सौ. नलिनी तारळेकर यांच्या कुशल नेतृत्वाला द्यावयास हवे. आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

या स्नेहसंमेलनाबरोबरच दोन उपस्नेहसंमेलनें हि यंदा गाजलीं. एक बायॉलॉजी असोशिएशनचें स्नेह संमेलन व दुसरें मराठी वाङ्मय मंडळाचें स्नेहसंमेलन. बायॉलॉजी असोशिएशनने स्नेहसंमेलनप्रसंगी सादर केलेला करमणुकीचा कार्यक्रम रेखीव व आकर्षक असा होता. मराठी वाङ्मय मंडळाच्या स्नेहसंमेलनासाठी महाराष्ट्र कवि श्री. यशवंत हे मुख्य पाहुणे म्हणून आले होते. त्यांचे ‘शब्दाचें सामर्थ्य’ या विषयावरील काव्यात्म व भावपूर्ण व्याख्यान आजहि अनेकांच्या स्मरणांत राहील. त्याचवेळीं आयोजित केलेल्या कवि–संमेलनांत श्री. यशवंत कवींनी आपल्या भावपूर्ण कविता आपल्या भरदार आवाजांत म्हणून दाखविल्या. या संमेलनाच्या निमित्ताने जळगांव जिल्ह्यांतील ललित साहित्याचें एक प्रदर्शनहि भरविलें होतें. रात्रीं सादर केलेला करमणुकीचा कार्यक्रमहि आकर्षक झाला. या दोन्ही संस्थांच्या कार्यकर्त्यांनी या संमेलनासाठी घेतलेले श्रम व विद्यार्थ्यांनी त्यांत भाग घेऊन दाखविलेला उत्साह पाहिला की विभागवार स्नेहसंमेलनाचें यश डोळ्यांत भरू लागते. या दोन्ही संस्थांचें मनःपूर्वक अभिनंदन.

## विविध संस्था

आपल्या कॉलेजमधील विविध संस्था किती कार्यक्षम आहेत हें शेवटीं छापलेल्या त्या त्या संस्थांच्या अहवालावरून लक्षांत येण्यासारखें आहे. गेलीं दोन तीन वर्षे सुप्तप्राय असलेल्या कलामंडळाने यंदा पुन्हा उचल खाल्ली. पंधरा आगष्टला त्यांनी विविध करमणुकीचा कार्यक्रम सादर केला. स्नेहसंमेलनप्रसंगीं ‘अंमलदार’ हें

नाटक यशस्वीरीत्या करून दाखविलें व २६ जानेवारीला चित्रकेलेचें प्रदर्शन भरविलें. कलामंडळाने दाखविलेल्या या उत्साहामागे प्रा. ग. ह. तारळेकर यांची प्रेरणा आहे. सायन्स असोसिएशनने अणुशक्तीवर जो परिसंवाद घडवून आणला तो सर्वच दृष्टींनी अतिशय महत्वाचा झाला. प्रत्येक शास्त्रांतील प्राध्यापकाने अणुशक्तीची एकेक बाजू विवेचनार्थ घेऊन अत्यंत सोप्या भाषेंत त्या त्या बाजूचें दर्शन घडविलें. प्रा. पुरोहित यांनी 'Radar' वर दिलेलें व्याख्यान व पुणे विद्यापीठाचे प्रा. चिपळोणकर यांनी 'तारकाविश्व' या विषयांवर दिलेलें व्याख्यानहि पुष्कळ काळ स्मरणांत राहतील. मराठी वाङ्मय मंडळातर्फे सौ. मालतीबाई बेडेकर यांनी दिलेले 'माझ्या कादंबऱ्यांची भूमिका' हें व्याख्यान अत्यंत रसपूर्ण झालें. श्री. पाटणकरांच्या शायरीचा मराठी वाङ्मय मंडळाने पेश केलेला कार्यक्रम अत्यंत अभिनव असाच म्हणावा लागेल.

यंदा स्थापन झालेली नवीन संस्था म्हणजे लेडीज असोसिएशन. कॉलेजांतील हें नूतन महिलामंडळ प्रा. कु. लता पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखालीं विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय चांगलें कार्य करीत आहे. या मंडळाने आयोजित केलेले 'रांगोळी प्रदर्शन' 'हळदी कुंकू' 'खाद्य पदार्थांचें प्रदर्शन' या सारखे कार्यक्रम अत्यंत अभिनव असेच होते. विद्यार्थिनींमध्ये संघटनवृत्ती निर्माण होण्याच्या दृष्टीने व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्याच्या दृष्टीने हें मंडळ अत्यंत कार्यक्षम ठरेल अशी खात्री वाटते.

## आमचें वसतिगृह

प्रा. नाडकर्णी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली वसतिगृहाचें कार्य अत्यंत पद्धतशीर व शिस्तबद्ध रीतीने चाललें आहे. यंदा वसतिगृहांत एकूण ९८ विद्यार्थी व ११ विद्यार्थिनी राहात आहेत. गेली ३ वर्षें चालू असलेले वसतिगृहांतील अभ्यासमंडळहि अत्यंत उत्साहाने कार्य करीत आहे. यंदा वसतिगृहांतील विद्यार्थ्यांनी वर्गणी जमवून वसतिगृहाच्या सभागृहांत लावण्यासाठी राष्ट्रीय नेत्यांच्या प्रतिमा खरेदी केल्या. दि. १५ ऑगष्टला प्रा. अदवंत यांच्या हस्ते या प्रतिमांचें अनावरण करण्यांत आलें. महात्मा गांधी जयंति, सानेगुरुजी जयंति, सुभाष जयंति इत्यादि थोर पुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करणें व विविध चर्चा आयोजित करणें हेंहि अभ्यासमंडळाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे झाले. श्री. के. नारखेडे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ जानेवारीं रोजीं वसतिगृहाचें स्नेहसंमेलनहि अतिशय थाटांत साजरे झालें. वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचा उत्साह, विविध कार्यक्रम आयोजित करण्याची त्यांची हौस व संघटित वृत्ती यामुळे आमच्या वसतिगृहांचें वातावरण अगदी घरगुती व प्रसन्न वाटतें. प्रा. नाडकर्णी यांनाच याचें सर्व श्रेय द्यावयास हवें.

## अभिनंदन व नवीं प्रकाशनें

प्रा. मु. म. थत्ते यावर्षी आपल्या कॉलेजच्या प्राध्यापक वर्गाचे प्रतिनिधि म्हणून विद्वत्सभेवर निवडून आले.

प्रा. म. ना. अदवंत हे पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे चिटणीस म्हणून निवडून आले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखासभा जळगांव येथें स्थापन करण्यांत आली. त्याचे कार्याध्यक्ष म्हणून प्रा. राजा महाजन, खजिनदार म्हणून प्रा. मु. का. जोशी व कार्यकारिणीचे एक सदस्य म्हणून प्रा. म. मो. केळकर यांचा निवड झाली.

या सर्वांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

यंदा आमच्या प्राध्यापक वर्गाचीं खालील प्रकाशनें प्रसिद्ध झालीं आहेत.

प्रा. म. द. नाडकर्णी

( 1 ) Engineering Chemistry
( 2 ) Introductory Practical chemistry
( 3 ) Experimental Orgnic Chemistry

प्रा. म. मो. केळकर

( १ ) मालविकाग्निमित्रम् ( संपादन )



**आभारः—** हा अंक तयार करण्याच्या बाबतींत आम्हांला सर्वांचेंच सहाय्य झालें आहे. विद्यार्थि–विद्यार्थिनींनी व प्राध्यापक वर्गाने आम्हाला तत्परतेने साहित्य देऊन अंक दर्जेदार करण्यास मदत केली. येथील सुप्रसिद्ध चित्रकार श्री. वसंतराव केळकर यांनी मुखपृष्ठासाठी आकर्षक डिझाईन काढून दिलें व दरवर्षाप्रमाणे अखिल भारतीय कीर्तीचे कलावंत श्री. केकी मूस यांनी त्यांच्या दोन कलाकृति ( Table-tops ) अजिंठ्यांत छापण्यासाठी दिल्या. या सर्वांचे मानावे तितके आभार कमीच पडतील. श्री. दलाल यांनी मूसच्या चित्रांची छपाई अतिशय आकर्षक रीतीने करून दिली याबद्दल त्यांचे मुद्दाम आभार मानावयास हवेत. श्री. वसंतराव केळकर, श्री. मूस व श्री. दलाल या तीनहि कलावंतांनी आजवर आमच्या कॉलेजबद्दल व 'अजिंठ्या' बद्दल जी आत्मीयता व जें प्रेम दाखविलें त्याबद्दल त्यांचे कसें उतराई व्हावें हें कळत नाही. असाच लोभ त्यांनी 'अजिंठ्या' वर नित्य ठेवावा हीच विनंती.

डेक्कन प्रिंटिंग प्रेसचे श्री. नेहेते यांचे व आमचे संबंध अगदी घरच्यासारखेच झाले आहेत. डिसेंबर सुरू झाला की अजिंठ्याच्या संपादकाचा मुक्काम प्रेसमधेच असावयाचा. एकीकडे काव्यशास्त्रविनोद व एकीकडे मासिकाचें काम असे अडीच तीन महिने नेहेते मास्तरांच्या सहवासांत केव्हां निघून जातात हें कळतहि नाही. त्यांचे आभार मानलेले त्यांना आवडायचे नाही व तो औपचारिकपणाहि आम्ही दाखवित नाही. अंक काढण्याची आमची घाई व नेहेते मास्तरांचा संथपणा व शांतपणा यांतून निर्माण होणारे प्रेमळ संघर्षहि मोठे मजेदार असतात. शेवटी मास्तरांचाच विजय होतो. पण त्यांतहि एक निराळी गोडी अनुभवास येत असते. चित्रशाळा प्रेसचे श्री. दामुअण्णा रानडे हे तर माझे स्नेहीच. त्यामुळे आभार मानण्याचा औपचारिकपणा त्यांनाहि रुचावयाचा नाही.

हा अंक तयार करतांना प्राचार्य महाजन यांनीं दिलेलें उत्तेजन व केलेलें मार्गदर्शन सतत आमच्या पाठिशी होते. त्यांनीं दिलेल्या सवलतींचा अंक तयार करतांना जास्तींत जास्त उपयोग करून घेतला आहे. त्यांनी घालून दिलेल्या पृष्ठसंख्येच्या किंवा खर्चाच्या मर्यादांचें आमच्या हातून अतिक्रमण झालें तरी त्याबद्दल नापसंति व्यक्त न करता त्यांनी आमचें कौतुकच केलें. त्याबद्दल त्यांचा ऋणनिर्देश कोणत्या शब्दांत करावयाचा? पण कांही कांही लोकांचें ऋण कधीच न फिटणारें असतें व त्या ऋणांत सदैव राहण्यांतच खरा आनंद असतो. प्राचार्य महाजन यांचें ऋण हें अशाच प्रकारचें नाही काय?



## —० पसायदान ०—

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषौनि मज देयावें, । पसायदान हें ॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूता परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥
दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जे वांछिल तो तें लाहो प्राणिजात ॥
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥
चलां कल्पतरूंचे अरव । चेतनाचिंतामणिचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तण्ड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥

( ज्ञानेश्वर



CHALLENGE

AJINTHA
1962



# अजिंठा

## मराठी विभाग

अभिजात कलाकृति विविध प्रकारच्या ऊर्मींतून जन्म घेऊं शकते. ती अनंतमुखी असते आणि विविध मुखांनी रसिकाशीं संवाद करते. सौन्दर्यसाधना हा एकच हेतु तिच्या मुळाशीं असतो असें म्हणता येत नाही. तिच्या आंतरिक ऐश्वर्यामुळे तिला सौंदर्य प्राप्त होतें, हें मात्र खरें. या ऐश्वर्यामुळे ती व्यक्तिमन उजळून काढते. बोधाचा आग्रह न धरतांहि ती मूल्यांचें संस्थापन करते आणि तिच्या प्रकाशांत जीवनाचें मर्म, जीवनाचें सौंदर्य आविष्कृत होतें.

म्हणूनच, अशा कलेच्या समीक्षेसाठी केवळ एका व्यवच्छेदक लक्षणाला मान्यता देऊन चालत नाही. तिच्या सौंदर्याची जाणीव ठेवावी लागते तशी तिच्यामध्ये अंतर्भूत असलेल्या मनोविश्वाची उकलहि करावी लागते. ज्या भूमींतून, ज्या परिस्थितींतून ती उदयास आली असते तिचीहि ओळख करून घ्यावी लागते. आणि अखेर जीवनमूल्यांच्या निकषावर तिची पारख करणें अवश्य होतें. या सर्व समीक्षातत्वांचा आश्रय केल्याखेरीज तिचा सर्वांगिण आस्वाद घेणें शक्य होत नाही.

— सौ. कुसुमावती देशपांडे

( ग्वाल्हेर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांतून— )

## -* भारतगौरव *-

उजळलीं गगनांतिल मंदिरें
गाउ या जयभारत आदरें ॥
आवेश एक जरि भिन्न वेश अन् भिन्न बोलत्या भाषा
या असंख्य हृदयीं रोज निनादे एक अखंडित आशा
इतिहास येथला आम्हा घाली सदैव अमृतस्नानें
शूरत्व कुणी साधुत्व कुणी त्यागांत गुंफि भूषणें
मुक्तिला लाजविती मोहरें
गाउ या जयभारत आदरें ॥१॥

तापले ऋषी नाचली उर्वशी गीता रणिं जन्मली
शृंगार आणि अंगार जिवानें इथेच आलिंगिली
येथेच प्रीतिचा ताज राज्यही शांतिचें पाहिलें
येथेच चुड्यांनी कड्या वज्रशा ठुकरावुनि दाविलें
वारसा नित्य अम्हा पाझरे
गाउ या जयभारत आदरें ॥२॥

हे विशाल सिंधू अभेद्य गड हे पहाडांतले कडे
लोण्यासम हृदयें घालतीं येथे पोलादी साकडें
उजळते रंग नव पराक्रमांचे इथे नभाची अभा
हें राष्ट्र महाराष्ट्रही दाखवी निष्ठा ती दुर्लभा
दिव्य मानव्य इथे अंकुरें
गाउ या जयभारत आदरें ॥३॥

या असीम सीमा हिमवज्रांकित सागरवाहू स्फुरे
रूपांत येथल्या सामर्थ्याला सौन्दर्याचे तुरे
हा गंगायमुना सुवर्णसंगम नित्य इथे प्रीतिचा
फडकतो नभीं हा ध्वज चक्रांकित दूत विश्वशांतिचा
विलसतीं शिखरें अन् गोपुरें
गाउ या जयभारत आदरें ॥४॥

— राजा महाजन



## -० दूधसागर ०-

चांदणं दुधाळ सांडलं चौफेर
गोरी गोरी पान रजनी सुंदर
वाहते सरिता पीयूषाचा पूर
अशी ती भेटण्या प्रियास आतूर

निघतांना गोपी मथुरेच्या हाटीं
खट्याळ कन्हैया फोडीत घागरी
धरुनिया नेम अचूक टिपुनी
रजनीचा घट सांडला भूवरीं

त्याच दुधाने ही भिजली धरणी
दुधाळल्या वृक्षीं फळें दुधाळलीं
दुधाळल्या बागा दुधाचींच तळीं
इथे तिथे दूध धुंद रातराणी

गोकुळनगरीं आश्चर्य वर्तलें
दुधाचे सागर भूवर सांडले
खाचखळग्यांत साकळलें दूध
म्हणतात लोक त्यांस ग्रह-तारे

वाऱ्याचाहि स्पर्श चिंब भिजलेला
आभाळाचा माथा दुधीं रंगलेला
दृष्टि जाई तेथे दिसे दुधी रंग
दुधाळले शब्द दुधाळ आनंद !

× × ×

— मधु फालक
तृतीय वर्ष, कलाविभाग

## कथा....

वाट अशी वेडीपिशी
म्लान अशी शुक्रप्रभा
रात्रीच्या या काठावर
भिजलेला चंद्र उभा

निवांतशा जलाशयीं
साकारली एक व्यथा
आणि हळव्या शब्दांना
आठवली दीर्घ कथा

इथे भोळ्या शपथांनी
विसराव्या चिंब सरी
उभा जन्म दिलें मोल
अजुनी हा घाव उरीं

आणि भिजल्या डोळ्यांना
झाली काठावर सांज
दूर दूर कोठेतरी
आता हरवली नीज !

कु. मृणालिनी पारकर
द्वितीय वर्ष-कला विभाग

## –० दूर तिथे तूं ०–

दूर तिथे तूं आणि इथे मी
तुला सारखा स्मरे

तुझ्या वाचुनी शून्य मनीं या
माझ्या कांही नुरें

दूर तिथे तूं परंतु दिसशी
चराचरीं गे मला

फुलाफुलांतुन तुझ्या मनांतिल
भाव गडे वहरला

दूर तिथे तूं म्हणुनि आपुली
सांग कथा का सरे ?

वसुंधरेच्या कहाणींत ग
अर्थ तिचा पाझरे !

दूर तिथे तूं रेंगाळत मी
तुझ्या स्वप्नसंभ्रमीं

गुप्त मिठी मज घालतात हे
हात तुझे रेशमी !

दूर तिथे तूं ? नव्हे इथे तूं
इथेच मम अंतरीं

अखंड ओठीं अन् हृदयीं घुमे
दूरुन तुझी बासरी !

—दीक्षित बी. बी.
बी. अे. प्रथम वर्ष

## वेडें मन....

शहारले तरु स्वप्नमग्न रान
जरा हललें ग वेडें पिसें पान
गोरा गोरा चंद्र गोरीशी चांदणी
रातकिडे धुंद एकसूरीं गाणीं
कळीकळीमध्ये स्तब्ध गंधकळा
पाकळ्यांच्या कुशीं षट्पद सावळा
नाचरा गुलाबी गंधवेडा वारा
क्षणाक्षणावर प्रीतीचा इशारा
परि वेडें मन तोल सुटलेलें
आशेच्या वाटेला श्वास रोखलेले

— रवीन्द्र मेढे
व्दितीय वर्ष–कला विभाग

* × *

## असा वेडा पारिजात

असा वेडा पारिजात
झाला देठ देठ वेडा
वाहत्या रे झुळुकीला
याने दिला स्वप्नविडा !
झुळुकीच्या ओठांतली
धुंद गारव्याची चव
पारिजाताच्या मनांत
नाचे वेदनेची लव !
कळी कळी उधळून
झाला कुबेर कंगाल
पहाटेच्या पापणीला
दिसे आगळा फुलूर !
असा वेडा पारिजात
झाला देठ देठ वेडा
एक वेड्या मुक्तिसाठीं
चढे मृगजळ कडा !

* × *



# थेंब....!

ले. कु. गुणसुंदरी केळकर,
बी. ए. प्रथमवर्ष

एक थेंब आला. आकाशाच्या मुठींतून निसटला. पानावर पडला. पानाने दचकून पाहिलें तों त्याच्या मुठ्त एक चांदणी थरथरत उभी होती. तिला उचलून घ्यायला तें हळूच पुढे वाकलें. पण अरेरे ! तिला तेवढ्याचीहि चाहूल कळली वाटतं ! झरकन् निसटली. पानाच्या श्वासोच्छ्वासाची चाहूल लागली नाही तोच पळाला आणि......बिचारा जमिनीवर येऊन कोसळला. क्षणाचें अस्तित्व नाहीसें झालें. पण जातां जातां जमिनीवर एक पाण्याचा गोल ठसा उमटला. जीवित संपल्याची एक निशाणी ! त्याच्या स्पर्शाने मातीचा कण शहारला. त्याने तो गारवा आपल्या शरीराला लपेटून घेतला. जातां जातां थेंब कणाला चैतन्य देऊन गेला. लुकलुकत्या डोळ्यांनीं कण दुसऱ्या थेंबाची वाट पहात राहिला. बिचारें पान मनाशीं आपण घाई केली म्हणून उगीचंच हळहळलें. वाऱ्याला त्याने आपलें दुःख बोलून दाखविलें. रस्त्याचा वाटसरू वारा हंसत हंसत निघून गेला. त्याला अशीं दुःखें ऐकावयाची संवय लागली होती. या सुखदुःखाच्या सुरांनीच तर त्याला आवाज प्राप्त करून दिला होता.

मधाशीं पळालेल्या थेंबाला पहायला आकाश खालीं वाकलें. आणि मग त्याचा डोळा चुकवून— पंतोजींना शिक आलीसे पाहून सगळीं मुलें जशी एकमेकांना ढकलत वर्गाच्या बाहेर पडूं लागतात— तसे ते थेंब दाटीवाटीने त्याच्या मुठींतून बाहेर पडूं लागले. झाडाच्या शेंड्यावर पडले. तेथून दुसऱ्या पानांवर उतरले. आणि मग एखाद्या मनोऱ्याच्या पायऱ्यावरून गडगडत खालीं यावे, तसें ते थेंब एका पानावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्यावर अशा रीतीने घरंगळत घरंगळत खाली आले. पानें मात्र त्यांच्या या शिवाशिवीकडे स्तंभित होऊन पहातच राहिलीं. ते दोरावरून घसरत घसरत जमिनीवर येऊन थांबले. क्षणभर थांबले आणि मग त्या गुळगुळीत जमिनीवरून परस घसरूं लागले. गळ्यांत गळा घालून ओहोळाला जाऊन मिळाले.

कांही छपरावर टेकले; आणि लगबगीने स्वतःला सावरत कडेवरून खालीं ओघळले, आणि मग एकाच्या मागून एक दुसरा करत करत थेंबाची माळ छपरावरून ओघळूं आगली. त्यांच्या त्या गतीला आकार आला आणि मग आकार आणि गति एकमेकांत मिळून गेले... एका थेंबाने दुसऱ्या थेंबांत विरघळून जावं तशी !

आकाशांतून थेंबामागून थेंब पडत होते. ते इतके जवळ जवळ होते की एक मुंगीहि त्याच्यामधून जाणें शक्य नव्हतें. त्यांना गति प्राप्त झाली होती. त्या थेंबांतून त्या गतीची एक रेषा तयार झाली होती.. आकाशांतून जमिनीकडे ती धांवत होती; आणि जमिनीवर पडून तुटत होती, मोडत होती. तरीसुद्धा त्या दोऱ्याचे रीळ संपत नव्हते. किती लांब ! एका महाभूताच्या हातून दुसरें महाभूत त्याला चुकवून पळून जात होतें. थेंबा–थेंबांनी पळत होते; आणि मग हातांत हात धरून पळत होतें. परत एकदा एकसंघ होण्यासाठी धडपडत होते.

थेंबाथेंबाने धारा तयार होते. गतीची दिशा दाखवली जाते आणि मग तेंच थेंब पाटीवर रेखले जातात. जवळ जवळ काढले जातात. मुंगीहि जाऊं शकणार नाही इतकंच अन्तर त्यांच्यांत राखलं जातं आणि मग रेषा बनते. बिंदूंची पळण्याची दिशा दाख–विली जाते. आकाशांतला पाण्याचा थेंब पाटीवर रेखला गेल्यावर त्याला बिंदू नांव प्राप्त होतें. आणि मग क्षण–भंगूर थेंब बिंदूच्या रूपाने अमर होतो. त्याची गति रेषेच्या रूपाने साकार होते. आणि मग त्या बिंदूच्या गतीने आकृत्या तयार होतात. डोळ्यांत पडलेली प्रति–बिंबें अमर करण्याचा प्रयत्न केला जातो. अवकाशाला छेदणाऱ्या रेषा कागदावर उतरतात. रेषांचें विश्व तयार होतें.

पारिजातकाच्या निष्पर्ण झाडावरून थेंब ओघळतात. जातां जातां पानांचीं दारं ठोठावतात. सालीच्या आंत झोपलेल्या पानबाळांना जाग येते. हळूच... दार उघडून

तीं डोकावून बघतात. आणि सृष्टीचें ओलेतं, स्निग्ध रूप पाहून हरखून जातात. दारें तशीच उघडीं ठेऊन तीं पानबाळें समोरच सौन्दर्य निरखत रहातात. क्षणांतच सालीचा रंग हिरवा होतो.

एखादा थेंब असाच रेंगाळत रेंगाळत सर्वांच्या मागून येतो. झाडाच्या पानावर ठिबकतो मघांच्या अनुभवाने शहाणें झालेलें पान तसेंच त्याला तेथे विसावूं देतें. अनिमिष नेत्राने त्याच्या सौंदर्याकडे पहात रहातें. वाऱ्याने थेंब थरारतो. त्याच्या भावविश्वांत तरंग उठतात. ढगाच्या मुठींत असतांना त्याला पांढऱ्या रंगाशिवाय रंगच माहिती नव्हता. जिकडे पहावें तिकडे पांढराशुभ्र रंग! तेथे ना काना ना कोपरा. नाही जडता, नाही स्पर्श. सगळं कसं निराकार, निराधार, स्पर्शविरहीत. हा पानाचा मऊ मऊ स्पर्श त्याला नवीन होता. तो त्याला सुखवीत होता. त्याने स्वतःकडे वळून बघितलें. त्याचा रंग बदलला होता. आकाशांत असतांना त्याला रंगच नव्हता, रूप नव्हतं एवढंच काय ! स्वतंत्र अस्तित्व तरी कुठे होतें ? आता त्याला हिरवा रंग प्राप्त झाला होता. त्याला अस्तित्व प्राप्त झालें होतें ! त्या हिरव्या रंगाच्या गारव्यानं तो शहारला. त्याच्या भोवतालीं रंगाचें साम्राज्य पसरलें होतें. मातीचा तपकिरी रंग, रस्त्याचा काळा रंग, कौलांचा लाल रंग, घरांचा पिवळा रंग... आणि आकाश ! ज्या आकाशांतून तो खालीं आला होता त्याच्याकडे त्याने पाहिलें. ओहो ! काय आश्चर्य... त्या आकाशाचा रंग निळा होता. आणि मग पांढरा रंग ! अहं ऽऽ कुठेतरी आकाशाच्या कोपऱ्यांत पांढऱ्या रंगाचे तुकडें पसरले होते. म्हणजे त्यानं कल्पना केली होती त्यापेक्षां आकाश मोठें होतें तर !

त्याच्या भोवतीचे रंग नुसतेच नव्हते. त्यांना गंधहि होता. गंधाच्या आधाराने त्या रंगांचें अस्तित्व जाणवत होते. मातीचा धुंद गंध; कौलांचा शेवाळी गंध; फुलांचा मस्त गंध आणि हो त्याला स्वतःलाहि गंध येत होता. हिरवा गंध ! स्वतःच्या अस्तित्वाच्या जाणीवेने तो स्वतःला हरवून बसला.

आणि इतक्यांत ढगांच्या आडून एक सोनेरी किरण हळूंच लपत छपत आला. थेंबाशीं खेळूं लागला. सोनेरी किरणामुळे थेंबहि सोनेरी झाला. किरणाच्या उबेची त्याने दुलई पांघरली. आणि मग थेंबाचें तें विलोभनीय रूप पाहून पानाला आपला मोह आवरेना. त्याने श्वाससुद्धा कोंडून घेतला. आणि हलक्या पावलाने तें थेंबाच्या जवळ गेलें. आणि हाय ! पान थेंबाला उचलणार, इतक्यांत लबाड किरण त्याला घेऊन पळाला सुद्धा. पानाला फक्त त्याचा स्पर्श हुळहुळत राहीला. निराश झालेल्या पानानं तोच स्पर्श आपल्या स्मृतीच्या कप्प्यांत जपून ठेवला. हावरेपणाने तें त्या लबाड उन्हाकडे पाहूं लागलें.

पण थेंब ! त्याला जाणवलें तसें त्याला खरोखरच अस्तित्व प्राप्त झालें होतें ! पानावरचा थेंब हिरवा दिसतो कौलावरचा थेंब लाल दिसतो. आणि रस्त्यावरच्या पेट्रोलवर पडलेला थेंब ! त्याला तर नानाविध रंग, नानाविध तरंग प्राप्त होतात एवढ्याशा थेंबांत रंगाची दुनिया सामावली जाते. आकाशांतल्या इन्द्रधनुष्याचें चोरून आणलेले रंग तो मुक्त हस्तान उधळीत असतो. एकच थेंब तऱ्हेतऱ्हेचीं व्यक्तिमत्वें प्राप्त करून घेतो. स्वतः निराकार राहूनसुद्धा आकार प्राप्त करून घेतो. दुसऱ्याच्या अस्तित्वांत आपल्याला सामावून घेतो. आणि तरी देखील स्वतःच्या वेगळ्या व्यक्तिमत्वाने चमकतो. भूमिका रंगवतो.

आकाशांतून पाण्याचा थेंब धरतीवर पडतो आणि मग सारी धरती ओलींचिंब होऊन जाते. काळोखाचा थेंबहि असाच वातावरणांत टपकतो आणि मग टिपकागदावर शाईचा थेंब पडावा आणि पसरावा तशी काळोखाचीं वर्तुळें पसरत जातात.

आणि अश्रूचा थेंब ! बालकाच्या अश्रूचा थेंब, मातेच्या अश्रूचा थेंब, विरहिणीच्या अश्रूचा थेंब आणि या सर्वांहून मोठा सामर्थ्यवान, दलिताच्या अश्रूचा थेंब ! पापणीशीं येऊन थबकलेला तो थेंब जमिनीवर पडला तर !...... ...



# माझी सायकल हरवते- त्याची गोष्ट....

ले.- मो. शं. केसकर, बी. एस्सी. तृतीय वर्ष.

" बाप्या, ऊठ " मला झोपेंत कुणीतरी गदगदा हलवत होते. " अरे सोड यार. " असें म्हणून मी नेहमीप्रमाणे करवट बदलली आणि डोक्यावरून पांघरूण ताणलें. पण हाय ! खस्सकन् तें पांघरूण नान्याने—म्हणजे आमचे ज्येष्ठ बंधु ओढले. ( नान्या हें मी त्याला लाडाने आणि कधी कधी रागाने पण संबोधतों. ) आणि लगोलगच माझी कॉलर धरून कुणीतरी मला उठवले. तरी पण उठून बसवल्यानंतर मी लवंडलों आणि रग अंगावर घेण्याचा अर्धवट प्रयत्न झोपेंत चालू होता, तोंच कमरेंत एक सणसणीत लाथ बसली. आणि मग मात्र अस्मादिकांची झोप उडाली. नान्या माझ्या-पेक्षा केवळ दोन वर्षांनी सीनीयर ( आणि तेहि फक्त वयाने ) असतां मला लाथ मारण्याची त्याची मजल ? आणि तीही अशा सुदर वेळीं ? या विचाराने मी ताडकन उठून बसलों आणि डोळे चोळत चोळतच त्याला एक गुद्दा लगावणार तेवढ्यांत आमचे अण्णा कडाडले, " बाप्या, कुणावर हात उगारतो आहेस ? " आणि मग मी सताड डोळे उघडून समोर पाहिले तों अण्णा, आई समोर उभे व नान्या, ताई, विलास वगैरे घरांतली सर्व मंडळी माझ्या गादीभोंवती जमा झालेली; व माझ्याकडे चमत्कारिक नजरेने पहात असलेली मला आढळली. यावरून आपणांस मिळालेली लाथ अण्णा-कडूनच मिळाली असावी असा मी तर्क केला. पण लाथ मारून झोपेंतून उठविण्याची ही काय पद्धत झाली ?

आमच्याकडे मला झोपेंतून उठवणें हें फार कठीण कार्य आहे अशी सर्वांची समजूत होऊन बसली आहे. आणि कांही अंशीं ती खरीहि आहे. कारण आम्ही पडलों कुंभकर्णांचे जातभाई ! आज रात्रीं झोपलों कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुणीतरी उठून बसविल्या-शिवाय उठायचे नाही हा आमचा शिरस्ता. म्हणूनच आमची ताई मला अनेकविध उपायांनी पहाटें उठ-विण्याचा प्रयत्न करते. कधी कधी ती मला प्रेमाने म्हणते, " अरे बापू, तुला बी. एस्सी. ला क्लास मिळवायचा आहे ना ? मग चल, ऊठ पाहूं. " पण असल्या प्रेमळ शब्दांचा माझ्यावर कांहीच परिणाम होत नाही. मग ती चहा करून देण्याची लालूच दाखविते. पण तरीहि आम्ही असे वस्ताद कीं तिला बधत नाही. मग उपहासानें शस्त्र बाहेर काढतें. मस्त गुलाबी थंडी बाहेर पडली असतां माझ्या कानाशीं भुणभूण लावते कीं तो शेजारचा दिनू व समोरची सरिता पहा, पहाटें चारचे उठले आहेत, नाही तर तूं ! यावर्षी कांही पास व्हायची लक्षणं दिसत नाहीत. अशा रीतीने मला उठविण्याचे विविध उपाय आजपर्यंत योजण्यांत आले होते. पण आजचा उपाय त्या मानाने फारच अघोरी वाटला. त्यामुळे मी मारक्या रेड्यासारखा ( म्हशीसारखा हा शब्दप्रयोग माझेबाबतींत चालण्यासारखा नाही ) सर्वांकडे पाहूं लागलों.

आता माझ्या झोपेचा अंमल पुरता उतरला होता, हें पाहून अण्णांनीच एकदम दरडावून विचारलें, ' बाप्या, सायकल कुठाय ? " हा प्रश्न इतक्या पहाटें मला अनपे-क्षित असल्याने मी तो पूर्ण न ऐकतांच पटकन बोलून गेलों, " मला नाही माहीत, नान्याला विचारा. " " मूर्खा, काल संध्याकाळीं तूंच सायकल नेली होतीस ना त्या टोळभैरवांबरोबर बाहेर जातांना ? " ( हा शब्द आमच्या मित्रमंडळीस उद्देशून होता. ) अण्णा माझ्यावर इतके भयंकर तापल्याचे पाहून नेहमीप्रमाणे आई माझ्या पार्टीस येऊन मिळाली आणि माझ्यावतीने अण्णांना सांगू लागली, " अहो, पण इतकं कातवायला काय झालं ? जरा दमानं घ्या. आपली सायकल बरोबर मिळेल. त्या पोरास काय आपलं फाड फाड बोलून घेतां आहांत ? " आईचा हा पॉइंट अण्णांना पटलेला दिसला आणि त्यामुळे त्यांच्या रागाचा पारा बराच खाली आला. व शेवटीं नॉर्मलवर येऊन त्यांनीं मला विचारलें, " बापू काल संध्याकाळीं तूं सायकल नेली होतीस ना ? " " हो" मी आतां निमूटपणे उत्तर दिलें. " मग ती आता कोठे आहे ? " त्यांनी माझेवर पुढचा प्रश्न टाकला आणि नेमकें याचेंच उत्तर मला देतां येईना. काल सायकल माझे जवळ होती पण ती कुठे मला सोडून गेली हें कांही केल्या मला आठवत नव्हतें. काल मित्रमंडळींत गप्पा

रंगांत आल्याने मी रात्रीं ११ पर्यंत त्यांचेबरोबर भटकत होतों. व ११॥ ला आमची स्वारी घरी उगवलीं ती सायकली वाचूनच. पण रात्रीं सगळेजण झोपले असल्याने मजजवळ सायकल नाही हें माझ्या व इतर कुणाच्याच लक्षांत आलें नाहीं. व सकाळीं उठून जो काय प्रकार झाला तो प्रारंभीं सांगितलाच आहे.

मग अण्णांनी परत अगदी “श्रीगणेशाय नमः” पासून सुरुवात करण्याच्या आविर्भावांत म्हटले “घरून निघाल्यानंतर तूं कुठे कुठे गेला होतास हें अगदी शांतपणें आठव बरं !” मी सांगायला सुरवात केली; “प्रथम मी पल्या विसरभोळेच्या घरीं गेलों. तेथे बंड्या, अप्पा, शाम्या वगैरे सर्व मित्रमंडळी जमलेलींच होती. फक्त शशीच कमी होता. म्हणून त्याला बोलावयाला त्यांच्या घरीं गेलों. पण तो जेवत होता म्हणून समोरच्या चाटूफळ्यांच्या ओट्यावर आम्हीं बसलों. व त्यावेळी सायकल बाजूला ओट्यांस टेकवून ठेवली. थोड्यावेळांतच शशी आला व आम्ही गांधीपार्कमध्ये गेलों.” “पण उठतांना तेथून सायकल बरोबर घेतली कां ?” अण्णांनी माझ्या भाषणांतील कच्चा दुवा पटकन पकडला. आणि माझ्या डोक्यांत लख्ख उजेड पडला. मी कबुली दिली, “नाही.” आणि त्याच क्षणीं नान्या अगदी आनंदाच्या उर्मि येऊन ओरडला, “जा आत्तांच्या आत्तां चाटूफळ्यांकडे. सांग त्यांना कीं मला सायकल वापरायची अक्कल नाही. कधीनवांत माझ्या हातांत सायकल आली. आणि त्यामुळे ती तुमच्या ओट्याजवळ विसरून गेलों. तरी आतां कृपाकरून आमची सायकल आम्हांला परत द्या.”

डोळे चोळतच मी शर्ट घातला आणि अण्णांना सांगितलें, “चहा घेऊन जातोंच.” पण तेवढेहि सौजन्य मला दाखविण्यांत आलें नाही. व अण्णा ओरडले, “जा म्हणतो ना अगोदर ?” “जातों, जातों’ म्हणत मी पायांत चपला सरकावल्या व चाटूफळ्यांकडे निघालों. तेथे गेलों तर स्वतः चाटूफळेच ओट्यावर जांभया देत उभे होते. मी जरा नम्र भाव चेहऱ्यावर आणीत अगदी खोल गेलेल्या आवाजांत काल घडलेली हकीगत सांगितली व कृपा करून माझी सायकल परत द्या अशी विनंती केली. पण ते तेवढ्यांत ओरडले, “तुम्हाला काय वाटलें आम्ही तुमची फडतूस सायकल दाबून ठेवली म्हणून ?” “नाही, तसं नाही वाटलं.”— मी बोललों. “मग काय वाटलं ? तुमची सायकल येथे नाही ती सिटी पोलीस स्टेशनवर आहे.” “आँ ! काय म्हणतां ?” आतां मात्र मला मूर्छित होण्याची वेळ आली होती. मग चाटूफळे मला ऐकवूं लागले, “येवढे कॉलेजला जातां आणि अजून साधी सायकल सांभाळतां येत नाही ? आणि आमचा ओटा म्हणजे काय सार्वजनिक जागा वाटली काय गप्पा मारत बसायला ? खबरदार आतां पुढे इथं गप्पा मारायला बसलांत तर ! नाहीतर असं करतों येथून चांगलं पक्कं पार्टीशनच टाकून घेतों म्हणजे मग तुमच्यासारख्या टोळभैरवांना येथे बसतांच येणार नाही.” “अहो पण माझ्या सायकलचें काय ?” मी केविलवाण्या सुरांत विचारलें. “कशी होती तुमची सायकल ?”— एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने कैद्यास गुरकावून विचारावें तसें त्यांनी मला विचारलें. “फिलीप्सची २२ इंची सायकल होती. चेन कव्हर होतं, घंटी होती, स्टँड होता, कॅरियर होता, म्युनिसिपाल्टीचा बिल्ला नव्हता व पुढे दांड्यावर बाबा सीट बसविली होती.” मी आवश्यक तेवढें वर्णन सांगितलें. तेव्हा ते म्हणालें कीं, तुमच्या वर्णनाप्रमाणेच असलेली एक सायकल येथे रात्रीं १० पर्यंत पडली होती पण तिला मालक न सांपडल्यामुळे आम्ही पोलीस स्टेशनवर नेऊन दिली. पुढे तें लहान मुलांचें सीट असल्यामुळे कुणा कॉलेजच्या पोराची ती सायकल असेल असें आम्हांस वाटलेंच नाही. तेव्हा आतां तुम्ही पोलीस स्टेशनवर जा.”

मी घरीं येऊन अण्णांना सर्व सांगितलें व म्हणालों कीं, तुम्ही चला ना पोलीस स्टेशनवर. पण त्यांनी तें साफ नाकारलें व मला बजावलें कीं, स्वतः केलेल्या भानगडी स्वतःच निस्तरायला शिका. नान्याला विचारायची सोय नव्हतीच. कारण माझ्या हातून झालेला गुन्हा हा तो स्वतःचा मोठा विजय मानीत होता. तेव्हा परत कालच्याच माझ्या साथीदारांस घेऊन आमची मिरवणूक सिटी पोलीस स्टेशनकडे वळली.

पोलीस स्टेशनमध्यें जाण्याचा तो पहिलाच प्रसंग असल्याने आम्ही जरा दबतदबत आंत गेलों. येवढ्यांत “कौन है बे ?” म्हणून एका कॉन्स्टेबलने आम्हाला हटकलेंच व सरळ त्यांच्या प्रमुखाकडे आम्हाला नेलें. प्रथम आमचें नांव, गांव, धंदा (!) विचारून मग आम्हाला त्याच्यासमोर आणण्यांच कारण त्यांनी त्या



पोलीसास विचारलें. आम्ही अगोदरच त्या पोलीसास सर्व हकीगत सांगितली असल्याने ती आणखीन रंगवून मी कशी वेंधळेपणाने सायकल हरवली तें सांगितलें, आणि नंतर मी त्याच्या सांगण्यांत पुस्ती जोडली कीं, आम्ही ती सायकल परत घ्यावयास आलों आहोंत. पण आमचें बोलणें ऐकतांच तो अधिकारी म्हणाला. “खूप दिसतां राव तुम्ही. ती सायकल इतक्या सहजासहजीं परत मिळेल असें वाटलें कीं काय तुम्हाला ? तिचा पंचनामा केलाय. आता मॅजिस्ट्रेट साहेबांच्या हुकूमाशिवाय ती सायकल येथून हलूं शकणार नाही. आता तुम्हाला कोर्टाचें समन्स येईल. मग तुम्हाला काय सांगायचें तें कोर्टात सांगा. व घ्या आपली सायकल दोन चार महिन्यांत परत. त्याचें तें बोलणें ऐकून माझ्या पोटांत तर एकदम भीतीचा गोळा उठला. कारण आज पोलीस स्टेशनसुद्धा आंतल्या बाजूने मी पहिल्यांदाच पहात होतों, आणि कोर्टाची पायरी चढायची तर अजून कधीच वेळ आली. नव्हती. येवढी भानगड करण्यापेक्षा आम्ही आपलें खास अस्त्र (!) जरा दबल्या आवाजांत काढलें. “हं ! कितींत काम होईल तें जरा सांगा. असं पहा आम्ही अजून शिकणारी पोरें. तेव्हा कोठे कॉलेज बुडवून या कोर्टाच्या भानगडी करायला लावता ? आमची ही पहिली वेळ आहे तेव्हा तुम्ही आम्हाला जरा सहृदयतेने वागवा ! तुमचाहि फायदा होईल; व आमच्याहि मागची कटकट वाचेल.” साहेबाला हा मुद्दा पटलेला दिसला. पण वरकरणी एकदम तसें न दाखवतां तो म्हणाला, “बरं, दुपारीं या; तेव्हा आपण पाहूं काय करायचें तें. व येतांना ज्यांनी सायकल येथे आणली त्या चाटूफळ्यांना पण तुमच्याबरोबर आणा. आम्हांला सर्वांचे जबाब घ्यावयाचे आहेत.” “बरं.” म्हणून आम्ही तेथून निघालों व तडक चाटूफळ्यांकडे गेलों. आम्हाला पाहतांच “आतां या टोळांचें येथे काय काम परत निघालें ?” असा भाव त्याच्या तोंडावर उमटला. पण आम्ही सोयिस्कररित्या त्याकडे दुर्लक्ष केलें. व सगळी हकीगत सांगून दुपारीं जबाब देण्यासाठी पोलीस स्टेशनवर येण्याची विनंती केली. प्रथम त्यांनी नकार दिला. पण आम्ही त्यांना बरेंच लोणी लावल्यावर कसेंबसें ते तयार झाले. परत दुपारीं आमचा काफिला पोलीस स्टेशनवर हजर झाला. प्रथम हवालदार साहेबांनी (!) चाटूफळ्याचा जबाब घेतला. व नंतर माझा जबाब घेणें सुरूं झालें नांव, गांव इत्यादि प्राथमिक स्वरूपाचे प्रश्न झाल्यावर त्यांनी मूळ मुद्यास हात घातला कीं, सायकल ज्या ओट्यावर तुम्ही बसला होता तेथेच ठेवली असतां उठतांना कुणाच्याच कसें लक्षांत आलें नाहीं ? याचें मी उत्तर देऊं लागलों “गंमत काय झाली साहेब कीं,...” “शट अप् !” साहेब मध्येच रागाने ओरडले व आपल्या हातांतील रूळ त्यांनी टेबलावर आपटला व मला सांगितलें, “ही काय गंमत चालली आहे ? तुमचा येथे जबाब चालूं आहे. तेव्हा जरा शुद्धीत येऊन नीट बोला.” अशा रीतीने समज मिळाल्यावर मात्र मग मी तोंडांतून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द विचार करून बोलूं लागलों. व या प्रकारे थोडा वेळ साहेबांचे व माझे व क्रमाने माझ्या मित्रवर्यांचे ‘सवाल जबाब’ झाले. मग साहेबांनी मोठ्या अधिकाऱ्यांसमोर कसें बोलावें याविषयीं एक तास घाट्या ताणून आमच्यासमोर आपली भाषणाची हौस फेडून घेतली, आणि आम्ही ‘बोअर’ झालों असतांहि जबरदस्तीने आम्हांस तें ऐकावें लागलें. माझा हा पहिलावहिलाच हलगर्जीपणा (जाहीर रीत्या झालेला) असल्याने साहेबांनी मोठ्या उदार बुद्धीने आमची सायकल त्यावरचा पंचनाम्याचा कागद फाडून माझ्या ताब्यांत दिली. तिला कैदखान्यांतून सुटलेले पाहून मला अक्षरशः आनंदाचें भरतें आलें व मी सायकलचें हँडल, सीट कुरवाळूं लागलों तेवढ्यांत “आम्हाला चहा वगैरे कांही नको बरं कां ?” असें म्हणून साहेबांनी इन्डायरेक्टली चहाची ऑर्डर सोडली. त्यामुळे चहा मागविणें भाग पडलें. मग मात्र “अहो, कशाला हें निष्कारण मागवलें ?” असें म्हणत त्यांनी सर्वांत आधी कप तोंडास लावला.

या चहापानाच्या कार्यक्रमानंतर आमची स्वारी सायकलसह— जगज्जेता शिकंदर आपली लढाई मारून आल्यावर जेवढ्या दिमाखाने राजधानींत येत असेल— तेवढ्या रुबाबांत एका हातांत सायकल धरून मित्रमंडळीसह पोलीस स्टेशनांतून बाहेर पडलों.

तिकडे त्या साहेबाला चहा पाजला त्यावेळी आमची मित्रमंडळी मोठ्या आशाळभूतपणे त्याच्याकडे पाहात होतीच. येतांक्षणींच त्यांनीं माझ्यावर एकच हल्ला चढविला. “लेका बाप्या, येवढी अडीचशें रुपयांची सायकल फुकटांत परत मिळवलीस त्याबद्दल आम्हाला कांही भत्ता देशील का नाही ? आणि माझ्या संमतीची वाट न पाहातांच त्यांनी मला “मद्रास” मध्यें खेचलें; आणि सामोसा, कचोरी, बटाटेवडा, डोसा, स्पेशल चहा इ. ची फर्मास दांडगी ऑर्डर सोडली; व ढेकर देईपर्यन्त खाल्ले. काऊंटरवर मुकाट्याने पांच रुपयाची नोट ठेवून व मोठ्या आठवणीने सायकलीला घेऊन तिला प्रेमाने कुरवाळींत आमची स्वारी घराकडे वळली.

# गर्दीमहात्म्य ....

ले.– प. शं. केसकर
पदवीपूर्व– व्यापार विभाग

" अय्या! परवाच ना ग तुझें लग्न? मग अजून तर कोणीच पाहुणें दिसत नाहीत तुमच्या घरीं!"

" नाही तर काय! आमच्या बाबांच्या डोक्यांत एक नवेंच खूळ शिरलेंय. म्हणे काय करायचत हे खंडीभर पाहुणे. खाण्यापुरते येतात. कोणाचें लग्न आहे हें सुद्धा पुष्कळांना माहीत नसतें कधीकधी."

" अग पण प्रेझेन्ट्स कशी काय मिळतील तुला पाहुण्यांशिवाय?"

अगबाई! ही कल्पना अजून त्या नववधूला आली नव्हती खरेंच कीं! पाहुण्यांशिवाय कशी काय मिळतील प्रेझन्ट्स? तिच्या मैत्रिणीने असें म्हटल्याबरोबर ती आणखीच खिन्न झाली. आपला जेवणाचा खर्च त्यांच्या आहेराने भरून निघतो हें आपल्या बाबांना कसें सुचलें नाही याचें तिला आश्चर्य वाटलें. पण आहेराचें जाऊं द्या. मंडळी भरपूर असली तर किती शोभा येते कार्याला. कोपऱ्यांतून गुरव सनईचे सूर काढीत आहेत आणि पाहुणे मंडळी झकपक पोषाख करून इकडे तिकडे मुंबईच्या मोटारीसारखी निष्कारण फिरत आहेत. किती मजा येते. कोणाला कांही काम नसतें. पण आपण फार कामांत आहोंत हें दाखविण्याची सगळयांची धडपड चालू असते. खरोखरच पाहुण्यांच्या गर्दीने लग्नाला आगळीच शोभा येते. मग याच्या अगदी विरुद्ध होणाऱ्या आपल्या लग्नाचा देखावा तिला दिसूं लागला. पांच माणसे वराकडे आणि चार माणसे वधूकडे असें केविलवाणें लग्न तिला दिसूं लागलें आणि तिला गर्दीचें महत्व पटलें. तावडतोब तारा करून सगळया पाहुण्यांना जितकी गर्दी घेऊन येतां येईल तितकी घेऊन या असें कळवावेंसें तिला वाटूं लागलें.

गर्दी आहेच अशी अजब चीज! गर्दीच्या अतिरेकानेहि माणूस वैतागतो आणि ती नसली तरी तो केविलवाणा होतो. एखाद्याला आपल्या लग्नाला खूप पाहुणे जमावे असें वाटत असेल तर पाहुण्यांची गर्दी जमविण्याचा हमखास उपाय म्हणजे त्याने लग्नपत्रिकेंत खालीं एक विशेष सूचना लिहून द्यावी कीं, ' लग्नाला येतांना आहेर आणूं नये. ' आणि मग पहा नेहरूंच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणाला जास्त गर्दी होते कीं, तुमच्या लग्नाला. अगदी तुमच्या आतेबहिणीचा मावस दीरसुद्धा त्याच्या अर्धा डझन पोरांना घेऊन तुमच्या दारांत दत्त म्हणून उभा राहील.

पण जरा सबूर! अशी गर्दी जमवायला युक्ति लागते खरी. पण ही गर्दी अशी आहे कीं, एकदा तिच्यावरचा ताबा गेला कीं, गर्दी जमविणाराच पुष्कळ वेळा मूर्ख ठरतो. नको त्या ठिकाणीं झालेली भाऊगर्दी पांगविणें हें एक दिव्यच आहे. तरी पण साधारणपणे गर्दी ही भित्री असते. गर्दीच्या ठिकाणीं पोलिसांनी हवेंत बंदुकीचे चारपांच बायबार काढले किंवा लाठ्या नुसत्या जमिनीवर आपटल्या की तावडतोब सगळी गर्दी पांगते. आणि त्या ठिकाणीं स्मशानशांतता पसरते. वरील उपाय पोलिसांना नेहमी वापरावे लागतात. पण एकदा मुंबईला एक महाभयंकर आग लागली होती. ती आग पाहण्यासाठी भोंवतालच्या टापूंतील हजारों माणसे गोळा होत होती. लग्नाचा माणसे काय वाटेल तें पहाण्यांस जमा होतात. लग्नाचा सोहळा असो किंवा अन्त्ययात्रेची तयारी असो, बारावें असो नाहीतर बारसें असो, माणसे बघायला येणारच. खून करणाऱ्या व्यक्तीची किंमत ती किती? पण त्याला काय शिक्षा मिळते तें ऐकायला कोर्टांत माणसांच्या झुंडी तयार! एवढेसें कांही वाजलें कीं, ' बंड्या, पप्या, बन्या बघा बरं काय वाजतंय तें ' म्हणून हातांतलं काम टाकून माणसे खिडकींतून पाहायचीच. तशी त्यांना संवयच आहे! आणि येथे तर शिवलीलामृतांत वर्णन केल्याप्रमाणे अक्षरशः ' आकाशपंथे जाती ज्वाळा ', असा देखावा होता. मग असलें क्वचित पाहायला मिळणारें दृश्य कोण सोडतो? अशी गर्दी जमा झाली कीं कांही विचारूं नका. त्यांत आणखी आगीचें चित्रण करण्यासाठी हे सिनेमा शुटिंगवाले कॅमेरे घेऊन तयार! जणूं कांही ते टपलेलेच होते कॅमेरे सरसावून! मग अशावेळीं त्या फायरब्रिगेडच्या माणसांना आग विझवायला सुचणार कसें? म्हणून आग लागलेल्या बिल्डिंगवर पाणी मारायच्या अगोदर त्यांनी ती गर्दी पांगविण्यासाठी त्या जनसमुदायावर



पाण्याचे फवारे मारावयास सुरुवात केली. तेव्हा कोठे परीटघडीचे कपडे खराब होतील या भयाने ती गर्दी थोडी पांगली. अशा कठीण प्रसंगीं गर्दी कशी हटवावी याविषयीं एक विनोद येथे सांगणें सयुक्तिक ठरेल. एका पोलिस ऑफिसरच्या जागेसाठी इंटरव्हयू चालू होता. प्रश्नकर्त्यांने प्रत्येक उमेदवाराला एकच प्रश्न विचारला, " खूप जमलेली गर्दी कशी हटवाल?" बहुतेकांनी लाठीमार, गोळीबारादि शिळे उपाय सांगितले. एका उमेदवाराला तो प्रश्न विचारल्याबरोबर त्याने बिरबलाच्या आवेशांत उत्तर दिले, ' मी मदतीची पेटी घेऊन फिरेन. आणि त्या मोजक्या उत्तरानेच त्याची त्या जागी नेमणूक झाली. त्याने गर्दीचें तें वैशिष्टय चांगलें पाहून ठेविलें होतें. आपणसुद्धा कीर्तनाच्या जागीं नेहमीं पाहातों. कीर्तन संपल्यावर बुवांचे स्वयंसेवक आरतीचें तबक जेव्हा श्रोत्यांत फिरवतात तेव्हा पहाट उजाडल्यावर आकाशांतील एकेक तारा जसा गायब होतो तसे मागचे श्रोते मागल्यामागे सटकूं लागतात. इतका वेळ कीर्तन ऐकल्याबद्दल त्या तबकांत आणापैसा टाकावा ही बुवांची किमान अपेक्षाहि चार दोन भाविक सोडले तर बाकीची गर्दी पूर्ण करत नाही.

मोठ्या शहरांत जे फिरते विक्रेते असतात त्यांनासुद्धां गर्दी कशी जमवावी आणि जमलेली गर्दी जागच्या जागीं खिळवून कशी ठेवावी याचें चांगलें ज्ञान असतें. हे लोक गर्दीला आपल्या अगोदर वक्तृत्वाने चांगलीच भुरळ घालतात. मधून दादा–बाबा करून खुलवतात. एकदा सकाळच्या वेळों मी नेहमीप्रमाणे मंडईत भाजी आणावयास जात होतों. रस्त्यांत मला गारुड्याचा खेळ दिसला. खूप गर्दी जमली होती. त्या गर्दीत मीसुद्धा घुसलों आणि हळूंहळूं एकेकाला मागे टाकीत अगदी पहिल्या ' बच्चे लोकां'च्या रांगेत आलों. मधोमध त्या गारुड्याने एक अजगर ठेवला होता. ती गर्दी जमण्याचें मुख्य कारण म्हणजे तो अजगर व गारुड्याच्या खांद्यावर बसलेलें माकडच होते. थोड्या थोड्या वेळाने ' बच्चे लोक, ताली बजाव ' म्हणून तो सांगायचा कीं आतां या अजगराची आणि माकडाची मारामारी होईल. ती पाहण्यासाठी मीसुद्धा पुष्कळ वेळ ताटकळत उभा राहिलों. त्याने दंतमंजनें व इतर ' जडीबुटी ' विकण्यास सुरवात केली. पण मधून मधून त्याचें तें पालुपद चालूच होतें. मी आणि इतर गर्दी अगदी तटस्थ उभे होतो. पुरेशीं औषधें खपलीं असें पाहून त्या गारुड्याने मुकाट्यान तो अजगर टोपलीत घालून ठेवला आणि तो सामानाची आवराआवर करूं लागला. मी मनांतल्या मनांत त्याला शिव्या मोजून मंडईकडे वळलों. भाजी घेऊन येतों तों घड्याळांत बाराचे ठोके पडले. घरच्या सगळ्यांचीं जेवणें वगैरे आटोपून अर्धी अधिक मंडळी वामकुक्षी करीत होती. मी मात्र चांगलाच खजील झालों. पण त्यांतल्या त्यांत खिलाडू वृत्तीने मनांतच त्या गारुड्याच्या गर्दी जमविण्याच्या व दीड–दोन तास सतत टिकविण्याच्या विद्येचें कौतुक केलें

असें म्हणतात कीं प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. एक चांगली आणि दुसरी वाईट. पण गर्दी अशी चमत्कारिक आहे कीं तिच्या दोन्ही बाजू वाईटच आहेत. एखाद्याच्या भाषणाला अगदी थोडी गर्दी असली तर आपण म्हणतों, ' हे! तें काय भाषण होतें? कुत्रेंसुद्धा नव्हतें त्याच्या भाषणाला ' आणि तुफान गर्दी असली तरी कपाळाला आठ्या पाडून म्हणतोंच कीं इतकी वाईट गर्दी उलटली होती कीं भाषणांतला एक शब्दसुद्धा ऐकूं आला नाही. या भाषणाला जमणाऱ्या गर्दीबद्दलची एक सत्य घटना फार मजेशीर आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या काळांत जळगांवच्या कॉटन मार्केटच्या पटांगणांत एका कॉंग्रेस श्रेष्ठीचें भाषण होतें. त्या भाषणावर हरताळ पाडा असा प्रचार आठ दिवस आधीपासून सं. म. समितीचे लोक करीत होते. भाषणाच्या दिवशीं प्रास्ताविकाला खरोखरच पांच पन्नास माणसे असतांना सुरुवात झाली. मग हळू हळू अशी गर्दी वाढली कीं सगळे पटांगण गच्च भरलें. मागून येणारे सगळे लोक किती गर्दी जमली व त्या वक्त्याची कशी फजिती झाली हें पाहावयाला आले होते. आणि विशेष असें कीं हरताळ पाळा असा प्रचार करणारे लोकहि आपली योजना यशस्वी झाली की नाही तें पहावयास हजर होते. आणि दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये फोटोसहित बातमी आली; ' जळगांवला नामदार × × × यांच्या भाषणाला हजारोंनी गर्दी जमली होती.' बिचारे हरताळवाले! ही गर्दी कोणाला खड्डयांत लोटेल आणि कोणाला उचलून धरल याचा कांही नेम नाही.

फारच खट्याळ आहे ही गर्दी. तिचें महात्म्य वर्णन करण्यास अनेक उदाहरणांची येथे गर्दी झाली तरी तें पूर्ण होणार नाही हेंच खरें!

# " पसंत आहे मुलगी....! "

लेखक : कु. शशिकला प्रभुणे, बी. ए. चतुर्थ वर्ष

डिसेंबर मधील ती धगधगीत दुपार बघतां बघतां एकदम मलूल होऊन गेली. काळ्या काळ्या मेघपुंजांनी आकाशाची निळाई पार झांकळून टाकली. सर्वत्र कुंद हवा पसरली अन् त्यामुळे भर दुपारची ती थंड शांतता एकदम उदासवाणी वाटूं लागली. गुबगुबीत उशीवर रेलून खिडकींतून दिसणाऱ्या ह्या निसर्गातील बदलाकडे शून्य दृष्टीने पहात असलेली मित्रविन्दा उदगारली " हंऽ! माणसंहि अशीच लहरी...कध्धी त्यांच्या वरच्या भपक्याला भुलूं नये!" अन् नकळतच सकाळचा सगळा प्रसंग तिच्या दृष्टीसमोर उभा राहिला.

पंधरा दिवसांपूर्वीच तिला पाहून गेलेल्या, मिलिन्द गोखलेचं ' एक्स्क्यूझ ' चं प्रदर्शन करणारं ' पॉलिशड् ' लेटर सकाळींच आलें होतें. हातांतलं काम बाजूला ठेऊन घाईघाईने बाहेर आलेल्या ताईंना पत्राची घडी करीत दादासाहेब म्हणाले होते, " नाहीतरी इतक्या श्रीमंत स्थळापर्यंत उगीच उडी मारली आपण! कुठे ते शेंकडां रुपये कमावणारे कॉन्ट्रॅक्टर...शिवाय हा मुलगाहि एवढा 'बी. ई. डिस्टिंक्शन मिळविलेला!' दिल्लीला इंटरव्ह्यूलाहि जाऊन आला म्हणे. शिवाय दिसायलाहि चांगला उंचापुरा गोरागोमटा!"

ताईंना आपल्या लेकीचा फार अभिमान! त्या चांगल्याच रागावल्या अन् म्हणाल्या, ' नुस्तं गोरं कांतडं काय करायचंय! आपली मित्रा काळीसांवळीच असली तरी आहे कशी उंच...सशक्त अन् चुणचुणीत! बरं ती बी. ई. तर हीहि काही साधी मॅट्रीक–फॅट्रीक नाही! गेल्याच वर्षी बी. एस्सी. झाली... अन् पुढच्या वर्षी तिचा तो रेडिओ इंजिनियरिंगचा कां कसला तो कोर्सहि पुरा होईल!"

ताईंच्या ह्या रागारागाने चालेल्या भाषणावर, किंचित हंसत दादासाहेब म्हणाले, " अग, हें तूं मला कशाला सांगतेस! जाऊं दे झालं! पण म्हटलं होतं... पुढच्या वर्षी अवी लंडनहून एम्. आर. सी. पी. होऊन येईल. त्याचं सर्व ठीक होईलच... तेव्हा म्हटलं ह्याहि जबाबदारींतून मुक्त व्हावं! मग पेन्शन घेऊन लोणावळ्याच्या त्या प्लॉटवर जाऊन आपण दोघे ' हरि हरि ' करायला मोकळे!"

त्यांना मध्येंच थांबवत हातांतून गालिचावर पडलेलं लाटणं उचलित ताई म्हणाल्या, " मुलीच्या बाबतींत पैसा अन् गोरा गोमटेपणा काय चाटायचाय? माझी मुलगी आहे कशी गुणी! स्वयंपाकपाणी...विणणं... भरणं ह्यांत माझ्यावरसुद्धा ताण करते पोरगी! अभ्यासांत तर हुशार आहेच भावासारखी... अन् परवांच नाही कां बॅडमिंटनची चँपियन म्हणून आली!" ताई पुढे असंच कांहीतरी पुटपुटणार होत्या. परंतु हंसत हंसत समोरचें वर्तमानपत्र उचलत दादासाहेब मध्येंच म्हणाले, " राम! राम! आता हे मित्रास्तुतीपुराण किती वेळ ऐकावं लागतंय कोण जाणें!" त्यांच्या त्या उदगाराने आणखीनच चिडून फणकाऱ्याने आंत जात ताई स्वतःशीच पण मोठ्याने पुटपुटल्या " नाही तर नाही ! त्या गोखल्यापेक्षा फक्कड जावई पाहीन मी ... !"

आत्ता सुद्धा, ताईंच्या त्या वाक्याची आठवण होऊन मित्राला किंचित हंसू आलं. पण लगेच तिच्या मनांत आलं कीं, दादासाहेब व ताई असं म्हणत होते खरे! पण मनांतून त्यांना मिलिन्द फारच आवडला होता. व त्याने होकार दिला असता तर त्यांना फार फार आनंद झाला असता. अन मग त्याने दिलेल्या नकाराचा कडु विचारच जणुं मनांतून दुर भिरकावण्याकरितां, तिने पलंगावरचं 'स्त्री' मासिक, टेबलावर भिरकावुन दिले. अन् ती पुटपुटली, " बरं झालं! नाहीतर केवळ दादा करतांच मी त्या प्रोग्रॅमला तयार झालें होतें!"

ती चटकन् उठली. अन् नाताळच्या सुट्टींतच अभ्यासाला लागायचे असं ठरवून, ' मै जिंन्दगीका साथ निभाता चला गयाऽ " असं कांहीसं गाणं गुणगुणत, टेबलाजवळ जाऊन, पुस्तकांची उलथापालथ करूं लागली. त्यांतहि तिचं मन लागेना. तेव्हा तिनं ठरवलं कीं अभ्यास आतां रात्रीपासून करूं या. आधी सुट्टींत क्लबमध्ये जाऊन नियमित प्रॅक्टिस करायची. अन तिने चटकन् घड्याळांत पाहिले. तो अवघा दीड वाजला होता. म्हणजे अजून चिक्कार अवकाश होता! मग तिने पुन्हा मघाचेंच तें मासिक घेऊन कॉटवर लोळण घेतली. पहिलेंच पान उघडते तो– ' आधुनिक समाजांतील विवाहसमस्या ' हें शीर्षक दिसलें. अन् ती दाबत होती ते विचार, तिच्या मनांत अधिकच गर्दी करूं लागले.

मिलिन्द गोखलेची ती हंसरी रुबाबदार मूर्ति, तिच्या डोळ्यासमोर तरळूं लागली. तिच्या मनांत आलं, निळसर रंगाचा तो वुलन सूट, त्याच्या गोऱ्या रंगाला किती खुलून दिसत होता! अन् त्याचं बोलणं अन् वागणं तरी किती इंप्रेसिव्ह! त्यांत शिष्टाचार व सौजन्य तर होतंच, पण मोकळेपणा किती! त्यामुळे त्या ' पहाण्याच्या ' प्रसंगाचासुद्धा औपचारिकपणा नाहीसा झाला! भिंतीवरच्या आपल्या हातांत रॅकेट घेतलल्या फोटोकडे पहात तो म्हणाला होता, " म्हणजे रॅकेटची अन् तुमची बरीच जानपहचान दिसतेय!" अन् मग इंजिनियरिंग कॉलेजमध्ये असतांना, लागोपाठ तीन वर्षे चँपियनशिप मिळाल्याचेंहि त्याने मोकळेपणे सांगून टाकलं होतं. दादांशी तर तो उत्साहाने ऑफिसच्या कामाविषयी बोलत होताच! पण, ताईंने केलेले बटाटेवडे, अगदी आपल्या आईच्या स्पेशल वड्यांसारखे, फर्मास झाले आहेत असं सांगून, त्याने ताईलाहि खूष केले होते. अन् दादा हात धुवायला आंत गेल्यावर, आपण घेतलेल्या रेडिओ इंजिनियरिंगच्या कोर्सबद्दल आपली प्रशंसा करून म्हणतो कसा– ' तुमच्या सारख्यांनी आमच्या ' बॅरन साईड ' कडे अशी जरा दृष्टि टाकली तर जरा तरी ' ग्रीन ' होईल ती!' त्या उद्गारांची आठवण होऊन नकळतच मित्रा लाजली. इतक्यांत ठण ठण असा दोनच्या ठोक्यांनी ती, त्या मिलिंदच्या स्वप्नांतून जागी झाली. अन् लगेच, तिला सकाळच्या 'त्या' पत्राची आठवण झाली. संताप, दुःख अशा कांहीतरी संमिश्र भावनांनी, तिचं अतःकरण भरून गेलं. तिला वाटलं कीं, आपल्याला आतां रडूं फुटणार. मोठ्या कष्टाने तिने मनसंयमन केलं अन् रेडिओ ऐकला कीं जरा बरं वाटेल, म्हणून ' विविध भारती ' लावली. ' तुम मुझे भुल भी जाओ ' सुधा मल्होत्राच्या त्या मधुर परंतु कातर स्वरांनी, जखमेवरची खपली पुन्हा निघाली! मित्राने खटकन् रेडिओ बंद केला. पदराच्या टोकाने डोळे कोरडे केले. अन् ' ताईऽ, चहा करूं का ग? दोन वाजून गेले!' असं मोठ्याने विचारत ती स्वयंपाकघराकडे वळली.

कॅलेंडरची आठ–दहा पानें उलटलीं गेलीं... दुसरा हिंवाळा सुरु झाला. निळसर धुक्याचा पडदा बाजूला सारून गुलाबी थंडीने हळूंच प्रवेश केला अन् गुलाबी स्वप्नांत रंगलेली माणसं मागील हिंवाळ्यांतील उबदार क्षणाच्या आठवणीने... शहारली!

× × ×

दिल्लीच्या आपल्या कार्यालयांत मिलिन्द सकाळचें टपाल पहात होता. इतक्यांत वशाचें पत्र पाहून, तो जवळ जवळ ओरडलाच– " अरे! बरोबर आजच वशाच्या लग्नाचा पहिला वाढदिवस की! स्वारी वर्षभर हनीमूनच साजरा करीत होती कीं काय? हरकत नाही म्हणा! सासुरवाडी मिळाली गब्बर अन् गोरीपान सुन्दर अन् शिकलेली बायको पण!" अन् पत्र फोडतां फोडतां त्यावेळी वशासारखी श्रीमंत सासुरवाडी अन् सुंदर बायको मिळाली तरच लग्न करण्याचा त्याने केलेला निश्चय आठवून त्याला हसूं आलं. ' पण... हें काय भलतेंच!' वशाने लिहिलं होतं....

"...बेट्या, लग्न करण्याचा विचार असेल, तर वेळीच जागा रहा! माझ्या लग्नाचा तो थाट... अन् सुंदर शिकलेली बायको पाहून, तूं म्हणाला होतास... " वशा, भाग्यवान आहेस बाबा!" ...हं भाग्यवान म्हणे! माझ्या बायकोला अन् तिच्या बापाला, एक देखणा... हुशार तरुण केवळ त्यांच्या वैभवांत भर घालणारी एक शोभेची वस्तु म्हणून हवा होता! अन् माझी सहचारिणी .. पार्ट्या, क्लब, सांस्कृतिक कार्यक्रम, संमेलनं ह्या भरगच्च कार्यक्रमांहून बिचारीला नवऱ्याची काळजी करायलासुद्धा फुरसत मिळत नाही! तसं म्हटलें तर म्हणते, " इश्श! एवढ्या माझ्या माहेरचे एवढे नोकर–चाकर आहेत कीं! अन् बायकोने नवऱ्याच्या पुढे पुढे करायचे, ही आयडीयाहि जरा बॅकवर्डच आहे नाही कां?" मला पगारहि चांगला मिळतो. पण त्याच्या दुप्पट किंमतीच्या वस्तु तिच्या श्रीमंत बापाकडून तिला वेळोवेळीं मिळत असतातच! शिवाय तिच्याजवळ असेल नसेल त्या सौन्दर्याची स्तुती करणारी माकडं तिच्याभोंवती असतातच. तेव्हा माझ्या

शिक्षणाची, श्रमांची, पैशांची, हुशारीची तिला कांहीच किंमत वाटत नाही! एकुलती एक, लाडावलेली ही पोरगी, एक सुंदर अशी एक नकली बाहुलीच निघाली शेवटीं!"

मिलिन्दला पुढे वांचवेना. तो एकदम गंभीर झाला. अन् त्याच्या डोळ्यासमोर तो वशाच्या लग्नाला पुण्याला गेला असता, जिला पहायला गेला होता, त्या मित्राची निळसर फुलाफुलांच्या पांढऱ्या शुभ्र सिल्कमधील... उंच, सडपातळ, काळीसांवळी परंतु विलक्षण स्मार्ट अशी मूर्ति उभी राहिली.

मित्रा तशी गोरीपान, नाजूक अन् रेखीव नव्हती. परंतु दादासाहेबांनी तिची त्याच्याशी ओळख करून दिली तेव्हा नमस्काराकरतां दोन्ही हात जुळवून व किंचित् स्मित करून आपल्या काळ्याभोर अन् विलक्षण तेजस्वी डोळ्यांनी तिने त्याच्याकडे एक निसटता दृष्टिक्षेप टाकला. त्यावेळी त्याला ती विलक्षण मोहक वाटली होती. नंतरच्या संभाषणांतून तिची असामान्य बुद्धिमत्ता त्याला जाणवली होती. अन् तिच्या विनोदी व खेळकर स्वभावावर तो खूषहि झाला होता. पण वशाच्या लग्नसमारंभाचा परिणाम म्हणून कीं काय, श्रीमंत सासुरवाडी अन् सुंदर बायको, ह्या कल्पनेच्या धुंदींत, त्याने तिला नकारहि देऊन टाकला होता. परन्तु कां कोण जाणें... तो तिला विसरूं शकला नव्हता. अन् एखाद्या उदास संध्याकाळीं, एकटं असतांना तिच्या आठवणीने तो अस्वस्थहि होत असे.

आताहि तिची आठवण येतांच त्याच्या मनांत आलं, खरंच ती फॅमिली अगदी सुटसुटीत अन् आयडियल होती. फॉरिनला गेलेला मोठा मुलगा...अन् . ती मित्रा 'कुणा ऑफिसरची बायकोहि झाली असेल एव्हाना!' ह्या कल्पनेने कां कोण जाणें पण त्याला एकदम कसेंसेंच झालें. त्याच्या एकदम लक्षांत आलं कीं, खरंच तिच्यानंतर आपण एकहि मुलगी पाहिली नाही ! गेलं वर्षच नाही तरी मोठं चमत्कारिक गेलं! बापूसाहेबांना अचानक पॅरॅलिसिसचा ॲटॅक काय आला! त्यामुळे त्यांच्या कॉन्ट्रॅक्टचाहि अगदी बोजवारा उडाला! अन् मग आपण कशाचाहि विचार न करतां होती नव्हती तेवढी पुंजी एकत्र केली... मुंबईचा बंगला भाड्याने दिला अन् वहिनी, मेघा, मनोज सर्वांनाच बापूबरोबर लोणावळ्याला जावं लागलं! तरी बरं त्या डॉ. अलेक्झांडरच्या ट्रीटमेंटनं व लोणावळ्याच्या हवेनं बापूंना चांगलंच बरं वाटत आहे अन् मेघाच्या कालच्या पत्रावरून बाकीचीहि सर्व मंडळी तेथे चांगलीच रमलेली दिसतात! शेजारी खूप चांगले मिळाले म्हणे त्यांना! अन् त्याला एकदम आठवलं कीं मेघाच्या त्या पत्रांतील तिच्या त्या विन्दा कां बिन्दा नांवाच्या मैत्रिणीच्या वर्णनाने एकदम आपल्याला त्या 'मित्राची' आठवण झाली होती. तो किंचित हसत उद्गारला "ती कशाला जाईल तिकडे पुणं सोडून..."

अन् त्याने दुसरें पाकिट फोडले तों काय? दिवाळी करतां त्याची रजा सँक्शन झाली होती. अन मग उरलेलं टपाल फोडतां फोडतां उद्याच लोणावळ्याला जावं असा विचार करीत, तो घरच्या आठवणींत रंगून गेला.

× × ×

बलिप्रतिपदेची ती पहाट... प्रकाश, आनंद अन् उत्साह घेऊन अवतरली. दवबिंदूंच्या कोमल स्पर्शाने कळ्या हलकेच उमलत होत्या. विहंगवृंद किलबिल करीत आकाशांत झेपावत होते. अन् घरोघर गृहिणी, नाजूक स्पर्श करून पतिराजांना उठवित होत्या. हं! पाडव्याच्या ओवाळणीची तयारी होती ही!

मेघाच्या "अय्या! मिलिन्ददादा किती गोरा झालाय!" अन् मनोजच्या, "दादा आला! दादा आला!" ह्या आरडाओरड्यानं कडेच्याच खोलींत झोपलेल्या मित्रविन्दाला जाग आली. वहिनी म्हणत होत्या, "किती वाळलाय ग! बिचाऱ्याच्या जेवणाचें हाल होत असतील!" त्यावर बापूंचा प्रेमळ परंतु थट्टेखोर स्वर ऐकूं आला, "आतां नाही व्हायचे बरं हाल! जातानां देऊं एखादं झकास माणूस बरोबर!"

ते शब्द ऐकून, मित्राच्या अंगावर रोमांच उठले... अन तिने अंगावरचा रग अधिकच लपेटून घेतला. परंतु लगेच, आपल्याला नकार देणारा हा मिलिन्द, आपल्या समोरच रहाणार, ह्या कल्पनेनं, तिला फार चमत्कारिक झालं. मेघाच्याकडे मिलिन्दचा फोटो पाहिल्यापासून, हा प्रसंग कधीतरी येणारच, ह्याची जाणीव तिला होतीच. तरी बरं त्यांच्याकडे ही गोष्ट कुणालाच माहित नव्हती. व ताईदादांनी पण त्यांना ती मुद्दामच कळूं दिली नव्हती. परंतु गंमत अशी कीं ह्या दोन घरांत चांगलाच घरोबा



जमला. अन मित्रविंदेवर तर त्यांच्या घरांतील सर्वांचीच मर्जी बसली. मधून मधून मिलिन्दवरून ते तिची थट्टाहि करीत. तेव्हां तर तिला फारच गुदमरल्यासारखं होई.

बापूंच्या मघाच्या वाक्याची आठवण होऊन मित्राच्या मनांत आलं,–'हे लोक एवढे मनोरे रचताहेत... पण त्यांना काय ठाऊक कीं, त्याचा पाया आधीच ढांसळलेला आहे!' अन् ह्या विचारासरशी, मनांत उसळलेल्या भावनांच्या कल्लोळानं तिला अगदीच असहाय्य झाल्यासारखं वाटलं. परंतु लगेच तिचा मानी स्वभाव उसळून वर आला. अन् त्याचें तोंडहि न बघण्याचा निश्चय करून, ती चटकन उठली. तिच्या मनांत आलं कीं 'साडेसातला मॅच आहे तेव्हा चटकन् सगळ आवरायला पाहिजे. अन शिवाय अंधारांतच दारापुढील सडारांगोळी उरकलेली बरी! कारण समोरच त्याचं घर होतं... अन तिथं...'तो' होता!'

सकाळीं मुखमार्जन आटोपून, मिलिन्द बाहेरच्या खोलींत प्रवेश करतो तों "विन्दाताई, टाऽटा" असे छोट्या मनोजचे शब्द व त्यावर "टाऽऽटा" असें हेल काढून, मंजुळ स्वरांत दिलेलें प्रत्युत्तर, त्याच्या कानीं आलं. आपल्या घरांत एवढी लोकप्रिय झालेली ही विंदा आहे तरी कशी, हे पहावं म्हणून तो खिडकीचा पडदा सारून बाहेर पाहूं लागला. तो पांढरा शुभ्र पंजाबी ड्रेस केलेली, लांबसडक केसांच्या दोन वेण्या वर बांधलेली, एक तरुणी हातांत रॅकेट घेऊन, वळणावर सायकल वळवितांना त्याला दिसली. त्यावेळीं तिच्या चेहेऱ्याची एक बाजू त्याला जी ओझरती दिसली, त्याबरोबर लगेच त्याला हातांत रॅकेट घेतलेल्या मित्राच्या फोटोची आठवण झाली.

"काय हा पिच्छा पुरवलाय ह्या मित्राने माझा!" असं पुटपुटत तो आंत येत असतां मेघाने विचारले, "कोण रे हा मित्र तुझा?" त्यावर "आहे अगदी जीवश्च कंठश्च!" असं हंसत हंसत उत्तर देत तो चहा घेण्यासाठी बापूंच्या खोलीकडे वळला.

चहाचा घुटका घेत बापू म्हणाले, "केक्स अगदी फक्कड झालेत हं! पहा बेटा मिलिन्द, तीं कडक बिस्किटें मला चालत नाहीत म्हणून समोरच्या त्या विंदानं केक्स करून पाठविलेत. ते दादा, त्या ताई फार चांगली माणसं आहेत बरं! त्यांचा शेजार आहे म्हणून दिवस भुर्रकन् उडून गेले! ती पोरगी तर फारच लाघवी! आपल्या मेघाची अन् तिची चांगलीच गट्टी जमलीय! अन् आपला मनोज तर दिवसभर त्यांच्याकडेच असतो. अगदी आयडियल फॅमिली आहे बरं! त्यांचा मोठा मुलगा तर एम्. आर. सी. पी. करितां फॉरिनला गेलाय!"

"आँ!" मिलिन्द चमकून उद्गारला, "त्यांचं सरनेम कर्वे आहे कां?"

"हो! कां?" बापूंनी विचारलं.

"पण तर ते पुण्याला असिस्टंट रजिस्ट्रॉर होते. शिवाय त्यांच्या मुलीचंहि नांव 'मित्रा' का कायसं होतं!" स्वतःशीच बोलल्यासारखा मिलिन्द पुटपुटला.

"अय्या! तेच ते!! शिवाय विंदाला तिच्या घरचे सगळे 'मित्रा'च म्हणतात. 'मित्रविंदा' नांव आहे तिचं! मला 'विन्दा' आवडलं म्हणून आम्ही तेंच म्हणतों!" मेघा म्हणाली, "पण काय रे तुझी अन् त्यांची काय ओळख?" तिने लगेच विचारले.

मिलिन्द विलक्षण गोंधळला. परंतु चटकन सांवरून घेत म्हणाला, "माझी नाही ग! आमचा तो पुण्याचा वशा नाही कां? त्यांचा ओळखीचा आहे तो मुलगा... तो सांगत असें त्यांच्याबद्दल कांही कांही...!" अन् असं कांहीसं पुटपुटत, चहा संपवून तो चटकन् उठून आपल्या खोलींत गेला.

विचारांचा विलक्षण गोंधळ झाल्याने त्याचं डोकं गरगरायला लागलं होतं म्हणून तो कॉटवर लवंडला. अन् त्याने डोळे मिटून घेतलें. मित्राचं लग्न झालेलं नाही व आपल्या घरांतल्या सर्वांची ती आवडती आहे, ह्या कल्पनेनं त्याला उगाचच आनंद झाला. परंतु लगेच आपण स्वतःच तिला नकार देऊन टाकला ही जाणीव होऊन त्याला फारच चमत्कारिक झालं. त्याला वाटलं ही गोष्ट जर कां बापूंना कळली तर ते रागावून म्हणतील "गाजरपारखीच आहेस!" शिवाय ती मित्रा... ते दादा... मला काय समजत असतील. अन् जरी आपण आता समजा 'हो' म्हटलं अन् त्या स्वाभिमानी मुलीनंच आपल्याला नकार दिला तर... ! खरंच आपण नकार दिला तेव्हा तिची मनःस्थिती कशी झाली असेल? पण मग आता करायचं तरी काय? अन् ह्या विचारांतच रात्रीच्या जागरणाने त्याला किंचित् झोप लागली.

तो जागा झाला तो मेघाच्या "अय्या ! दादा किती सुंदर काश्मीर सिल्क आहे हें ! माझ्याकरतांच ना ?" ह्या आरोळीनं !

त्यावर "अजून तरी तुझ्या साडींत कुणी भागीदार नाही." असं मिलिन्द हंसत, डोळे चोळत उद्‌गारला.

"म्हणजे, येणार आहे वाटतं लवकरच कुणीतरी" मेघाने मिस्किलपणे विचारले व म्हटले, "अरे खरंच ! ही साडी आतां विन्दाला घडी मोडायला देते ! तिने परवा आणलेली अबोली साडी मी नेसणार आहे. आम्हाला संध्याकाळीं एका मैत्रिणीकडे जायचंय समारंभाला !" अन् तिने ती साडी घेऊन मित्राकडे धूम ठोकली.

जेवतांना मनोज बडबडत होता, "वहिनी, मला भात नको ! विंदाताई जिंकली म्हणून तिने मला गुलाबजांब दिले !"

बापू आश्चर्याने म्हणाले, "अरेच्या, मग सांगायला कशी आली नाही ती ! आज तिची फायनल होती पुण्याच्या त्या फुलंब्रीकर बरोबर !"

"आज तिला झालंय काय कोण जाणें !" कोशिंबिर वाढतां वाढतां मेघा म्हणाली, "मघाशी दादाने मला आणलेल्या त्या साडीची घडी मोड म्हटलं तर निक्षून 'नाही' म्हणाली. अन् बरं कां ग वहिनी, तिची ती 'नाकारलेली मुलगी' नांवाची गोष्ट छापून आलेला दिवाळी अंक, ताई मला देत होत्या, तर तिने तो रागावून हिसकावून घेतला अन् लपवून ठेवला. पण मी तिच्या नकळत पळवून आणून तो दादाच्या खोलींत ठेवलाय ! बघूं कशी नेते ती !"

ह्या संभाषणाने मिलिन्द चमकला, चटकन् जेवण आटोपून तो तडक आपल्या खोलींत गेला. अन् घाईघाईने अंक उघडून त्याने मित्राची ती गोष्ट वाचायला सुरवात केली. 'एका स्वरूपहीन परंतु सद्‌गुणी मुलीचें दुःख त्यांत मोठ्या तन्मयतेनं रंगवलं होतं. ज्या तरुणावर ती जीवाभावानं प्रेम करत असते, तोच तिला नकार देतो. परंतु अखेर त्याच्यावर कोसळलेल्या आपत्तींत, ती कशाचीहि अपेक्षा न ठेवतां, दुरूनच त्याला सहाय्य करते तेव्हा मात्र त्याला तिच्या निःस्वार्थी प्रेमाची अन् गुणांची ओळख पटते व तो तिच्याकडे जातो. परंतु अपमानित झालेली ती मानी तरुणी त्याला टाळण्याचा प्रयत्न करते. परंतु अखेर त्याने क्षमा मागून, बरींच आर्जवं केल्यावर स्त्रीस्वभावानुसार ती विरघळते. अन् त्यांचें मीलन होतें ! कथा वाचून संपल्यावर किंचित हंसत मिलिन्द स्वतःशीच म्हणाला "एकंदरीत बरंच कोर्टिंग करावं लागणार म्हणायचं !" अन् मग एकदम कसला तरी निश्चय केल्याप्रमाणं तो गंभीर झाला. अन् विचारांत गुंग असतांनाच त्याला गाढ झोप लागली.

संध्याकाळीं मिलिन्द आपला आवडता निळा सूट चढवून अन् अगदी जामानिमा करून, केसावरून कंगवा फिरवित असतां, मेघा तेथे येऊन म्हणाली, "आहे बुवा ! कांही विशेष !" मिलिन्दने हंसत मान डोलावली अन् तिच्या अबोली रंगाच्या चंदेरी साडीकडे लक्ष जातांच सहज विचारल्य सारखं दाखवून तो म्हणाला, "मग तुझी मैत्रीण नेसलीना ती तुझी साडी ?"

साडीच्या निऱ्या ठाकठीक करीत मेघा म्हणाली, "अरे देवा ! किती आर्जवं करावी लागली. शेवटी ताई जेव्हा म्हणाल्या कीं 'एवढी म्हणतेय् तर नेस की !' तेव्हा नेसली अन् मी म्हटलं 'वहिनीला दाखव चल !' तर चक्क नकार देऊन म्हणाली, 'प्लीज, वहिनीनाच बोलाव बाई इकडे !' तिला इकडे आणून मी तिची तुझ्याशी ओळख करून देणार होते. पण पट्ठी इकडे फिरकायलाच तयार नाही ! इतक्यांतच तुला लाजूं लागली काय ?"

आपल्याला जसं कांहीच कळलं नाही असं दाखवत व आवाजांत खूपसं आश्चर्य आणून, मिलिन्दनं विचारलं, "म्हणजेऽ ?"

त्याला वेडावून, मेघा म्हणाली, "एऽ हे ! जसं कांही ठाऊकच नाही ! म्हटलं बापूना अन् वहिनीला, 'सून' म्हणून, अन् मला व मनोजला 'वहिनी' म्हणून विंदा एकदम पसंत आहे ! तुझाच काय तो प्रश्न आहे !

त्यावर एकदम साधेपणाचा आव आणून मिलिन्द उत्तरला, "इतकी तयारी झाल्यावर मग माझं गरिबाचं काय चालतंय !"

हें ऐकून, मेघा एकदम ओरडलीच, "अय्या ! एऽ, तुला पसंत आहे ना विंदा ? मग थांब, मी बापूंना अन् वहिनीला सांगतें !" अन् ती धांवणार इतक्यांत परत वळून तीच म्हणाली, "अरे ! पण तूं तिला पाहिली पण नाहीस अजून !"

त्यावर मिलिन्द हंसत म्हणतो कसा, 'अग, आतां पाहतों की ! आण बोलावून !'

अन् त्यानंतर पांचच मिनिटांनी बापू बोलावताहेत असं सांगून, मेघाने मित्रविन्देला ओढतच बापूंच्या खोलींत आणले. मिलिन्दला तेथे पाहून ती दाराशीच खाली मान घालून, ओठंगून उभी राहिली. अस्मानी रंगाच्या त्या भारी काश्मिरासिल्कमध्ये मित्राविन्दा मोठी मोहक दिसत होती. नेहमीप्रमाणे केसांच्या दोन वेण्या न घालतां तिने त्यांचा मोठा अंबाडा घालून त्यावर कुंदफुलांचीं वेणी माळली होती. अन् अंगावरच्या दोनचार ठसठशीत अलंकारांनी ती एखाद्या नववधूसारखी दिसत होती. तिच्याकडे कौतुकाने पहात वहिनी म्हणाल्या, "अग विन्दा, एवढी नवी साडी नेसली आहेस, तर नमस्कार कर तुझ्या बापूंना !"

मित्रविन्दाने एकदम ओशाळून, दोघांना नमस्कार केला. बापूंना नमस्कार केल्यावर ते म्हणाले, "बोल बेटी, काय आशीर्वाद देऊ तुला ?"

गंभीरपणे परंतु किंचित् स्मित करीत बापूंकडे पहात मित्रविंदा म्हणाली, "तुमचे आशीर्वाद सदैव माझ्यामागे रहातील ह्याची पूर्ण जाणीव आहे मला बापू ! आशीर्वाद अगदी तोंडाने देण्याचीच काय आवश्यकता आहे ! नाही कां ?" अन् ती झपाट्याने घरीं जाण्यासाठी वळली.

तों काय... पुढच्याच दारांत मिलिन्द उभा ! ती जवळ जातांच तो गंभीरपणे परंतु किंचित स्मित करीत म्हणाला, "हे पहा, आमच्या ॲप्लिकेशनचा फेरविचार होणार असेल तर, ही साडी 'पाडव्याची ओंवाळणी' म्हणून द्यायला आपण तयार आहोत बुवा !"

मिलिन्दचे हे शब्द ऐकून, आनंद, संताप...खेद दुःख अशा एकामागून एक उसळलेल्या परस्परविरोधी भावनांच्या कल्लोळाने मित्राचे डोळे आसवांनी भरून आले... अन् खळकन् ते गालांवरुन ओघळले. ते पहातांच मिलिन्द गहिवरून म्हणाला, "प्लीज प्लीज .. एक्स्क्यूझ मी"

"एक्स्क्यूझ .." किती वेगळया अर्थानं म्हणत होता तो ! अन् किती आर्जवानं !

त्याच्या त्या मधाळ शब्दांनी क्षणभर मित्रबिंदा विरघळली... परंतु लगेच मागच्या 'एक्स्क्यूझ' च्या स्मृतिदंशानं, तिच्या मनाला असह्य वेदना झाल्या. अन् चांगल्या तिखट शब्दांनी त्याची हजेरी घ्यावी म्हणून अश्रुभरल्या नजरेनं परंतु निश्चयाने मान वर करून तिने त्याच्याकडे पाहिले अन् तिच्याकडे पहात असलेल्या त्याच्या आर्जवी अन् प्रेमळ नजरेला नजर भिडतांच, एका अननुभूत भावनेनं तिचं हृदय पुलकित झालं अन् ती अडखळतच म्हणाली... "पण... तो मागचा 'एक्स्क्यूझ !"

मिलिन्द एकदम घाईघाईने इंग्रजींत म्हणाला "हँग दोज वर्डस् ! मी तुला मागून सांगेन तें सगळं पण प्लीज विसरून जा ना तो माझा गाढवपणा ! अन् खरं सांग, मी तर तुला पसंत आहे ना !"

त्याच्या ह्या प्रश्नाने मित्रा विलक्षण लाजली अन् कुणाचीतरी चाहुल लागल्याने त्याचा हात दूर करीत घरी पळत जात असतां म्हणाली "इश्श ! कांहीतरीच काय विचारणं !"

बाहेरच्या दिवाणखान्यांत पाऊल टाकतांच मित्रविंदेला पळतांना अन् मिलिन्दला ओशाळतांना पाहून मेघा मिस्किलपणे हंसली अन् दोन्ही हात कमरेवर ठेऊन मान तिरपी करून ती मिलिन्दला म्हणाली "वा ! दादासाहेब बऱ्याच लवकर ओळख जमवलीत की ! काय विचार ठरला मग ?"

मिलिंद खांदे उडवित, तिच्याकडे न पहातां म्हणाला "ओळख बघूं तूंच !" त्यावर 'पसंत आहे मुलगी' असं म्हणून तिने आनंदाने जोरांत टाळी वाजवली अन् ती घरांत पळाली.

व्हरांड्यांत येऊन मिलिंदने इकडे तिकडे पाहिले. प्रातिपदेची रात्र होती. सर्वत्र पणत्या तेवत होत्या ! अन् त्याच्याहि हृदयांत आनंदाचे लक्षदीप उजळले होते !

× × ×

: प्रथम श्रेणीच्या :

कपबशा, ग्लासेस आणि सर्व प्रकारच्या कांच व चिनी सामानाकरितां—

चित्रा स्टोअर्सला भेट द्या !

टाइम्स्, नवभारत टाइम्स्, फिल्मफेअर, पराग, इलस्ट्रेटेड वुइकली, फेमिना, धर्मयुग

... आणि ...
नवीन प्रकाशन सारिका, एकॉनॉमिक्स् टाइम्स् व केसरीचे अधिकृत एकमेव विक्रेते :

चित्रा स्टोअर्स, १८, फुले मार्केट., जळगांव.

जळगांवांतील विश्वसनीय व सर्वांत जुना बुकडेपो

नेवे ब्रदर्स बुकसेलर्स

जळगांव.

आमचेकडे

प्रायमरी, माध्यमिक शाळेला, कॉलेजला, लागणारीं सर्व प्रकारचीं पुस्तकें व स्टेशनरी किफायतशीर भावांत मिळेल.
– एकवेळ येऊन खात्री करावी –

ब्रँच– शारदा बुक डेपो, कॉलेज एस्. टी बसस्टॅन्ड जवळ, जळगांव.



# अरविंदाचा काव्यसंन्यास........

अविनाश वामनराव अत्रे
P. D. Arts ( A )

**दृश्य पहिलें :—**

[ कॉलेजचा एक वर्ग–सुमारे २५–३० विद्यार्थी–विद्यार्थीनी आपापसांत बोलत आहेत. एवढ्यांत दरवाजांतून अरविंद हातोडे प्रवेश करतात. सारी मुलें स्टँपिंग करून त्याचें स्वागत करतात. ]

पहिला मुलगा– अरे अरविंदा, इकडे बसना !

दुसरा मुलगा– अरविंदराव, तुम्ही आपले मागेच बसा.

तिसरा मुलगा– नकोरे, मागं कशाला ? कविराज तुम्ही इथंच बसा.

दुसरा मुलगा– अरे, मागेच बसूं दे त्याला. थोडं वर्गातलं काव्य पाहूं दे. ( वर्गात हंशा )

[ अरविंदा काव्य पहाण्याचा मोह टाळून पुढेच बसतो. सेक्रेटरी येतो, स्टँपिंग सुरूं होतें. सारी मुलें 'या सेक्रेटरी' म्हणून स्वागत करतात. ]

एक मुलगा– अहो, सेक्रेटरी साडेपांच वाजले !

दुसरा मुलगा– सेक्रेटरी, चर्चेला उशीर झाला बरं का ?

सेक्रेटरी– थोडे थांबा, करतोंच सुरूं आतां !

[ तेवढ्यांत दोन मुली येतात. मागील बेंचावरील मुले बायकी आवाजांत 'अगबाई, या– या' म्हणतात, ( वर्गात हंशा ) ]

सेक्रेटरी– Silence please ! silence ! गप्प बसा ! ( भाषणाच्या थाटांत ) वाङ्मयप्रेमी मित्रांनो, आज मला थोडा उशीर झाला. त्याबद्दल......

एक मुलगा– Nevermind

सेक्रेटरी– त्याबद्दल मी दिलगिरी प्रदर्शित करतों.

( बरं...... बरं चा मुलांमधून आवाज )

सेक्रेटरी– मित्र हो ! आजच्या चर्चेचं साहित्य साऱ्यांनी वाचलं असेलच. परंतु जर कोणी वाचलं नसेल तर त्याचा थोडक्यांत सारांश सांगतों. आपल्या कॉलेजांतील श्री. सरदेशपांडे यांचें काव्य आज चर्चेला आहे. एका मनुष्यावर अतिशय वाईट कृत्य करण्याची जबाबदारी पडते. पण त्याची सद्विवेकबुद्धि त्याला त्यापासून परावृत्त करण्याचा सारखा प्रयत्न करते. तेव्हा अशा मनःस्थितींत सांपडलेल्या माणसाचें चित्रण येथे कवीने केलें आहे. ज्यांना या काव्यावर आपलें मत मांडावयाचे आहे, त्यांनी येथे येऊन आपलें मत मांडावें.

( मुलांत पुन्हा गडबड, कोणीच उठत नाही )

सेक्रेटरी– कोणी तरी उठाच ! कोणीच बोलत नाही हें ठीक नव्हे. तुम्ही उठा देशपांडे !

देशपांडे– No. excuse me.

सेक्रेटरी– तुम्ही देशमुख ? नाही ! तुम्ही कुळकर्णी ? नाही ! तुम्ही नाडकर्णी ? नाही ! अरे, तुम्ही सारेजण नन्नाचा पाढा म्हणूं नका ! हातोडे आतां कृपया उठाच ! इतर कुणी नाही. निदान तुम्ही तरी सांभाळा वाङ्मय मंडळाची......

अरविंद– ( उपकार करण्याच्या अविर्भावांत ) बरं ! बोलतों मी ! ( जागेवरून उठून टेबलापाशी जातो ! )

अरविंद– रसिकहो ! खरं सांगायचं म्हणजे, आज मी या काव्यावर बोलणार नव्हतों. कारण हें काव्य अगदी थर्ड क्लास आहे. ही कविता पहा, या कवितेंतील आठहि कडव्यांतील भावनेचें स्पिरीट उडून गेलें आहे. दुसरी गोष्ट सांगायची म्हणजे, ह्या कवीने वृत्तांच्या खडकाळ प्रदेशांतून आपल्या कवितेला नेले आहे. त्यामुळे आठच कडव्यांत तिला आठशें ठेचा लागलेल्या दिसत आहेत. मला समजत नाही कीं ज्यांना या खडकाळ प्रदेशांतून जातां येत नाही, ते आमच्या मुक्तछंदाशी कां दोस्ती करीत नाही ? उफाळलेल्या भावनांना मूर्तस्वरूप द्यायला मुक्तछंदासारखं दुसरं साधन नाही. मर्ढेकरांसारखे कवी हेंच म्हणतात कीं—

इरेस पडलों जर बच्चमजी
मुक्तछंद तर लिहीन मीही
ऐस पैस अन् लफ्फेबाज
लुगड्याचा जणूं पदर इरकली

( 'वाहवा' चा मुलांमधून आवाज )

आणि पुढे काय म्हणतात माहित आहे ?

इरेस पडलों जर वच्चमशी
तर भाषेची ऐशी तैशी
उलटी सुलटी करीन मीहि
भव्य भयानक विराट् कपत्रशी

( मुलें टाळ्या वाजवतात. ' भले मर्ढेकर ' चा आवाज. )

हल्लीच्या विज्ञान युगांत कवींनी साधेसुधे सुटसुटीत शब्द वापरून काव्य तासाभरांत रचावें. एका प्रख्यात नवकवीने लिहिलेलं काव्य माझ्या वाचनांत आलें आहे. तो लिहितो—

किंचित् होतें पोटांत दुखत
म्हणून ( नव ) कवि गेला मॅटरनिटींत
झाली डिलीव्हरी, आली प्रतिमा जन्मास
वेळ लागला फक्त अर्धा कलाक्, अर्धा कलाक्

( सारे टाळ्या वाजवतात. )

शिवाय आपण काव्यांत जुने संकेत लाथाडले पाहिजेत. या कवीने लिहिलें कीं ज्याप्रमाणे भुंगा गुंजारव करतो त्याप्रमाणे म्हणे त्याला त्याची सद्सद्विवेकबुद्धि त्याला सांगत होती ! खरं म्हणजे आतां सारे भुंगे खलास झाले आहेत. आतां उरले आहेत फक्त डांस ! म्हणून कवीने सद्सद्विवेकबुद्धीचा डांस त्याच्या भोवतीं गुण-गुणत होता असें म्हणावयास पाहिजे. आतां पूर्वीचा बाल-कवींचा अरुणोदय विसरा. आतां गिरणोदय झाला आहे. हल्लीची सायंकाळ बिनचेहऱ्याची असते. (असें म्हणतात) जीवनभर पोटासाठी धावपळ करावी लागते. जीवन कसें करपलेल्या भाकरीसारखें झालें आहे. केशवसुतसुद्धा हेंच सांगत होते.

जुनें जाऊं द्या मरणालागुनी
जाळूनी किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायीं टाका
सावध ! ऐका पुढल्या हाका
खांद्यास चला खांदा भिडवुनी

( सारे टाळ्या वाजवितात. )

* * * *

दृश्य दुसरें :—

[ अरविंद हातोडे आपल्या खोलींत टेबलावर लिहित असला आहे. मधेंच लिहिलेल्या काव्यांतील ओळी गुणगुणतो. ]



क्षणांत तूं चाललीस
लचकत, अंग मोडत
मनास वाटलें......

अरविंद–(स्वतःशी)–शाबास अरविंदराव ! फक्त पंचेचाळीस मिनिटांत काव्य झालं ! विजूची आठवण व्हावयाचा अवकाश, उचलली लेखणी लावली कागदाला अन् काय ! काव्य संपलं तेव्हाच थांबली ! आज हें काव्य विजूला वाचून दाखविणार आणि विचारणार ( तोंच दरवाजावर टक् टक् ) येस् ! हृदयाची हांक तिने ऐक-लीच असली पाहिजे. ( दरवाज्यावर जोराने टक् टक् ) थांब हं ! आलोच !

[ असें म्हणून दार उघडतो, दारांत त्याचा मित्र श्रीरंग साठे हजर. ]

श्रीरंग– काय रे अरु ! असा कोयनेल प्यायला-सारखा चेहरा करून कां पहातोस माझ्याकडे ? अरे दोस्त, तुझा फास्फ्रेंड इतक्या दिवसानंतर आल्यावर त्याला निदान बैस तरी म्हण.

अरविंद– छेः छेः रंग्या, लेका तूं येऊन अगदी बेरंग केलास माझा ! मी कुठल्या मुडमध्यें होतों हें तुझ्यासारख्या भावनेचा 'फ्यूज' उडालेल्याला कसं कळणार ! तूं...

श्रीरंग– ए फ्यूजवाल्या, शुद्धीवर आहेस ना तूं !

अरविंद– दारुबंदी झाली म्हणून कोणी काव्यबंदी करणार नाही. अरे हृदयाचें एंजिन धडधडूं लागल्यावर मस्ती म्हणजे काय याची जाणीव होते.

श्रीरंग– अऱ्या, तुला मी सांगून ठेवतों कीं ज्यावेळीं मी तुझ्याकडे आलों असेन त्यावेळीं तुझी ती मस्ती, तो काव्याचा झटका हें सारं दाबून ठेवत जा.

अरविंद– असं सांगितल्याने तो झटका थोडाच दाबला जाणार आहे ! रंग्या ! माणसाचं शरीर, त्यावरचा घाम, एवढंच काय पण त्याचं नुसतं नांव आठवलं तरी तो झटका उफाळून येतो. आतांच पहा ना ! सकाळीं विजया लोखंडेची आठवण झाली. झालं, लगेच तिच्या-वर कविता रचली.

श्रीरंग– ए भल्या माणसा ! दे ना सोडून त्या पोरीचा नाद ! तिच्या बापाची स्वतःची मोटर आणि बंगला आहे. आणि तूं— सगळं कांही मित्राचें वापरतो.



( आठवण होऊन ) लेका, माझा दोन महिन्यापूर्वी सूट घेतला होता ना ! तो—

अरविंद– ( निर्धाराने ) माफ कर मला ! पण तो तुला आज तरी मिळणार नाही. कारण मला—

श्रीरंग– माहित आहे ! मिस् लोखंडेला आपलाच सूट आहे असें भासवावयचे ! पण मित्र म्हणून सांगतों कीं तिचा नाद सोड, अरे ! काव्य केलें म्हणजे प्रेम करतां येतं असं नाही.

अरविंद– अरसिक किती तूं मित्रा ! अरे ज्याला काव्य करतां येत नाही तो प्रेम करीत नाही, अन् जो प्रेम करीत नाही तो कवीच होत नाही !

श्रीरंग– एवढे प्रेमवीर तुम्ही !

अरविंद– प्रेमवीर ? अरे, प्रेमाचे शाहीर म्हण. गोविंदाग्रजांना 'प्रेमाचे शाहीर' म्हणत. परंतु यार, उसके उपर अपनी टांग है, समझा. या कवितेंत विजूचें इतकें मस्त वर्णन केलें आहे !

श्रीरंग– बरं, मग काय ?

अरविंद– मग काय ? तिला वाचून दाखविणार अन् लगेच मागणी अगदी डायरेक्ट. हा पठ्ठा कोणाला डरत नाही.

श्रीरंग–बारे पठ्या ! म्हणे मागणी घालणार ! तिची चप्पल जेव्हा......

अरविंद–(मधेंच) रंग्या, लेका, हल्ली ती काळ्या सॅन्डल वापरते.

श्रीरंग–हो ! अन् तिचा काळा सॅन्डल तुझ्या गालावर प्रहारित होइल तेव्हा तुझ्यासारखा ' काला आदमी ' सुद्धा 'लाल' होईल.

अरविंद–मी लाल होईन. परंतु शरमेने नव्हे ! तर लज्जेने ! अरे, एवढा अनुराग झाल्यावर पुरुषाने देखील लाजलें पाहिजेच !

श्रीरंग–पण काय रे ! मला सांग कीं ज्याच्या साऱ्या कविता सा. प. आल्या आहेत त्याने काय पोरगी मिळवावी ? कवि मूर्ख असतात हेंच खरं. ( हसतो )

अरविंद–तूं हस लेका ! पण एक सांगतों, माझे मामा 'चिळा–कोयत्याचे' संपादक आहेत. त्यांचा मी भाचा आहे. हें साऱ्या समाजवादी संपादकांना कळण्याचा अवकाश कीं सारे येतील माझ्याकडे धापा टाकीत ! पण मला तसा मोठेपणा नको आहे. मी स्वतःच्या जीवावर पोरगी मिळवणार आहे.



श्रीरंग– पण समज ! विजू नाहीच म्हणाली तर !

अरविंद–अरे छोड दे यार ! ती काय नाही म्हणते मला. तिला मी माझी सारी बाजू एक्स्प्लेन करीन. 'तिला म्हणेन, विजू काव्याच्या पिपांत आज माझी मेलेल्या उंदरासारखी स्थिति झाली आहे. तरी तूं माझ्या जीवनाच्या पणतीमधील तेल असल्याने तुझ्यामुळे माझं जीवन ज्योतीसारखं प्रकाशित होईल.'

श्रीरंग–मधेंच वारा आला नाही म्हणजे मिळविली.

[ तेवढ्यांत एक डांस गुणगुणत येतो व अरविंदा-भोवतीं फिरुं लागतो. ]

अरविंद–रंग्या लेका आगोदर टाळी दे ! बस्स आमचं जमलंच !

श्रीरंग–जमलंच ! कुणाशी ?

अरविंद – तुझ्यासारख्या अरसिकाला नाहीच समजणार तें ! अरे, हा पहा डांस माझ्याभोवतीं गुणगुणत फिरत आहे.

श्रीरंग– अरे, डांस गुणगुणारच !

अरविंद–आतां समजलं, काय म्हणतो आहे तो ?

श्रीरंग–हो ! डांस सांगतो आहे कीं हे मूर्खा प्रेयसीच्या चिंतनांत आणि रटाळ काव्य खरडण्यांत तूं तुझ्या खोलीचा गेल्या सबंध महिनाभर केर काढला नाही.

अरविंद–Nonsence ! तो तुमचा प्रांतच नव्हे. याची भाषा कळायला कविच व्हायला पाहिजे. मी तुला एक्स्प्लेन करुन सांगतों. ऐक, हा डांस विजूकडून आला आहे.

श्रीरंग– आला असेल.

अरविंद– तुला कालिदासाचा मेघदूत माहित आहे का ?

श्रीरंग– हो, हो, मागल्या वर्षी होतं आपल्याला !

अरविंद– त्यांतल्या त्या ओळी.

कश्चित् कांताविरहगुरुणा स्वाधिकारात् प्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः ॥

आणि मग त्या यक्षाला

आषाढस्य प्रथम दिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श॥

काय माहित आहे ?

श्रीरंग– अरे, कालिदासाच्या वेळीं ढग बरोबर

निरोप द्यायचे. पण हल्ली ढगांचा कांही भरवसा नाही.

अरविंद–अरे, पण विजू आहे शहाणी. तिनं धरला हा डांस अन् पाठवला माझ्याकडे ! पण तिचा निरोप येण्या आधीच माझं उत्तर तिला मिळालं !

श्रीरंग–हें बघ, तूं पुन्हा काव्य बरळायला लागलास !

अरविंद– अरे, एक वेळ मी माझ्या विजूचा त्याग करीन, पण काव्याचा ? छेः छेः, तें कधी शक्य नाही. आम्ही कवी आमच्या मनाला सारखे बजावित असतों–

मना सज्जना काव्यपंथेचि जावे......

श्रीरंग– झालं ! आतां तुला रामदासांनी झपाटलेलं दिसतय !

अरविंद– रंगा, मी फार विसरभोळा आहे रे !

श्रीरंग– माहित आहे.

अरविंद– अरे, एवढ्यासाठीच तिने हा डांस पाटवला माझ्याकडे मला आठवण द्यायला.

श्रीरंग– दोघंमिळून पिक्चरला जायचा बेत आहे वाटतं ?

अरविंद– छे रे, आज मधल्या सुटींत ॲपॉईंटमेंट दिली आहे.

श्रीरंग– [ स्वतःशी गुणगुणतो ] मोहब्बतके राहोमें चलना संभल्के...

* * *

## दृश्य तिसरें—

[कॉलेजची घंटा होते. गोंगाट करीत विद्यार्थी बाहेर येतात.]

आशा– ए विजू, तुला आतां पिरिएड ऑफ आहे का ?

विजया– आहे नं !

आशा– मलासुद्धा ऑफ आहे ! चल, आपण टेबलटेनिस खेळूं.

विजया– अग मला ॲपॉईंटमेंट आहे ! ते आपले कवि–वाङ्मय मंडळांतले !

आशा– हां हां म्हणजे सदा आपल्याच नादांत असतात तेच ना !

विजया– बरोबर, अन् त्याचबरोबर डाव्या हाताच्या अंगठ्याचे नख दातांनी कुरतडणारे [ दोघी हसतात. ] त्यांना त्यांच्या काव्याची वही आज परत करायची आहे. अगदी पांच मिनिटांत येतें. [ जाते. ]

* * *



## दृश्य चौथें—

[ कॉलेजच्या बागेंत आंब्याच्या झाडाखालीं हातोडे मिस् लोखंडयांची वाट पहात आहेत. ]

अरविंद– [ स्वतःशी ] अरे ! घंटा होऊन पांच मिनिटं झालीं. अजून कशी आली नाही ? पोरींना वेळेचं महत्व कळत नाही हेंच खरं ! हीं पांच मिनिटं मला पांच युगें वाटतात. अरे वा, ती पहा येतेच आहे इकडे !

विजया– [ प्रवेश करून ] Excuse me Gentleman ! वाटेंत मैत्रीण भेटल्यामुळे थोडा उशीर झाला.

अरविंद– चालायचंच ! पण कविता कशा काय वाटल्या आमच्या !

विजया– खरं सांगायचं तर तुम्ही मधून मधून जो आत्मा, द्वैत, ब्रह्म वगैरे आले आहे ना अन् त्यांत मुक्तछंद, अगदीं सारी पानें कोरीं असल्याचा भास झाला.

अरविंद– बरोबर आहे तुमचं म्हणणं ! तुम्हाला मी अगोदर अरविंद आणि टागोर वाचावयास सांगितले पाहिजे होते. ते वाचल्याशिवाय माझें काव्य कळायला कठीण आहे. मी तर झोपतांना अरविंद व रवींद्र वाचतों. त्याशिवाय झोपच येत नाही. अहो, तुम्हाला सांगतों, परवां मी सहज एकनाथ चाळला. छेः तसाच उठलों अन् रात्रीं बराच वेळ भटकलों. शेवटीं एका प्रेतयात्रे-बरोबर स्मशानांत गेलों व जळणारं प्रेत पहात बसलों. पहाटे दूधवाल्यांच्या सायकलींच्या खडखडाटाने भानावर आलों.

विजया– [ थडपणे ] आतां मी जातें.

अरविंद– जास्त वेळ घेत नाही तुमचा. आज सकाळीं एक कविता केली. अवघ्या पंचेचाळीस मिनिटांत केली.

विजया– इतक्या थोडया वेळांत ?

अरविंद– हो ! सातला बसलो न् पावणेआठला थांबलों.

विजया–पण विषय काय आहे ?

अरविंद–अगदी साधा, प्रेमाचा !

विजया–प्रेमाचा असला तरी त्यांत तें द्वैत, अद्वैत असेलच.

अरविंद–नो, नो, नो ! अहो अगदी वास्तव आहे सारें. एक प्रियकर आपल्या प्रेयसीचें वर्णन करतो. वाचतों बर कां ? ( दोन चारदां खांकरतो ) ऐका—



तो दिवस
विसरणार नाही तो दिवस
ज्या दिवशीं मी तुला पाहिले अन्
हृदयाच्या मोहळांत
मधमाशा हंसल्या
घसघसून, भसभसून, फसफसून
आणि तूं हसलीस
दिसले मला दांत
मनास वाटलें
गोरे सोल्जर आहेत खडे
उभे करुन रांग
तेवढ्यांत तूं हलवलेस
नाक तुझें, आणि वाटलें मला
ज्या लेखणीने लिहिले हें गीत
त्या लेखणीसारखें–
आणि पाहिले मी ओठ तुझे
वाटलें मला
प्यायलीस तूं
लिप्टनची लाल लेबलें–
क्षणांत तूं चाललीस
लचकत, अंग मोडत
मनास वाटलें, चालली ट्राम
आपुल्या मुंबईची

विजया–वा, वंडरफूल ! फारच रगली कविता ! पण कायहो हातोडे, काव्य हें अनुभूतींतूनच निघतें ना ?

अरविंद– ofcourse ! अहो अनुभूति पाहिजेच. हृदयांतून अगदी [ छातीवर प्रथम उजव्या बाजूस नंतर डाव्या बाजूस हात ठेवून ] या इथून उचंबळून यायला पाहिजे. त्याशिवाय मी काव्य लिहित नाहीं.

विजया– मग मला तुम्ही सांगा कीं ही प्रेयसी तुम्ही कुठ पाहिली ?

अरविंद– मी ? छेः छेः अहो कवितेंतला प्रियकर असं म्हणत आहे.

विजया– अरे वा, इतक्यांत लाजायला शिकलांत कीं ?

अरविंद– नाही, म्हणजे त्याचं असं आहे.



विजया– कळलं तुम्हाला काय म्हणायचे आहे तें ! आपल्या कॉलेजमधलीच ना !

अरविंद– अगदी बरोबर ओळखलंत !

विजया– गुड् ! आज तिला इथं बोलावलं असतं तर आणखी मजा आली असती.

अरविंद– असं कसं होईल ! आली आहे कीं ती !

विजया– कुठे आहे ?

अरविंद–माझ्या समोर !

विजया–(आश्चर्याने) म्हणजे ?

अरविंद–विजू, आणखी स्पष्ट करण्याची गरज नाही. अगदी माझ्या हृदयांतले सांगतो.

विजया–(रागाने) Shut up ! तुम्ही काय बडबड चालविली आहे याची जाणीव आहे कां तुम्हांला ? म्हणे तूं मला पाहिजेस. मी तुमच्यावर प्रेम करतें अशी आपली समजूत असेल तर मला आपल्याला ताळ्यावर आणण्यासाठी सन्डल काढावा लागेल. यापुढं प्रेमाचा एक शब्द तर उच्चारुन बघा मग दाखवतें. Nonsence ( रागारागाने निघून जाते. )

अरविंद–अहो, अहो लोखंडे, अहो मिस लोखंडे ! छेः गेलीच निघून ! अखेर सारा घात झाला. प्रेमाचा संसार थाटण्यासाठी अगोदर काव्याचा संसार उभारला. पण ही पडली शिष्ठ पोरगी ! छे Frielty thy name is Woman हेंच खरं. बस्स, आता पुरें झालें हें काव्य.

आजपासून
आजपासून केली बंद
बिळें माझ्या मनाचीं
भावनेच्या घुशी आणि
विकारांचे उंदीर
घालत होते धुडगुस
केलें होतें भगदाड
पण आज
आज घेऊन आलों
शेण
विवेकाचें नि व्यवहाराचें
अन्
घेतले सारें लिंपून

[ प्रथम अरविंद व नंतर पडदा पडतो. ]

# श्री. ना. पेंडशांच्या कादंबऱ्यांतील प्रादेशिकता

ले०— कु. साधना आरस
बी. ए. तृतीयवर्ष

अद्भुतरम्य, वास्तववादी, तत्त्वचिंतनपर, स्वप्नरंजक मनोविश्लेषणात्मक संज्ञाप्रवाही अशा अनेक प्रवाहांनी मराठी कादंबरीचा विकास व विस्तार झालेला दिसतो. र. वा. दिघे, बोरकर, खांडेकर प्रभृतींनी प्रादेशिकतेचा एक नवा प्रवाह तिला आणून भिडविला. वरील कादंबरीकारांनी एक विशिष्ट प्रदेश, तेथील निसर्ग यांचा कादंबरींतील पार्श्वभूमि तयार करण्याकडे कुशलतेने उपयोग करून घेतला. परंतु रंगमंचकावर मागील बाजूस लावलेले कापडाचे रंगीबेरंगी पडदे जें कार्य साधतात तेंच कार्य त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रादेशिकता साधते. म्हणूनच की काय, 'प्रादेशिक' हें विशेषण यथार्थत्वाने त्यांच्या कादंबऱ्यांस लावतां येत नाही. दिघ्यांच्या 'पाणकळा' कादंबरींत जीवनांतील सत्–असत् प्रवृत्तींचा संघर्ष रंगविण्यासाठी भुजबा सारखी संतसज्जन व रंभाजी पाटलासारखी आडदांड तशीच रगेल व्यक्ति निर्माण करून नंतर त्यांच्या जीवनांतील विविध घटनांना उठाव आणण्यासाठी कोंकणची पार्श्वभूमि उभी केली आहे. खांडेकरांच्या 'दोन ध्रुवां' तहि रमाकांत, सुरंगासह सारीं पात्रें मुंबईचें रंगेल जीवन सोडून या ना त्या निमित्ताने कामापूरसारख्या खेडेगांवीं येतात. त्या सर्वांचाच तेथील कारखान्याशी येन केन प्रकारेण थोडा फार संबंध येतो. परंतु एकट्या वत्सलेखेरीज इतर कुठलेंच पात्र कामापूरच्या जीवनाशीं, तेथील निसर्गाशीं समरस होऊं शकत नाही. त्यामुळे खांडेकरांनी निर्माण केलेलें प्रादेशिक वातावरण मनाची फारशी पकड घेत नाही. हीच गत बोरकरांच्या 'भावीण' कादंबरींतील प्रादेशिकतेची! कथान्तर्गत जीवनचित्रणाला उठाव देण्यासाठी जाणीवपूर्वक व प्रयत्नपूर्वक प्रादेशिक पार्श्वभूमि उभी करण्याच्या खटाटोपांत व्यक्तिजीवन व तो प्रदेश यांच्यातील दुरावा वरील कादंबरीकारांच्या लक्षांत आला नसावा. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्यांस निभ्रान्तपणे प्रादेशिक म्हणतां आलें नाही. मानव–जीवन आणि प्रादेशिक वातावरण यांच्यांतील जिव्हाळ्याचा संबंध र. वा. दिघे यांच्या 'आई आहे शेतांत' किंवा 'पडरे पाण्या' या नंतरच्या कादंबऱ्यांतून ठळकपणे जाणवतो हेंहि येथे नमूद करणें आवश्यक आहे असें वाटतें.

मराठी कादंबरी खऱ्या अर्थानें 'प्रादेशिक' म्हणून नांवारूपास आली ती श्री. ना. पेंडसे यांच्याच काळांत! आज पेंडशांची कुठलीहि कादंबरी म्हटली म्हणजे हातांत हात गुंफून एकमेकींना बिलगून असलेल्या नारळी–पोफळीच्या व सुपारीच्या बागा, करवंदीच्या जाळ्या, कणखरपणे छाती व मान ताठ करून समस्त कोंकणची राखण करणारा करवंद्याचा कातळ, बापूंचें जीवन घडविणारा गारंबीचा साकव, वणदीचा पूल, सावित्री मातेचें झुळझुळ वाहणारें स्वच्छ पाणी, महापुरुष वटेश्वर, व्याघ्रेश्वरीचें देऊळ, अशीं कितीतरी चित्रें एकामागून एक मनःचक्षूंपुढून सरकूं लागतात, आणि ह्या निसर्गचित्रांची मनावरील धुंदी ओसरण्याच्या आंतच त्यांच्या निकट सहवासांत आलेल्या एक एक व्यक्ति आठवूं लागतात. कुठेहि अन् केव्हाहि फिसूकन हंसणारे लहानपणचे खेळकर, अल्लड तितकेच व्रात्य हऱ्या व परसू डोळ्यांपुढे उभे राहतात. तसेंच मुंबईच्या धकाधकीच्या वातावरणांत बकाल वस्तींतून भेळ–चिवडा विकणाऱ्या व कलंदर बनलेल्या हऱ्याची मूर्ति बोलकी होते. त्या पाठोपाठच गारंबीचा जीर्णोद्धार करण्यासाठी जातीने खपणारा आणि स्वकष्टार्जित पैसा गारंबीला पाण्याप्रमाणे अर्पण करणारा अफाट बापू, सामाजिक विरोधाला न जुमानता दुर्गेश्वराची सुसंस्कृतता व सुशिक्षितता वाढीस लावून त्याचा कायापालट करूं पाहणारे ध्येयवादी राजे मास्तर, मुसलमान कादरवर सख्ख्या भावापेक्षाहि जास्त प्रेम करणारा व त्यापायीं आप्तजनांचा रोष ओढवून घेणारा रघू बेंद्रे, अण्णा खोताच्या पापाचा उच्चार न केल्यामुळे जन्मभर तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणारी यशोदा या साऱ्या व्यक्ती आपल्या– समोर उभ्या राहून आपल्याशीं हितगुज करीत असल्याचा



भास होतो. फार काय, बापूची भूतवाडीची मावशी, राधा, सिंधुताई, भुत्या, अब्दुलमियाँ, नाना शिंत्रे, सोन्याबापू आखवे, यासारख्या कांही प्रमाणांत दुय्यम वाटणाऱ्या पात्रांनाहि आपण सहजासहजीं विसरूं शकत नाही. ही किमया फक्त पेंडशांनाच साधली!

वाचकाला सर्वस्वी अपरिचित असलेला कोंकणचा परिसर पेंडसे इतक्या सफाईने व जिव्हाळ्याने जिवंत करतात कीं त्यांच्या कादंबऱ्या वाचलेला वाचक कोंकणच्या कुठल्याहि भागांत न बिचकतां अचूकपणे भटकून येऊं शकेल. तीच गोष्ट त्यांच्या कथानकांतील व्यक्तिंबाबत! सर्वच व्यक्तींचें जीवन, जणूं स्वतःच जगत असल्याप्रमाणे इतक्या तादात्म्याने रेखाटलें आहे कीं नुकत्याच परिचय झालेल्या व्यक्ति फार जुन्या जिवलग स्नेह्यासारख्या वाटूं लागल्या. व्यक्तिजीवनदर्शनांतील आणि प्रादेशिक वातावरणनिर्मितींतील इतकी अपूर्व समरसता, इतका सफाईदारपणा व सहृदयता इतर लेखकांच्या वाङ्मयाला क्वचित्च आली असेल.

पेंडशांच्या कादंबऱ्यांवरून त्यांच्या अद्वितीय कलानिर्मितीची गंगोत्री एकट्या कोंकणच्या भूमींत, तिथल्याच नाना तऱ्हेच्या व्यक्तींत व त्यांच्या जीवनांत आढळतें हें उघड आहे. "माझी जन्मभूमि व आतांपर्यंत माझ्या वाट्यास आलेलें जीवन या दोहोंचा मला कादंबरीकार बनविण्यांत फार मोठा हात आहे." ह्या लेखकाच्या उद्गारांतहि हेंच व्यक्त झालें आहे. पेंडशांचें वयाच्या अकराव्या वर्षापर्यंतचें बालपणीचें आयुष्य हर्णै बंदराने वेढलेल्या कोंकण प्रदेशांतच गेलें. त्या संस्कारक्षम वयांत त्यांच्या मनावर तेथील वातावरण, लोकव्यवहार, लोक-जीवन, आणि विशिष्ट व्यक्तिनमूने यांचे जसे संस्कार झाले तसेंच तेथील वनश्रीचें, यात्राउत्सवाचें जें विलक्षण आकर्षण त्यांना वाटलें त्यांतूनच त्यांचें एकंदर अनुभव विश्व साकार झालेलें दिसतें. त्यांनी कोंकणच्या जीवनांत जें जें पाहिलें, स्वतः अनुभविले आणि जें त्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडलें त्या सर्वांशी कमालीचें इमान राखूनच पेंडशांनी आपली कलानिर्मिति केलेली असल्यामुळेंच ती अत्यंत सकस व डोळस बनली आहे.

पेंडशांच्या बापूला गारंबीबद्दल वाटणारा अपार जिव्हाळा, हऱ्याला करवंद्याबद्दल वाटणारी विलक्षण ओढ, रघू व कादरचा साखरपेंडीबद्दल वाटणारा आदर, तिच्या वरील त्यांची असीम श्रद्धा, दुर्गेश्वर-बुरोंडीवर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करणाऱ्या व त्यांच्या उत्कर्षासाठी हव्या त्या खस्ता खाणाऱ्या राजेमास्तरांची मानसिक तळमळ या साऱ्या भावना स्वतः लेखकाच्या मनांत वास्तव्य करणाऱ्या अशाच असून त्यांचें प्रतिबिंब त्या त्या व्यक्तींच्या स्वभावांत पडलेलें दिसतें. कोंकणचा परिसर, त्याच्या कानाकोपऱ्यांसह वाचकापुढे उभा करतांना, किंवा विशिष्ठ व्यक्तींच्या जीवनाचें त्यांतील बारकाव्यांसह दर्शन घडवितांना स्वतः पेंडसे कुठेच डोकावतांना आढळत नाहीत. निसर्गजीवन आणि मानवीजीवन यांची भावपूर्ण एकतानता चित्रित करतांना त्या दोहोंशीं पेंडसे कमालीचे समरस झाले आहेत, देहभान विसरले आहेत. कला विषयाबद्दल सखोल, सूक्ष्म पण तितकीच विशाल अनुभूति असल्याखेरीज अशा प्रकारचें तादात्म्य आढळणें शक्यच नाही. पेंडशांच्या रसरशीत आत्मानुभवांत व अवलोकन शक्तींत जितकी सूक्ष्मता व मार्मिकता तितकीच सर्वांगीणता व विशालता प्रत्ययांस येते. त्यांच्या कादंबऱ्या अव्वल दर्जाच्या प्रादेशिक, सकस व सरस ठराव्या याचें रहस्य हेंच नव्हे का?

कोंकणच्या वनश्रीचें बोट धरुन वाटचाल करणाऱ्या पेंडशांच्या कादंबऱ्यांत पाण्यांत रंग एकजीव व्हावा त्याप्रमाणे व्यक्तिजीवन व प्रादेशिक वातावरण परस्परांत मिसळून गेले आहेत. कथावस्तु व तदंतर्गत वातावरण समांतर न जातां, हातांत हात घालून फिरणाऱ्या जिवलग मित्रांप्रमाणे पुढे सरकतांना दिसतात. प्रदेश व व्यक्ति यांचा परस्परांवर अपरिहार्य परिणाम झालेला दिसत असून त्यांतूनच कथाविश्वाची उभारणी झाल्याचें दिसतें. प्रत्येक कादंबरींतून निसर्गाला, त्यांतील प्रत्येक घटकाला एका व्यक्तिइतकें महत्व प्राप्त झालेलें आहे. जीवनाचें एक प्रमुख अंग म्हणूनच निसर्ग कादंबऱ्यातून आलेला आहे. त्या त्या प्रदेशाच्या व्यक्तींच्या जीवनावर उमटलेला ठसा आणि त्या त्या विशिष्ठ व्यक्तिमुळे प्रदेशाला आलेलें महत्व ठिकठिकाणीं जाणवतें. एकच प्रदेश साऱ्या कथांतून वावरत असला तरी जीवनसंघर्षांत तो कधी कधी सहाय्यक तसा कधी विघातकहि ठरला आहे. कधी त्याच्या कृपादृष्टीमुळे जीवनाला उत्कृष्ट वळण लागलेलें दिसतें तर कधी त्याच्या इतराजीमुळे एखादें जीवन

उध्वस्त झालेलें दिसतें. पारीस्थितीची प्रतिकूलता आणि सामाजिक विरोध हत्या व बापू या दोघांच्याहि जीवनांत सारखाच तीव्र ! परंतु बापूला त्यांनी हात दिला तर हत्याला संसाराच्या वावटळींत हवें तसें फेंकून दिलें. पारिस्थितीशी दोन हात करीत, जिद्दीने जीवन जगण्याच्या निर्धारांतूनच बापूला पैशाचा धबधबा निर्माण करतां आला. आणि ' फार मोठं ' होण्याची विठोबाची इच्छाहि तो पूर्ण करुं शकला. पण या उलट कुठल्याहि प्रकारे प्रतिकूल पारीस्थितीला प्रतिकार न करतां समाज पुरुषाला भिऊन, बुजेरपणाने, दबलेल्या मनाने वावरणारा हत्या जीवनांतील साधीं साधीं सुखेंहि अनुभवूं शकला नाही. अशाच प्रकारचा पारीस्थितीचा अपारिहार्य परिणाम राजेमास्तर, मुल्या, यशोदा, सिंधुताई, यांच्या-ही जीवनांत झालेला आहे. हा प्रदेश म्हणजे जणुं सर्वच पात्रांची जीवनदायी प्रेरणा !

पेंडशांनी आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटलेल्या विविध नमुन्यांच्या व्यक्तिरखा त्यांना स्वतःच्या आयुष्यांत कधीतरी, कुठेतरी निश्चितपणे भेटलेल्या आहेत. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावाच्या अतिशय बारीकसारीक, रंगीबेरंगी छटा, तसेंच तिच्या जीवनातील अत्यंत मोहाचें किंवा अत्यंत कसोटीचे क्षणहि पेंडसे विलक्षण तन्मयतेने रंगवूं शकले. वाचकाप्रमाणे लेखकाच्याहि मनाला या सर्व व्यक्तींनी चटका लावला असला पाहिजे. त्यांच्या जीवनांतील दैन्य, दारिद्र्य, अज्ञान, आणि तज्जन्य इतर वैगुण्यें व वैषम्यें पेंडशांना तीव्रतेने जाणवलीं. त्यांनी तीं वैगुण्यें अतिशय सहानुभूतीने, सहृदयतेने व तितक्याच डोळसपणे टिपून घेतली व आपल्या कादंबऱ्यांतून त्यांचें अचूक दर्शन घडविलें.

व्यक्तिजीवन आणि समाजजीवन यांच्या कथेच्या अखेर पर्यंत चालणाऱ्या संघर्षांत आणि त्या संघर्षांतील नाट्यांतच पेंडशांची लेखणी अधिक रमते. पारंपारिक जीवनमूल्यांची मोठ्या श्रद्धेने जपणूक करणाऱ्या व एका ठरीव चाकोरींतच गुरफटलेल्या समाजांत अचानक एखादा बंडखोर बापू; बाणेदार, एकनिष्ठ, ध्येयवादी राजेमास्तर अथवा एखादा रघु जन्म घेतो. आणि तेथूनच पुढे पेंडशांच्या कादंबरींतील संघर्षाला सुरवात होते. व्यक्तिव्यक्तीच्या संघर्षांत पुष्कळदा निसर्ग अपरिहार्यपणे डोकावल्याखेरीज राहत नाही. या संघर्षाची धार तेज करण्यांत गारंबीच्या पाटाचें पाणी जितकें जबाबदार आहे तितकेंच अण्णा खोतांचीं व पांडभटाचीं पापें पचविणारें व्याघ्रेश्वराचें देऊळहि कारणीभूत आहे. या संघर्षांत एका बाजूला पेंडशांचीं सज्जन, सुधारणेच्छू व कांहीशीं महत्त्वाकांक्षी पात्रें असतात तर दुसऱ्या बाजूला जुनें तें सोनें ह्या समजुतीप्रमाणे जुन्याच रूढींना व परंपरांना चिकटून राहिलेलीं व आपली स्थितिप्रियता सोडण्यास तयार नसलेलीं पात्रें आढळतात. सत्पक्षापेक्षा असत् पक्षाचें प्राबल्य व संख्या अधिक असल्यामुळेच कीं काय एखाद्या राजेमास्तरांना प्राणाहून प्रिय अशा दुर्गेश्वराला सोडून देऊन हद्दपारीचें दुःख अनुभवास येतें. अशा संघर्षांत हत्यासारख्या कलंदर वृत्तीच्या व अंतर्मुख बनत चाललेल्या तरुणाला शेवटीं शेवटीं जीवनाचा उबग येतो. जगावरील त्याचा विश्वास उडूं लागतो. आणि एकटी निराशाच त्याला शेवटपर्यंत सोबत करीत राहते. अशा रीतीने व्यक्तिजीवन विरूद्ध समाजजीवन यांतील झगडा हेंच पेंडशांच्या बहुतेक कादंबऱ्यांचें मध्यवर्ति केंद्र व हेंच आकर्षणाचें महत्त्वाचें स्थान !

पेंडशांच्या कादंबऱ्यांचा उल्लेखनीय विशेष म्हणजे त्यांच्या अनुभवविश्वांतील विविधता अन् तितकीच समृद्धता ! ही समृद्धता त्यांनी रंगविलेल्या व्यक्तींच्या जीवनांतून, त्यांच्या स्वभावांतून व्यक्त होते. प्रत्येकाच्या वांट्याला आलेलें जीवन वेगवेगळ्या प्रकारचें असून त्यानुसार तें जगण्याच्या प्रत्येकाच्या पद्धतींतहि निराळे-पण आढळतें. बापूला बिनदिक्कतपणे व स्वाभिमानाने जीवन जगण्यांतच खरें सुख मिळाल्यासारखें वाटतें तर ध्येयसिद्धिसाठी सर्वस्वाचा होम करण्यांत, स्वसुखाला तिलांजली देण्यांत जीवितसाफल्य आहे असा राजेमास्तरांना साक्षात्कार होतो. जीवनाचें कोडें उलगडण्याच्या मागे लागलेल्या हत्याच्या जीवनावरच एक प्रकारच्या गूढतेची व गांभीर्याची छटा पसरलेली दिसते. परंतु अशा प्रकारच्या व्यक्तिनमुन्यांतील विविधतेपेक्षाहि त्यांच्यातील एकताच अधिक नजरेंत भरते. प्रत्येकाच्या स्वभावांत कितीहि वैचित्र्य आढळत असलें तरी माणुसकी हाच प्रत्येकाचा मनोधर्म आहे. माणुसकी हेंच जीवनाचें सर्वश्रेष्ठ मूल्य असा दृढविश्वास प्रत्येकाचा अतःकरणांतून झरतांना प्रत्ययास येतो. आपल्याच्या पानांप्रमाणे हृदयाला हृदय भिडविण्याचा अमोल संदेश राजेमास्तरांप्रमाणेच बापु, हत्या, मुल्या, दिनकर, राधा, सिंधुताई, कादर, अब्दुलमियाँ या साऱ्या व्यक्तिसुद्धा कसोशीने पाळतांना दिसतात. एखादाच जय्या किंवा सोन्याबापू हा ह्या मानवताधर्माला विरोध करणारा



भेटतो. परदुःख जाणून घेऊन तें शीतल करण्यासाठी प्रसंगीं स्वतःची अब्रू, सुख, समाधान धोक्यांत घालण्यासाठी लागणारा मनाचा अलौकिक मोठेपणा पेंडशांच्या प्रमुख व्यक्तीमध्यें सामान्यत्वाने आढळतो. जातिभेदाच्या, स्पृश्यास्पृश्यतेच्या भिंती फोडून प्रामाणिकपणे अब्रूने आणि माणुसकीने जगण्यासाठीच या सर्वांची धडपड चाललेली दिसते.

या साऱ्या व्यक्तींमध्यें सामान्यत्वाने आढळणारें दुसरें एक वैशिष्ट्य असें कीं त्या आजच्या यांत्रिक जीवनाच्या खडखडाटापासून जवळजवळ अलिप्त असलेल्या निसर्गसुंदर अशा कोंकणच्या मर्यादित भूभागांतच विशेष रमलेल्या आहेत. त्यांतून जर त्या बाहेर पडल्या तर त्यांच्या जीवनाला अर्थच उरत नाही. यांत्रिक जीवनाचा, वातावरणाचा स्पर्श झाल्यामुळेच जीव गुदमरून सोडणारी अशी हत्याच्या जीवनाची दारुण शोकान्तिका ' कलंदर ' मधून पहावयास मिळते. फक्त याच संदर्भात पेंडशांच्या कांही ठळक व्यक्तिरेखा साचेबंद म्हटल्या पाहिजेत. किंवा त्या एकाच ठशाच्या झाल्या आहेत काय अशी शंका मनास स्पर्श करून जाते व विचारानंतर ती शंका खरी आहे असंहि वाटूं लागतं ! निसर्गप्रीति व मानवता याबाबत पात्रांच्या मनोवृत्तींत जें साम्य आढळतें त्यावरून तीं पात्रें कांही प्रमाणांत ठोकळेबाज वाटूं लागतात. पण हीं दोनच साम्यस्थळें वगळल्यास लक्षांत यावा इतका प्रत्येक व्यक्तीचा वेगळेपणा ठसठशीत, रेखीव आहे.

पेंडशांच्या व्यक्ति मुलुखावेगळ्या किंवा अतिमानुष, अवास्तव नाहीत. पृथ्वीच्या पाठीवर कुठेच अशा प्रकारची एखादी व्यक्ति अजिबात भेटूं शकणार नाही असें नाही. ध्येयवादी व त्यागी शिक्षकाचीं कितीतरी उदाहरणें आज आपल्या डोळ्यासमोर आहेत. संस्कारक्षम मनावर योग्य वयांत योग्य ते संस्कार न झाल्यामुळे त्या मनाचा विकास कसा खुंटतो हें भोवतालच्या समाजाकडे डोळसपणे पाहिल्यास सहज लक्षांत येऊं शकेल. त्यामुळेच ' पेंडसे ' ' कोंकणच्या माणसांतच ' विशेष रमतात हें एका टीकाकाराचें मत वरवरचें व कांहीसें उथळ स्वरूपाचें वाटतें. त्यांची माणसे खास कोंकणची आहेत. हे अगदी खरें ! ज्या मातींत एखादी व्यक्ति जन्म घेते व तिच्या निकट सहवासांत आपलें बरेचसें आयुष्य घालविते त्या व्यक्तीच्या ठिकाणीं त्या मातीचे गुणावगुण कमीजास्त प्रमाणांत आढळणें अपरिहार्यच नाही का ? त्यामुळेच पेंडशांनी निवडलेला हा विशिष्ट भौगोलिक परिसर, त्याच परिसरांतील विशिष्ट व्यक्ति आणि त्या व्यक्तींच्या एका विशिष्ट जीवनांचेंच त्यांनी घडविलेलें दर्शन यामुळे त्यांच्या कादंबरीविश्वाला एक प्रकारच्या मर्यादेचें कुंपण घातलें गेलें आहे हें तत्वतः पटतें. पण तें पटूनहि त्यांतील व्यक्तिजीवनाची, व्यक्तिमनाची सार्वत्रिकता नाकबूल केल्यास लेखकाच्या बाबतींत अन्याय केल्यासारखें होईल. कारण माणूस म्हटला कीं त्याच्या भावना, मनोविकार, विचार इथून तिथून सारखेच असतात, या अलिखित तरीहि निरपवाद सत्याचा प्रत्यक्ष उद्घोष पेंडसे करीत नसले तरी त्या सत्याच्या आधारावरच त्यांचें कथाजगत् उभारलें गेले आहे हें निश्चित ! त्यांची कोंकणची माणसें हींसुद्धा ' माणसें ' च आहेत हें जर मान्य केलें तर मग तीं देशकाल–परिस्थितीची मर्यादा ओलांडू शकतात असें म्हणायला हरकत नसावी. ही मर्यादा ओलांडतांना फारतर त्यांच्या नांवारूपांत, वेशभूषेंत, आचारधर्मांत फरक आढळेल.

पेंडशांच्या कादंबऱ्यांतील प्रादेशिकतेचें स्वरूप स्थूलमानानें हें असें आहे. स्वानुभवजन्यता किंवा आत्मप्रचीति हे त्यांच्या कलाजगताचे मूलाधार होत. कल्पिताशीं फार काळ रमायचें नाही, कल्पनेला मोकाट सोडून अनुभवांची सत्यता घालवायची नाही या अलिखित संकेतपालनामुळेच त्यांच्या कादंबऱ्या अतिशय वास्तव ठरल्या आहेत. त्या वाचल्यानंतर वाचकाच्या मनांत विचित्र खळबळ माजते आणि तींतूनच जीवनाबद्दल एकदम आस्था, सहानुभूति वाटूं लागते. जीवन उत्साहाने जगण्याची प्रेरणाहि मिळाल्यासारखें वाटतें.

पेंडशांच्या सर्वच कादंबऱ्यांचा मनावर होणारा परिणाम अतिशय एकसंघ व सलग स्वरूपाचा असतो. वणदीचा पूल नुसता एकटाच आठवत नाही–तर त्यावर कधीमधी येणाऱ्या विठोबाच्या भूताचीहि आठवण त्याचेसह हटकून होतेच. एवढेंच नाही तर त्याबरोबर अफाट बापूच्या कर्तृत्वाचा भव्य चित्रपटहि डोळ्यापुढे तरळूं लागतो. जी गोष्ट वणदीच्या पूलाची, तीच हर्णै बंदर,

दापोली, साखरपेंडी, गुळपेंडी, दुर्गेश्वर, मुर्डी या भागांची ! नुसतीं निसर्गदृष्यें किंवा नुसत्या व्यक्ति आठवूंच नयेत अशी विलक्षण एकजीवता प्रत्ययास यावी, हेंच पेंडशांच्या कादंबऱ्यांना खऱ्या अर्थानें 'प्रादेशिक' विशेषण बहाल करण्याचें कारण होय ! व्याघ्रेश्वराच्या देवळाशीं अण्णा खोत व पांडभट यांचीं पापें इतकीं निगडीत कीं एकाचवेळीं व्हावी आठवण तर दोघांचीहि ! अशा तऱ्हेने पेंडशांच्या पात्रांइतकेंच त्या त्या पात्राशीं सलोख्याच्या संबंधाने निगडीत असलेल्या कोंकणच्या निसर्गाचें ठसेहि अत्यंत भरीवपणे, ठाशीवपणे मनावर कोरले जातात. त्यांच्या कादंबऱ्यांतून घडणारें माणुसकीचें भव्य दर्शन मन भारावून सोडणारें आहे. त्यांतील जीवनदर्शन आणि व्यक्तिमनांतील भावभावांचें परिणामकारक अधिक जिवंत आविष्करण हें वाचकाची चित्तवृत्ति अंतर्मुख करून सोडतात.

निसर्गाचें मानुषीकरण करून बालकवींनी एक जीवंत काव्य निर्माण केलें. पेंडशांनीहि गारंबी, दुर्गेश्वर, साखरपेंडी इ.त इतका जीव ओतला कीं त्या चालत्या-बोलत्या व्यक्ति वाटव्या. त्यांच्याहि मनांत हर्षखेदादि भावना प्रभावीपणे वास करतांना दिसतात. बापूच्या ऐश्वर्याने, पराक्रमाने गारंबी दिपून जाते तर राधेशीं विवाहबाह्य संबंध ठेवल्याने ती लालहि होते. अशा-तऱ्हेचा मानवी भावनांचा प्रादेशिक घटकांशीं, वातावरणाशीं सुसंवाद घडविलेला वाचकांपर्यंत संक्रांत करणें हीच पेंडसे यांची किमया अन् हेंच त्यांचें आगळें वैभव ! व्यक्तिजीवनांत विरून गेलेली त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रादेशिकता कांहींच्या मतें संकुचिततेचा दोष निर्माण करणारी ठरली असेल तर असो पण मला तरी ती वेगळेपण प्रकाशित करणारी प्रभावी शक्ति वाटते ! त्यांच्या कादंबरींतील प्रादेशिकता हाच त्यांच्या कलेचा फार मोठा गुण वाटतो !

---


विद्यार्थ्यांचें सर्वांत आवडतें ठिकाण—

★ मेसर्स विजय बुक डेपो, जळगांव. ★

आमचेकडे शालेय व सर्व प्रकारची हिंदी, मराठी व इंग्रजी पुस्तकें मिळतील.

....तसेंच....

पॉलिटेक्नीक, हायस्कूल व कॉलेज यांना लागणारी सर्व प्रकारची स्टेशनरी किफायत भावांत मिळेल.

अनुभव हीच खात्री ! एकवेळ अवश्य भेट द्या...!

मेसर्स— विजय बुक डेपो, जळगांव.


## वादविवाद—सभा

डॉ० बाबासाहेब आंबेडकर स्मारक ढाल [ धुळें ] विजेते



आन्तर महाविद्यालयीन सामने— वैयक्तिक स्पर्धांमधील विजेते



## स्नेहसंमेलन १९६१–६२



पंजाबचे राज्यपाल माननीय काकासाहेब गाडगीळ भाषण करतांना—

## आमचे कलावंत



'अंमलदार' नाटकांत काम केलेले विद्यार्थी–विद्यार्थिनी



# पराभव....

लें०– सु. द. कुळकर्णी
बी. ए. द्वितीय वर्ष

टण्....टण्.....टण्......टण्......टण्......
घड्याळांत पाचाचे ठोके ऐकून चांगलाच दचकलों मी ! बाप रे ! एवढ्यांत पांच वाजलेहि ? घाईघाईनं मी उठलों अन् नलूला म्हणालों, "बरं आहे नलूताई येईन पुन्हा केव्हा तरी, असाच सुट्टीच्या दिवशीं. आता जायलाच हवं. घरीं वाट बघत असतील सारी. अच्छा येतों."

"बघ हां, पुढल्या रविवारी अवश्य ये. आज ह्यांची व तुझी भेट झाली नाही. वाट बघेन हं मी तुझी."

"अच्छा जरुर येईन." असं म्हणून नलूचा निरोप घेतला व रस्त्यावर आलों. बसेसला खूप गर्दी होती. शेवटीं एका टॅक्सीला हात दिला व आंत जाऊन बसलों. "मोहना, सनेवाडा" पत्ता सांगितला व रुमाल काढून "हुश्" करीत तोंडावरील आलेला तेलकटपणा पुसण्याचा एक अयशस्वी प्रयत्न केला. टॅक्सीने वेग घेतला तशी माझ्या मनांतील विचारांनाहि आपोआप गति मिळाली. डोक्यांत कुणीतरी घण मारीत आहे असेंच वाटलं क्षणभर. कुठुन आलों या नलूच्या घरीं कोणास ठाऊक ? काय पण घर होतं ! कुबट वास घरांत मुरलेला होता नुसता ? घराला ओल तर कांही विचारूं नका. घराला एकच दार अन् एकच खिडकी ! कसे राहातात बुवा हे लोक ! कमाल आहे ! आणि आश्चर्य आहे, नलूलाहि आता आवडतं हे सारं ! हीच नलू काय स्वच्छतेच्या नियमांबाबत गप्पा ऐकवित असे हायस्कूलमध्यें असतांना ! हिलाहि आता आवडतं वाटतं......

पण......पण, मला मात्र फार वाईट वाटलं. नलूला तशी, गणेशच्या सान्निध्यांत, त्याच्या संसारांत वावरतांना पाहून ! आणि परमेश्वराच्या विसंगत करणीबद्दल थोडासा विषादहि वाटला......

कल्याणला एका पडक्या वाड्याच्या दोन खोल्यांत नलूनं आपला आणि गणेशचा संसार थाटला होता. संसार कसला म्हणतां येईल त्याला ?... आठ दहा पितळेचीं भांडीं, दोन चार फुटलेले पत्र्याचे डबे, एक रंग उडालेली, चिटकी झालेली पत्र्याची पेटी, एक दोऱ्या तुटलेली खाट, नाही म्हणायला दोन बिनहाताच्या डगडगणाऱ्या खुर्च्या, पिवळी डायल झालेलें जुनाट असें एक भिंतीवरील घड्याळ, ती दोघं नवरा बायको अन् त्यांची दोघं पोरं. बस्स्. एवढंच !! नलूचा सुडौल बांधा, लहानशी जिवणी, नाजूक डोळ्यांच्या दोन नाजूक फूलपाकळ्या, नीटस चाल......

उलटपक्षीं ह्या साऱ्यांच्या जोडीला गणेशचं मळकट, काळसर धोतर, खालच्या कवळीचा अगदी समोरचा एक दांत पडलेला, वर्णहि काळसरच, दोन्ही गालांचीं वर आलेलीं गालफडं नि बारीक व पिचपिचलेले डोळे........ह्या साऱ्या गोष्टी बघितल्या अन् माझ्या मनाला ती विसंगति अधिकच बोचली. नाहीतरी देवाला ही खोडच आहे...एखाद्या भिकारड्याच्या पोराला गोड आवाज द्यायचा. ....कमळासारख्या सुंदर पुष्पाला चिखलांत टाकायचं......गुलाबाला कांटे द्यायचे...... सारं कांही उलटं...... जें जिथं पाहिजे तिथं नेमकं नाही अन् जें जिथं नको तें तिथं हट्कून हजर......

मला मात्र वाटलं, हा दोघांचा जोडा अगदी अयोग्य आहे...... गणेश खेरीज इतर कुणालाहि ही शोभली असती. गणेशसारख्या कळकट राहणाऱ्या, कुरूप आणि गुणरहित माणसावर तिचं रूप फुकट उधळलं जात आहे...... त्याच्यासारख्या ऐंशी रुपड्ये पगार मिळविणाऱ्या भिकार मास्तराच्या आयुष्यांत तिचा जीवनप्रवाह वाया जात आहे......

मला मात्र अगीचच एवढी खंत...... दुसऱ्या बाजूनं मी विचार केला. नलूच्या वागण्यांत तर कुठेंहि या विसंगतीची जाणीव तिला असलेली दिसत नव्हती. कारण, तीच त्याचीं मळकट, काळसर झालेलीं धोतरं धूत होती.... तो जें जें सांगेल तें तें ती विश्वासाने मानीत असते... त्याच्या आवडीनिवडीनुसार त्याला खावूं घालीत होती.... तो जेवून उठल्यानंतर त्याच्याच उष्ट्या ताटांत जेवत होती.... त्याच्या पिचापिचीत डोळ्यांत जणूं कांही तिला हवं असलेलं दिसत होतं असंच ती वागायची. त्याला दोन मुलं दिली होती तिनं.... एक मोठी मुलगी व पाठचा एक मुलगा.

त्यांत पोरगीच तेवढी नाक, डोळ्यांच्या बाबतींत आई–सारखी होती. बाकीच्या बाबतींत दोघंहि पोरं बापाच्याच वळणांवर होती. पण नलू त्यांचा कंटाळा करतांना दिसत नव्हती. उलट त्यांच्या नाकांतला शेंबूड तीच काढीत होती.... त्यांचे मुकेहि घेत होती....

नलूला तशी स्नेहानं, समाधानानं वागतांना मी पाहिलं अन् मनांत सहज एक विचार आला.... खरंच का ही सारं मनापासनं करते आहे? कीं हें सारें ढोंग? काय समजायचं तरी काय हिच्या मनांतलं? गणेशासारख्या बिनहौशी, श्रीहीन, कळकट माणसांत हिला खरोखरी काय दिसलं? कीं केवळ "पदरीं पडलं अन् पवित्र झालं" अशांतली गत आहे? खरोखरच तिनं केलेली निवड योग्य आहे काय? कीं चूक आढळून आल्यानंतरहि केवळ स्वाभिमानानं चुकीला ती बरोबर समजत आली आहे? नलूची संसारांतील तृप्ति ही खरी वस्तुस्थिति कीं केवळ माझ्याचसाठी... केलेला खोटा अभिनय?

अशा अनेक प्रश्नांनी माझ्या मनांत धुडगूस घातला होता. मनाला हजारदा विचारलं "हा अभिनय कीं वस्तुस्थिति"? एक मन म्हणालं "हा अभिनय होता..., निदान असायला हवा असंच माझ्या मनाला आंतून वाटायला लागलं." नलूची तृप्ति व समाधान पाहून मला चुकल्याचुकल्यासारखं वाटायला लागलं.... त्याचं खरं कारण मला आत्ता सापडलं! तिच्याबद्दलच्या माझ्या असें चुकल्याचुकल्यासारखें वाटण्यामागे, एक कारण परंपरा होती. नलूनं आम्हां सर्वांचे अंदाज खोटे ठरविले होते! मानवी सुखदुःखाबद्दलची प्रत्येकाचीं मूल्यें निर-निराळीं असतात, प्रत्येकाच्या कल्पना निरनिराळ्या असतात हें मला कबूल आहे! परंतु आमचीं जीं मानवी सुखदुःखाबद्दलचीं मूल्यें होतीं, तीं नलूनं खोटीं ठरविली होती हें मात्र निश्चित!

अन् मी अचानक भूतकाळाच्या खोल गर्तेत शिरलों. नलूची स्थिति डोळ्यासमोर आली. नलूची आई मोठी प्रेमळ स्वभावाची होती. नलू नुसती चांगली शिकलेली सवरलेली होती, असें नव्हे तर चांगली मॅट्रीक पासहि झाली होती. नलूच्या शेजारींच आम्ही रहात होतों. सवात प्रथम मला बाळपण आठवलं. बालपणीं मी व नलू एकत्र खेळत होतों. एकदा तर आमच्या बालमित्रांनी आमचं दोघांचं लुटुपुटुचं लग्नहि लावलं होतं....

मला सारी बालपणांची स्वप्ननगरी आठवली. ती आठवण होतांच मी थोडासा हंसलों. बालपणीं मला आकर्षण होतं सातासमुद्रापलिकडच्या नगरीचं. मनांत यायचं हे सातहि समुद्र पायाखालून घालवेत एकदा. त्या नगरींतली राजकन्या अगदी नलूसारखी असेल नाही? तिला एकदा घेऊन यावं आपल्यामध्यें खेळायला मग ती नलूशी भांडेल! तिला रडवेल. नाहीतरी ती रडकी आहे. पण छे! ती तशी रडतांना मला बघवेल का? आमचं दोघांचं भांडण झालं तरी ती तर कधीच माझ्या विरुद्ध कागाळी, चहाडी करीत नाही माझ्या आईजवळ? मग त्या राजकन्येला कशाला आणायचे! छे! नकोच....

पण... मी थोडा मोठा झालों आणि या स्वप्न-नगरीची पडझड व्हायला लागली.

पण त्या स्वप्ननगरांतल्या राजकन्येवरचा माझा विश्वास मात्र दृढ होता. ती राजकन्या नलूसारखीच असणार याची मला खात्री होती.

...आणि मी थोडा मोठा होतों तोंच मला साक्षात्कार झाला कीं खुद्द नलू हीच ती राजकन्या! नलू मध्यें बराच काळ गेला. मी कॉलेजमध्यें गेलों. नलू मॅट्रीकला होती. तसं आम्ही बोलत असूं. पण बाळपणींचा मोकळेपणा निघून गेला होता.

आतां नलू दिसायची मैत्रीणींच्या मेळाव्यांतून हिंडतांना. खरोखर कुणी राजकन्याच मैत्रीणीसमवेत चालली आह असं वाटायचं.

"काकू, आईनं लोणचं दिलं आहे" असा तिचा आवाज अधूनमधून मला अभ्यास करतांना ऐकू यायचा. पण मी खोलींतून स्वयंपाकघराकडे मोर्चा वळविला कीं नलूचा स्वर कमी होत असे.

"काय नलू, कांहीं विशेष?

"कांही नाही रे, जरा लोणचं..." "नाही पण मी आल्याबरोबर बोलणं कां बंद पडावं तुझं"?

"इस्श्य, कांही तरीच!" "बरं, येतें हं काकू," असं म्हणत नलू निघून जायची."

मी एकदा आईला विचारलंहि, "का ग आई, नलू अलिकडे मला कां घाबरते"?



आई म्हणाली होती, "तिला तुझ्याशी बोलतांना लाज वाटते. माझ्याजवळ तुझ्या कॉलेजच्या परीक्षांच्या वगैरे सगळ्या हकीगती ती विचारते. पण तुला विचार–तांना लाजते. वयच आहे तिचं आता हें लाजण्याचं. बालपण संपलं आता तुमचं."

हें कळाल्यापासून मलाहि बरं वाटूं लागलं. नलू आपल्याला लाजते ही कल्पनाच कांही और वाटली. अन् नकळत मी नलूकडे आकर्षिला गेलों....तिला याबद्दल कांही जाणीव, कल्पना आहे की नाही याचा मात्र मी विचारहि केला नाही.... कारण तिच्याकडून कांहीच प्रतिसाद मिळत नव्हता....

नंतर बऱ्याच दिवसांनी एकदा नलू बाहेर भेटली. तेव्हा आमचं थोडं संभाषण झालं. बस्स, तेवढंच. लग्नाच्या आधीच मी तिला म्हणालों होतों, "मॅट्रीक सुटलीस एकदाची सेकंडक्लास. मग काय कॉलेजचं पहिलं वर्ष चालूं होणार ना या जूनला?

"आमचं कसलं कॉलेज घेऊन बसला आहेस?"

"कां?" मी म्हणालों, "दादा नाही म्हणताहेत वाटतं? तसं असेल तर सांग मी आत्ता दादांना सांगून बघतों...."

"नाही, तसं कांही नाही, परंतु माझं आता शिक्षणांत लक्षच लागत नाही रे. तुला म्हणून सांगतें, कुणाला सांगू नकोस. परंतु माझी मनःस्थितीच अशी कांही विचित्र झाली आहे कीं माझं मलाच नवल वाटतं....

मला अभ्यासांत गोडीच वाटत नाही आता... बरं, तें जाऊं दे. तुझं आतां शेवटचं वर्ष ना कॉलेजचं. पेढे मिळतीलच म्हणा. पण आतां लाडू कधी देशील आम्हांला...?" हें वाक्य तिनं ज्या आवाजांत उच्चारलं तो आवाज अशा कांही अनेक प्रकारच्या भावनांनी बनलेल्या अंतःकरणाचा निर्देशक मला वाटला कीं त्याचा अर्थ काय करावयाचा हेंच मला त्यावेळीं समजलें नाही. मी चपापून तिच्या चेहऱ्याकडे बघितलं तेव्हा तिचा चेहरा मला निर्विकार दिसला... मी क्षणभर गोंधळलों.

माझ्या मनांतलेंच ही बोलली कीं. का हिला कांहीच कल्पना नाही तिच्याबद्दल माझ्या मनांत काय भावना आहेत, काय अंदाज आहेत, काय अपेक्षा आहेत? माझ्याच काय परंतु माझ्या बालमित्रांच्याहि काय अपेक्षा आहेत तिच्याबद्दल ह्याची तिला जाणीवहि नसेल काय? छे? हें शक्यच नाही. कीं मीच पहिलं पाऊल उचलावं असं हिला वाटतं? परंतु पुन्हा शंका आली कीं हीचं कुणा दुसऱ्यावरच प्रेम आहे कीं काय? समजायचं तरी काय?

मी अशा गोंधळलेल्या स्थितींत असतांनाच ती मला म्हणाली होती, "एवढ्यांतच भावी संसाराच्या स्वप्नांत रममाण झालास वाटतं! बरं, तें जाऊं दे. अरे हो, तुला सांगायचं राहिलंच, माझा इथल्याच मुलींच्या मराठी शाळेंत शिक्षिकेच्या नोकरीसाठी प्रयत्न चालूं आहे. ते आमच्या वर्गावर हिंदीला गणेश देशपांडे मास्तर होते ना? त्यांच्याचतर्फे चालू आहेत प्रयत्न. फार सज्जन मनुष्य आहे तो...."

मी बारीक नजरेनें तिच्याकडे पहात होतों व तिचं बोलणं ऐकत होतों. ती सांगत होती, "या शाळेंतला तोच सिनीअर शिक्षक आहे. म्हणून त्यांच्याचतर्फे शाळेच्या हेडमास्तरकडे प्रयत्न चालविला आहे. बहुतेक यश येईल असें वाटतंय. कारण देशपांड्यांचं वजन चांगलं आहे असं सांगतात त्या शाळेंत...."

आता हा देशपांडे कोण ह्याचाच मी विचार करीत होतों.... एवढ्यांत माझा मित्र बाळू तेथून सायकलीवर बसून जातांना दिसला. माझ्याकडे त्याचं लक्ष गेलंच. मी हंसत हंसत हात हलविला तसा तो आमच्याजवळ आला.

"काय लेका, एका गावांत राहून किती दिवसांनी भेटतो आहेस? काय हालचाल आहे?"

"हाल आहेत." मी उत्तरलों. तसा तो नलूकडे वळला व तिला म्हणाला, "ओहो, तुम्ही? नमस्ते."

तिनंहि प्रतिनमस्कार केला. आणि आम्ही दोघंहि मित्र बऱ्याच दिवसांनी भेटतों आहे तेव्हा आपली उगाच अडचण होईल म्हणून ती तेथून निघून गेली. ती गेल्यावर बाळू मला म्हणाला,

"काय रे, ह्या साऱ्या पोरांनी ठरविलं आहे कीं काय लग्न करायचं नाही म्हणून? आता ह्या नलूचंच बघ ना. अजून कांही बार उडवायचा विचार दिसत नाही स्वारीचा. ह्या पोरींनीच असं ठरवलं तर आपल्या–सारख्या पोरांचं रे कसं होणार? मला मोठी चिंता वाटतेय." चेहऱ्यावरती आणतां येईल तेवढी

चिंता आणीत बाळूनं वरील वाक्य उच्चारलं, तसं आम्ही दोघं ह खळखळून हसलों. बाळू आपलं घोडं पुढे दामटवित म्हणाला, "प्रत्येक पोरीला वाटतं कीं तिचा नवरा देखणा, रुबाबदार, उच्च पदाधिकारी असा असावा. तूं कांहीहि म्हण, ह्या पोरींनी जास्त चिकित्सा केली कीं अखेरीस येतात मेटाकुटीला. अन् मग होतात कुणी क्लार्कांचो सहधर्मचारिणी, नाहीतर कुणा मास्तरांच्या पतिव्रता. जाऊं दे !

हं तुझा अभ्यास काय म्हणतो ? B. A. च्या यशाची खात्री आहेच मला तुझ्याबद्दल ! बरं पण पुढच्या वर्षी तरी उडवशील कीं नाही तुझ्या लग्नाचा बार ?"

मी मनांतल्या मनांत म्हणालों, "काय विचित्र रीत आहे पहा एकेकाची. थोड्याच वेळापूर्वी नलूनंहि मला हेंच विचारलं होतं अन् आता हाहि हेंच विचारीत आहे."

मी त्याला म्हणालों, "अरे, पण मी तर अजून शिकूनच राहिलों आहे. तूं तर चांगला पगारदार मनुष्य. अन् तुझ्याबद्दल तर तूं बोलायलाहि तयार नाहीस. माझ्याच लग्नाचं तूं विचारायला लागलास. खासा न्याय आहे !"

बाळू म्हणाला, "खरं आहे तुझं म्हणणं. पण काय करणार. येऊन गेल्या एक दोन मुली मला सांगून. पण त्या अशाच. त्यामुळं नकार द्यावा लागला. हवी तशी सांगून आलीच नाही. आयुष्याच्या गाठी असतात ना ह्या !"

बोलत बोलत आम्ही लक्ष्मीनिवासरेस्टॉरंटपर्यंत आलों होतों. खरं म्हणजे मी आज बाळूशी बोलण्याच्या मनस्थितींतच नव्हतों. थोड्याच वेळापूर्वी नलूचं अन् माझं जें संभाषण झालं होतं त्याच्याच विचारचक्रांत मी गुरफटलों होतों. पण शिष्टाचार म्हणून बाळूशी मी बोलत होतों. रेस्टॉरंटमध्यें आम्ही गेलों. कॉफी घेऊन मी त्याचा निरोप घेतला. बाळूच्या बोलण्याचा सूर मी ओळखला होता. मनांतनं त्यालाहि नलू हवी होती. आता स्पष्टच सांगायचं म्हणजे मला आणि बाळूला ह नलू हवी होती. आणि आम्ही तिच्या लायकीचेच होतों. कारण तसं पाहिलं तर बाळूला चांगल्यापैकी सरकारी नोकरी लागली होती. कुठल्याशा ऑफिसांत ऑफिस-सुपरिंटेंडेंट होता तो. आणि मी सुद्धा कॉलेजच्या B. A.-च्या शेवटच्या वर्षाला होतों.... हीं सारीं चित्रं डोळ्यासमोरुन सरकत होतीं. नलूचे वडील रामराव रेव्हेन्यू मध्यें क्लार्क होते. एवढ्यावरुन आमच्यापैकी कुणालाहि नलू दिली असती तर वाईट कांहीच झालें नसतें. परंतु दैवगति तशी नव्हतीच. माझ्यामुळे बाळूशीहि तिची तोंडओळख झालेली होती. परंतु एके दिवशीं नलूनं आम्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. आम्हा दोघांना वगळून एकेदिवशीं नलूनं गणेश देशपांड्याशी लग्न लावलं. गणेश देशपांडेबद्दल आम्हाला फारशी माहिती नव्हती. तरी तिनंच सांगितल्याप्रमाणे एवढं माहित झालं होतं कीं, तिच्याच शाळेंत तो मास्तर होता. नलूचं हिंदी चांगल होतं.... नि तोहि हिंदीचाच मास्तर होता. या पलिकडे पिचपिचीत डोळ्याच्या, उंच गालफड असलेल्या मंद बुद्धीच्या गणेशजवळ नलूसारख्या, अनेकविध गुणसंपन्न फक्कड पोरीला आकर्षित करायला आणखी कांही भांडवल असेल याची आम्ही स्वप्नांतसुद्धा कल्पना करुं शकत नव्हतों. पण तरीहि असं असूनसुद्धा तिनं त्याची निवड केली होती हें मात्र खरं.

मध्यंतरी बराच काळ गेला. मला नोकरी लागून माझं लग्नहि झालं होतं... आमच्या त्या जुनाट, रूढी-प्रिय गावांत अपरिचित असलेला, एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष आईबापांनाहि पसंत नसलेला प्रेमविवाह तिनं गणेशशी केला होता. मला नंतर कळलं कीं त्या दिवशीं नलू माझ्याशी जें बोलली त्यांत याच देशपांड्याचा उल्लेख तिनं केला होता. आणि तिचा शिक्षिकेसाठी केलेला पयत्न अयशस्वी झाला होता. मुलांच्या मराठी शाळेंत गणेश साधा मास्तर होता. त्याच्या कर्तृत्वाची मजल मास्तर-कीच्या पलीकडे जाणारी नव्हतीच. .. पण त्याच्या या मास्तरकीसमोर माझ्या पदवीचं, शिक्षणाचं, हुशारी व हौशी स्वभावाचं नलूच्या मानाने कांहीहि मोल नव्हतं. त्याचा ऐंशी रुपड्ये पगार नलूला बाळूच्या चारशे रु. पगारापेक्षा अधिक मौल्यवान वाटतांना दिसत होता. मला मनांतनं मात्र वाटायचं, कीं हें तिचं मूल्यमापन खोटं आहे. हें ढोंग, ही मनाशी केलेली प्रतारणा एखाद्या क्षणांपुरती का होईना कधी तरी माझ्या दृष्टीस पडेल या आशेनंच मी तिचं मन चाचपून पहात होतों. कधी तरी तिचं असमाधान मला दिसेल असं मी अपेक्षित होतों. .. वाट पहात होतों आणि ह्याच उद्देशानें मी



आज दुपारीं तीन वाजेचा तिच्याकडे गेलो होतों. परंतु माझ्या पदरीं निराशाच आली होती. तरीहि मी खट्टू झालों नाहीं. आशावादीच राहिलों. नाही तरी पुढच्या रविवारीं तिनं यायलाच सांगितलं होतं पाहूं या....

या विचारचक्रांत मी इतका गुरफटलों होतों कीं दारासमोर केव्हा टॅक्सी उभी राहिली याचं मला भानच राहिलं नाही. टॅक्सीवाल्याची हांक कानीं आली तसा मी भानावर आलों. त्याचे पैसे चुकते केले. घरांत शिरलों. पत्नी वाटच पहात होती. जातांबरोबर ती म्हणाली, "इश्श्य, सुटी झाली म्हणून काय झालं ? हें काय बाहेर फिरणं ? पांचाला येईन म्हणालात अन् पावणे सहाला आलात ? चला, झटपट कपडे बदला. तोंवर मी चहा करतें. स्वस्तिकला "मानिनी" लागला आहे. तिकिटाचं रिझर्वेशन मी आधीच करुन आलें आहे. म्हटलं येतात कीं नाही वेळेवर ? चला, आटपा, अजून पंधरा-वीस मिनिटें अवकाश आहे पिक्चर सुरु व्हायला. चलता ना ?

"अ ?... हो," मी कसं तरी म्हणालों. खरं म्हणजे मनांतनं सिनेमाला जाण्याच्या विचारांत मी नव्हतों. मला विश्रांती हवी होती. पण काय करतां ? झटपट कपडे बदलले नि निघालों.

मन ठिकाणावर होतंच कुठें ? मनांत एक विचार आला. नलू आपल्याला मिळाली नाही म्हणून काय झालं ? आपली बायकोहि कांही अगदीच अरसिक नाही. रुपानं नलूपेक्षा थोडीशी डावी असली तरी अगदीच कांही कुरुपहि नाही. मग मी एवढी कां बरें खंत बाळगावी नलूची ? बरं आता खंत बाळगली तरी काय उपयोग होणार होता ?...परंतु माणसाचं मन हें मोठं विचित्र असतें. तें एकदा जिद्दीला पेटलं म्हणजे मग काय करेल याचा नेमच नाही. माझंहि अगदी तसंच झालं होतं. नलूबद्दलचे विचार मनांत गर्दी करीतच होते. पत्नी मध्येंच कायसं विचारीत होती. त्याचीं कशीतरी तुटकतुटक, गोंधळून मी उत्तरें देत होतों. मला असं झालं होतं कीं केव्हा एकदाचा सिनेमा संपतो व घरी जातों अन् अथरुणांवर पडतों. अगदी विचित्र मनःस्थितींत "मानिनी" सिनेमा बघितला. अन् घरी आलों. जेवण केलं नि अंथरुणांवर आडवा झालों. नलूच्या विचाराने डोकें भणाणलें होतें. मला माझा क्षणभर अपमान, पराभव झाल्यासारखा वाटला...

क्षणभरांत माझ्याडोळ्यासमोर मघाशीं बघितलेला "मानिनी" चित्रपट आला. त्यांतली दृश्यें माझ्या डोळ्यासमोरुन तरळून गेलीं. काय योगायोग ? नेमका आजच "मानिनी" चित्रपट बघायला मिळावा ? माहेरच्या कौतुकाला पारखी झालेली, दुसऱ्याच्या श्रीमंतीबद्दल मुळीसुद्धा लोभ मनांत न धरतां स्वतःच्या संसारालाच स्वर्ग मानणारी अशी मानी, स्वाभिमानी नायिका त्या चित्रपटांत मी थोड्याच वेळापूर्वी पाहिली होती. मनांत विचार आला, नलूत आणि "मानिनी" तल्या नायिकेंत फरक काय ? नलूहि स्वतःच्या संसाराला स्वर्ग मानून राहूं लागली आहे. घरच्या, आप्तांच्या कौतुकाला नलूहि पारखी झाली आहे. दुसऱ्याच्या श्रीमंतीकडे पाहून त्याचा मुळीसुद्धा लोभ मनांत न धरतां गरीबींतहि स्वाभिमानानं, मानानं जीवन जगणाऱ्या नलूत आणि त्या चित्रपटांतल्या नायिकेंत फरक काय ? कांहीच नाही. दोघीहि सारख्याच. अशारीतीनें मी नलूची चित्रपटांतील नायिकेबरोबर तुलना करीत होतों. क्षणभर मला वाटलं, काय हा अपूर्व योगायोग ? जिचा मी आज एवढा विचार करीत होतो अगदी अशीच नायिका मला पडद्यावर दिसावी ना ! परंतु लगेच मी तिकडे व्यवहारी दृष्टीने बघायला लागलों. नव्हे माझ्या मनाची समजूत करायला लागलों म्हणा हवंतर...

मी मनांत म्हटले, "अहां, पडद्यावरची "मानिनी" ही मुद्दाम ओढून ताणून आणली आहे अखेरीस. त्या चित्रपटाचा शेवट त्या "मानिनी"च्या अपेक्षेनुसारच झाला आहे. व्यवहारांत या गोष्टी शक्य तरी आहेत काय ? चित्रपटांतल्या "मानिनी"ला कधीच स्वतःच्या परिस्थितीबद्दल असमाधानी, अतृप्त दाखविलेली नाही. आणि दाखवणं इष्टहि झालं नसतं. नायिकेला जर स्वतःच्या परिस्थितीबद्दल असमाधानी, अतृप्त दाखवलं असतं तर चित्रपटाचा बोऱ्याच वाजला असता की. अखेर चित्रपट तो चित्रपटच. कृत्रिमच वातावरण तें. नायिकेला कशाला असमाधानी दाखवतील ?"

लौकीक व्यवहारांत असं मुळींच असणार नाही. व्यवहारांत नलू एकदा तरी फसेल. कधी तरी असमाधानी, अतृप्त दिसेलच. कधी तरी पश्चात्ताप पावलेली दिसणारच !!

अशा तऱ्हेचे उलटसुलट विचार माझ्या मनांत येत होते व त्यांचें समर्थनहि मीच मनांत करीत होतों. शेवटीं मनांतील तें विचारांचं वादळ शमविण्याच्या हेतूनं मी माझ्या मनाची समजूत केली.... तसं कां म्हणत नाही.... परंतु मनांत म्हटलं अजून वेळ गेलेली नाही.... केव्हा तरी नलू असमाधानी दिसेलच ? याच विचारांत केव्हा झोप लागली तें कळलेंहि नाही.

ठरलेल्या रविवारीं, नलूनं मुद्दाम सकाळीं नवाला यायला सांगितलं असतांनाहि मी चांगला अकरावाजतां गेलों. वाटलं कीं वेळेवर गेलों नाही तरच मजा दिसेल. तिच्या सांगितल्याप्रमाणे गेलों तर सर्व पूर्वनियोजित वातावरण राहील.

घरांत पाऊल टाकलं. घरांतील वातावरण सुन्न होतें.... घरांत भकास शांतता होती.... माझ्या मनाला अधिकच हुरूप चढला.... दोघंहि पोरं बाहेरच्या खोलींत निराशापूर्ण व खेदयुक्त चेहरा करून बसली होती. मनांत म्हटलं कांही भांडणाबिंडण झालेलं दिसतय. अखेर योग जुळून आलेला दिसतोय आपल्या मनाप्रमाणे.

शेवटीं मोठ्या पोरीला विचारलं, आई बाबा आहेत ना घरांत ?" पोरीनं मानेनेच होकार दिला. मी आणखी मधें घुसलों. समोरचं दृश्य बघीतलं अन् क्षणभर अवाक् राहिलों ! माझा माझ्या डोळ्यावरती विश्वास बसेना कीं मी हें पाहातों आहे तें खरें आहे कीं भास आहे. कोणती अपेक्षा मनांत बाळगून मी आलों होतों अन् मला काय दिसत होतं !! मी सत्यसृष्टींतच होतो. समोर पाहिलं, नलू खाटेवर बसली होती. तिचा केशभार विस्कळीत झाला होता. चेहरा कसा उभरून यावा तसा दिसत होता. जवळच गणेश उभ्याने औषधाच्या बाटलींतून कपांत औषध ओतीत होता. औषध कपांत ओतून झाल्यावर त्यानं माझ्याकडे बघितले. व मोडक्या हाताच्या खुर्चीवरून "थाड् थाड्" करीत हाताने धूळ झटकली व बसा म्हटले. मी बसलों. कांहीवेळ कोणीच कांही बोललें नाही......नंतर गणेशनं स्वत.च्या हातांनी औषधाचा कप नलूच्या तोंडाला लावला. कडू औषध असल्यामुळे नलूच्या तोंडातून लाळ बाहेर आली......ती गणेशनं खुशाल आपल्या मळकट धोतराच्या सोग्याने पुसली......नंतर मोसंबीचा रस बशींत काढून आपल्या हाताने तिला पाजला. हाताचा आधार देऊन तिला निजते केले. तसं पाहिलं तर नलू मोसंबीचा रस आपल्या हातानं पिऊं शकली असती. स्वतः खाटेवर आडवी होऊं शकली असती. परंतु त्यानं स्वतः आपल्या हातानं रस पाजला व तिला आधार देऊन निजते केले. नलूने माझ्याकडे निजतांना बघितले व किंचित् हास्य तिच्या चेहऱ्यावर उमटलें...... झालें ! मनांतील द्वेषी विचारांनी पुन्हा उचल खाल्ली. माझ्या मनांत अढी निर्माण झाली. अहंभावाने मनाला घेरलें. मी मनाशीं म्हटलं... 'हा काय सारा माझ्या-साठी केलेला अभिनय ? कशावरून ? मला वाटतं म्हणून ? छे ! छे ! पण हो, मला अजूनहि तसंच वाटत होतं....'

असाच विचारतंद्रींत राहिलों असतों परंतु तेवढ्यांत मी भानावर आलों गणेशच्या शब्दांनी. तो सांगत होता, "काल सकाळपासनंच हिला ताप यायला लागला. काल फारच घाबरून सोडलं होतं. डॉक्टरला आणलं; ते म्हणाले, "विशेष कांही नाही. परंतु विश्रांतीची फार गरज आहे. त्यांना काम अजिबात करूं देऊं नका." त्यांनी गोळया लिहून दिल्या आहेत. आनायासें तुम्ही आलाच आहांत, पंधरावीस मिनिटांत मी गोळ्या घेऊन येतों. तोपर्यंत तुम्ही बसा नलूजवळ. फारच घाबरट आहे ती." त्याच्या स्वरांत काळजी दिसली......घाईघाईने त्याने शर्ट अंगावर चढविला आणि तसाच निघाला. मी माझी खुर्ची उचलून नलूच्या बाजेजवळ आणली व तिच्याशीं बोलूं लागलों. खरं म्हणजे तशा अवस्थेंत मी तिच्याशीं बोलायलाहि नको होतें. परंतु मनांतली खुमखुमी कांही जात नव्हती. मी मी मनाशीं प्रश्न केला, "मी तिच्याशी या अवस्थेंतहि बोलतों आहे तें योग्य आहे काय ?" दुसऱ्या मनानं उत्तर दिलं, "तिच्यासंबंधी वाटणाऱ्या खंतींतूनच तूं हें बोलत आहेस." क्षणभर माझा विजय झाला असें वाटलें. मी लगेच हातवारे करीत नलूच्या चुका तिला सांगूं लागलों.

"तुझं हिंदी किती चांगलं होतं नाही ? आता या संसारांत सारं पार विसरली असशील अगदी !"

तशाहि अवस्थेंत तिनं उत्तर दिलं, "छे छे ! रात्रीं सारं कामधाम आटोपल्यावर, मुलं निजल्यावर हें वाचून दाखवतात ना रोज कांहीतरी..."



मनांतनं मी चांगलाच सर्द झालों. मनाशीं म्हटलें, "छे !... हा बुरूज शाबूत आहे एकूण ! तरीहि मी तिला म्हणालों," तुझ्यासारख्या कर्तृत्ववान् मुलीनं असं रात्रं.दवस राबून फुकट आयुष्य घालवायचं ! छे ! तुझ्याविषयी किती वेगळ्या कल्पना होत्या आमच्या ! किती वेगळे अंदाज बांधले होते आम्ही तुझ्याबद्दल !"

तशी ती कळवळून म्हणाली, "तूं तरी असं बोलूं नकोस. सर्वांनी मला दोष दिला. प्रत्यक्ष आईबापांनी सुद्धा. परंतु माझी खात्री आहे कीं माझी निवड योग्यच आहे. मी इथे सुखी आहे. देवाच्या कृपेने सारं कांही आहे माझ्या घरांत. मला तर माझ्या घरांतच सारं हवं असलेलं मिळतंय !"

माझा बार फुकटच गेला होता. आणखी कांही अधिक बोलूं शकत नव्हतों व बोलणं इष्टहि नव्हतं. क्षणभर विचारांचं वादळ सुरुं झालं होतं. पुन्हा मी मनाशीं म्हटलं, "असेल ! गणेशसारख्या मचूळ, मळकट राहणाऱ्या माणसाच्या अन्तरंगांत हिला कांहीतरी दिसलं असेल ? कांहीतरी मूल्य आहे असें पाहिलें असेल ! नसेल कशावरून ?— तें मात्र तुमची आमची नजर पाहूं शकत नसेल ? परंतु माणसाचें मन मोठें विचित्र असतें. लगेच माझ्या डोळ्यांसमोर मघाचें दृश्य उभें राहिलें. स्वतःच्या तोंडातली लाळ नलूला काय स्वतः पुसतां आली नसती ? मोसंबीचा रस काय स्वतःच्या हाताने घेतां आला नसता ? स्वतःला निजतां आलें नसतें ? माझ्याकडे पाहून ही कां हसली होती ? ही काय सहज हसली होती ? कीं मला चिडवावयाचा उद्देश होता तिचा ? कीं मी तिच्या सांगितल्याप्रमाणे आलों होतों म्हणून आदरपूर्वक हसली होती ? का मला फसविण्यासाठी तिनं ह्या साऱ्या क्रिया गणेशकडून करवून घेतल्या होत्या ?... खरं काय असेल ? कीं केवळ अभिनयच होता हा ?

तेवढ्यांत गणेशचं पाऊल दारांत वाजलं. त्यानं लगेच एक गोळी नलूला दिली व म्हटले, "चहाबरोबर घ्यायला सांगितल्या आहेत डॉक्टरनं !"

नंतर कपडे काढून त्यानं चहाचं आंधण चुलीवर ठेवलें. मी त्याला म्हणालों, "माझा नका ठेवूं. मी इतक्यांत घेऊन निघालों बघा." परंतु त्यानं ऐकलंच नाहीं. तो म्हणाला, "आम्ही कांही मुद्दाम तुमच्यासाठी करीत नाही चहा. नलूलाहि गोळी घ्यायची आहे. बघा बुवा, गरीबाघरचा चहा आवडत नसेल तर नका घेऊं." मी चमकून त्याच्याकडे बघितलं.... मला जास्त बोलतांच आलें नाही. कसातरी मी तो चहा घेतला व निघालों. डोक्यांत चांगल्याच झिणझिण्या येत होत्या. अपमानानं मस्तक सुन्न झालं होतं, बधीर झालं होतं ! मनांत एकच प्रश्न सारखा घोळत होता, हा सारा माझ्यासाठी केलेला अभिनय कीं वस्तुस्थिति ? कशावरुन मला वाटतं म्हणून ? पण हो, मला अजूनहि तसंच वाटत होतं.... तें सारं ढोंग असावं ! नवऱ्याचं आपल्यावर किती प्रेम आहे, तो आपली किती काळजी घेतो हें दाखविण्यासाठीच नलूनं मुद्दाम सर्व गोष्टी त्याच्याकडून करवून घेतल्या. मनांत म्हटलें, कितीदा करशील लपवा छपवी ! थांब, जातेस कुठे ? केव्हातरी तुला पश्चातापदग्ध झालेली बघेनच ! मन जणुं सूडबुद्धीने पेटून निघालं होतं नुसतं....

× × × ×

पण त्यानंतर कांही दिवसांनीच माझी बदली झाली. पुनश्च मी संसारांत रमलों. नलूची आठवणहि विसरलों. अगदी पार विसरलों. असं एकच वर्ष लोटलं असेल नसेल. ऑफिसच्या कांही कामांनिमित्त पुन्हा एकदा नलूच्या गांवाला जावं लागलं. आल्या दिवशीं सर्व दिवस कामांतच गेला. म्हणून मुद्दाम मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं नलूच्याघरीं जायचें ठरविलें. गेल्या वेळेसारखें अचानकच...

सकाळचें दहा वाजलें होतें. मंडईजवळून मी जात होतों...... आाण अचानक गणेश दिसला. माझ्याचकडे येत होता तो. पाठीवर एक पिशवी... अन् दुसऱ्या हातांतहि एक पिशवी. घामाघूम झालेला दिसत होता तो. मूलतःच काळा वर्ण असल्यामुळे अधिकच विद्रुप दिसत होता तो. मी त्यांस हात जोडून नमस्कार केला. त्याने मानेनेच नमस्कार केला. कारण हातांत पिशव्या होत्या.

"केव्हा आलांत ?"

"कालच आलों ?"

"काल आलांत ? मग उतरला कोठे ? आम्हाला माहितहि नाही. काल घरीं नाही आलांत ?"

"काल कामांतच सारा दिवस निघून गेला. म्हटलं जाऊं उद्या सावकाश... अन् हा आत्ता तुमच्या-कडेच निघालों बघा." तो किंचित हसला .त्यामुळे त्याचे पिचपिचलेले डोळे अधिकच बारीक झाले. नाक

फेंदारलें गेलें अन्... अन् कसला तरी विचार येऊन त्याच्या चेहऱ्यावर उदासीनता पसरली. त्याचा चेहरा उतरल्यासारखा भासला....

तसा तो म्हणाला, "गेलांत तेव्हा भेटूनहि गेलां नाहीत? आम्हाला वाटलें जाल भेटून. नलू सारखी आठवण करीत होती तुमची..."

"काय? नलू माझी आठवण काढीत होती?" मी मनांतून अधिकच साशंक झालों. "सारं कांही ठीक आहे ना?" मी अधीरतेनं विचारलं. एक उसनें हास्य चेहऱ्यावर आणीत तो म्हणाला, "सारं ठीक आहे."

तें ऐकून माझा जीव भांड्यांत पडला. गणेशबरोबर बोलत बोलत मी त्याच्या घरीं आलों. तोंच त्याची पोरगी कमल समोर आली. केवढी वाढली होती ती! पहिल्यानं तर मी ओळखलंच नाहीं तिला. तिचा चेहरा मात्र कोमेजलेला दिसला.... गणेशनं पिशव्या तिच्या हातांत दिल्या. आम्ही बैठकीच्या खोलींत बसलों. गणेशनं कमलला बोलाविलं अन् सांगितलं, "कमुताई बऱ्यांच दिवसांनी आले आहेत तुझे मामा. पहिल्यांदा चांगले खमंग पोहे कर आणि त्यानंतर चहा. मग सावकाश स्वयंपाक केला तरी चालेल. कांही घाई नाही. अनायासं आज ब्राह्मण मिळाला. अन् आईला सांग, विनूभैय्या आले आहेत म्हणावं! अन् तुझ्या आईला मात्र हात देखील लावूं देऊ नकोस स्वयंपाकाला बरं का?"

पोरीनं मानेनंच नकार दर्शविला.

"म्हणजे?" मी आश्चर्यचकित होऊन विचारलं. कमलकडे मी बघितलं. तिचा चेहरा गोरामोरा झालेला मला दिसला....

तोंच घाईघाईनं गणेश मला म्हणाला, "म्हणजे त्याचं असं... अलिकडे आमची कमुताईच करून घालते आम्हाला. उत्तम स्वयंपाक येतो बरं का तिला! त्यानं कमलकडे बघितलं, कमल खाली मान घालून उभी होती. तिचा चेहरा किंचित उदास भासला. मला नाही म्हणायला अवकाशच मिळाला नाही. नंतर आमच्या गप्पा चालू झाल्या. गणेश माझ्याशीं दुसऱ्याच गोष्टी बोलत होता. पण त्याच्या वायफळ बडबडीकडे माझं लक्ष होतंच कुठं? माझ्यांत अचानक बदल झालेला होता.... माझी सूडबुद्धि पार लयाला गेली होती... माझी नजर शोधीत होती नलूला. पण तिचा विषयच निघत नव्हता. अन् ती बाहेरहि निघत नव्हती. मी वेड्यासारखा स्वयंपाकघराकडे पहात होतों...

पोहे करून झाल्यावर कमलनं हांक मारली. गणेशनं मला आंतल्या खोलींत नेले. आम्ही दोघंहि पाटावर बसलों. कमलनंच पोहे आणले बशांमध्ये...मला कमालीचं आश्चर्य वाटत होतं कीं नलू कुठे गेली आहे?

पोह्यांच्या बशा आमच्या समोर ठेवल्यावर बाल-बुद्धीप्रमाणे कमल म्हणाली, "बाबा, आईनं हट्टानं पोहे केले. तिनं ऐकलंच नाही माझं."

मी पहिलाच घास तोंडांत घातला तेव्हा कळलं कीं, पोह्यांत तिखट मुळींच नाही अन् मीठ मात्र भरपूर आहे. परंतु मी बोलून मात्र दाखविलं नाहीं. गणेश अन् त्याचा मुलगाहि मुकाट्याने पोहे खात होते. सारीं जणं मुकाट खात होतीं.... कुणीच कांही बोलला नाही. जणूं कांही पोहे खातांना ते अधिक खारटच असतात अन् तेहि बिनतिखटाचेच असतात....

कसे बसे मी ते पोहे संपविले अन् बाहेरच्या खोलींत येऊन बसलों. माझ्याच पाठोपाठ गणेश आला. अन् माझ्याजवळ उभा रहात हळू स्वरांत म्हणाला, "मध्यंतरी नलू मोटारीच्या ॲक्सीडेंटमध्यें सापडली. त्यांत बरंच लागलं तिला. पुनर्जन्मच झाला म्हणा ना! डोक्याला जास्त मार लागला होता. शेवटीं ऑपरेशन करावं लागलं. परंतु कांही उपयोग झाला नाही. डोळ्यांच्या अगदी कवड्या होऊन गेल्या....." भारावलेल्या व जड आवाजांत त्याने वरील वाक्यें उच्चारलीं.

बस इतकंच. कुठे देखावा नाही. तक्रार नाही. कांही नाही.

इतक्यांत आंतून नलूची हांक ऐकूं आली. गणेश आंत गेला व नलूला त्यानं हात धरून बाहेर आणून बसवली. औषधाच्या बाटलींतलं औषध कपांत ओतून त्यानं कप तिच्या तोंडासमोर धरला. नलूनं चाचपडत गणेशचे हात हातांत घेऊन तो कप ओठाला लावला.

त्यावेळीं त्या कपांतल्या औषधांत गणेशच्या मोठेपणाचं प्रतिबिंब पडलेलं मला दिसलं. अन् त्यांतच मला माझा पराभव दिसूं लागला......

---



# आरसा....

ले.– एम्. के. चौधरी
प्रथम वर्ष, विज्ञान

संध्याकाळीं चार वाजतां कॉलेज सुटल्यानंतर घरीं येऊन पाहतों तर वहिनीसाहेब जरा रागावलेल्या दिसत होत्या. कारण तसें कांही नव्हतें. आपल्या पसंतीने एक महिन्यापूर्वीच आणलेला आरसा आमच्या दादांच्या हातून पडून फुटला नि झालं. संध्याकाळीं नवीन आरसा घ्यायला जायचंय असं मला सांगितलं. मी माझ्या खोलींत जाऊन कॉटवर पहुडलों. माझं मन आरशाच्या राज्यांत विहरूं लागलं. आपल्या आवडत्या वस्तूविषयीं अनादर दाखवावा अन् न कळत कां होईना ती वस्तू नाहीशी व्हावी यावर मनुष्याने कां चिडूं नये? त्यांतल्या त्यांत आरशासारखी वस्तू. अंगनांचा जीव. दिवसाचा सोबती.

मला कुठंसं वाचलेलें आठवतय. मासळीला स्वतःचं चमकदार चंदेरी पोट कधी पाह्यला मिळालं नाही. नागाला आपल्या फणींतला तेजोमणी कधी दिसूं शकला नाही. कस्तुरीमृगाला आपल्या पोटांतली कस्तुरी कुठं हुंगायला मिळाली आहे? इतकं कशाला! जोंपर्यंत आरसा अस्तित्वांत आला नाही तोंपर्यंत तरी आपण आपला चेहरा कुठं स्पष्टपणें पाहूं शकत होतों? हा आरसा आपल्या जीवनांत एक मोठं स्थान बनून राहिला आहे.

प्राचीन काळापासून तर आतांपर्यंत आरशाने बरीच मोठी कामगिरी बजावली आहे. अलाउद्दीनाला पद्मिनीचें रूप पाहतां आलं तें याच आरशामुळे. पद्मिनी त्याच्या तडाख्यांतून सुटली व तिने आपल्या चारित्र्याचें रक्षण केलें तें आरशामुळेच! आरशाऐवजी 'आरशीं' तून नाही कां आपण आधुनिक 'पद्मिनी' चं रूप न्याहळीत? काय हो केशवराव? कांही झालं तरी आरशी आरशाचं प्रतिरूपच. त्याला रंग देऊन आपण डोळ्यावर चढवतो व 'ति'ला न कळत एखाद्या छबकडीचं सौन्दर्या-वलोकन करीत पुण्यांतल्या रमणीय रसवंतीप्रमाणे समाधानाचे पेले रिकामे करतों.

कोरियांतील एक गोष्ट मला आठवली. पतिमहाशयांनीं आपल्या प्रियेसाठी एक नवीन नवीन गंमती दाखविणारी वस्तू आणली होती. ती वस्तू पाहातांच पत्नी खवळली व म्हणाली, 'याच का सटवीला बरोबर घेऊन आलांत तुम्ही?" पतीने पाहिलें तों काय, महाशयहि उसळले व ओरडले, 'माझ्या गैरहजेरींत या कुणा दुष्टाला तूं बरोबर राहूं दिलेंस?" शेवटीं नवराबायकोचं कडाक्याचं भांडण सरपंचाच्या गालावरील मोठ्या काळ्या तिळामुळे संपलें. त्या तिळामुळे आरश्यांतलं रहस्य उघडकीस आलं अन् नवरा–बायकोचा गैरसमज नाहीसा झाला. असा आहे हा आरसा नवराबायकोंत (गोड) भांडण करून संसारांत वळवाचा पाऊस टाकणारा.

बारा वर्षांच्या उमलत्या पारिजातकाच्या कलिके-पासून तर बावीस वर्षांच्या उत्फुल्ल रसरसलेल्या गेंदेदार झेंडूच्या फुलाप्रमाणे असलेल्या यौवनेचें सौंदर्य त्यानं अगदी जवळून पाहिलं आहे. किशोरीच्या प्रेमविव्हल कटाक्षाने तो घायाळ झाला नाही. आरशासमोर कपडे करतांना, गौरांगीच्या अलककलापांत भांग भरतांना, विलोल नील नयनांत मेंहदीने रंगविलेल्या आरक्त कराग्राने काजळ घालतांना तो बावरला नाही. पदराच्या रेशमी कांठाच्या स्पर्शानं किंवा संपूर्ण विकसित यौवनाच्या स्वप्नामुळे त्याच्या अंगावर शहारे उभे राहिले नाहीत. तरुणी कपडे केल्यानंतर जशी दिसते त्यापेक्षा कपडे करतांना अधिक सुंदर दिसते असं म्हणतात. म्हणूनच मला आरशाचा फार हेवा वाटतो. खरा ब्रम्हचारी! तरुणांचा खऱ्या अर्थानं आदर्श! मेनकेमुळे तपोभ्रष्ट झालेल्या विश्वामित्रांपेक्षाहि श्रेष्ठच? आधुनिक रोमियो-प्रमाणे त्याला ढंग करावे लागत नाहीत. 'मौनं सर्वार्थ–साधनम्' हेंच तत्त्व त्यानं मनीं बिंबवलं आहे असं म्हणायला मुळींच हरकत नाही. अन् म्हणूनच कीं काय 'जर आरसा नसता तर स्त्रियांचा अर्धा वेळ वाचला असता.' असं म्हणणाऱ्या 'थोरा'चा मला मनस्वी राग येतो.

आपलं रूप क्षणोक्षणी पाहतां यावं म्हणून पूर्वीच्या स्त्रिया आनंदानं नदीकाठीं जाऊन धुणें धूत असत. इंद्रधनुष्याप्रमाणे लवलवलेली एखादी लतांगी आपलें सौन्दर्यावलोकन करून 'घट' तिथंच ठेऊन 'कुठं'

वेळूच्या जाळींत निघून जात. असल्या रित्या घटाला पाहून कविवर्य भा. रा. तांब्यांना कविता सुचली.

‘घट तिचा रिकामा झऱ्यावरी
त्या चुंबिती नाचुनि जललहरी!’

असें आहे आरशाचें रूप. सुखाचं स्थान. सौन्दर्याची साक्ष. आणि म्हणूनच आजची नववधू आरशापुढे—

‘ओळख पहिली गालीं हसते
सांग दर्पणा कशी मी दिसतें.’

असें गुणगुणतांना आढळली तर त्यांत नवल तें काय?

जलदर्पणांत आपलें कलापूर्ण शिंग पाहून बारहसिंगा अभिमानित झाला. लग्नाच्या वेळीं परातींतील पाण्यांत नूतन वधुवरांना आपले मुखचन्द्र एकत्र पाहतांना काय सुख मिळत असेल? नुसत्या कल्पनेनं सुख मिळतं. ‘हित्वा हालामभिमतरसाम्’ असें मेघदूतांत वर्णन केलें आहे त्यावरून तरी आपल्याला काय समजतें? जल–दर्पणांतच पाहून वर फिरत असलेल्या माशाचा उजवा डोळा छेदून अर्जुनाने द्रौपदी जिंकली. लाल किल्ल्यां–तील तुरुंगांत बसून शहाजहान आपल्या प्राणप्रिय मुमताजचें स्मारक–ताजमहाल–पाहूं शकत होता तो आरशामुळेच.

या आरशाचा मी फार आभारी आहे. माझ्या खोलीच्या भिंतीवर मी आरसा अशा रीतीने लटकावला आहे कीं कॉलेज रोडवरील पोस्टाच्या पेटीपासून तर एम्. जे. कॉलेजच्या फलकापर्यंत सर्व कांही कॉटवर पडल्या पडल्याच दिसतें. अन् याच रस्त्यावरुन सध्याकाळीं सहाच्या सुमाराला फिरायला निघालेल्या ‘एकी’ला पाहून मी लगेच खोलीच्या बाहेर पडतों अन् मग… आरशाचें आभार मानतों.

आरशाचेहि निरनिराळे प्रकार आहेत. बिल्लोरी आरसा, बहिर्गोल आरसा, अंतर्गोल आरसा. आरशांत पहाणाऱ्याला आरसा त्याचं खरं रूप दाखवितो. समाजां-तील लोकांप्रमाणे यांच्यांतहि कुसळाइतकं असेल तर मुसळाएवढं दाखवून पराचा कावळा करणारे बहिर्गोल आरशासारखे यांच्यांत आहेत. पण ‘दाढी’ करतांना ‘गृहस्थां’ना यांचाच फार उपयोग होतो.

प्रयोगशाळेंत प्रयोग करतांना आम्हाला फार आनंद होतो. हिरव्या साडींतील एखाद्या कॉलेजकन्य-केला टेलिस्कोपमधून पाहाण्यांत आम्हाला किती म्हणून आनंद होतो! प्रभात कॉलनींतल्या आमच्या ब्लॉक-वरील गच्चीवर बसून मुंबईहून ट्रिपसाठी आलेल्या स्कर्टमधल्या स्मार्ट छोकरींचीं प्रतिबिंबें झेलण्यांत आम्ही गुंग होतों तें याच आरशामुळे. अन् काय हो! रामचंद्र चंद्रासाठी रडत होते ना! आरशांत प्रतिबिंब पाहून ते हसले. त्याच रामाचे वंशज ‘चांद’ ऐवजी ‘चांदणी’साठी आसुसलेलों असलों तर त्यांत गर्ह्य काय आहे?

दररोज सकाळीं उठल्यानंतर आधी आरशांत पहावें. शेंडी चोळावी म्हणजे आयुर्वर्धन होतें, असें वैद्यकशास्त्रांत आहे असें म्हणतात. दररोज एकसारखं आरशांत पाहत राहिल्यास मानसिक सामर्थ्य वाढतें. डोळ्यांत तेजस्विता येते. म्हणूनच ‘हिप्नॉटिझम्’ किंवा ‘मेस्मेरिझम्’ यासठी आरशाची अत्यंत जरूरी असते. आरशासमोर व्यायाम केल्यास फार फायदा होतो, म्हणूनच कीं काय ‘जिमखानाहि’ आता ‘आरसेमहाल’ झाला आहे.

जळींस्थळीं आरसा आहे या युगांत. बैलाच्या झुलीला, सायकलीच्या हँडलवर, मोटारच्या ड्रायव्हरपुढे, तरुणीच्या पर्समध्यें, तरुणांच्या खिशांत, रेस्टॉरन्टमध्यें, पानपट्टीच्या दुकानावर, गरिबांच्या झोपडीपासून, राजेरजवाड्यांमधून हिरव्या माडीपर्यंत, सर्व ठिकाणीं यानं आपलं साम्राज्य प्रस्थापित केलं आहे. म्हणूनच या युगाला ‘आरसायुग’ म्हटल्यास त्यांत कांहीच वावगं होणार नाही.

× × ×

“यायचं ना माझ्या बरोबर आरसा घ्यायला सुभाष चौकांत?” वहिनींनी विचारलं! मीं कपडे केले. भांग पाडण्यासाठीं माझ्या खोलींतील आरशासमोर उभा राहिलों. सूर्याचे आरक्त कर संध्येला शेवटचें आलिंगन देत होते. आकाशांतील ढग पिवळे तांबडे झाले होते. कांही पक्षी साद घालीत उडत होते. असली शामशोभा आरशांत पाहून माझ्या वृत्ति पुलकित झाल्या, बहरल्या, फुलोरल्या. अन् मी आरसा आणण्यास खोलीच्या बाहेर पडलों.



# सूर लागला आज ....

लें०– रघुनाथ वा. कुळकर्णी
बी. ए. तृतीय वर्ष

मी मुळखाचा आळशी आहे हें इतरांचंच काय पण माझं स्वतःचं देखील मत आहे. सूर्य चांगला कासराभर वर गेल्यानंतर हळूंच उठावं, चादर अव्यवस्थितपणे पायांनीच भिरकावून द्यावी, मोरींत जाऊन भरंकन चूळ भरावी आणि स्टोव्हला काकडा लावावा. मात्र ह्या साऱ्या गोष्टी इतक्या थोडया वेळांत आटोपतात कीं माझं मलाच आश्चर्य वाटायला लागतं. चट की पट काम संपवणारा माणूस आळशी कसा असूं शकेल? असं तुम्ही विचाराल! पण माझ्या आळसाचा मुखवटा जरा वेगळ्या स्वरुपाचा आहे. नेहमीपेक्षा निराळा. खोलींतल्या वस्तु जागच्या जागीं नीट ठेवणं माझ्या हिशेबांतच नाही. जिथं रिकामी जागा असेल तिथं हातांतली वस्तु जाऊन पडते. स्टोव्हजवळ चहासाखरेचे डबे पडलेले आहेत. एक इंच अंतरावर रॉकेलचा डबा उभा आहे. आणि त्याच्या जवळच पाण्याची बादली आहे. आग आणि पाणी गुण्यागोविंदाने शेजारीं शेजारीं नांदत आहेत. सायंकाळीं आणून ठेवलेला पाव आशाळभूत नजरेने माझ्याकडे पाहूं लागतो.

शेजारच्या गजाभाऊंच्या घड्याळांत आठाचे टोल पडतात. तेव्हा कुठे “भूलोकीच्या अमृताने” भरलेली बशी माझ्या ओठाला लागते. आणि मग समोरच्या बालनच्या हॉटेलांत खडखडणाऱ्या डम् डम् डिगा डिगाच्या साथींत माझं संगीत चहापान आटोपतं. एकदा तर मला काय लहर आली कुणास ठाऊक, संगीताच्या तालावर मीहि ताना मारूं लागलों. बशीवरच कप आपटून तब्बलजीचा ठेका धरूं लागलों. पण व्हायचं तेच झालं. कपबशीचा कपाळमोक्ष होऊन माझी धुंदी साफ उतरली. मग दुपारचा चहा नाईलाजास्तव पितळी थाळींतून प्यावा लागला. खोली साफ करून जाणारी सरू मोलकरीणहि हल्ली कामचुकार झाली आहे. चार चार दिवस येतच नाही. पण मी तरीहि शांत असतों. साडेदहा वाजतां खाणावळींतले चार बेचव घास पोटांत रिचवून मी सरळ ऑफिसचा रस्ता धरतों. कुणी माझ्याशी बोलावं किंवा मी कुणाशी बोलावं असं मला वाटतच नाही. संध्याकाळीं पुन्हा दोन घास खाऊन मी खोलींत येऊन पडतों. वाटलं तर थोडसं दूध घेतों आणि कडी घालून सरळ झोपतों. पण झोप तर हरणाच्या पावलाने माझ्यापासून दूर जाऊं पहाते. भिंतीवर टांगलेल्या तसबिरी भकास नजरेने माझ्याकडे पाहतात. दांत विचकून हसतात. मला तें सारं सारं असह्य होतं. डोक्यावर पांघरूण घेऊन मी निपचित पडून राहण्याचा प्रयत्न करतों पण झोप लागत नाही. शेवटीं मी उठतों. हळूंच दिवा लावतों. त्या प्रकाशांत एक तसबीर माझं लक्ष खेचून घेते. घाबरलेलं मन ताळ्यावर येतं. विचारांचं काहूर ओसरूं लागतं. मला आधार मिळतो. माझं पांगळं मन भानावर येतं. माझ्या ताईच्या त्या तसबिरीकडे मी कितीतरी वेळ बघत असतो. मन ताईच्या चिंतनांत रंगून जातें. माझ्यापेक्षा दहा वर्षांनी मोठी असलेली माझी ताई, आई– बाबाचं छत्र उडून गेल्यानंतर जिने अपार मायेने मला वाढविलं ती माझी मुलुताई शेवटीं मला सावरून धरते. पदवीधर झालेल्या छोट्या भावाला, केवळ चार अक्षरांचीच ओळख असलेली ताई दिलासा देते. माझं मस्तक आदराने नम्र होतं.

होय! जिच्यावर कालपर्यंत मी जीवापाड प्रेम केलं, त्या प्रभा मुजूमदारने शेवटी माझा घात केला. हृदयावर वज्राघात बसला. केवळ व्यवहारी जगावर प्रेम करणाऱ्या प्रभेने माझ्यांतील कलावंत मनाची ओळख करून घेतली नाही. तिच्या बरोबर मी हिंडावं, हुंदडावं, मौज करावी. हीच तिची इच्छा. पण माझ्यांतला ‘गायक’ अजून मेला नव्हता. गायनाची मला मुळांत आवड होती. तिला समजावून सांगण्याचा मी खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ. माझ्या स्वप्नमंदिराचा पाया कलला. मंदिरच उध्वस्त झालं. मला कांही सुचेनासं झालं. तिने माझा अव्हेर करुन तिऱ्हाईताशी लग्न केलं… माझं मन बेचैन झालं. आशा आकांक्षांची रांगोळी झाली. कशांतच राम वाटेना. जीवनांत स्वारस्य उरलं नाही. माझं कामांत लक्ष लागेना. माझ्या आवडत्या व्हायोलीयनचे मी तुकडे तुकडे केले. हृदयवीणेचा तार तुटल्यावर संगीतांत आनंद कसा वाटणार?

पण ह्याच वेळीं मला सावरणारी एक व्यक्ति निघाली. ती म्हणजे माझी सुलोचनाताई – सुलूताई ! एकुलत्या एक लाडक्या भावासाठी ती मुंबईला धावत आली. माझ्या मनाची तगमग तिला उमगली. अनुभवाचे चार शब्द तिने मला ऐकविले. विहिरीच्या काठावर उभ्या असलेल्या माझ्या मनाला तिच्या दिलाशाने लगाम घातला. या विशाल जीवनांत अजूनहि माझ्या कर्तृत्वाला भरपूर वाव आहे हें तिनं पटवून दिलं. मला पटलं. मी स्वतःवर चिडलों. पण जागा झालों. केवळ ताईमुळे मी भानावर आलों. ह्या गोष्टीला केवळ दोनच महिने लोटले आहेत. मी प्रभाला विसरलों आहे. पुन्हा पूर्वी-प्रमाणे जगायचा प्रयत्न करतों आहे. पण तें नीट जमत नाही. धकाधकीच्या जीवनाचा मला वीट आला आहे. आगगाडीच्या खडखडाटाने कान किटले आहेत. मित्रांचा सहवास नकोसा झालाय...... सारं शून्यवत भासू लागतय...

अशा वेळीं ताईची सोज्वळ मूर्ति माझ्या नजरेपुढे उभी राहते. माझं अंतर्मन नवीन पंख फुटल्यागत झेंप घेऊं लागतं. ताईला दिलेल्या वचनाला जागण्याचा माझा निर्धार आहे. ताई माझ्यासाठी एक सुंदर ‘ मुलगी ’ शोधणार आहे. तिला आवडेल अशी वहिनी. तिच्या शब्दाला मान देणं माझं इतिकर्तव्य आहे !

आजहि रोजच्याप्रमाणे सकाळचा चहा घेऊन मी बाहेर पडलों. ताईला पत्र टाकायचं होतं म्हणून सरळ पोस्टाकडे निघालों. माझं आजूबाजूला लक्ष नव्हतं. शेजारुन माणसं चालत होतीं. मोटारी धावत होत्या. रिक्शा पळत होत्या. पण मला कशाचीच खंत नव्हती. मी सरळ पोस्टांत आलों. दोन अंतर्देशीय पत्रं घेतली व परत निघालों. तोंच कुणाची तरी हाक माझ्या कानांवर आली. प्रथम वाटलं भास असावा. पण खरोखरच कुणीतरी मला, माझं नांव घेऊन हांक मारीत होतं... आणि विशेष आश्चर्य म्हणजे तो एक स्त्रीचा आवाज होता. मी स्तंभितच झालों. ह्या नव्या गांवांत बदलून यायला मला एकच महिना झाला होता. कुणाशी विशेष असा परिचय अद्याप झालाच नव्हता...

“ हेमंतराव, अहो हेमंत ”

मी मागे वळून पाहिलं ! जागच्या जागीं खिळून उभा राहिलों. वीस–बावीस वर्षांची, तांबडा ब्लाऊझ आणि पांढरी शुभ्र साडी परिधान केलेली नाजुक तरुणी माझ्या पुढ्यांत उभी होती. तीहि दोन्ही हात नम्रपणे जोडून हसतमुखाने तिने मला नमस्कार केला. मीहि प्रतिनमस्कार केला... पण... पण ही युवती कोण ? या प्रश्नाचं उत्तर मला गवसेना. स्मृतीला ताण दिला. पण छे, ती माझ्या परिचयांतली नव्हतीच. मग ती मला ओळखते कशी ? मी म्हणालों,

“ नमस्कार. पण......आपण...... ”

“ मी कोण, कुठलें वगैरें सारं सारं सांगणार आहे. ” एवढं बोलून ती किंचित् थांबली. घामेजलेलं कपाळ रुमालाने टिपलं व पुढे म्हणाली, “ हेमंतराव, आज चार दिवसापासून मी तुमच्या शोधांत आहे. शेवटीं सुदैवाने आज गाठ पडली म्हणायची. इथल्या पोष्टांत क्लार्क्सच्या जागा भरायच्या आहेत म्हणून इंटरव्ह्यूसाठी मी आलें आहे. तुमचा मित्र कृष्णा गुते ह्याने तुम्हांला चिठ्ठी दिली आहे. मी त्याची मावसबहिण. तुम्ही मला जरूर ती मदत करावी असं त्याने विनंतीपूर्वक सांगितलं आहे... ”

“ कृष्णाच्या तुम्ही मावसभगिनी होय ! मग आधीं कां नाही सांगितलं ? ” मी चिठ्ठी वाचली. मध्येंच ती म्हणाली,

“ अरे हो एक विसरलेंच कीं, माझं नांव चंदा फाटक. ” ती हसली.

कृष्णासाठी चंदाची सोय करणं जरूर होतं. पण खरं म्हटलं तर मी बावरलों होतों. अशावेळीं एका तरुण स्त्रीच्या सहवासांत मला कांही दिवस घालवायचे होते... माथं सुन्न झालं.

इकडल्या तिकडल्या गप्पा मारित आम्ही खोली-जवळ आलों. चंदाची बॅग माझ्या हातांत होती. तिच्या गळ्यांत एकदा थर्मास काय तो होता. खोलींत नेणं आणि माझा अव्यवस्थितपणा तिला दाखविणं मला जड वाटलं. क्षणभर कुलूप उघडायचं भान मला राहिलं नाही. तेव्हा चंदा पुढे आली. माझ्या हातांतील बॅग तिने काढून घेतली व कुलुप उघडण्याची मला जाणीव करून दिली. दार उघडून आम्ही आंत आलों.

“ चंदा, मला वाटतं घरीं चहा बनविण्याऐवजी आपण हॉटेलचा मागवूं. ”

“ छे, छे घरांत सारं असतांना हॉटेलचं कळकट पाणी हवं कशाला ? ”



आणि ती खरोखरच चहाच्या तयारीला लागली. स्टोव्ह पेटवून चहाचं आंधण ठेवलं. हें सारं ती इतक्या सहजतेने करित होती कीं माझ्यासारख्या सराईतालाहि आश्चर्य वाटावं. मीहि तीला मदत करूं लागलों. गादी व्यवस्थित गुंडाळून ठेवली. कागदाचे कपटे गोळा केले. पण मध्येंच मला अडवून ती म्हणाली,

“ मी आवरेन सारं नंतर. तुम्ही बसा पाहूं. ”

“ अहो पण, तुम्ही माझ्या पाहुणी... ”

“ ऊं हूं ! स्त्रीने स्त्रीचं काम करायला नको वाटतं ? ” असं म्हणून तिने चहाचा कप माझ्या हातीं दिला. दुसरा कप स्वतः घेतला. अहाहा, किती लज्जत-दार झाला होता चहा ! त्यांत आगळीच माधुरी होती. निराळीच खुमारी होती. चंदा हंसत होती. मनमोकळें-बोलत होती· दिलखुलासपणे गप्पा रंगवित होती.

परंतु मधूनच माझ्या मनाला कसली तरी टोचणी होत होती. मित्राच्या बोटभर चिठ्ठीवर परक्या तरुणीला खोलींत ठेवून घेणं ही कांही साधीसुधी गोष्ट नव्हती. चंदा मला फसवणार तर नाहीना ? पण चंदाचं उमलत्या फुलासारखं हसणं पाहून आणि निरागस बोलणं ऐकून माझी कुशंका दूर झाली.

थोड्या वेळानंतर मी खाणावळींतून डबे घेऊन आलों. तेव्हा आश्चर्याचा दुसरा धक्का बसला मला. चंदाने खोली अगदी स्वच्छ केली होती. दोरीवर वेडेवाकडे लोंबकळणारे माझे कपडे, हॅंगर्सना व्यवस्थित अडकावून ठेवलेले दिसत होते. स्टोव्ह चकचक करित होता. टेबलावरची धूळ नाहीशी झाली होती. मी खोली तर चुकलों नाही ना, असा मला भास झाला. मी दारावर टक् टक् केलं.

“ चंदा... चंदा...... ”

“ आलें ” असं म्हणून ती मागल्या दाराने आंत आली. तिचे गोरे हात साबणाच्या फेसाने भरले होते. मी मुद्दामच म्हणालों,

“ तुम्ही उगीच त्रास घेताहात हा. सरु येईल ना कामाला. ”

“ त्यांत कसला त्रास ? तुमचा टेबलक्लॉथ धूत होतें मी. आणि हे बघा, कांही दिवस मला इंथ राहायचं आहे. तेव्हा केलं थोडं काम तर बिघडलं कुठे ?... आणि एक विचारूं कां हेमंतराव ? ”

“ जरुर जरुर... काय ? बोला ”

“ हेमंत, तुम्ही मला ‘ अहोजाहो ’ बोलूं नका. निसंकोचपणे एकेरी नांवाने हांक मारित जा. मला त्यांतच आनंद वाटेल. ”

“ जशी तुमची इच्छा. बस्स ! ” मी उत्तरलों.

“ पुन्हा तुमची... ”

“ अरेच्या चुकलों कीं; जशी तुझी इच्छा बस्स ! ”

“ बस्स !! चंदा लाजली.

त्या दिवशीं चंदाचा इंटरव्ह्यू उत्तम पार पडला. शिवाय एक पोस्टइन्स्पेक्टर माझ्या ओळखीचा असल्याने तिला जॉब मिळण तसं कठीण नव्हतं......

दुसऱ्या दिवशीं चंदा कामावर रुजू झाली. तिचं ऑफिस लवकर सुटत असल्याने ती माझ्या अगोदर खोलीवर आली होती. मी येऊन पहातों तर बाईसाहेब स्टोव्हवर कांहीतरी शिजवीत होत्या. खमंग वास सुटला होता. म्हणजे हिने येतांना दाळ, तांदूळ देखिल बरोबर आणले असावेत. पिठलं-भाताचा समाचार घेऊन केवळ चंदाच्या आग्रहाखातर रात्रीं भटकायला गेलों. फिरून परत आल्यावर मी कालच्याप्रमाणे एक सतरंजी घेऊन बाहेर पडवींत झोपायची तयारी करूं लागलों. पण चंदाने मला दारांतच अडवलं. बाहेरची थंडी मला बाधेल असं तिने ठासून सांगितलं. एवढंच नव्हें तर ती स्वतः एका कोपऱ्यांत सतरंजीवर झोपली. निष्पाप अन् निर्व्याज भावनेने. माझ्यावर तिचा विश्वास होता. आपुलकी होती. तिला शांत झोप लागली आहे असं जाणून मी हळूंच बाहेर पडवींत येऊन लवंडलों. हळूंच दार लावून घेतलं.

एका दिवसामागून दुसरा दिवस हजेरी लावून जात होता. माझ्या वैराण जीवनांत चैतन्याची फुलबाग फुलूं लागली. हळुहळू माझा एकाकीपणा नाहीसा झाला. कॉलेजांत असतांना भावगीत गायनाचा मला छंद होता. गॅदरिंगच्या वेळीं मला बक्षीसं मिळालीं होतीं. पण नंतर परिस्थितीने सारा रंग पालटून टाकला. व्यवहारी जगांत मी गाणं विसरलों. विसरलों म्हणण्यापेक्षा, त्या कलेला मी दुरावलों. मला गायन येतं हें चन्दाला कसं कळलं कुणास ठाऊक. पण एके दिवशीं तिने खास माझ्यासाठी एक सुंदर व्हायोलीन विकत आणलं. मी म्हणालों,

“ उगीच केलास एवढा खर्च ? ”

" माझ्या पहिल्या पगाराची, तुमच्या वाढदिवसानिमित्त भेट आणली आहे मी तुम्हाला. हेमंत, कृपया स्वीकार करावा..."

" माझा वाढदिवस ? अन् आज आहे ? "

" होय. तुमच्या डायरींत वाचली मी जन्म तारीख. " चन्दा.

" दुसऱ्याची डायरी अशी चोरून वाचायची नसते. "

" तुमची डायरी म्हणजे माझीच डायरी. किनई !"

तिच्या बोलक्या डोळ्यांनी माझ्या हृदयाचा ठाव घेतला !

माझ्या कलेला तिने पुनर्जीवन दिलं !!

मलाहि पुनश्च गायनाचा छंद जडला. चन्दाला पेटी सुंदर वाजवितां येई. माझा आवाज आणि चन्दाच्या पेटीचा मंजुळ सूर, किती सुंदर मिलाप! अपूर्व योगायोग ! संध्याकाळीं गाण्याची बैठक मारली म्हणजे तासन् तास समाधि लागायची आमची.

माझं जीवन पार बदललं. निराशेच्या गढूळ पाण्याची वाफ झाली. चंदा कोण, कुठली हें सारं मी विसरलों. मला प्रेम देणारी, आपुलकीने माझी काळजी करणारी एक प्रिय व्यक्ति या नात्याने मी तिच्याकडे पाहूं लागलों.

एक गोष्ट मात्र खरी कीं चाळींतील लोक आणि ऑफिसची मंडळी आम्हा दोघांकडे नवरा-बायको म्हणून बघत होती. त्यांना वास्तव परिस्थितीची कल्पना देणं हा एक पेचच होता. माझ्या शेजारीं राहात असलेले दामुअण्णा पालवणकर तर चंदाला चक्क सुनबाई अशी हाक मारीत. एकदा त्यांनी चांगलीच कमाल केली. नुकत्याच माहेरीं आलेल्या त्यांच्या मुलीची पहिली मंगळागौर होती. त्यानिमित्त मला आणि चन्दाला, जोडीने जेवायला येण्याचं खास निमंत्रण होतं. बायकांनी आग्रह करून चन्दाला " नांव घेण्याची " गळ घातली—

" चांदीच्या वाटींत खडीसाखराचे खडे
हेमंताचें नांव घेतें मंगळागौरीपुढे ! "

उखाणा घेतांना माझ्याकडे मोठ्या अभिमानाने बघत होती ती. भरल्या घरांत सुवासिनी म्हणून मिरविण्यांत ती आनंदली होती. क्षणभर मीहि स्वतःला विसरलों. चंदाचं मोहक लावण्य माझ्या डोळ्यांत नाचूं लागलं.

प्रेमाच्या दुनियेंत मश्गुल झालेलं माझं मन भानावर आलं तें ताईच्या पत्रामुळे. दुसऱ्या दिवशीं सुलूताईचं पत्र आलं. तें मी नीट वाचलं. पुन्हा पुन्हा वाचलं. मोटारला ब्रेक लागावा त्याप्रमाणे माझं स्वैर सुटलेलें मन एकदम ताळ्यावर आलं... ताईने माझ्यासाठी एक सुंदर ' मुलगी ' शोधली होती. तिला बघण्यासाठी मला गांवीं बोलावलं होतं... माझं माथं सुन्न झालं. सर्वांगाला चटके बसूं लागले. एका मनाला ताईला दिलेल्या वचनाची जाणीव झाली... दुसऱ्या मनापुढे चंदा घिरट्या घालूं लागली. ताईचं वचन कीं चंदाशी विवाह ? छे, डोकं गरगरूं लागलं... कर्तव्यपालन मला ताईकडे खेचित होतं. तर प्रेमाच्या स्निग्ध प्रकाशांत चंदाची सालस मूर्ति चमचम करित होती. त्या दिवशीं माझं कशांत लक्ष लागेना. चंदाशी खूप बोलावसं वाटत असूनहि शब्द ओठांतच जिरले. माझ्या निराश आयुष्यांत आशेचा तजेला निर्माण करणारी, माझ्या सुप्त कलेला पुनर्जीवन देणारी चंदा, तिला विसरणं माझ्या शक्तिपलिकडे होतं. तिला माझ्या हृदयांत स्थान होतं... तिच्या वियोगाच्या नुसत्या कल्पनेनेंच माझं सर्वांग शहारलं. मी पुरता बेचैन झालों. माझी अस्वस्थता मात्र चंदाला जाणवली असावी. मी संध्याकाळीं ऑफिसमधून घरीं आलों तेव्हा चंदा, ताईच्या फोटोपुढे हात जोडून उभी होती. नकळत माझं मस्तक नम्र झालं. ताई आमच्या प्रेमविवाहाला संमती देईल अशी आशा मला वाटत होती. पण मधूनच शंका चाटून जाई. ताईने माझ्याविषयीं कांही अपेक्षा बाळगल्या असतील. तिच्याहि आकांक्षा असतील म्हणूनच तिने माझ्यासाठी ' स्थळ ' शोधलं असेल. मी चन्दाशी लग्न केलं तर त्या नियोजित मुलीच्या मनाला किती वेदना होतील. ताईचं हृदय अक्षरशः विदीर्ण होईल.

...माझी अस्वस्थता अधिकच वाढूं लागली...

...दोन दिवस मी चन्दाशीं विशेष बोललों नाहीं. तिला कष्टी करायचा माझा विचार नव्हता. परंतु कुठला तरी निर्णय घेणं जरूर होतं.... आणि नेमक्या ह्याच प्रसंगीं चन्दाने मला लग्नाची गळ घातली. इतके दिवस मनांत सांठवून ठेवलेलं मनोगत तिने प्रगट केलं. आपण दोघं मिळून ताईच्या भेटीला जाऊं, तिचा शुभाशिर्वाद घेऊं.... त्यामुळे मी अधिक बेचैन झालों. माझ्या संमतीची चन्दा वाट बघत होती. माझा होकार मिळणारच असा तिला आत्मविश्वास होता. प्राप्त परिस्थितींत मी निश्चित असा निर्णय घेऊं शकलों नाहीं. चन्दाच्या मनाला वाईट वाटेल असं मात्र मी कांही केलं नाहीं. दोन दिवस मी विषण्ण मनःस्थितींत होतों हें पाहून कदाचित् तिला दुःख झालं असेल...



सायंकाळीं ऑफिसांतून परतलों तों खोलीला कुलूप. चन्दा घरीं नव्हती. शेजारच्या गजाभाऊंनी मला किल्ली दिली. मी दार उघडलं. टेबलावर चिट्ठी होती. चन्दाने लिहिलेली—

प्रिय हेमंत,

एक अनाहूत स्त्री म्हणून मी तुमच्या जीवनांत आलें. तुमचा अगत्यशील स्वभाव मला खूप आवडला... तुमच्या ' होकाराची ' मी दोन दिवस वाट पाहिली. तुमची उदास अवस्था पाहून, तुम्हाला मजविषयीं कदाचित् प्रेम वाटत नसेल, असं मला वाटलं. तुम्हाला दुःखी करण्याचा माझा इरादा नाही. खरंच, मी कोण ! कुठले ? हें माहित नसतांना तुम्ही तरी कां करावं माझ्याशीं लग्न ? इतके दिवस मला आपुलकीने आसरा दिल्याबद्दल मी आपली आभारी आहे. तुम्ही कुठंहि असा, सुखी असा.

दुर्दैवी — चन्दा

मी चिट्ठी पुन्हा पुन्हा वाचली. नकळत डोळे पाणावले. चंदाच्या विशाल मनाची खरी जाणीव झाली मला. मी स्वतःवर खूप चिडलों. चरफडलों...कुठं गेली असेल चंदा ? चंदा, चंदा तुझ्याशिवाय मी जगूं शकणार नाही. तुझ्याशिवाय माझी कला तरणार नाही. मला तुझा आधार हवाय्...

त्याच रात्रीच्या एक्स्प्रेसने मी ताईकडे निघालों. ताईला सारं नीट समजावून सांगायचं. तिची संमती मिळवून चंदाशीच लग्न लावावयाचं, हा निर्णय घेतला... मी आल्यामुळे ताईला खूप समाधान वाटलं. तिने भाऊरायाचं यथोचित स्वागत केलं. भरपूर गोडधोड खाऊं घातलं. तिचे यजमान कॅप्टन विश्वासराव माझी यथेच्छ चेष्टा करित होते. कारण दुपारींच ' मुलगी ' पाहाण्याचा कार्यक्रम होणार होता. मी वरकरणी हंसत होतों. पण आंतून हृदय जळत होतं. डोकं तापलं होतं मी व्याकूळ झालों होतों. सध्या मला लग्नच करायचं नाही असं मी ताईला पदोपदीने सांगितलं. पण तिचा सूर कायमच. मुलगी बघायला काय हरकत आहे. आणि पसंती नापसंती तिने माझ्यावरच सोपविली असल्याने केवळ तिच्या समाधानासाठी मी तयार झालों.

विश्वासराव मुलीसंबंधी माहिती देत होते. ते मला म्हणाले, " हेमंत मुलीला पाहिल्या बरोबर म्हणशील कीं बायको हवी तर अशीच ! "

" अहो अशीच काय, हीच मला बायको हवी असा हट्ट धरील तो " ताईने अचूक टोला मारला.

ताई आणि विश्वासराव एवढ्या जोरजोराने कां हंसत आहेत हें मात्र मला उमजलं नाही. आम्ही सर्व बाहेरच्या दिवाणखान्यांत बसलों होतों.

शेवटीं नियोजित मुलगी पोह्यांच्या बशा घेऊन बाहेर आली... दारांतून तिने माझ्याकडे नजर वळविली त्याचवेळीं माझं लक्ष तिच्याकडे गेलं... आणि आश्चर्याचा धक्का बसला मला... होय ती मुलगी दुसरी तिसरी कुणी नसून चंदाच होती...... माझी चंदा...... ! आणि दिवाणखान्यांत हास्यसागराला उधाण आलं. विश्वासराव खदखदून हंसले. चंदाची वृद्ध आई देखिल तोंडाला पदर लाऊन हसंत होती. माझ्या डोक्यावर हात फिरवून ताई म्हणाली—

" कसं पण बनवलं एका माणसाला ! "

म्हणजे ही सारी ताईचीच योजना होती तर. मी डोळे चोळून चोळून पाहिलं. तें स्वप्न नव्हतं. ती चंदाच होती.

कॅ. विश्वासराव म्हणाले—" चंदाचे वडिल माधवराव फाटक हे माझे समव्यवसायी मित्र. भारतीय सीमेजवळ लष्करी ऑफिसर म्हणून कर्तव्य बजावित असतांना त्यांना शूराचं मरण आलं. मी त्यांचा असिस्टंट होतों. मरतेसमयीं त्यांनी चंदाची जबाबदारी माझ्यावर सोपविली होती. त्यांचं कर्तव्य मी आज पूर्ण करित आहे."

" होय हेमू." ताई बोलूं लागली,— " चंदा मला खूप खूप आवडली, तिचं सालस वागणं, मनमिळाऊ वृति ह्यामुळे तिनं माझं मन जिंकलं. तिला गायनाची आवड असल्याने ती तुला जरूर आवडेल अशी माझी खात्री होती. तुझ्या निराश जीवनांत पुनश्च चैतन्य निर्माण व्हावं आणि तुम्हां दोघांना एकमेकांच्या स्वभावाची नीटस ओळख व्हावी ह्याच हेतूने मी तिला मुंबईला तुझ्याकडे पाठविली होती... आहे पसंत ?

चंदाने हळूंच माझ्याकडे पाहिलं. ती लाजेने चूर झाली. आणि अकल्पित पण गोड अशा घटनेंने माझं सर्वांग रोमांचित झालं. माझी मूक पसंती जाणून इतर मंडळी दिवाणखान्यांतून बाहेर पडली.

दिवाणखान्यांत फक्त आम्ही दोघंच होतों—

मी आणि चंदा !

---

जळगांवकरांचे आवडतें व विश्वसनीय ठिकाण--

★ त्रिभुवनदास पुरुषोत्तमदास आणि कंपनी ★

सुभाष चौक, जळगांव.



° आमच्याकडे हिज मास्टर्स् व्हाईज रेडियो

° ग्रामोफोन, रेकॉर्ड्स् व त्यांस लागणारे सामान मिळेल

....तसेंच....

° फॉवरलुबा कंपनीचीं सर्व प्रकारचीं घड्याळें देखील मिळतील.

एव्हररेडी : रेडियो बॅटरी, टॉर्च, सेल्स्, इलेक्ट्रिक फिटिंगचें सामान, फिलीप्स् लॅम्पस्, ट्युब लाईट्स्, पंखे व इतर सामान मिळेल.




—तसेंच—

° सर्व तऱ्हेचे स्टोव्ह व त्यास लागणारे सामान

—तसेंच—

° सर्व प्रकारचे साबण, सेन्टस्, अत्तरें, सुंगधी तेलें,

° पोमेड, ब्रिलीयनटाईन्स्, स्नो, पावडर्स, टूथपेस्ट आदि मिळतील.



त्याचप्रमाणे तपकीर, अगरबत्ती, जर्दा व सुंगधी तेलें यास लागणारीं द्रव्यें देखील मिळतात.

सर्व तऱ्हेच्या नित्योपयोगी वस्तु घाऊक व किरकोळ भावांत मिळतात.

या....पहा.... आणि खात्री करा....!

त्रिभुवनदास पुरुषोत्तमदास आणि कंपनी

सुभाष चौक, जळगांव.



# गंजलेलीं मनें....

ले०- कु. सुधा नाईक
पदवीपूर्व पहिलें वर्ष,
[ कलाविभाग ]

परवाचीच गोष्ट. शेजारच्या लतातांई माझ्याकडे अडकित्ता मागायला आल्या होत्या. त्यांच्या अडकित्त्याची धार निघून गेली आहे. अगदी गंजून गेला आहे तो. पण दोन पावलें चालून जाऊन धार लावणाऱ्याकडून धार लावून घेणं कांही होत नाही त्यांच्याकडून. आणि मग वेळ आली कीं याच्या त्यांच्याकडे अडकित्ता मागत फिरतात.

त्या कुमुदचीहि तीच गोष्ट. डाळी-साळी भरावयाचे लोखंडाचे डबे अगदी गंजून गेलेत. पण त्यांना घासून पुसून स्वच्छ ठेवणं कांही जमत नाही तिला !

नाही तर ती सरला पहा. रंग आणून तिने हे डबे रंगविले आहेत. आणि त्यांचा रंग निघून जातोसा वाटला कां ती सवड काढून त्यांना रंगवून ठेवते. एकाच रंगाचे ते डबे फळ्यांवर रांगेने ठेवलेले पाहिले कीं मन कसें प्रसन्न होतें.

पण मग जें सरलाला जमतं तें कुमुदला कां अशक्य वाटावं ? मला तर वाटतं कीं त्या गंजलेल्या डब्यांप्रमाणे कुमुदचं आणि लतातांईचं मनहि गंजलेलंच असावं. अनेक वर्षे गंज चढून चढून जशी अडकित्याची धार नाहीशी झाली, तसा गंज चढून कुमुदच्या नि लतातांईच्या मनाचा उत्साह नाहीसा झाला असावा.

फक्त कुमुद आणि लतातांईच कां, जगांत डोळे उघडे ठेवून वावरलं कीं गंजलेल्या मनांची अनेक माणसे आपल्या दृष्टीस पडतात. नाविन्याची हौस या लोकांच्या ठिकाणीं नसतेच ! आपण कांही करावें असं त्यांना वाटतच नाही ! गंजलेल्या मनांची माणसे आणि धार असलेल्या मनांची उत्साही माणसे असेहि जगांतल्या माणसांचे दोन भाग पडूं शकतील. जगांत गंजलेल्या मनांची माणसेच अधिक असावीत असं मला वाटतं.

ही गंजलेल्या मनांची माणसे म्हातारे - तरुण, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित अशा सर्व तऱ्हेच्या वर्गांत आढळून येतात.

लहान मुलांच्यांत मात्र गंजलेल्या मनाचीं मुलें सहसा आढळत नाहीत. अगदी ५-६ महिन्याचा छोटा बाळ कसा खेळतो ? त्याच्यापुढे निरनिराळ्या प्रकारचीं खेळणीं पडलेलीं असतात. एकच एक खेळणं घेऊन खेळत बसणं त्याला आवडतच नाही. सारखा एक खेळणं टाकून दुसरं खेळणं हातांत घेत असतो तो ! "नवं तें हवं" अशी त्याची वृत्ति दिसते. मुलांचं मन उमलल्या फुलासारखं टवटवीत असतं. त्याला थोडासुद्धा गंज चढलेला नसतो. म्हणूनच "मुलं म्हणजे फुलं" असं म्हणत असावेत.

तरुण माणसे म्हणजे उत्साहाचं मूर्तिमंत प्रतीक, असं आपल्याला वाटतं. पण तरुणांतहि मनाला गंज चढलेले लोक असतातच. "हें मला आवडत नाही अन् तें करणं मला जमत नाही." असं म्हणणाऱ्या तरुणांचीं मनें गंजलेलींच असतात.

तो शेजारचा विलास ! आताशी कुठे १५ वं वर्ष चालू आहे त्याला. पण हौस म्हणून कुठल्याच गोष्टीची नाही. सदा रड्यासारखा बसलेला असतो. कधी गणपती उत्सवांत भाग घेणार नाही कीं कधी शाळेच्या नाटकांत काम करणार नाही. खेळतांनासुद्धा बेभान होऊन खेळलेला मी कधी पाहिला नाही त्याला ! "अरे विलास, गांवांत बघ किती छान प्रदर्शन भरलंयं, खूप गर्दी आहे लोकांची, आपणहि जाऊन येऊं चल." असं जर त्याला कुणी म्हटलं तरीसुद्धा "नको बुवा, आपण नाही येत." असं म्हणून गप्प बसेल. आता तुम्हीच सांगा या विलासचं मन गंजलेलं नाही तर काय ?

याउलट तो सुहास, नांवाप्रमाणेच सुहास आहे ! विलासच्याच वयाचा हा पोरगा. पण सदा धडपडत असतो. हें करून पहा, तें करून पहा, इकडे भाग घे, तिकडे भाग घे असें चाललेलें असतें त्याचें ! नवीन गोष्ट शिकण्याच्या नादांत त्याने हातापायाला जखमाहि करून घेतल्या आहेत. पण अमुक एक गोष्ट मला जमणार नाही असं त्याच्या तोंडून निघालेलं मी तरी अजून ऐकलं नाहीं.

पण सगळे जण त्याला धडपड्या म्हणून चिडवतात. मला मात्र ही असली धडपडी मुलेंच आवडतात. त्यांची धडपड म्हणजे त्यांच्या उत्साही मनाचं प्रतीक. त्यांचीं मनें गंजलेलीं नाहीत हें दर्शविणारी निशाणी म्हणजे त्यांची धडपड.

आणि म्हाताऱ्यांचें तर विचारायलाच नको ! म्हातारी माणसे म्हणजे गंजलेलीं मनें असें समीकरणच होऊन बसलें आहे जणू ! त्यांच्या गात्रांप्रमाणेच त्यांचा सारा उत्साह शिथील झालेला असतो. त्यांच्या मनाची सगळीं धार निघून जाऊन तें बोथट झालेलें असतें. त्यावर भरपूर गंज चढलेला असतो. परंतु ह्या म्हाताऱ्यांतहि कांही उत्साही मनाचे म्हातारे आपणाला आढळून येतात. त्यांची या वयांतील धडाडी पाहून ते तरुणपणीं केव्हढे धडपडत असतील याची कल्पनाच करतां येत नाही. परंतु अशीं उदाहरणें विरळच !

त्या आळशी माणसाची गोष्ट सगळयांना ठाऊक आहेच. चांगले पिकलेले रसरशीत जांभुळ त्याच्या मिशींत पडलेलें असतांनाहि स्वतःच्या हाताने त्याने तें तोंडांत घातलें नाही. मला वाटतं, त्याच्या मनावर कमालीचा गंज चढलेला असावा. त्याशिवाय कां तो असं वागला ?

पुष्कळदा माझ्या मनांत येतें कीं अडकित्ते, सुऱ्या, कात्र्या यांना गंज चढला कीं तो काढून त्यांना धार लावून मिळतेना, तशीच कांहीतरी व्यवस्था मनाचा गंज काढून त्यांना पुन्हा पहिल्यासारखे बनविण्यासाठी असावी.

पण कुणास ठाऊक, अशी जर व्यवस्था केली तर तिचा उपयोग किती जण करून घेतील. आमच्या लताताईसारख्यांना तर त्याचाहि कंटाळा यायचा. " ऊं, कोण करीत बसतय ही उठाठेव ? " असंच हे लेक म्हणतील.

ती पहा ती सरलाच येत आहे. तिच्या मैत्रिणीकडे भरतकामाचा नवा नमुना शिकण्यासाठी तिच्याबरोबर जायचं कबूल केलं आहे मी तिला. आणि आतां तर मला जावंच लागेल. नाहीतर तुम्ही म्हणाल, ' लोकांना नांवं ठेवता, पण स्वतःच्या मनालाहि बराच गंज चढलाय कीं ! ' बरं, नमस्ते !

———

जळगांवकरांचें आवडतें ठिकाण—

कल्पना फोटो स्टुडियो

ज्योतिबा फुले मार्केट, जळगांव.

आमचेकडे फोटोचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात

आयडेन्टिटी कार्ड व रंगीत फोटो स्पेशॅलिस्ट



# राई गोविंदाला भेटली ....

लें०— प्रा. राजा महाजन

एक गांवमां नादतं घर नी रामचंदर ऽ
दोन भाऊन्ना नांदे संसार रामचंदरऽ
मायले कामना मोठा उभार रामचंदरऽ
' मना लेक पिंडिस्ना अवतार ' रामचंदरऽ

एका गांवांत एक नांदतं घर होतं. दोन भावांची जोडी सुखानं संसार करीत होती. मोठ्याचं नांव होतं परशराम. धाकट्याचं नांव होतं गोविंदा. म्हाताऱ्या आईला त्यांच्याकडे बघून मोठा अभिमान वाटायचा. ' माझे लेक सांबाच्या पिंडीचे अवतार आहेत,' असं ती तोंड भरून सांगायची. धाकट्याचं नुकतंच लग्न झालं होतं. अजून ' पहिलं मूळ ' लागायचं होतं. परशराम आणि गोविंदा शेतांत राबायचे. मळा पिकायचा. धान्याच्या कणग्या भरायच्या. मोठी सून सारजा कशी कणगी सारखी दिसायची. धाकटी सूनहि तशीच उजवी होती. गव्हाच्या कणकेसारखं रूप. ' पर्णून ' आणली तेव्हा गांव धडाधडा बोलूं लागला,' राधा वाट चुकली आणि गोविंदाला येऊन भेटली. ' म्हातारीला तर धाकट्या सुनेचं मोठं कौतुक. सारखं तोंड भरून बोलायची. म्हणायची, येत्या श्रावणांत धाकट्या सुनेचं ' मूळ ' लावीन. मोठा ' भात ' बांधीन. आणि एव्हाना ती ' मुळा ' च्या तयारीला लागलीहि होती. पण—

दैव कोन्हले कयनं नी रामचंदरऽ
ज्यानं दैवज फिरनं नी रामचंदरऽ
त्यानं सगय सरनं नी रामचंदरऽ

विधिलिखित निराळेंच होतें. माणूस परिस्थितीच्या ' हातचा ' आहे हेंच खरं. आयुष्याच्या गणितांत सुखाची बेरीज व्हायची असली तर दैव माणसाला ' अधिक 'ची खूण देतं. आणि दुःखाचं उत्तर निघायचं तेव्हा ' वजा ' ची खूण करतं. तसंच या नांदत्या घराचं झालं. भरल्या संसाराला तडा पडायचा होता. नांदत्या घराचा कूस ढळायचा होता. सुखाच्या राशीला कीड लागायची होती. दैवाला विचित्र खेळ खेळायचा होता.

एक रोज काय झायं नी रामचंदरऽ
गोईंदा गया गायी चाराले रामचंदरऽ
गायी चरती नादांत नी रामचंदरऽ
मोटकरी गुंगना गान्यांत नी रामचंदरऽ
एक धाकलंसं मंदीर नी रामचंदरऽ
ऊन पडलं अंबीर नी रामचंदरऽ
गोईंदा म्हने निजूं जरा नी रामचंदरऽ

एके दिवशीं गोविंदा गाई–वासरं घेऊन रानांत गेला. आषाढाचा महिना होता. पिकांनी रान उभारलं होतं. गवताच्या लहान लहान पात्यावर पाकोळ्या झुलत होत्या, उडत होत्या. डुलत होत्या, झुळझुळ वारा वहात होता. दुपारचं ऊन जरा पडलं होतं. जसं कुणी गुलाल उधळला. गोविंदाने गाईंना पाणी पाजलं. त्या आंब्यांच्या राईच्या सावलींत रवंथ करीत बसल्या. गोविंदाने पाहिले, बांधावर एक छोटंसं मंदीर होतं. त्या साऱ्या वनप्रदेशांत हें मंदिर विशेष उठून दिसत होतं. जसं गळयांतल्या साऱ्या दागिन्यांत उठून दिसणारें मंगळ–सूत्रच ! या भागाला आपण अजून कसं आलों नाहीं याचंच त्याला कोतुक वाटलं. आणि त्यानं ठरवलं कीं नेहमी इकडेच यायचं. ऊन चढतीचं होतं. टाळ टाळ करीत झुडुपं हालत होती. जनावरं सावलींत विसावली होतीं. त्याला वाटलं आपणहि जरा आराम करूं. तो मंदिराकडे जायला निघाला. आणि—

मार्गी पांच अंडा देखात रामचंदरऽ
कोन्हा कोंबडीना पडना नी रामचंदरऽ
गोईंदानी त्याबी उचली लिधात रामचंदरऽ
अंडा खावाले मन झाय नी रामचंदरऽ
गोईंदा जरासा जपना नी रामचंदरऽ
झाया तिसरा पहार नी रामचंदरऽ
गोईंदा जल्दीज उठना नी रामचंदरऽ
ढोरें घरकडे काढात नी रामचंदरऽ
गोईंदा घरकडे निंघना नी रामचंदरऽ

जातांना त्याला रस्त्यांत पांच अंडे पडलेले दिसले. त्याला वाटलं कुणीतरी वाटसरु बाजार करुन येथे आला

असेल. त्याच्या जवळ कोंबड्या असतील. ऊन टाळण्यासाठी तो झोपला असेल. कोंबड्या येथेच गवतांत बसल्या असतील. ऊन टाळून वाटसरु कोंबड्या हाकलीत निघून गेला असेल. आणि अंडीं येथेच राहिलीं. गोविंदाने अंडीं उचलून घेतलीं. त्याला अंडे तळून खाण्याची अनावर इच्छा झाली. घरीं केव्हा जातो असें त्याला झालें. पण लगेच निघणं शक्य नव्हतं. म्हणून थोडावेळ तो मंदीरांत झोपला. झोपला कशाचा, उगीचच डोळा लागतो न लागतो तोंच तिसऱ्या प्रहराच्या पहिल्या गोड झुळुकीने त्याला जाग आली. तो उठला. ढोरं घराकडे काढलीं. आज तो लवकरच घरीं जात होता. गोविंदा घरीं आला. आईला आश्चर्य वाटलं. 'गोईदा, आज लवकर घरीं कसा रे?' असं नुसतं विचारून आई कामाला निघून गेली. मोठी भावजयी अजून शेतांतून आली नव्हती. गोविंदाने गाई वाड्यांत बांधल्या. हिरव्यागार गवताच्या चार पेंढ्या मोकळ्या करून गव्हाणांत टाकल्या. गाईम्हशींच्या अंगावरती नेहमीप्रमाणें आपली 'ऽ ह्रा' म्हणून थाप मारली.

गायी वाडामां बांध्यात नी रामचंदरऽ
गोईदा मायले बोलना नी रामचंदरऽ
आओ आओ आई माईनी रामचंदरऽ
येवढा अंडाज तयना नी रामचंदरऽ
माय माता नही म्हने नी रामचंदरऽ
त्यानी अंगेज तयात नी रामचंदरऽ
त्यानी जेवनज कय नी रामचंदरऽ
गोईदा धाबावर गया नी रामचंदरऽ
तठे पलंगाज टाका नी रामचंदरऽ
त्यानी गादीज पसारी नी रामचंदरऽ
तोतं जल्दी जपी गया नी रामचंदरऽ

गोविंदाने आईला हाक मारली, 'ए आये, मला एवढीं अंडीं तळून दे ना?' म्हणून तो आईच्या मागे लागला. आई कामांत होती. "जा रे बाबा. कुठून कांही घेऊन आला. आणि मला त्रास देतो. तुझी भावजय येईल नि मग सांग तिला." आईने साफ नकार दिला असें पाहुन गोविंदाने स्वतःच ते अंडे तळले. झकपैकी जेवण केलें. आणि झोपावसं वाटलं म्हणून तो धाब्यावर चढला. पलंगावर अंथरूण घातलें. आणि थोड्याच वेळांत डाराडूर घोरूं लागला.

अर्धी रातना अंबल नी रामचंदरऽ
गोईदा पानी पानी करे नी रामचंदरऽ
माय भाऊ व्हता झोपमां रामचंदरऽ
त्याले पानीज मियेना नी रामचंदरऽ
आग पोटमां लागनी नी रामचंदरऽ
त्याले जराबी उठायेना नी रामचंदरऽ
जीव तसाच जयेना नी रामचंदरऽ
उनी डोयांत अंधारी नी रामचंदरऽ
त्याले कांहीज सूजेना नी रामचंदरऽ
त्याना आवाज खोल गया नी रामचंदरऽ
कायी रातना काया पहार रामचंदरऽ
सट्वाईज व्हती हिंडत रामचंदरऽ
तिन्ही टिळाज लिव्हला नी रामचंदरऽ
त्यान्हा परान निंघना नी रामचंदरऽ

अर्धी रात्र झाली. गोविंदाचा गळा तडतडूं लागला; घशाला कोरड पडली. तो सारखा 'पाणीऽ पाणीऽ' बडबडूं लागला. भाऊ आणि म्हातारी खाली चूर झोपलेले होते. शेतांतून काम करून आलेलीं माणसं. जवळीं आणि झोपलीं. त्यांना ऐकायला जाईना. आधीच ती गाढ झोपेंत. तशांत गोविंदाचा आवाजहि फुटेना. प्राण घशाशीं आला. डोळ्यापुढे अकाळविकाळ रेघाच रेघा चमकत आहेत असं वाटूं लागलं. तशांत काळजांतल्या जीवाला करकचून दोऱ्याने बांधून कुणी तरी खेचत आहे असं त्याला झालं. नसा आवळल्या गेल्या. शुद्ध जाऊं लागली. मध्यरात्रीचा फेरा घालायला सटवाई निघाली. तिनं एकवार गोविंदाकडे पाहिलं. शेवटचा टिळा घातला. आणि गोविंदाचा प्राण गेला.

दिनमान का उगीला नी रामचंदरऽ
माय भाऊज उठनात नी रामचंदरऽ
अजू गोईदा उठेना नी रामचंदरऽ
भाऊनी म्हईस धुतली नी रामचंदरऽ
गोईदा येरे दूध ले रे नी रामचंदरऽ
कसा गोईदा येईल नी रामचंदरऽ
भावजयी न्याहारी टाके नी रामचंदरऽ
गोईदा न्याहारी कर रे नी रामचंदर
कसा गोईदा येईल नी रामचंदरऽ
अजून गोईदा उठेना नी रामचंदरऽ
माय गयी उठाडाले नी रामचंदरऽ
तठे कसाना गोईदा नी रामचंदरऽ
मायनी तोंड ठोकी लिधं नी रामचंदरऽ
माय धडधडा पडे नी रामचंदरऽ



सकाळ झाली. भावजयीनं दळण संपवलं. मोठ्या भाऊनं गोठा साफ केला. म्हातारीने घासूनपुसून स्वच्छ केलेलं 'दुभलं' दिलं. तिनं धाब्याकडे पाहिलं. गोविंदा उठल्याचीं कांही चिन्ह दिसेनात. तिला वाटलं, 'गोविंदा अजून कसा उठला नाही? असा तर तो कधी निजत नाही!' मोठ्या भाऊनं म्हैस धुतली. तें दुभलं हातांत घेऊन म्हातारी घरांत आली. 'फेसाचं दूध माझ्या गोविंदाला फार आवडतं.' गोविंदाच्या आठवणीनं ती मनांतल्या मनांत हरखली. गोविंदा, येरे बाबा, तुझं दूध आलं. फेस निवल्यावर मग रागावशील माझ्यावर! म्हातारीनं बाकीचं दूध चरींत ओततांना हाक मारली. कामाचा उरक सुरुच होता. लवकर काम आटोपून शेतांत जायचं होतं. भावजयी भाकरी थापीत होती. एरव्ही भाकर तव्यावर टाकली कीं लगेच वर यायची. दूध पिऊन तट्ट फुगलेल्या वासरासारखी पण आज भाकर सारखी तव्याला लागून जळत होती. भावजयीच्या मनानं हेलकावा घेतला. "आत्येबी, गोईदा अजून आले नहीत. न्याहारी झाली. अजून तोंड धुतलं नही. आंघोय केली नही. न्याहरी केव्हा व्हईल? शेतावर केव्हा जातील?" पण गोविंदा अजून खाली येण्याचं एकहि लक्षण दिसत नव्हतं. म्हातारीला नवल वाटलं. ती स्वतःशीच पुटपुटली, 'जागला असेल रात्रीं बायकोची आठवण काढीत. म्हणून उशीरा झोंपला असेल. अलीकडे त्याचं ध्यान कुठं आहे ठिकाणावर? थांब बरं बाबा! आतां मूळच लावून आणतें. मग तूं आणि तुझी राधा!" असं म्हणून म्हातारी स्वतःशीच हसली. आणि त्याला हातधरुन उठवून आणण्यासाठी वरती गेली. म्हातारीनं पांघरूण ओढलं. आणि गोविंदाला पाहातांच म्हातारीनं हंबरडा फोडला. मोठमोठ्यानं रडूं लागली. भाऊ-भावजय धावत गेले. भाऊहि गोविंदाला पाहून धडाधड धरणीवर अंग टाकूं लागला. 'माझा दादा गेलारे! माझा बाप कसा सोडून गेलारे' असं म्हणूत तोंड ठोकूं लागला. भावजयीला रडणं आवरेना. तिनं म्हातारीला सावरलं. शेजारी-पाजारी धावत आले. त्यांचेहि डोळे डबडबले. पण ते कशीबशी म्हातारीची समजूत घालूं लागले. 'आजी, आतां रडून काय गोविंदा येणार आहे? काय त्याचं वागणं? काय त्याचं बोलणं? तुम्हाला शोभत नव्हता तो! जसा कांही देवमाणूस. आतां रडून कसं भागेल? त्याच्या बायकोला आणा. तिचं बिचारीचं काय होईल? सतीच्या नशीबांत देवाने काय दुःख लिहिलं! आवरतं घ्या. आणि पुढच्या तयारीला लागा.

मायनं रडनं थांबे ना नी रामचंदरऽ
मोठा लेकले बोलूं लागे नी रामचंदरऽ
जाय तूं राईले लेवाले नी रामचंदरऽ
काय सांगू मी लाडकीले नी रामचंदरऽ
आते आनूं कोन्ता खजीना नी रामचंदरऽ
तिना आसू कसा पुसूं मी रामचंदरऽ
माले डाखीन म्हनशी का रामचंदरऽ
कसा देवूं मी तुना भरतार नी रामचंदरऽ
जेठ गया सासुरवाडीले रामचंदरऽ

मोठ्या भावाने गाडी काढली. बैल जोडले. राईला घ्यायला छकडं निघालं. बैलांच्या खुरांना माती बिलगत नव्हती. बैलांच्या तोंडाचा फेस थांबत नव्हता. एका मागून एक अशीं चार वनं ओलांडलीं. गांव आलं. पांढरींत कुत्रीं ओरडत होतीं. वेशीच्या दरवाज्याजवळ गाडी आली. 'कसा जावूं मी तिथे? काय सांगू मी राईला? परमेश्वरा काय रे केलं हें?' परशरामाचं मन धापत होतं. गाडी घराजवळ थांबली. मोठ्या जेठाला पाहून राई पदर घेऊन घरांत गेली. पाण्याचा तांब्या भरून आणला. जेठची नजर जमीन सोडत नव्हती. राईचे आई वडील आले. 'राईचा जेठ, आणि असा मधेच अवचित? सगळं ठीक तर आहे ना? आत्याबाई, पाव्हणे खुशाल आहेत ना?'

जेठ राईले बोलना नी रामचंदरऽ
राई मनासंग चाल नी रामचंदरऽ
आत्याबाईना निरोप नी रामचंदरऽ
गाडी उभीच व्हतीना नी रामचंदरऽ

राईच्या आई वडिलांना वाटलें, असेल कांही काम. राई आपल्या आईबरोबर बाजारांत गेली. लुगडं-चोळी केल्याशिवाय, चुडा भरल्याशिवाय लेक कशी पाठवूं म्हणून मायलेकी बाजारांत आल्या.

मायनी लुगडंज काढलं नी रामचंदरऽ
लुगडं निघनं फाटेल नी रामचंदरऽ
लेकी नशीब फुटनं नी रामचंदरऽ
उन्यात पटूकरना घर नी रामचंदरऽ
मनी राईले कुकु देना नी रामचंदरऽ
कुकु निघंना हिटकर नी रामचंदरऽ
लेकी नशीब फुटनं नी रामचंदरऽ
गयात मन्यारना घर नी रामचंदरऽ
मनी राईले चुडा भर नी रामचंदरऽ
चुडा एकबी चढेना नी रामचंदरऽ
लेकी नशीब फुटनं नी रामचंदरऽ

बाजारात सगळे अपशकून झाले. काय झालं असेल? हृदयांत खळबळ माजली. 'ते तर खुशाल आहेत ना? त्यांना कांही झालं का? देवा, तूंच माझी लाज राखरे बाबा!' राईला वाटलं असंच उडून जावं. मनांनं ती गेलीहि होती. पण तो जोडीदार दिसत नव्हता. हें काय? डोळ्यापुढं त्यांची मूर्तिसुद्धा येत नाही? नाहीतर एरव्ही कसं जवळ असल्यासारखं बोलायचे.' राई चालत होती. जीवानं ठाव सोडला होता. मनाचा खुंट उपटून पडला होता. राई घरीं आली. उभ्या गाडींत बसली. बसतां बसतां गळ्यांतल्या पोतीचा सर तुटला. भाजलेल्या तव्यावर टाकलेल्या पाण्याप्रमाणे मन चरकत होतं. राई देवाचं नांव घेत होती. गाडी पहिल्या वनाजवळ आली.

एक वन वलांडिलं नी रामचंदरऽ
तठे गवऱ्या दिखन्या नी रामचंदरऽ
'दाजी, गवऱ्या कसान्या नी रामचंदर'ऽ
'कोनं गाडं ज उचकनं नी रामचंदर'ऽ
आले दुसऱ्या वनाला नी रामचंदरऽ
तठे टोकरे दिखनात नी रामचंदरऽ
'दाजी, टोकेर कसाना नी रामचंदर'ऽ
'आठे मांग लुटायना नी रामचंदर'ऽ
आले तिसऱ्या वनाला नी रामचंदरऽ
तठे गुलाल दिखना नी रामचंदरऽ
'दाजी, गुलाल कसाना नी रामचंदर'ऽ
'आठे वान्या लुटायना नी रामचंदर'ऽ
आले चवथ्या वनाला नी रामचंदरऽ
तठे कपडा दिखना नी रामचंदरऽ
'दाजी, कपडा कसाना नी रामचंदर'ऽ
'आठे शिपा लुटायना नी रामचंदर'ऽ
गाडी घरजोडे उनी नी रामचंदरऽ
माय बटावर दिखनी नी रामचंदरऽ
जाऊ फयी जशी दारनी नी रामचंदरऽ

एका दमांत गाडी पहिल्या वनाजवळ आली. गोवऱ्यांचा ढीग पडलेला दिसला! 'दाजी, या गोवऱ्या कशाच्या?'

'येथे किनी, कुणाच्या गाडीचं चाक मोडलं असेल?' दुसऱ्या वनाजवळ आले तों टोकरांचे तुकडे पडलेले दिसले.

'दाजी, टोकरांचे तुकडे कसे आले?'

'कुणी मांग लुटला गेला असेल! आपल्याला काय करायचं!'

गाडी तिसऱ्या वनाजवळ आली. तिथं पोतीच्या पोती गुलाल सांडला होता.

'दाजी, इतका गुलाल कसा हो सांडला?"

'कुणी वाणी लुटला गेला असेल. आपल्याला काय करायचं!'

शेवटीं ते चौथ्या वनाजवळ आले. तों तेथे कोऱ्या कापडाचे तुकडे पडलेले दिसले.

'दाजी, इकडे कोऱ्या कापडाचे तुकडे कसे हो आले?'

'कुणी शिंपी-बिंपी लुटला गेला असेल! आपल्याला काय करायचं?'

गाडी घराशी आली. म्हातारी ओट्यावर पाठमोरी बसली होती. मोठी जाऊ दाराच्या फळीशी इतकी चिपकून उभी होती कीं फळीहून ती निराळीच दिसेना. राई लगबग उतरली; आत्याबाईच्या पाया पडूं लागली म्हातारीला दुःख अनावर झालें आणि तोंडून उद्गार बाहेर पडले–

काय पडस मना पाय नी रामचंदरऽ
शिंग डफडं लावून जाय नी रामचंदरऽ
राई रडूंज लागनी नी रामचंदरऽ
पाय जाऊना पडनी नी रामचंदरऽ
काय पडस मना पाय नी रामचंदरऽ
शिंग डफडं लावून जाय नी रामचंदरऽ



"काय नमस्कार करते बाई? आपलं सगळं संपलं तुझा गोईंदा गेला. माझा हीरा गेला. शिंग-डफ लावून धींड निघाली आपली. त्या वाटेला आपल्याला कसं नेलं नाही देवानं." कुणी आपला गळा दाबत आहे असं राईला वाटलं. तिचा तोल तिला सांभाळतां येईना. कशी बशी जाऊच्या पायाशीं पडली. कपाळावरचा कुंकू पुसला. धाडकन् हात उंबरठ्यावर मारला. बांगड्यांचे तुकडे तुकडे झाले. 'ते कुठे आहेत? कुणी सांगाना? कुठं शोधूं मी त्यांना? देवा, काय वैर साधलं रे! तुझा कोणता गुन्हा केला होता? त्यांनी गुन्हा करणं शक्य नाही. मी केल्याचं आठवत नाही. मग असं कसं झालं? माझ्या मंदिरांतील मूर्तीची कोणी चोरी केली? आतां हें मंदीर मूर्तीवाचून कसं राहील? माझ्या गोविंदा! या राईचीहि वाट पाहिली नाही? मीच चांडाळीण तिकडे सुख खात होती. सांगाना काय करूं मी? फक्त तोंड बोलत नव्हतं. भिंतीना डोळे असते तर त्यांत आसूं मावले नसते. घराच्या पायांत हृदय असतं तर त्याच्या ठिकऱ्या झाल्या असत्या. आभाळाला मन असतं तर त्याने मातीचा ठाव घेतला असता. पाण्याला वाचा असती तर त्याने डोळ्यावाटे न पाझरणाऱ्या अश्रूसाठी हंबरडा फोडला असता!

राई तिथून निंघनी नी रामचंदरऽ
गेली गोईंदाच्या डहुणापाशी नी रामचंदरऽ
राईनी पांच फेऱ्या घातल्या नी रामचंदरऽ
राईनी उडी ज मारली नी रामचंदरऽ
राई गोईंदाला भेटली नी रामचंदरऽ

राई भानावर आली. 'आता कशासाठी आणि कुणासाठी जगायचं? सतीला हळदीचा रंग एकदाच लागतो. ते ज्या वाटेने गेले त्याच वाटेने मी जाणार! माझ्या गोविंदाजवळ जाणार!' राई तडक निघाली. स्मशानांत आली. डोहाच्या शेजारीं निखारे धुगधुगत होते. राईने निखाऱ्यांना फेऱ्या घातल्या आणि धाडकन् डोहांत उडी घेतली. राई गोविंदाला भेटली.

(अहिराणी भाषेंतील एका लोककथेच्या आधारें)

---



कलाकार : [illegible]
एस. वाय. बीएस्सी

ऊंस, कापूस, कडधान्यें, भाजीपाला, व फुलें, यांच्या अधिक उत्पादनासाठी सरकारमान्य

**भारत छाप मिश्रखतें वापरा !**

: निर्माते :
भा. फ. इ. प्रायव्हेट लि.
१२, नानाभाई लेन,
मुंबई १.

: सोल आर्गनायझर :
जळगांव, धुळें व नाशिक
–जिल्ह्यासाठी–
विठ्ठलराव गाजरे
१८७, महात्मा गांधी रोड,
जळगांव.

JYOTSNA
photo stores
dealers and photographers
opp. fulay market, jalgaon, east khandesh



मंगल प्रसंगांचे
फोटो
फ्लॅश लाईट ने
काढून घ्या :—
ज्योत्स्ना फोटो स्टोअर्स
फुले मार्केट समोर, जळगांव.

व्हिमको बालामृत
दिल्याने मुलें निरोगी व सशक्त होतात.
व्ही. एम. केमिकल वर्क्स, जळगांव.

व्हिमको ड्रेसिंग ऑईल
सर्व प्रकारच्या जखमा, भाजणें, कान वहाणें इत्यादींवर अप्रतिम गुणकारी.
व्ही. एम. केमिकल वर्क्स, जळगांव.

व्हिमको जुलाब गोळी
जुलाबा करितां उत्तम औषध.
व्ही. एम. केमिकल वर्क्स, जळगांव.

व्हिमको टीथिंग सायरप
दिल्याने लहान मुलांचे दांत व दाढा सुलभतेने निघतात.
व्ही. एम. केमिकल वर्क्स, जळगांव.



# नाटक आम्हाला बसवतें !

ले०– प्रा. म. मो. केळकर

कॉलेजचें स्नेहसंमेलन जवळ आलें आहे. निवडणुका होऊन गेल्या आहेत. सुमारे १५–२० दिवस चाललेला धुळा आता थंडावला आहे. ओटो दिलबहारची बहारहि संपली आहे. कॉलेजच्या 'रंगी बेरंगी' भागांत भाव मारण्याची विद्यार्थ्यांची वर्षांतली अखेरची संधी संपल्याचें किंचित्सें दुःख कांही चेहऱ्यांवर दिसत आहे.

निवडून आलेले विद्यार्थी B. O. A. C. च्या विमानाने आत्ताच या क्षुद्र हिंदुस्थानच्या भूमीवर उतरल्यासारखे रुबाबांत आहेत. निवडणुकीच्या दिवशीं वापरण्यास काढलेले (किंवा खरें म्हणजे आणलेले) कोट अजूनहि कांही खांद्यावर दिसत आहेत. त्यामुळे ते ओळखूहि येत नाहीत. त्यांच्या Identity card वरहि असेच फोटो असतात. आणि मग मूळ चेहरा आणि हा छबींतला चेहरा पडताळून पाहण्याचा कधी प्रसंग आलाच तर आयडेंटिटी कार्डाच्या हेतूलाच धक्का बसल्यासारखा वाटतो.

कांही लोक खूष आहेत. कांही चिडले आहेत. पण जी. एस. म्हणून निवडून आलेला T. M. खुषींत आहे. फक्त आद्याक्षरांनी उल्लेख करावयाची ही इथली एक खास पद्धत आहे. खूप आडनांवें सारखीं असल्याने हें होत असावें. शे दोनशे रुपये त्याने खर्च केले आहेत. पण त्याचें चीज झालें आहे. आणि मुख्य म्हणजे साऱ्या मुलींचीं मतें ह्याला मिळालीं असल्याने एका सूक्ष्म समाधानाने तो तरंगत आहे.

विद्यार्थी–प्रतिनिधींची पहिली बैठक नुकतीच झाली. त्यावेळीं फक्त चहा दिला गेला म्हणून थोडा असमाधानाचा सूर उमटला. मुख्य पाहुण्यासाठी डॉ. राधाकृष्णन् पासून नांवें सुचवण्यांत आलीं. शेवटीं त्याचें काय व्हायचें हें ठरलेलेंच आहे. पाहुण्यांच्या नांवांची ही यादी घसरत घसरत शेवटीं खाली कुठे थांबेल हें सांगणें कठीण. नाटक बसवून घेण्याची जबाबदारी माझ्याकडे सोपवली आहे. मला सहाय्य करण्यासाठी एक विद्यार्थी प्रतिनिधी देण्यांत आला आहे. पण कांही अपवाद सोडले तर ही सारी मंडळी आता एकदम फोटोच्या दिवशींच दिसणार हा सर्व साधारण अनुभव आहे. ज्याचें लग्न असतें त्याला काम पडूं द्यायचें नसतें; तसें विद्यार्थ्यांचें संमेलन म्हणजे त्यांनी फक्त नवरदेवा–सारखें (पण वधूच्या शोधांत !) मिरवायचें ही त्यांची समजूत असावी.

नाटक बसवण्याची माझी हौस आता मरगळल्यासारखी झाली आहे. पण अजून जिवंत आहे. नाटक बसवण्याच्या प्रयत्नांत मी गेलीं २ वर्षं आपटी खात आहे. यामुळेच मला एकदा 'बिचारा दिग्दर्शक' म्हणून शेलापागोटें देण्यांत आलें होतें !

दोन वर्षांपूर्वी नाटक बसवण्यासाठी जुळवाजुळव करण्याच्या प्रयत्नांत मी होतों. पण जमेचि ना ! विद्यार्थी प्रतिनिधींना मी सांगितलें. त्यांनी थोडा प्रयत्न करावा ही आशा. वाटलें, ते कांही मुलामुलींना आणतील आणि पात्रांभावी कोसळणारें नाटक सावरेल. पण त्यांची सूचना अगदी नवीन होती. दुसऱ्या एका कॉलेजचें बसवलेलें नाटक आपण घ्यावें ही त्यांची सूचना ! 'बीज क्षेत्र' न्यायावरचा हा विश्वास पाहून मला संताप आला. पण पात्रें नसल्यावर मी तरी कसा जोर धरणार ? पण मला अगदी गाडल्यासारखें झालें !

येवढें सगळें असलें तरी यंदा पुन्हा नाटक म्हटल्यावर मी खुललों. आशा अकारण बळावली. पुन्हा प्रयत्न करून पहावासें वाटूं लागलें.

बऱ्याच शोधाशोधीनंतर एक नाटक निवडलें. नाटकांत काम करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी गुरुवारीं दुपारीं जमावें म्हणून मी सूचना लावली. गुरुवार आला; मी खुषींत होतों. नाटक वाचून ठेवलें होतें. चाचणीसाठी उतारे निवडून ठेवल होते.

ठरल्यावेळीं मी व माझे सहकारी प्रा. भावे ठरल्या जागीं गेलों. खोली रिकामी होती. कोणीहि आले नव्हते. मला वाटलें अजून तास सुटले नसतील; वाट पहावी. आम्ही तेथेच थांबलों. तास सुटल्याची घंटा झाली. व्हरांड्यांतून विद्यार्थ्यांची जा ये सुरू झाली. आमच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहत ते जात होते. कांही नाजुक

आवाजहि त्यांत फिसफिसत होते. कांही सुगंधी चेहरे समोरून आपला कुणी Profile काढीत आहेत अशा कल्पनेने एकमेकींच्या हातांत हात घालून एकमेकीकडे पाहत चालले होते; पुढे चाललेल्या शेपस्थांचें कोणी शेजाऱ्याजवळ वर्णन करीत होता तर समोरचा मुलगा कसा 'मोरू' आहे, याचें वर्णन करीत कांही गळ्यांतली लॉकेट्स् तोंडांत जात होतीं. पण थांबत कोणीच नव्हते. आंत कुणीच येत नव्हते. नवीनच पाटी लावलेल्या वकिलाच्या चिकाटीने आम्ही बसून होतों. पण कोणीहि फिरकत नव्हते.

पुन्हा एकदा आपटी खाऊन आम्ही परतलों. आम्ही हात हल्वीत परतणार हें आमच्या सहकाऱ्यांनी आधीच ओळखलें होतें. आमच्या परतण्याची ते वाटच पाहत होते.

'अशा नुसत्या सूचना लावून कामें होत नसतात. विद्यार्थ्यांना जरा विश्वासांत घेऊन कामें करावीं लागतात.' एक सहकारी म्हणाले.

'विद्यार्थ्यांना खवचटपणे बोलण्याची आणि कडवटपणे तोडण्याची सवय आहे तुम्हाला; कोण फिरकणार तुमच्याकडे?'

'पण बऱ्याच दिवसांत नाटक बसलें नाही आपलें. कांहीहि करा पण यंदा नाटक बसवाच. आम्ही प्रयत्न करूं मुलें मिळवण्याचा.'

'सोडून द्या नाद. त्यांना आच नाही तर आपलें तरी काय अडलेंय.'

'हो ना, आपण कुटवर लोणी लावणार? संमेलन त्यांचें आहे आहे कां आपलें?'

आमच्यावर चौफेर हल्ला होत होता. आमचेंच खरोखर चुकत आहे कीं काय असें आमचे आम्हालाच क्षणभर वाटूं लागलें. या साऱ्या गोष्टी आम्हाला पटत होत्याहि आणि नव्हत्याहि. १२९० मुलांमधून एका नाटकापुरतीं पात्रें जमा होऊं नयेत याचें मला दुःख होत होतें.

विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या प्रतिनिधींना मी निरोप धाडला. आणखी एकदा प्रयत्न करून पहावा असें मी त्यांना सांगितलें. त्या दोघांनीहि मान्यता दिली. मला पुन्हा जरा बरें वाटलें.

पण कॉलेजांतील लोकशाही आणि बाहेरील लोकशाही यांत फार फरक आहे. सार्वत्रिक निवडणुकींत निवडून आलेले लोक नंतर मतदारांचें ऐकत नाहीत. येथे प्रतिनिधि कांही कबूल करतात, आश्वासनें देतात, पण मतदार त्यांचें ऐकत नाहीत.

शुक्रवारीं स्टाफ रूमबाहेर एक आवाज किणकिणला. विद्यार्थिनी– प्रतिनिधी आल्या होत्या. बरोबर आणखी एक विद्यार्थिनी होती. या एका प्रकाराचें नेमकें कारण मला अजूनहि उलगडलें नाही. विद्यार्थिनी असोत कीं पोक्त, संसारी स्त्रिया असोत त्यांना एकटे जातां येतच नाही का? वारभर कापड आणायला गेल्या तरी बायका शेजारणीला घेऊन जातात आणि एकाद्या विद्यार्थिनीला कोणा शिक्षकाला भेटायचें असलें कीं दुसरी बरोबर असणारच!

तिने येऊन सांगितलें. 'सर ४–५ मुली तयार आहेत. उद्या जमणार आहेत.'

'मी ८–१० मुलें आणतों सर. आमचा ग्रुप मोठा आहे.' विद्यार्थी प्रतिनिधि म्हणाला. मी पुन्हा सुखावलों. आगगाडींतून जातांना टेलिफोनच्या तारा वर जात आहेत असें वाटतें आणि खांब येतांच त्या खाली ओढल्या जातात तसें माझें चाललें होतें.

शनिवार उजाडला. पुन्हा आम्ही ठरल्या जागीं गेलों. ४–५ मुली, ८–१० मुलें जमली होतीं. इतकीं मुलें जमण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. आम्ही नाटकाची रूपरेषा सांगितली. तें कसें ग्रिप घेईल तेंहि सांगितलें. खूप लोकांना वाव आहे हेंहि सांगून टाकलें.

मुलांची चौकशी केली. कोणी कोणी पूर्वी कामें केलीं होतीं म्हणून विचारलें.

'मी 'देवमाणूस'मध्यें जिवबाचें काम केलें होतें, पाथर्डी हायस्कूलमध्यें'

'मी संभाजीचा एक प्रवेश केला होता.'

'वा, छान!' मी म्हटलें.

'त्यांत मी सावाजी होतो.'

'मी 'पुण्यप्रभावां'त गोकुळचें काम केलें होतें.'

'अरे, पण गोकुळ 'पुण्यप्रभावां'त नाही.'— मी म्हणालों.



'मग नाटक दुसरें असेल. पण मी गोकुळ होतो.' मी मनांत म्हटलें — हा नक्कीच गोकुळ असावा.

मुलींचीहि चौकशी केली. पूर्वी काम केल्याचें कोणीच सांगेना. एकमेकीला कोपरखळ्या दिल्या गेल्या. आणि शेवटीं फक्त माना हलल्या.

प्रा. भावे म्हणत होते, 'नाटक विनोदी आहे. स्वच्छ वाक्यें म्हटलीं तरी पुरे.' एक दोन परिच्छेद मुलांकडून वाचून घेतले. जेमतेम स्पष्ट आणि गोड करून घेतलें तर शुद्ध असें वाचन झालें.

स्त्री भूमिकांचा उतारा मुलींना वाचायला दिला. बराच शुद्ध वाचला. आम्ही मनांत म्हटलें, 'ठीक आहे.'

पण यांतून फार तर २–४ लोकांची निवड करतां आली असती. बाकीच्या भूमिकांचें काय? पूर्वी नाटकांतून काम केलेलीं मुलें होतीं. आम्हाला तीं माहीत होतीं. पण तीं आलीं नव्हतीं, येणार नव्हतीं. त्यांना बोलावणें हवें होतें. भूमिका वाचून दाखवणें त्यांना आता 'कमीपणाचें' वाटत. ते मनांत म्हणत होते, सालं, दोन वेळां आम्ही कामें केलीं. आता हीरोचा चान्स मिळाला तरच आपण जाणार. आपल्याशिवाय काय होतयं? पहा बोलावतीलच आपल्याला. सरांना 'डबल एजी' आहेच नाही तरी. गेलों तरी ग्रुपनेच जायचें. आणि त्या × × × च्या बरोबर काम करायचे ना? आपल्याला नको असली हीरॉईन.'

मुलींबद्दल चौकशी केली.

'सर, मिक्स्ड नाटकांत काम करायला घरून परवानगी नाही मिळणार.'

आमचें बोलणेंच खुंटलें.

'ह्यांतली भूमिका ओव्हर आहे सर. मला नाही जमायची'

'जमते कीं नाही तें आम्ही पाहूं, करायची कीं नाही तें तुम्ही ठरवा म्हणजे झालें.'

खाली बसून नुसत्या माना हलल्या. थोडीशी आपापसांत कुजबूज झाली. 'पण सर, ती T. Y. मधली मिस् म्हात्रे चांगलें काम करते. तिला सांगाना.' ती काम चांगलें करते हें मलाहि ठाऊक होतें. पण ती आता सीनियर होती. बोलावणें आल्याशिवाय येणार नव्हती.

'त्यांची शिफारस तुम्ही कशाला करता? बरें, तें जाऊं द्या. तूर्त अशा अशा भूमिका मी ठरविल्या आहेत. सध्या ३ पुस्तकें आहेत. मुलांना २ देतो. १ तुम्ही न्या. उद्या रविवार आहे, शक्य तर आपापसांत पुस्तक बदलून उद्याच्या उद्या लिहून घ्या. सोमवारीं आपण पुन्हा जमूं' मी म्हणालों.

'पण सर.........'मधाचीच ती मुलगी.

'सोमवारीं या तर खऱ्या. मग बघूं आपण.'

सोमवार उजाडला. फक्त ४ विद्यार्थी व १ विद्यार्थिनी होती.

'बाकीचे विद्यार्थी कोठें आहेत?'

'त्या टेमेला प्रॅक्टिकल आहे. चौवरी तासाला गेला आहे. आणि तो भोळे एन्. सी. सी. मध्यें आहे त्याची आज परेड आहे.

'मग पुस्तकें?'

'हें एक आणलें आहे सर.'

'आणि दुसरें पुस्तक कोठे आहे?' तें दिलें होतें तो होता म्हणून विचारले. 'तें माझ्या पार्टनरच्याजवळ राहिलें.'

'मग तूं तरी लिहून घेतलेंस का?'

'घेतलें सर. पण माझे तास सव्वा दोनलाच संपतात. २ तास उगाचच थांबावें लागतें.'

'बरें, विद्यार्थिनींचें काय हो?'

'त्या दोघींना घरून परवानगी नाही.'

'बरें, तुमचें काय?

'मी रोज भुसावळहून येतें. मला ५ ची गाडी मिळायलाच हवी.'

'अहो पण ३ वाजतां प्रॅक्टिस सुरू करून ५ ला संपणार कशी रोज?'

'मग मला नाही जमायचें.'

मी आणि भावे खचतच चाललों होतों. उद्या नाटकाचा नारळ फोडावा या कल्पनेने आम्ही आलों होतों. पण इथे साराच भोपळा फुटत होता.

' बघूं, वेळेनें पाहतां येईल. उद्या याचवळीं येथेच जमायचें. '

' पण सर. कांही मुले म्हणत होती कीं आम्ही हें नाटक पाडणार म्हणून.' उरलेल्या मुलांतला एक म्हणाला.

' असल्या बातम्यांना घाबरूं नका. त्यांत कांही अर्थ नसतो. आम्ही पाहूं त्याचें. '

दुसऱ्या दिवशीं आम्ही ( म्हणजे मी व भावे ) जमलों. कोणीहि तेथे नव्हतें. आम्ही एकमेकांकडे पाहत बसलों होतों. आमचे चेहरे साफ फ्लॅट झाले होते.

इतक्यांत कॉलेजचा गडी आला.

' हीं तीन पुस्तकें मधा कोणी विद्यार्थ्यांनी आणून दिलीं आहेत. '

मधापेक्षाहि भकास चेहऱ्याने आम्ही एकमेकाकडे पाहात राहिलों. इतक्यांत तास सुरू झाल्याचे दोन टोल पडले. दोन्ही बाजूंनी श्रीमुखांत बसावी तसा त्या टोलांचा आवाज वाटला.

---

★ मे. कन्हैयालाल उदयराम शर्मा ★
जळगांव
सर्व प्रकारचें
❋ कापड ❋
व
❋ पातळें ❋
मिळतात.
फेवर लुबा, वेस्ट एन्ड, रोम आदि
सर्व प्रकारचीं नवीन
- घड्याळें -
—स्वस्त किंमतींत—
मिळतात.
—तसेंच—
लग्नसमांरभांसाठी लागणारें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण

स्थापना
सन- १८८०
जळगांव, धुळें जिल्ह्यांतील सर्वांत जुनें व जास्त खप असलेलें
: लोकप्रिय साप्ताहिक :
प्रबोधचंद्रिका
संपादक :- श्री. वा. ना. फडणीस,
' प्रसाद ' २७७, बळिराम पेठ, जळगांव.
—[ दर सोमवारीं प्रसिद्ध होते. ]—



# अमर कलाकृति....

ले०- जनार्दन बी. पाटील
बी. ए., द्वितीय वर्ष

निरनिराळ्या देशांतील कलावंत येऊन पर्वताच्या पायथ्याशीं असलेली सरस्वतीची मूर्ति पाहून जात होते. प्रत्येक कलावंत ती सुंदर मूर्ति पाहून आपला आनंद व्यक्त करीत होता. ती भव्य मूर्ति काळ्या पाषाणाला कोरून तयार केली होती. तिची मुद्रा शांत गंभीर, सात्त्विक दिसत होती. तिच्या एका हाताची ठेवण आपल्या भक्तांना आशीर्वादसूचक अशी होती. एका हातांत वीणा धारण केलेली होती. त्या वीणेमधून रुणझुण, रुणझुण असा मधूर आवाज निघत असल्याचा भास होई. कपाळावर अर्धचंद्राचा टिळा होता. तिने पद्मासन घातलें होतें. शरदऋतूंतील कोट्यवधी चंद्रबिंबें एकत्र केलीं असतां जितकी सुन्दर दिसतील तितकें सुन्दर तिचें मुखकमल दिसत होतें. तिच्या गळ्यांत जी माळ कोरलेली होती ती अग्नीच्या ज्वालेच्या उज्वल तेजाला हारवित होती. कटिप्रदेशावरील मेखला अतिशय सुन्दर होती. लोक त्या सुन्दर मूर्तीची प्रशंसा करीत होते. असाच एकदा एक दाढी वाढलेला म्हातारा तिथे आला. आपल्या हातांतील फुलें त्या मूर्तीच्या पदकमलावर टाकून तो रडक्या आवाजांत म्हणाला, ' ही मूर्ति पाहून तुम्हाला आनंद होतो आहे नाही ? हसतां काय ? रडा ! ही मूर्ति म्हणजे माझ्या मुलीचें थडगें आहे थडगें ! माझी अमर कलाकृति म्हणून तुम्ही या मूर्तीची वाहवा करता आहांत ! पण ही माझी अमर कलाकृति नाही ! माझी अमर कलाकृति माझी मुलगी होती ! मी तिला मारलं ! आणि हें थडगं तयार केलं. ' तो वेडा शिल्पकार त्या मूर्तीच्या पायावर डोकें ठेऊन रडूं लागला.

तो वेडा शिल्पकार त्या सुन्दर कलाकृतीचा कलावंत रमेशचन्द्र होता. इतर बंगाली तरुणांप्रमाणेच त्याच्याहि हातांत कला होती. ज्या दगडावर त्याचीं बोटं चालत तेथून सुन्दरच कलाकृति तयार होत असे. आपल्या रुक्ष अशा संसारांत त्यास एकच समाधान होतें. तें म्हणजे त्याची मुलगी मृणाल! अकरा वर्षांच्या त्या मुलीकरतां वाटेल तें करायला तो तयार होता. आपल्या कलेवर पोट जाळणें त्याच्या मानी स्वभावास रुचत नव्हतें. त्याला त्या नीरस आयुष्याचा कंटाळा आला होता.

कलावंताला आपला संसार म्हणजे सर्वस्व वाटत नाही. त्याला दुसऱ्या कशाची तरी ओढ असते. रमेश-चन्द्रालाहि अशीच ओढ लागलेली होती. त्याला अशी मूर्ति तयार करावयाची होती कीं ज्यामुळे त्याचें नांव अमर होईल. त्याकरता तो तडफडत होता, धडपडत होता.

बऱ्याच विचारानंतर रमेशचंद्राच्या मनाने सर-स्वतीची मूर्ति करण्याचा ध्यास घेतला. तो सरस्वतीची अशी मूर्ति तयार करणार होता कीं त्यामुळे त्याचें नांव शिल्पकार म्हणून अमर होईल. रमेशचंद्राच्या हट्टी मनांतून तो विचार हटेना. रात्रंदिवस तो विचार करूं लागला. शेवटीं निश्चयाने तो कामास लागला. सरस्व-तीच्या मूर्तीकरतां तो मॉडेल पाहूं लागला. परंतु सरस्वतीच्या शांत, प्रसन्न मुद्रेसारखी एकहि तरुणी त्यास आढळेना. दिवसावर दिवस जाऊं लागले आणि रमेशचंद्र अस्वस्थ होऊं लागला. त्याचें मन कशांतच रमेना.

आणि कलेच्या वेडापायीं आपल्या अकरा वर्षांच्या अजाण पोरीला मित्राच्या स्वाधीन करून तो हाडाचा कलावंत परदेशी निघून गेला.

निरनिराळ्या देशांत जाऊन त्याने अनेक तरुणी पाहिल्या. परंतु एकाहि तरुणीच्या चेहऱ्यावर त्यास सरस्वतीचें तेज आणि गांभीर्य आढळेना. परंतु त्याने आपला हट्ट सोडला नाही. त्याचे हात मूर्ति करण्यासाठी उत्सुक झालेले होते. मनांत कल्पनेचा कल्लोळ उठत होता. पण सरस्वतीच्या मुद्रेचें प्रतीक त्यास कुठेच आढळलें नाही.

शेवटीं पांच वर्षे परदेशी फिरून रमेशचंद्र निरा-शेने मायदेशीं परतला! दुःखाच्या झळीने त्याचा चेहरा काळा पडलेला होता. विषण्ण, जड मनाने तो आपल्या घरीं येत होता.

तोंच त्याला एक सतरा-अठरा वर्षांची तरुणी डोक्यावर घागर घेऊन लचकत, मुरकत, हसऱ्या अशा स्थितींत जातांना दिसली. तिला पाहताच तो एकदम

मारावल्यासारखा झाला. हरवलेलें सांपडल्याचा भास त्याला होऊन तो तिचें लावण्य न्याहाळून पाहूं लागला.

हरिणीप्रमाणे नेत्र असलेली ही तरुणी गजगतीने मंदमंद पावलें टाकीत होती. तिच्या मुखाच्या ठिकाणीं पौर्णिमेचा चंद्रच उगवला होता. तिने आपल्या नाजुक गळ्यांत चापेकळीची माळ घातली होती. एकाद्या फुलराणीप्रमाणे तिने आपल्या अंगावर फुलांचे अलंकार घातले होते. ती जणु कांही मदनाची क्रीडा करण्याची लतागुंफाच वाटत होती. ती सुंदरी म्हणजे ब्रह्मदेवाची रमणीय कलाकृतीच वाटत होती!

या तरुणीच्या मोहक दर्शनाने रमेशचंद्र अगदी भारावून गेला. त्याला हवी असलेली मूर्तीच साक्षात् त्यास दिसली होती. कल्पनेचें बादळ त्याच्या मनांत उठून त्याने तिला मॉडेल म्हणून समोर ठेवण्याचें ठरवलें. घरीं आल्यावर त्याला कळलें कीं ती तरुणी म्हणजे त्याची मुलगी मृणालच आहे!

त्याने दुसऱ्या दिवशीं आपलें मूर्ति करण्याचें काम सुरूं केलं. त्याला आता मॉडेल मिळालें होतें!

रमेशचंद्राने उत्साहाने काम सुरूं केलं. त्याचा हात शिलाखंडावर भराभर चालत होता. त्याने मारलेल्या घावाबरोबर त्या काळ्या पाषाणाचा आकार बदलत होता. खूप मेहनतीने व कष्टाने तो ती शिल्पकृति तयार करीत होता. त्याच्यासमोर एका दगडावर मृणाल बसली होती. तिच्याकडे पाहून तो त्या मूर्तीचा आकार घडवत होता. दिवसभर एकाच पोझमध्ये बसल्यामुळे तिचें अंग अवघडून येई. रात्रीं प्रत्येक अवयवांतून कळ येत असे. परंतु रमेशचंद्राकरितां ती सर्व सहन करत होती. त्याला तिची खबरच नव्हती. कलेच्या नादांत तो अंध झालेला होता. तिच्या खालावलेल्या शरीराकडे त्याचें लक्षच नव्हते. त्याला फक्त आपलें ध्येय दिसत होतें. त्यासाठी तो शक्तीपलीकडे आटोकाट प्रयत्न करीत होता. हळूहळूं त्या पाषाणाला आकार येऊं लागला. मृणालच्या चेहऱ्यासारखा चेहरा आता त्या मूर्तींत दिसत होता. हिच्या मुखावरची प्रत्येक चर्या, भाव, सौन्दर्य त्यांत उमटूं लागलं. जसजसा काळ जाऊं लागला तसतशी मूर्ती जिवंत होऊं लागली आणि तारुण्याने मुसमुसलेली पण आता कृश होत चाललेली मृणाल? हळूहळूं तिच्यांतला जीव जणूं जाऊं लागला. तिचें तेज गांभीर्य नष्ट होत चालले. जणूं तिचा प्राणच त्या मूर्तींत ओतला जात होता.

रमेशचंद्राच्या वेडाने तिचा प्राण घेण्यास सुरवात केली होती! पांच वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतर त्याचं स्वप्न साकार होऊं लागलं होतं' सरस्वतीची जिवंत मूर्ति तयार करण्यांत तो यशस्वी झाला होता. त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. आता त्याचं लक्ष मृणालकडे गेलं. धांवतच तिच्याकडे जाऊन तो म्हणाला, 'मृणाल, बघ! माझं स्वप्न आज साकार झालं! या काळ्या पाषाणांतून मी ही जिवंत मूर्ति तयार केली! या ठिकाणीं येणारा प्रवासी माझं नांव घेईल मृणाल, तुलाच या कलाकृतीचें श्रेय द्यावें लागेल! बघ! मृणाल हें आपलं जिवंत स्वप्न!' 'पाहिलं!' एकच शब्द तिनं मोठ्या कष्टाने उच्चारला आणि दुसऱ्याच क्षणीं तिने रमेशचंद्राच्या मांडीवर प्राण दिला.

'मृणाल! तो एकदम किंचाळला. 'तूं मला सोडून गेलीस! नाही! मृणाल, मला एकट्याला सोडून जाऊ नकोस ग! मी तुझ्यावाचून कसा राहूं? मी...मी तुझा प्राण घेतला! मी तुला मारलं! मी माझी जिवंत सरस्वती मारली! ज्या कलेने तुझा प्राण घेतला ती आता काय उपयोगाची? मृणाल, मी तुझा खून केला...!' रमेशचंद्राच्या हळव्या मनांवर त्या घटनेचा भयंकर परिणाम झाला. सरस्वतीची ती सुन्दर कलाकृती करणारा शिल्पकार वेडा झाला! देवाच्या घरचा न्याय हा असा विचित्र असतो.

म्हातारा रमेशचन्द्र त्या मूर्तीच्या पायथ्याशी बसलेला असतो, रोज सकाळीं त्या शांत, गंभीर, सात्त्विक अशा मूर्तीच्या पायावर ओंजळभर फुलें वाहतो आणि जाणाऱ्या येणाऱ्या व्यक्तीला तो जीव तोडून सांगतो, 'ही सरस्वतीची मूर्ती नाही! हे माझ्या मुलीचं मी बांधलेलं थडगं आहे थडगं! माझी अमर कलाकृति तर माझी मृणाल होती!'



# जुलूस....

ले०– सुरेश कृ. कुळकर्णी
चतुर्थ वर्ष, कला विभाग

हेमंत–शिशिराच्या थंडीबरोबरच कॉलेजच्या नोटीस बोर्डावर निवडणुकांची नोटीस झळकूं लागते, आणि विद्यार्थ्यांना येतं उत्साहाचं उधाण. दरवर्षीच्या जाहीरनाम्यावर फक्त नवीन तारखा टाकण्याची तसदी घेऊन ते प्रसिद्ध केले जातात. निदान यंदा तरी वर्णी लागेल या दृढ आशेने बरे-वसे होतकरु उमेदवार अर्ज भरतात. कांहीजण ग्रुपस्पिरीटने भडकून बोहल्यावर चढतात.

साहजिकच क्लासेस मधील संख्या आकुंचन पावते. रोलकॉलला आता स्कॉलर्ससुद्धा देईनासे होतात. म्हणून एंगेज करायला विद्यार्थीच शिल्लक न राहिल्याने प्राध्यापकवर्ग कॉमनरूममध्ये अनधिकृत सुटीच्या निमित्ताने राजकारणाच्या काथ्याकुटांत मशगुल होतात. इकडे विद्यार्थ्यांना सोंगासाठी दिवस अपुरे पडूं लागतात. भितीपत्रकें, सुगंधी जाहिराती, रस्ते रंगवणें वगैरे प्रकार सालोसाल चालत आलेले. पण नाविन्य म्हणजे कॉलेज हद्दीच्या बाहेर दूर अंतरावर अखंड, अव्याहत कॉलेज गीतमाला सुरूं होते. कोणाच्या टाळक्यांतून निघाला असेल तें असो, पण कार्यक्रम मात्र असतो जोरदार. त्या गीतमालेमुळे आजुबाजूचं रुक्ष वातावरण पार बदलून जातं, आणि रफी, लता वगैरे यक्ष–किन्नर रोज हजेरी लावूं लागतात. रेकार्डस्वरचीं गाणीं आणि तो आवाज ऐकून खुद्द गायकांनासुद्धा हा आपलाच आवाज असें छातीठोकपणे सांगण्याची हिंमत होणें शक्य नसतें.

निवडणुकीचा पवित्र दिवस उजाडतो. या सोनियाच्या दिवशीं नेहमीचे साधे कपडे घालणें वरातीला नाईट ड्रेसने जाण्यासारखं उमेदवारांना वाटतें आणि म्हणून Beg, Borrow वगैरे नेहमीच्या मार्गाने साज न जमल्यास ओळखीच्या धोब्यास गाठून साजशृंगार केला जातो. त्यांच्यापैकी कांही होतकरू उमेदवार कॉलरवर टाय किंवा बो आणि पायांत खाजगी नसल्यास N. C. C. चे मिलीटरी बूट चढवून येतात. गळफास बसल्यासारखा तो चेहरा पाहिल्यावर कांहींना कीव येऊन असल्यानाच मतप्रदान करावेसें वाटूं लागतें. मतदान संपून निकाल लागतात. आणि बऱ्याच अपेक्षितांचेहि 'निकाल' लागतात.

गॅदरिंगचें 'स्पेशल' वातावरण निर्माण होऊं लागतें. कमिट्या, स्टॅंडिंग कमिट्या, सब स्टॅंडिंग कमिट्या वगैरे वगैरेच्या गोंधळांतून अखेर कार्यक्रमाचा मसूदा बाहेर येतो. आणि आता मात्र गॅदरिंग होणार याची खात्री पटून कांही (म्हणजे बरेच) जण जास्तींत जास्त भारी कपडे करण्याच्या तयारीला लागतात.

कांही प्राध्यापक कम् दिग्दर्शक सालाबादाच्या नव्या उत्साहानं कॉलेजविद्यार्थ्यांचं एक नाटक बसवायचं ठरवतात. त्यानुसार साधारणपणे एक दिवसाआड निरनिराळ्या मजकुराच्या नोटिसांतून हौशी कलावंताना आवाहन करण्यांत येतं. परंतु वर्षभर हिरो आणि हिरॉईन समजले (म्हणजे स्वतःच समजणारे) जाणार 'नरवीर' आणि 'लक्ष्या' आतां भूमिगत झालेले असतात. त्यामुळे 'अडला हरी' प्रमाणे असेल त्याच संचावर एकांकिका करण्याचं घाटतं. तालमी सुरुं होतात. उत्साहाला वळण लागतें.

गॅदरिंगच्या पहिल्या दिवसाची सनईच्या मंगल प्रभातनें सुरुवात होते. निरनिराळे खेळ सकाळच्या कार्यक्रमांत आयोजित केलेले असतात. विद्यार्थी अथवा प्राध्यापकवर्ग विरुद्ध विद्यार्थिनी यांच्यांतील रस्सीखेच हा कार्यक्रम सुरू होतो. सुरुवात बरी होते. पण थोड्याच वेळांत प्रेक्षकांतही त्याचें प्रत्यंतर झाल्याने कार्यक्रम आवरतां घ्यावा लागतो.

नंतर सायकलीची शर्यत, चेंडूफेक वगैरे कार्यक्रम सुरू होतात. मुख्य म्हणजे हे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडतात. चमचालिंबूशर्यत हा एक धांवपळीचा प्रकार विद्यार्थिनींसाठी ठेवलेला असतो. त्यांत चमचा तोंडांत धरून पळावें लागतें. त्यामुळे तोंड बंद ठेवावें लागत असल्याने भगिनीवर्गात नाराजीच दिसून येते. वैयक्तिक शर्यती संपल्यावर सामने सुरू होतात. परंतु त्याला पाहिजे तसा (!) प्रेक्षक वर्ग शिल्लक न राहिल्यामुळे विद्यार्थीगण शिळ्या केक्स (खरं म्हणजे आदल्या दिवशीच्या ताज्या) आणि वातड (खाणारा म्हणतो) चिवडा वगैरेच्या रिफ्रेशमेंटसाठी नाईलाजाने रांगा लावतात.

रात्रीच्या कार्यक्रमांची शोभा कांही औरच. विद्यार्थ्यांची नेहमीची (हजर न रहाण्याची) प्रथा ओळखून गेस्टच्या भाषणाचा कार्यक्रम अगोदरच उरकवून घेतलेला असतो. त्यामुळे नंतरच्या कार्यक्रमांत कोणालाच कृत्रिमपण वाटत नाही. रात्रीच्या कार्यक्रमासाठी बरेच महाभाग 'सहनौ वहकतु' साठी आपल्या इष्टमित्रांसह (कार्यक्रम पत्रिकेवर तशी टीप नसतांना देखील) कॉलेजवर येतात. त्यांच्यासह आंतल्या पिटांत प्रवेश कसा मिळवावा हा सवाल फक्त नवख्या विद्यार्थ्यांनाच पडतो. ते सरळ आपल्या (स्वतः मत न दिलेल्या) वर्गप्रतिनिधीस गाठून आपल्या गणगोताची वर्णी लावतात. तेंहि न जमल्यास दुसऱ्या टोकाला असलेल्या गुरख्याच्या 'पेशल'ची सोय करून आंत शिरतात.

पिटांत शिरल्याबरोबर एकदम अंगावर धूळ येते. ती धूळ कसल्यातरी Explosion ची आहे हें कळायला नवख्या विद्यार्थ्याला वेळ लागतो. डोळे चोळत इकडे तिकडे जागा रिकामी असल्यास पहायला जावे तोंच अंगावर बाणाचा मारा सुरुं होतो. प्रॅक्टीस होण्यासाठी बरेच विद्यार्थी प्रथम सजातीयांवर एकलव्यगिरी करतात हें नंतर कळतें. धडपडत मिळेल त्या जागेवर बसल्यावर त्याच्या हाताला एकदम चटका बसतो. तेव्हा त्याला चटका बसण्याइतपत कोण तापला आहे म्हणून बाजूस वळून पाहतां शेजारच्या प्रेक्षकाच्या हातांतील अग्निहोत्राचा तो प्रताप असतो.

ह्या पिटांच्या एका कोपऱ्यात कांही अनुभवी व मुरब्बी लोक होतकरु विद्यार्थ्यांस सशास्त्र अग्निहोत्राचें शिक्षण देण्यासाठी एक्स्ट्रॉ पिरीयडस् घेत असतात. १० मिनिटांत एक बॅच या हिशोबाने बऱ्याच बॅचेस तरबेज होऊन गुरुकुलांतून बाहेर पडतात आणि तोंडास चटका बसेपर्यंत धुम्रवलयें काढण्यासाठी जमावांत शिरतात.

धनुर्विद्या, अग्निहोत्र, कानठळ्या बसवणाऱ्या शिट्या आणि ॲटमबॉंबचे Explosions यांना आळा घालण्यासाठी फिल्मी गाणीं सुरु होतात. कांहीजण त्यावर ठेका धरतात, कांही त्याला सुद्धा दाद न देतां आपल्या कायाशी 'प्रामाणिक' राहतात. अर्थात गाणीं बंद होतात.

अखेर पडदा वर जातो. आणि रफी तलकच्या घराण्यांतला एकादा गायक नुकत्याच ऐकलेल्या रेकार्डस् वरच्या रागरागिण्या सुरूं करतो. थोड्याच वेळांत 'रसिक' त्याचें पाणी जोखतात आणि इतर चांगल्या कार्यक्रमास जास्त वाव मिळावा या उद्देशाने त्याला चांगल्या शद्बांत (?) Send off देण्याचा प्रयत्न करतात. त्या चांगल्यांतून कांही तरी बरावाईट शब्द उमटतो. तो शब्द बैठकीतल्या गायकाच्या एका भाटाला बोचतो. तो त्याची प्रेक्षकांना जाणीव करून देतो. ती जाणीव प्रेक्षकांना बोचते. आणि प्रेक्षकांतील एक दोन जण पुढाकार घेऊन त्याच्याशी वाद घालूं लागतात. थोड्याच वेळांत एकमेकांच्या मातृकुलाचा उद्धार झालेला कानीं येतो. थंड युद्ध संपून लढाईला खरें तोंड लागतें. अखेर कोणीतरी मध्यस्थी करून आता जर भांडणांतच शक्ति अशी खर्च केली तर पुढच्या कार्यक्रमाचें कसें होणार अशी चिंता व्यक्त करताच ते नाईलाजाने भांडण मिटवून स्टेजकडे तोंड वळवतात. मधल्या वेळांत गायकाच्या दोन चार चिजा संपून तो कार्यक्रम संपलेला असतो.

फारशी नांदी न वाजवतां एकांकिका सुरू होते. सुरुवातीचे दहा मिनिटं प्रेक्षक ठार मुके असतात. फक्त स्टेजवरच आवाज ऐकूं येत असतात. पडद्यामागून मधून मधून हुश्शचे सुस्कारे ऐकूं येतात. ते बहुधा दिग्दर्शकाचें असावेसे वाटतात. परंतु मौनव्रत संपवण्याची प्रेक्षकांची ती खूण असते. पडद्यामागून येणारे प्रॉम्टरचे आवाज यांढू लागतात. मधून मधून नट स्टेजवरचीं भाषणें विसरतात. बऱ्याच वेळा प्रॉम्टर. त्यामुळे प्रेक्षक आपलीं विसरलेलीं भाषणें सुरुं करतात. आणि एकांकिकेचें लवकरच सूप वाजतें.

नंतर रेडीओ स्टेशनवरच्या 'विनोदी' समजल्या जाणाऱ्या फार्ससाठी पडदा वर जातो. स्टेजवर फक्त रेडीओ दिसतांच फेकून मारण्यासाठी हातांत घेतलेली कुजकी अंडीं, जोडे शतांतच राहातात. अर्थहीन बातम्या देण्याचें काम कोणीतरी सुरू करतो. पण रेडीओवर इतरवेळीं ऐकूं येणारी खरखर, घरघर ऐकूं न आल्याने प्रेक्षक आपले घसे साफ करुन घेतात.

नकलांचा कार्यक्रम सुरू होतो. प्रेक्षक त्याच्याच नकला सुरु करतात. त्या कार्यक्रमाचा निकाल लागतो. येवढ्या वेळपर्यंत प्रेक्षक दमले असतील असा अंदाज घेऊन मध्यंतर जाहीर करण्यांत येतो.



मध्यंतरानंतर प्रेक्षक ताजेतवाने होऊन फारसे ॲटमबाॅंब न उडवतां अथवा भगिनीवर्गात खरी साप न फेकतां मुख्य कार्याकडे वळतात. पडदा अर्धवट वर जातो. बाकीचा तसाच लोंबकळत राहतो. पडद्याआडून धडपड सुरूं होते. तो धड वर जात नाही धड खाली येतहि नाही. प्रेक्षकांना असल्या किरकोळ गोष्टीवर शिट्या फुंकून स्टँपिंग करायची इच्छा नसते. परंतु त्यांत बराच वेळ जायला लागल्यावर प्रेक्षकांचा नाइलाज होतो. पडदा वर जातो...

फिश–पॉण्डस्‌चा कार्यक्रम सुरू होतो. फिशपॉण्डस्‌चा कार्यक्रम हाताळण्यांत प्रेक्षकांचा हातखंडा. परंतु सुरवातीचे दोनतीन फिशपॉण्डस् हजर नसलेल्या [न रहाणाऱ्या] प्राध्यापकांना असल्याने ते प्रथमग्रासमक्षिकापातासारखे वाटतें. त्यानंतर कांही 'फेमस' लोकांना Offer येते. स्टेजवर येण्यासाठी त्यांच्यासारखे लोकहि लाजूं लागल्यावर प्रेक्षक लाजेने माना खालीं घालतात. कांहीनी स्वतःलाच (कोणीच न दिल्याने) फिश–पॉण्डस् देऊन घेतलेले असतात. कांही फिश–पॉंडस् केवळ स्तुतिच करणारे असतात. कांही केवळ देणाऱ्यांचा अर्धवटपणा दाखवतात. कांहीचा अर्थ देणाऱ्यालाहि ठाऊक नसतो. त्यामुळे प्रेक्षकवर्ग फिश–पॉंडस्‌वर स्वतःचे फिशपॉंडस् देण्याचें सोडून Selection Hopeless ची धूळ सुरू करतात. आहे त्याच परिस्थितींत कार्यक्रम चालूं ठेवण्याचा या कार्यकारिणीच्या धोरणामुळे पुढे रेटला जाऊन अखेर पडदा टाकण्यांत येतो. मैदान मारल्याच्या बेहोषींत शेवटचे हरहर महादेव होऊन प्रेक्षक बाहेर पडतात.

बसस्टॉपवरची दर्दी गर्दी पाहूनच बरेच जण पायीं जायला निघतात. जातांना एन्. सी. सी. च्या विद्यार्थ्यांखेरीज (कारण त्यांचा नंतर कँप असतो) प्रत्येकाच्या तोंडीं एकच विषय असतो. तो म्हणजे गॅदरिंग. एकंदर झाल्यागेल्या कार्यक्रमाचें समालोचन करीत कांही नवख्यांचा ग्रुप चालला असतो. सर्वच कांही त्यांना नवीन असल्याने ते एकदम खूष असलेले दिसतात. त्यांच्यामागून संथपणे सिनीयर विद्यार्थ्यांचा घोळका जात असतो. नवख्यांच्या 'कलर'मध्ये असलेल्या गप्पा ऐकून मागच्या घोळक्यांतला एक Senior most विद्यार्थी त्यांना म्हणतो, "अरे लेको, काय गॅदरिंग पाहिलं तुम्ही; खरं गॅदरिंग तर मंडपाबाहेर होतं!" नवख्यांना ह्यातलं कांहीच आकलन न झाल्याने ते निमुटपणे पायाच्या कात्रीने रस्ता कापूं लागतात.

---

❀ स्वच्छ आणि चांगल्या दर्जाच्या
❀ रोजच्या गरजेच्या मालाकरितां –
❀ अनिल प्रोव्हीजन स्टोअर्स आणि जनरल स्टोअर्स ❀
माहेजी बाजार, जळगांव.
एकदा अवश्य भेट द्या....!

उच्च दर्जाच्या, पांढऱ्या
शुभ्र व शाई न फुटणाऱ्या
कागदापासून तयार केलेली
अत्यंत माफक दराची

# अरुण

❋ वह्या ❋ रजिस्टरें ❋ डेटबुकें ❋
विद्यार्थ्यांनो, एकवेळ खरेदी हीच खात्री
खरेदी करण्यापूर्वी अवश्य चौकशी करा.

अरुण प्रकाशन व बुकडेपो
पोलन पेठ, जळगांव [जिल्हा जळगांव]
प्राथमिक, माध्यमिक व कॉलेजच्या पुस्तकांचे माहेरघर




# कांही रूपककथा....

ले.– शरचंद्र नांदुर्डीकर
पदवीपूर्व, शास्त्रविभाग

## १ स्वातंत्र्योपासक—

कुठल्याशा एका देशाने दुसऱ्या देशावर आक्रमण केल्याची बातमी ऐकून गांवांत खळबळ उडून गेली. सर्व गांवकरी क्षुब्ध झाले. गांवांतल्या एकुलत्या एका पुढाऱ्याने सर्व रहिवाशांना उद्देशून दवंडी पिटवली, "मित्रहो, आक्रमणाची बातमी ऐकून तुमच्या अंतःकरणांत क्रोधाग्नि कसा धडधडून पेटला असेल ते मी जाणतों. तरी ज्यांना ज्यांना म्हणून स्वातंत्र्याची खरी चाड असेल त्यांनी आज संध्याकाळीं माझ्याच घरासमोर होणाऱ्या सभेस अवश्य उपस्थित रहावे."

संध्याकाळीं त्याच्या घरापुढे प्रचंड सभा झाली. लहानापासून थोरापर्यंत झाडून सगळेच्या सगळे उपस्थित होते.

"हा एखाद्या देशाचा व्यक्तिगत प्रश्न नसून मानवतेपुढे टाकलेली समस्या आहे." एका वक्त्याने आवेशाने सांगितलें.

"मानवाच्या मूलभूत हक्कांची ही पायमल्ली आहे." दुसऱ्या एका विद्वानाने प्रतिपादन केले.

"कोणतेंही सुसंस्कृत राज्य हा अन्याय कदापिहि सहन करणार नाहीं." तिसऱ्याने गर्जना केली.

सगळ्यांच्या शेवटी पुढारी भाषण करण्यासाठी उठला. तो म्हणाला, "हें एखाद्या राष्ट्रावरील आक्रमण नसून प्रत्यक्ष स्वातंत्र्यदेवतेवरील आक्रमण आहे. याची योग्य ती दखल घेतलीच पाहिजे. आणि त्या देशाचा कडेकडीत निषेध केला पाहिजे." असें मोठें आवेशपूर्ण भाषण करून तो ओरडला "××× चा—"

"धिक्कार असो." इतरांनी साथ दिली.

"स्वातंत्र्य देवतेचा—"

"विजय असो" इतरांनी त्याच्या सुरांत सूर मिळविला.

आणि अशा अनेक घोषणा झाल्या

त्या पुढाऱ्याच्या घरापुढच्या सज्ज्यांत पिंजऱ्यांत पोपट ठेवला होता. समोरच्या जनसमूहाकडे आणि मधेच निळ्या आकाशाकडे दुःखी नजरेने तो पाहत होता. त्याच्या दीनवाण्या, व्याकूळ नजरेला या विषयावर कांही सांगायचें आहे हें त्या गर्जनांच्या गडगडाटांत कोणाच्याच लक्षांत आलें नाही.

× × ×

## २ प्रतिबिंब—

दिवसभराच्या श्रमाने थकून जाऊन रविराजाने आपलें मस्तक पाण्यांत बुडावलें आणि हळूहळू रजनी जगाला काळ्या वस्त्रांत लपेटूं लागली. आकाशांत तारका चमकूं लागल्या. खालच्या सरोवरांत पडलेलें आपलें प्रतिबिंब पाहून तारका उद्गारली. "अग बाई! इतकी कां मी दिसायला सुंदर आहे. अगदीं जवळच जाऊन पाहूंया कां!" असें म्हणून तिने खालीं उडी टाकली आणि काय आश्चर्य! तारका राहिलीच कुठें? सरोवराच्या कांठीं एक दगड त्या ऐवजीं पडला होता.

× × ×

## ३ क्षमा—

दुपारची वेळ झाली. आपल्या गुहेंतून पाणी पिण्यासाठी म्हणून वनराज बाहेर पडले. डुलत डुलत धुंदींत मोठ्या डौलाने ते निघाले.

चुकून जातां जातां मधे झोंपलेल्या कोल्ह्याच्या शेंपटीवर त्याचा पाय पडला. त्या बरोबर आधी दोन हात दूर पळून कोल्हा म्हणाला, "छे! छे! एवढं वाईट वाटून घेऊं नका. चुकतं एखादे वेळेस. क्षमा केली आहे मी तुम्हांला."

एका झेपेसरशीं त्याला खालीं पाडतां पाडतां वनराज मनात म्हणाले, "म्हणे क्षमा करतोय मला. मूर्ख कुठचा!"

आणि मरतां मरतां कोल्हा पुटपुटला. "इतकं रागवायला काय झालं? क्षमा केली तें कुठेंच गेलं. नसती केली नाही तर."

× × ×

**४ आधार—**

तो डौलदार वृक्ष मोठ्या जोमाने वाढला होता. इतर सगळे त्याचा हेवा करीत आणि यात भर म्हणूनच कीं काय त्याच्या भोंवतीं वेलीचा नाजूक वेढाही पडला होता. जणुं कांही एखादें प्रणयी युगुल एकमेकाच्या बाहुपाशांत विसावून गुजगोष्टी करीत बसलें आहे.

एकदां लतेच्या मनांत आलें या वृक्षाचा एवढा तोरा हवाच कशाला? प्रत्येक वेळीं मी काय म्हणून त्याच्या आधाराची याचना करायची? आजपासून मी माझी स्वतंत्र.

वृक्षाने तिची खूप समजूत घातली पण व्यर्थ. ऐटींत तिने वृक्षाच्या आश्रयांतून स्वतःला मुक्त करून घेतलें. आणि...

...कांही केल्या तिला ताठ उभे राहतांच येईना. जमिनी सरपट ती लोळूं लागली आणि येतां जातां प्रत्येक जण तिला पायदळीं तुडवूं लागला.

× × ×

**५ पुरुषार्थ—**

त्या सुंदर युवतीच्या दोन बाजूस ते दोन तरुण बसले होते. एक किंचित् नाजूक होता तर दुसरा दणकट दिसत होता. दोघेही जण प्रेमाची याचना करीत होते. जो कोमल होता तो स्वप्निल डोळ्यांनी तिच्याकडे पाहत म्हणाला, “ हे सुंदरी, तूं जर माझा स्वीकार केलास तर रोज तारकांचीं फुलें मी तुला आणून देईन. आकाश गंगेंतून तुला फिरवून आणीन. धुक्याचें तलम वस्त्र आणून देईन.... ”

इतक्यांत बाजूच्या नदीच्या दिशेने ‘ वांचवा वाचवा ’ असा आवाज आला. ती युवती झट्कन् त्या कवीला म्हणाली, “ जा ! माझ्यासाठी त्या बुडणाऱ्याला वाचवून आणा. ” थरथर कांपत तो म्हणाला, “ अरे बाप रे ! मला पोहतांच येत नाही ग. मीहि त्याच्या बरोबर तळाशीं जाईन कीं. ” तिरस्काराचा एक कटाक्ष त्याच्याकडे टाकून ती दुसऱ्याला सांगणार एवढ्यांत त्याने उडीसुद्धां घेतली होती. आणि कांही वेळाने बुडणाऱ्या माणसाला त्याने वाचवून कांठावर आणलें देखील. कवीला ती रमणी म्हणाली “ तुमच्यापेक्षा यांचेंच प्रेम मला अधिक योग्य वाटतें. माझ्यासाठी तुम्हीं झाडाच्या हिरव्यागार पानांच्या बांगड्या घालून रडत बसा. ”

---

नाटक अगर शैक्षणिक संमेलनांसाठी
लाउड स्पीकर व लाईटिंगच्या खास व्यवस्थेसाठी
विश्वसनीय व एकमेव ठिकाण—
मायटी ब्रदर्स
[ डेकोरेटर्स व इलेक्ट्रिक सामानांचे विक्रेते ]
१३०, माहेजी बाजार, थत्ते बिल्डींग, जळगांव.
टीप :— धार्मिक कार्यास विशेष सवलत.
आपल्या आवाजाची रेकार्ड करून दिली जाईल.



# ....आणि माझ्या वक्तव्याला देवाज्ञा होते....!

ले.– कु. जयश्री धर्माधिकारी [ पदवी पूर्व, कला विभाग ]

विद्वन्नियुक्त अध्यक्ष, आणि ज्ञानपिपासू रसिकवृंद,

वास्तविक आजपर्यंत ४९ खास चर्चा, २८ गुप्त बैठकी आणि ७ खुलीं अधिवेशनें यांत ज्या मसुद्यावर फ्रीस्टाईल चर्चा झाली तिचा अित्थंभूत अहवाल सा. शि. प. ने. ( साहित्य शिखर परिषद ) चालविलेल्या “ साहित्य-मंजिरी ” आणि ‘ वाङ्मय-गुटिका ’ या मासिकपत्रांत आलेलाच आहे. त्याखेरीज आज मी विशेष काय सांगणार? तरीदेखील सा. शि. प. च्या नियामक, कार्यकारी, संपादक, प्रकाशक, मुद्रक, लेखक स्वयंसेवक, तहहयात, सर्वसाधारण, खास व आवश्यक अशा सर्व साहित्यिक गोटांतून आजच्या आयोजित परिसंवादासाठी माझ्या नांवाची गोड ललकारी आली. अतएव मी आपल्यापुढे सादर झालें आहे.

गुरु दत्तात्रेयाच्या मुखवट्याप्रमाणेच आजचा आपला विषयहि तीन शब्दांनी बद्ध आहे. “ साहित्य-विकास-योजना ”. या योजनेंत, मुख्यत्वें महाराष्ट्रीय माणसांत भावनात्मक ऐक्य साधण्यासाठी नवकाव्यावर विशेष भर आहे. कारण गेल्या पंचवार्षिक योजनेंत नवकाव्याच्या उत्पादनाने नवा उच्चांक गाठला आहे. नवकाव्यांत दिसून येणारे—वास्तववाद, वैफल्यवाद, मानवतावाद... सारे वादातीत आहे हें निःसंशय.

कारण आज मानवाची आणि मानवतेची एकमेकांपासून दूर दूर पळण्याची महान शर्यत सुरूं आहे. हरिणाच्या गतीनं धावणाऱ्या या विसाव्या शतकांत जरा डोळे उघडून ‘ जगाच्या पाठीवर ’ पहा. हिंदी चिनी भाई भाई म्हणत पोटांत खंजीर खुपसणारा तो लाल चीन ! एके काळीं अत्युच्चपदीं असलेल्या व आता चिरनिद्रा घेत असलेल्या स्टॅलिनला थडग्यांतून बाहेर काढणारा तो प्रगतीशील रशिया ! निषेध खलित्यांच्या होळीवर पोळी भाजणारा तो पाकिस्तान ! सत्तालोलुपतेने अंध झालेला तो पोर्तुगाल नि रक्तलांछित झालेला तो कांगो ! घात की अपघात अशा संशयग्रस्त स्थितिप्रत पोहोचलेला यूनोच्या सरचिटणीसाचा किंवा चौकशी मंडळाच्या सरन्यायाधीशाचा शोचनीय शेवट ! केवढा हा मानव्याचा अधःपात !

मानवहो, हा अखिल मानव्याचा सर्वस्पर्शी नि सर्वंकष प्रश्न आहे. विनाशाच्या वणव्यांत होरपळणाऱ्या, नैराश्याच्या खोल दरींत कोंदटलेल्या कल्पांत आणि मेघांच्या थैमानांत हेलकावणाऱ्या या जगाला कुणीच त्राता नाही का? माझा जीव मानवी जीवनासाठी अगदी कासावीस होत आहे. माझी ही तीव्र तृष्णा, ही जीवघेणी पिपासा कुणी तरी पूर्ण करेल काय?

अहाहा ! कुणा सुहृदाचा हात, थंडगार पाण्याने भरलेलें पात्र पुढे करीत आहे? माझी तृष्णा इतक्या तत्परतेने भागविणारा साथीदार मला मिळाला. किती भाग्यवती मी !

केवढ्या आशेने, आसुसलेल्या नजरेने, तृषाकांत अंतःकरणाने पाणी घेण्याकरिता मी हा हात पुढे केला. पण... पण... पाणिग्रहणाचा प्रश्न दिसतो तितका सोपा नाही. वाटतो तितका सहज नाही. कुणाचं पाणिग्रहण करूं मी? कांही...कांही सुचत नाही. कुणाचा हात हातांत घेऊं? कुणाची निवड करूं मी? कुठे संपत्तीचा विजय आहे. तर कुठें विद्येचा विजय आहे. कुठे भाषापांडित्य आहे तर कुठे शास्त्रीय पारंगतता आहे. कुठे वेशभूषा तर कुठे केशभूषा ! कुठे गानकला तर कुठे काव्यकला ! कुठे चित्रकला तर कुठे शिल्पकला ! कुठे नर्तन तर कुठे कीर्तन ! कुठे हास्य तर कुठे लास्य ! कुठे विकास तर कुठे विलास ! काय करूं मी? डोक्यांत विचारांचा डोंब उसळला आहे. अंगांत कापरें भरतें आहे. मनांत वादळ उठतें आहे. या अफाट पाणिग्रहणासाठी अंगप्रत्यंगांतून हात फुटत आहेत. सर्वांगांतून पाणी फुटत आहे. तोंडचें पाणी पळालं आहे. हृदयाचें पाणी पाणी झालें आहे. पाणावलेले डोळे घट्ट मिटून घेतले. माझा साथीदार निवडूं लागले. हळूंहळूं मूर्ति साकार झाली. मी आपले कापरे हात पुढे करून थिजलेले नेत्र उघडले... अन् अन् स्वप्नांतून जागे झालें. माय गॉड ! अखेर हें स्वप्नच होतं? अरेरे, पाणिग्रहणाच्या सर्व आकांक्षावर पाणी पडलं !

आणि या पाणी पडण्याच्या बाबतींत मला परवां-पर्यंत वाटत होतं कीं आसामांतलं चेरापुंजीचं स्थान अढळ आहे. पण पुणंभी कुछ कम नही ! केवढी थोर

पुण्याई या पुण्यनगरीची ! पण निर्घृण काळाला त्याची कुठली दखल ? त्यानें उन्मत्तपणे तांडवनृत्य केलं. वखवखलेल्या हातांना गवसेल तें गिळंकृत केलं. जाल तिकडं लाललाल पाणी, फेसाळणारें भेसूर पाणी मनाला येईल तसं वहात होतं.

नेमका आजचा विद्यार्थी असाच वहावत चालला आहे. त्याचं चित्र डोळ्यासमोर उभं राहिलं कीं नकळत कालिदासाने शोकावेगांतील अजाच्या तोंडीं घातलेलं वचन आठवतं " मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवित–मुच्यते बुधैः । " मरण हाच देहधारी मानवाचा स्वभाव असून जगणं ही एक विकृत अवस्था आहे. आजच्या महाविद्यालयीन युवकांचे चेष्टाचाळे बघून असंच म्हणावंसं वाटतं कीं बेजबाबदारपणा व उच्छृंखलता हीच आजच्या विद्यार्थ्यांची प्रकृति आहे नी गांभीर्य ही विकृति आहे. जी सर्रास घडते ती प्रकृति आणि जी आकस्मिक घडते ती विकृति या निकषावर कालिदासाने जीवनाचें जें लक्षण वदविलं आहे त्याच निकषावर मी आजच्या विद्यार्थीजीवनाची चिकित्सा केली तर ती अप्रस्तुत निश्चित ठरणार नाही.

महाविद्यालयातील निवडणुका पाहिल्या, त्यांतील बारेमाप पैशाची उधळपट्टी, हीन पातळीवरून चाललेला अपप्रचार, राजकीय पक्षाचा धुडगूस... हें सारं पाहिलं कीं वाटतं हा उद्यांचा आधारस्तंभ नुसताच स्तंभ रहाणार कीं काय ! जे विद्यार्थी चित्रपटगृहांत तीन तीन तास शांत बसलेले असतात, बाहेरचीं नाटकं मोठ्या रसिकतेनं आणि चोखंदळपणाने पहातात तेच विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्यावेळीं आपल्याच भावंडांचें परिश्रमाने बसविलेलें नाटक रंगभूमीवर येताच, त्या नाटकाचा, त्या परिश्रमाचा, त्या स्नेहाचा नि संमेलनाचा पार धुव्वा उडवून देतात. आचकट विचकट बोलण्याचा, टांचण्या लावून शरसंधान करण्याचा आसुरी आनंद ते लुटतात. एवढ्यावरच ते थांबत नाहीत तर सल्फुरिक ॲसिडच्या बाटल्या खिशांत बाळगून प्राध्यापकांच्या नि विद्यार्थिनींच्या कपड्यांवर उडविण्याचा पाशवी प्रकार करणारे महाभागहि आज आहेत.

खरं पाहूं गेलं तर सल्फ्युरिक ॲसिड इतकं उपयुक्त ॲसिड नाहीं बरं ! खोटं वाटेल पण, फुलांत फूल जसं गुलाबाचं, भाजींत भाजी जशी मेथीची, तसं ॲसिडांत ॲसिड सल्फ्युरिक ॲसिड ! साऱ्या रसायन शास्त्रांतला सम्राट आहे सम्राट ! या सम्राटावरून आठवलं ! तसे या भरतभूमीवर सम्राट अनेक आले नि मावळले. पण कविसम्राट रवींद्रांचें तेज अष्टौप्रहर दीप्तिमान आहे. ज्यावर कधींहि सूर्य मावळत नसे अशा साम्राज्याच्या मुख्य नगरांत ह्या सम्राटाने वास्तव्य केलं. तिकडे जपान-मध्ये जाऊनहि उगवत्या सूर्याचें दर्शनहि त्यांनीं घेतलं होतं. आणि अमेरिकेच्या नवीन जोमाच्या जीवनाचाहि परिचय त्यांना होता. मग रवींद्रांचा आत्मा कां विशाल होणार नाही ? त्यांच्या गीतांमधील विशाल मानव्यांच्या भावनेचा, जीवनाच्या असीम भव्यतेचा राष्ट्राच्या अस्मितेचा, ऐक्याचा, समतेचा नि ममतेचा प्रशांत साक्षात्कार एका विलोभनीय नि कमनीय भारतमातेचें दर्शन कां घडविणार नाही ? एका उदार जीवनप्रणालीचें दर्शक असें जीवनस्पर्शी साहित्य कां निर्माण होणार नाही ? होणारच ! निश्चित होणार.

कारण उच्च कलाकृतीची निर्मिति ही उदात्त नि उत्कृष्ट भावनाविष्कारांतून होत असते. परंतु आज कलेला बाजारी आणि हिडीस स्वरूप दिलं गेलं आहे. आजचे चित्रपट निर्माते कलेपेक्षा गल्ल्याकडे अधिक लक्ष देतात. पण ' प्रपंच ' सारख्या कांही मराठी चित्रपटांनी अजूनहि आपली पातळी सोडली नाही. ही आनंदाची गोष्ट आहे. प्रपंचमध्ये कुशलतेने हाताळलेली, दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेली कुटुंबनियोजनाची राष्ट्रीय ज्वलंत समस्या पाहून सात्विक धन्यता वाटली. एक गोष्ट आठवली. परवा शिळोप्याच्या गप्पांमध्ये शेजारच्या सीताकाकू डोस पाजीत होत्या. " कशाचं नियोजन नि फियोजन मेलं ! लेकरं देवाचें देणं आहे. " खूप हसूं आलं. खरंच कुणी लेकरांत देव मानतात तर कुणी पाषाणाच्या निर्जीव दगडांत ! कुणी म्हणतात त्यांची संख्या तेहतीस कोटी आहे. एक तोंडाचा मारुति, दोन तोंडाचा साप, तीन तांडाचा दत्त, चार तोंडाचा ब्रह्मदेव... असे किती देवांचे अवतार ! पण माणसांत देखील देव असतो हें माहित आहे ? नुकतंच तिकीट मिळवणारे, कॉंग्रेस प्रचाराचा नारळ जळगांवी फोडणारे शंकरराव देव माहित नाहीं तुम्हांला ?

( अध्यक्ष घंटा वाजवतात )

हाय रे देवा ! अध्यक्षदेवा ( अध्यक्ष पुनः घंटा वाजवितात ) माझ्या भाषणालाहि देवाला मान्य करण्याशिवाय आता काय गत्यंतर ?

---



# बोलविता धनी ' विरहची ! ' ....

ले०– शांताराम पाटील,
तृतीय वर्ष, कला.

थोड्या वेळापूर्वी पावसाचा शिडकावा झाला. चुकार ढग पसार झाले आणि सायंकाळची नाजुक किरणें वृक्ष–लतांशी चाळा करूं लागलीं. नुकतंच स्नान करून केस वाळवीत बसलेल्या नवयौवनेप्रमाणे सृष्टि आकर्षक दिसत होती. अशा वातावरणांत खोलींत बसून राहाणं शक्यच नव्हतं. कुठं तरी गप्पा छाटीत, ऐकाद्या ' मोक्याच्या ' कोपऱ्यावर येणाऱ्या जाणाऱ्यांची टिंगल करीत ही संध्याकाळ घालवायची आणि उद्यापासून अगदी ध्रुवनिश्चयाने अभ्यासाला लागायचे असा संकल्प करून मी बाहेर पडलों. पण सर्व टिंगलबाज मित्र सिनेमाला किंवा आपापल्या घरीं गेलेले असल्यामुळे मी एका विवाहित मित्राकडे जायचें ठरवलें. वास्तविक विवाहित मित्राकडे मी सहसा जात नाहीं. कारण त्याचं जीवन पाहिल्यावर मला त्यांचा हेवा वाटतो, कधी कधी मत्सरहि ! आणि दुसरं म्हणजे मला ' क्रौंचवधा 'चा श्लोक सार्थ व सटीक माहीत असल्यामुळे ' आपण कशाला जा त्याच्यामधे ' या विचाराने माझा विचार बदलतो. पण आज कांही इलाज नव्हता.

मित्राकडे गेलों तेव्हा तो एका आंतर्देशीय पत्रावर लिहित होता—

' आठवण होते तुझी, सखे मला क्षणोक्षणीं
विरहाची आग उरीं, भडकते निशिदिनीं
आळवितों, आलापितों, हृदयाच्या विणेवरी
तुझा विरही प्रियकर, भैरवीच्या रागदारी '

वाचून झाल्यावर मी त्याच्याकडे प्रश्नार्थक दृष्टीने पहातां त्याने खुलासा केला. त्याची पत्नी माहेरी गेलेली होती डिलीव्हरीसाठी ! आणि तिलाच तो त्याची हृदयव्यथा लिहित होता. मी त्याला म्हटलं ' लेका, ठीक आहे. लवकरच पितृऋणांतून मुक्त होशील. ' पण या पितृ–ऋणाच्या मुक्तिसाठी त्याला किती असह्य विरहवेदना सहन कराव्या लागत होत्या हें त्यानं सविस्तर वर्णन केल्यावर माझंहि हृदय कळवळलं. त्याचवेळीं माझ्या वाचनांत आलेल्या ' यशस्वी विवाहित जीवनाचें रहस्य ' या पुस्तकांतील ' यशस्वी विवहासाठी विरह अत्यावश्यक आहे ' हा विचार आठवला. पण हा विरहाच्या अत्या–वश्यकतेचा भाग खरा मानूं म्हटलं तर इकडे माझ्या मित्राची हालत विरहामुळे वाईट होत असलेली दिसत होती. व खोटा मानूं म्हटलं तर पुस्तकाचा लेखक फार व्यासंगी व अनुभवी होता. त्याने अनुभवजन्य व निरीक्षण करून शास्त्रशुद्ध लिहिलें आहे असा लौकीक होता.

विरहाने प्रेम खरोखर दृढ होत असेल का ? कीं, उगीच कांहीतरी लिहायचं आणि सांगायचं व प्रसिद्धि कमवायची म्हणून हे लेखक किंवा अनुभवी माणसं असं कांहीतरी प्रतिपादन करीत असतील ? विचार करुनहि मला निश्चित उत्तर सापडेना. शेवटीं मी ठरवलं कीं, विरहाने काय वाढतं आणि काय घटतं याचें समीकरण मांडत बसण्यांत कांहीं अर्थ नाही. एवढं खरं कीं एकाद्या विरही जीवाजवळ आपण त्याच्या भूतकाळाबद्दल व विरही अवस्थेबद्दल बोलायला लागलों तर तो फार रस घेऊन बोलतो. आणि यावरून विरह जितका वाईट म्हटला जातो तितका वाईट खास नाही. आपणांस एकादी शोकांतिका वाचून वाईट वाटतं. क्वचित प्रसंगीं आपण रडतोंही पण तरीहि आपण आनंदाने म्हणतों कीं मी आज अमक्या एका शोकांतिकेचं आकंठ रसपान केलं. शोकांतिका वाचतांना जसा दुःखातहि आनंद असतो, तसाच कांहीसा आनंद व गोडी विरहांतहि असते. प्रेमांत पडूनहि नियतीच्या फेऱ्यामुळे म्हणा किंवा कांही लौकिक कारणांमुळे म्हणा, प्रेम सफल न झालें तर विरही जीवांना प्रेमाग्नि जाळत असला तरी त्यांत सर्वदाहक अग्नीची तीव्रता नसून चंदनाची शीतलता असते, पाण्याची मृदुता असते, मधाची गोडीहि असते, दुःखातहि सुख असतें. म्हणूनच विरहातांजवळ बोलतांना तुम्ही त्यांच्या प्रिय व्यक्तीबद्दल केवळ ओझरता उल्लेख केला तरी त्या ओझरत्या उल्लेखावर ते कितीतरी वेळ बोलत रहातील. सुस्कारे टाकतील, हळहळ व्यक्त करतील, दैवाला दोष देतील, क्वचित् प्रसंगीं त्यांचे डोळे डबडबून येतील. पण आपल्या प्रिय व्यक्तीबद्दल बोलणं मात्र कधी आवरतं घेणार नाहीत. तसं पाहीलं तर दुःखद घटना उद्धृत केलेल्या आपणांस आवडत नाहीत. पण आपल्या विरहास

कारणीभूत झालेल्या घटनांचा नुसता कोणी उल्लेख केला, आपली स्मृति चाळवली कीं, आपण त्यावर तासन् तास बोलत बसतों आणि त्यास सहृदय म्हणतों. आता तुम्हीच सांगा, विरह जर खरोखर वाईट असतां तर अशा 'वाईट' गोष्टींबद्दल कोणी बोललं असतं का? बोलणं निघालंच तर ते रंगलं असतं का? आणि अशा 'वाईट' गोष्टींबद्दल बोलणारा माणूस सहृदय ठरला असतां का?

जगांतील गाजलेल्या कृतींच्या लोकप्रियतेचं एक प्रमुख कारण म्हणजे 'विरह.' 'दमयंति–स्वयंवरांतील' दमयंतीचा विरहविलाप किंवा 'रुक्मणी–स्वयंवरांतील' रुक्मिणीने श्रीकृष्णाचा केलेला धावा प्रसिद्धच आहे. 'विरह–तरङ्गांत' माधव ज्यूलिअनांनी नायक प्रभाकर व नायिका इंदु यांच्यांतील विरहाचं आणि नाजुक रेशमी बंधनांचं जें कौशल्यपूर्ण आविष्करण केलं आहे, त्यामुळेच विरह–तरङ्ग हें मराठींतील एक उत्कृष्ट काव्य ठरलं आहे. पण या सर्वांवर ताण करणारी जगप्रसिद्ध कलाकृति म्हणजे 'मेघ–दूत!' वास्तविक त्यांतला तो यक्ष शापभ्रष्ट होऊन त्याच्या पत्नीस दुरावतो काय, नंतर एका मेघाबरोबर निरोप सांगतो काय– सारंच अतार्किक, अकल्पनीय, अशक्य! पण त्या कलाकृतीचा रस 'विरह' असल्यामुळेच तें इतकं हृदयंगम ठरलं आहे. या शब्दसृष्टीच्या कुबेरांना काव्यासाठी विरह रसाखेरीज दुसरा रसच सांपडूं नये? वात्सल्यरसासारखा 'सात्त्विक आनंद' देणारा रस, मानवांतील चैतन्याचा आणि जिवंतपणाचा प्रत्यय आणून देणारा वीररस, जीवनांत घडोघडीं प्रत्ययास येणारं कारुण्य व त्यांतील करुण रस यांपैकी कोणताच रस या त्रिकालदर्शी कवींना आवडूं नये? त्यांच्या सुप्रसिद्ध काव्यकृति, कलाकृति नेमक्या विरहानेच ओथंबलेल्या असाव्यात हा का केवळ योगायोग आहे?

विरहाचं दर्शन घ्यायला आपणांस कलाकृतींकडेच जायला हवं असं नाही. आपल्या दैनंदिन व्यवहारांतहि असें कितीतरी प्रसंग दिसतील. मी नासिकला असतांना माझ्या खोलीशेजारीं एक इन्कमटॅक्स ऑफिसर रहात असे. संध्याकाळची वेळ झाली कीं, माझी त्या ऑफि–सरच्या खिडकीकडे अगदी सरावल्यासारखी नजर जायची. कारण सायबीणबाई दर दोन मिनिटांनी खिडकीबाहेर मोठ्या आतुरतेने व उत्कंठेने डोकावून पहायच्या. आणि 'ते' येतांना दिसले कीं, सायबीण–बाईचा चेहरा 'इलॅस्टिक' रबराप्रमाणे किती मोठा व्हायचा म्हणून सांगू? हें एक वेळ स्त्रियांच्या बाबतींत आपण समजूं शकूं. त्यांना दिवसभर त्याच त्या घरांत कोंडून बसावं लागतं. पुरुषांना त्या मानाने कितीतरी मोकळं असतं. पण ते कांही कांही वेळा अगदी स्त्रियां–वरहि ताण करतात. तुळसीदास नदी पुराने दुथडी भरून वहात असतांनाहि पत्नीस भेटण्यास गेला होता. हें सुप्रसिद्धच आहे. नुकतंच लग्न झालेले प्रोफेसर कॉलेजांतील तास संपल्याबरोबर घराकडे पळतात तें काय त्यांना कॉलेजांत काम नसतं म्हणून? किंवा संध्याकाळ झाल्याबरोबर तरुण तरुणींना देवळाची किंवा पार्कची आठवण येते ती काय त्यांना देवाबद्दल फार भक्ति आहे किंवा निसर्गाची फार आवड आहे म्हणून? या सर्वांचा बोलविता धनी 'विरह' असतो.

तुम्ही कोणत्याहि प्रेम विवाहित जोडप्याला विचारा, ते प्रामाणिक असतील तर मनमोकळेपणाने कबूल करतील कीं, सर्वांत काव्यमय, सर्वांत मनोरम, सर्वांत कल्पनारम्य अनुभव देणारी अवस्था जर कोणती असेल तर ती विरहाचीच! विरहावस्थेंतील ती हुरहूर, ती आतुरता, ती उत्कंठा, ती धडपड, ती स्वप्नाळू दृष्टि, आशाआकांक्षांनी आसुसलेलं मन, थरथरणारे ओठ, तो कल्पनाविलास, मीलनापर्यंत यांचा किती उत्कट अनुभव येत असतो! आणि त्यांतील आनंदहि मीलनाबरोबर संपतो. त्यांतील 'काव्य' हि संपते. सूर्यास्ताप्रमाणे हा सर्व आनंद हळूहळू ओसरतो. विरहामुळे मीलनाला जास्त महत्व येतं, उत्कटता येते. मीलनापूर्वीची विरहावस्था म्हणजे सूर्योदयापूर्वीची उषा! पण आपण मीलनालाच महत्त्व देतों, मीलनाचीच वाट पहात असतों. पण विरहां–तली गोडी मीलनाला कधीच येत नसते. किंबहुना मधुर मीलनाचा बोलविता धनीहि 'विरह'च असतो! असें माझ्याप्रमाणे तुम्हालाहि नाही वाटत?



# हे शोध लागले तर....

ले०– **कु. प्रभा प्रभुदेसाई**, पदवी पूर्व, कलाविभाग

आमची टर्मिनल परीक्षा चालूं होती. पहांटे अभ्यास करावयाची संवय असल्यामुळे माझी गजराच्या घड्याळा-वरच सर्व भिस्त असते. दुसऱ्या दिवशीं भूगोलाचा पेपर होता. भूगोलाचा आणि आमचा छत्तीसाचा आकडा असल्यामुळे मी त्या विषयाचा आधी अभ्यास केला नव्हता. त्यामुळें मी तीनचाच गजर केला व अगदी निर्धास्तपणें झोपलें आणि... आणि काय सांगू? पहाटे गजर बंद करून मी केव्हा व कशी झोपलें तें मला कळलं सुद्धा नाही. सकाळीं साडेसहाला आईने हाक मारली, तेव्हा मी खडबडून उठले. माझ्या डोळ्यांसमोर ब्रह्मांड उभे राहिले. गजराच्या घड्याळाचा उपयोग फक्त गजर बंद करण्याकरिताच असतो असें विधान आमचे केळकर सर वर्गात करीत असतात त्याची सत्यता मला त्या दिवशीं पटली. आतां कांही मी भूगोलांत पास होत नाहीं मला कळून चुकलें. मी आईवर चिडलें तेव्हा आई रागाने म्हणाली, "तूं म्हणजे अगदी मुलखाची आळशी आहेस बघ. तुला आधी मुळीच अभ्यास करायला नको. तुझी झोपसुद्धा कशी अगदी कुंभकर्णा सारखी आहे. माणसाला आपल्या झोपेवरसुद्धा ताबा ठेवतां येऊं नये म्हणजे काय?" आळशी आणि 'कुंभकर्ण' ह्या आमच्या आईने मला सप्रेम बहाल केलेल्या पदव्या आहेत.

त्या दिवशीं मला एक सुंदर कल्पना सुचली. ही माझी कल्पना म्हणजे सगळ्या संशोधकांना आव्हानच आहे म्हणा ना! आपल्याला जितक्या वाजतां उठावयाचें तसा गजर करावयाचा. गजर झाला कीं गादीखाली अशी स्प्रिंग असावी कीं त्यामुळे लगेच गादी भरभर गुंडाळली जाऊन मला गादीच्या बाहेर हाकलून दिलं गेलं पाहिजे. अर्थात फरशीवर झोपणारे नररत्नसुद्धा असतीलच. सर्व विद्यार्थी हें यंत्र तयार करणाऱ्यांस दुवा दिल्याशिवाय रहाणार नाहीत अशी माझी खात्री आहे.

भारतीय स्त्रियांना चूल आणि मूल याशिवाय कांही सुचतच नाही. दिवसभर त्यांचा वेळ स्वयंपाकांतच जातो. त्यामुळे कसलहि वाचन त्या करीत नाहीत. वर्तमान-पत्रसुद्धा किती थोड्याजणी वाचतात हें सांगणें नलगे. हल्ली कुकर लावतात. त्यामुळे स्वयंपाक भरकन होतो. पण पोळ्या करण्यांत त्या एक तास तरी घालवितात. जर पोळ्या करण्याचें यंत्र शोधून काढलें तर "आमचा स्वयंपाकांतच सर्व वेळ जातो. त्यामुळें इतर गोष्टी कराव-यास वेळ मिळत नाही." अशी ओरड करावयास त्यांना जागा राहणार नाही.

जगांत सतत जर काय चालूं असेल तर तें म्हणजे माणसाचं तोंड. कांही कांही वेळेला नको त्या माणसाशी भिडेखातर बोलावें लागतें. माझी एक मैत्रीण आहे. आपलं चऱ्हाट ती कितीवेळ लावते हें सांगणे फार कठीण आहे. आली कीं माझा एक तास तरी ती घेतेच. बरं, बडबडीला तरी कांही अर्थ असतो का? मुळीच नाही. Time is money ही म्हण तिला माहीत नसावी ती मैत्रीण बोलूं लागली कीं मला माझी दुर्बलता असह्य होते. हिच्या तोंडाला कुलुप घालतां येईल तर किती बरं होईल? असा विचार माझ्या मनांत हजार वेळा तरी डोकावून जातो. दुसऱ्याचें तोंड बंद करण्याचें यंत्र जो तयार करील त्याला मोक्षप्राप्ति मिळेल ह्यांत शंका नाही. कारण ह्याच्या इतकें मोठें पुण्य नाही.

"तुला देवाने डोकंच दिलं नाही." किंवा "देवानं अक्कल वाटली त्यावेळीं तूं कुठं गेली होतीस ग?" अशी मुक्ताफळं आम्हाला रोज मिळतात. मला फार वाईट वाटतें. कारण बुद्धि ही ईश्वरदत्त देणगी आहे. त्यांत माझा काय दोष? पण ह्यावर मला सगळी म्हणतात कीं, तूं अभ्यास करीत नाहीस म्हणून तुला कमी मार्कस् मिळतात. जर आपोआप यंत्राच्या सहाय्याने पुस्तकांतील सर्व ज्ञान डोक्यांत भरता आलं तर काय मजा येईल! ह्या यंत्रणेमुळे हुशार लोकांना सध्या जो जादा मान मिळतो तो मिळणार नाही व आम्हाला अशीं मुक्ताफळं रोज ऐकावीं लागणार नाही. सर्वत्र समता निर्माण होईल. ह्या यंत्रांच्या शोधांची फार मोठी आवश्यकता आहे. हा एकच शोध लागला तर अखिल मानव जातीचें कल्याण होऊन इतर सर्व शोध लावण्याची कटकट चुकेल. तेव्हा माझ्या ह्या सूचनेकडे सर्व वाचकांनी लक्ष द्यावें असें मला वाटतें.

# महाविद्यालयीन वातावरणांतील बेशिस्तीला जबाबदार कोण ? विद्यार्थी, विद्यार्थिनी की प्राध्यापक ?

[ यंदा वरील विषयावर बक्षिसासाठी निबंध मागविले होते. आलेल्या निबंधांत बक्षिसास पात्र असा एकहि निबंध नव्हता. कांही निबंधांतून कांही कांही भाग चांगला वाटला. तेवढाच भाग आम्ही खाली छापत आहोंत.

—संपादक ]

मनाची अपरिपक्वता हें बेशिस्तिला उत्तेजन देणारें एक प्रधान कारण होय. सक्तीचें प्राथमिक शिक्षण व त्यामुळे माध्यमिक शाळेंतून वाढलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा प्रवाह हा पानशेत धरण फुटल्याप्रमाणे शालान्त परीक्षेच्या धरणांतून फुटून महाविद्यालयाकडे वळतो. पिंजऱ्यांतून सुटल्यानंतर कानांत वारा भरलेल्या वासरां-प्रमाणे, अभावितपणे व बालीशपणे जाणाऱ्या येणाऱ्याला धक्के मारण्यांत त्यांना कॉलेजजीवनांतील इतिकर्तव्यता वाटते. तास सुरु असतांना गोंधळ करणें, मधूनच निघून जाणें, प्राध्यापकांना अनाहुत मार्गदर्शन करणें, घरगुती वातावरणाने वागणें ही चतुःसुत्री अंगिकारून ते दिवस घालवितात. क्लासमध्ये असें बेशिस्त वातावरण निर्माण करण्यांत कांही ठराविक विद्यार्थीच भाग घेत असतात. प्राध्यापकांनी सांगितलेलें मौलिक व स्पृहणीय विचार ग्रहण करण्याऐवजी त्यांच्या बोलण्यांत थोडी सुद्धा चूक झाल्यास किंवा शिकवित असतांना किंचित् अतिशयोक्ति झाल्यास स्टँपिंग करून व हल्लकल्लोळ करून जसा कांही आपण त्यांच्यावर विजय मिळविला याचा त्यांना अभिमान वाटतो. किंवा व्याख्यान हें जर खंड न पडतां सुरु राहिले तर " माहीत आहे, आपलें पाठांतर फारच दांडगें आहे. " असा शेराहि ते प्राध्याप-कांना देऊं शकतात. खोट्या प्रतिष्ठेच्या आहारीं विद्यार्थी गेलेले असल्यामुळे प्राध्यापकांनी सांगितलेले चार सद्-भावनेचे शब्द त्यांना अपमानास्पद वाटतात. कारण आपल्याला सारें कांही समजतें, अशी सोयीस्कर समजुत विद्यार्थी करून घेतात. प्राध्यापकांनी एकदा केलेला उपदेश निष्प्रभ ठरल्यानंतर परत त्यांच्या वाटेला जावयाचे नाही असा पोक्त निर्णय प्राध्यापकहि घेतात. विद्यार्थ्यांना प्राध्यापकांच्या ज्ञानरूपी पंखाखालीं बसून विहार करणें आवडत नाही व त्यामुळे प्राध्यापकांनाहि आपल्या पंखांची उब विद्यार्थ्यांना आग्रहाने देण्यांत स्वारस्य वाटत नाही. त्यामुळे बेशिस्तीच्या थंडींत ते कुडकुडत असतात व अर्धवट अनुभवांवर आधारलेली मतें उराशीं कवटाळण्यांत ते स्वतःला धन्य समजतात.

महाविद्यालयांतील बेशिस्तीचें आणखी एक कारण म्हणजे प्राध्यापक व विद्यार्थी यांचे दुरावलेले संबंध. विद्यार्थी व प्राध्यापक यांचे संबंध पूर्वीच्या आश्रमांतील गुरु व शिष्य यांच्या संबंधाप्रमाणे असणें शक्य नाही. याचें कारण म्हणजे विद्यार्थ्यांची वाढती संख्या. विद्यार्थ्यांचें मन ओळखणें ही एक कला आहे व ती सर्व प्राध्यापकांना साधेतच असें नाही. विद्यार्थीवर्गांत शिक्षणाविषयी प्रेम व महत्वाकांक्षा निर्माण करण्याचें कार्य हें प्राध्यापकांचेंच आहे हें विसरून चालणार नाही. विद्यार्थ्यांना खरी स्फूर्ति प्राध्यापकांकडूनच मिळत असते. त्यांच्या योग्य अयोग्य मतांचा विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनावर अतिशय परिणाम होतो. प्राध्यापक हे जेवढ्या आत्मीयतेने शिकवित असतील तेवढ्या प्रमाणांत विद्यार्थीहि त्यांना प्रतिसाद देत असतो. प्राध्यापकांचा संबंध हा विद्यार्थ्यांच्या जिवंत संस्कारक्षम अशा आनंदी व खेळकर वृत्तीशी येत असल्याने आजुबाजूच्या लोकांपेक्षा त्यांच्यावर जबाबदारीचें ओझें अधिक असतें. तें पेलण्याइतकें प्राध्यापकांचें व्यक्तिमत्व बळकट असावें लागतें. विद्यार्थ्यांबद्दल प्रेम, तळमळ, आत्मीयता हे गुण त्यांचे ठायीं असणें जरूरीचें आहे. त्याशिवाय त्यांच्या व्यक्तिमत्वांचे पैलू चमकणार नाहीत. " अध्यापन जितके शास्त्र आहे तितकीच ती कला आहे, हें प्राध्यापकांनीं ओळखावयास हवें. " कलेचा आविष्कार करतांना कलावंताची जी बेहोषी असते त्या बेहोषीचा अनुभव प्राध्यापकांना यावयास हवा. प्राध्याप-कांच्याच मनांत उत्कट ज्ञानलालसा नसेल तर ती विद्यार्थ्यांत कुठून येणार ?

कांही प्राध्यापकांनी एम्. ए. च्या किंवा एम्. एस्. सी. च्या परीक्षेंत उच्च श्रेणीचें यश मिळविलें असतें परंतु त्यांच्यांत शिकवण्याच्या कलेचा अभाव दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या पातळीवर येऊन विषयाची मांडणी करण्याचा अनुभव त्यांना फारच कमी असतो व अशा वेळीं विद्यार्थीवर्ग त्यांच्या व्याख्यानाशीं समरस होऊं




शकत नाही. आणि त्यामुळे त्यांचा कल इतर अयोग्य गोष्टीकडे वळतो व हेंच कांही प्रमाणांत बेशिस्तीचें मूळ होय.

—**सौ. इंदू चौधरी**, बी.ए., द्वितीय वर्ष

**आमचे व्यवहारी प्राध्यापक—**

" महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या मनांत प्राध्या-पकांबद्दल आदर नाही. " असा एक दावा केला जातो. हा दावा मात्र खरा नाही. प्राध्यापक म्हणजे गुरु. गुरु हा विशुद्ध चारित्र्याचा, कर्तृत्ववान व आदर्श असावा लागतो, तर तो विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करूं शकेल ! पण आमच्या प्राध्यापकांत प्रामुख्याने ह्याच गोष्टीची मोठी उणीव आहे असें खेदाने म्हणावें लागत आहे. ( मनांत त्यांची क्षमा मागून, कारण ते गुरु आहेत. ) या परिस्थितीला कोणतेंहि कारण जबाबदार असो. पण सत्यस्थिति अशी आहे खास. ' विद्यार्थ्यांचें कांही कां होईना ? आपलें काम बरें कीं आपण बरें. ' असा साधा, सरळ, सुटसुटीत आणि व्यवहारी विचार करून गप्प बसणारे कित्येक प्राध्यापक आहेत. शिक्षक आणि विद्यार्थी यांचेमधील जिव्हाळ्याचें नातें केव्हाच इतिहास जमा झालें आहे. विद्यार्थ्यांच्या भरमसाट संख्येमुळे प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष पुरविणें अध्यापकाला अशक्य आहे हें जरी असलें तरी महाविद्यालयांतील बेशिस्तीला आळा घालण्यांत प्राध्यापक खूप कांही करूं शकतील. सर्वच विद्यार्थी कांही बेशिस्त नसतात. हजारो आंब्याच्या आढींतील सडका आंबा नाही का आंबेवाला काढीत ? सुसंस्कार करायची ज्यांची जबाबदारी आहे ते आमचे प्राध्यापक कांहीहि कारणाने असोत निष्क्रीय आहेत.

महाविद्यालयांत तऱ्हेतऱ्हेच्या फॅशन्सला अधिक महत्व दिलें जातें. अनेकदां प्रत्यक्ष प्राध्यापकच एकाद्या ॲक्टरप्रमाणे नटून–थटून, त्याच थाटाचीं वस्त्रें परिधान करून कधी कधी शीळ घालीत बोलपटांतील भडक गाणीं गुणगुणत वावरत असतात. मग विद्यार्थ्यांनाच बंधन कां ? उपहारगृहांत विद्यार्थ्यांच्या खुर्चीला खुर्ची लावून स्पेशल मिसळ व गरम बटाटेवडा खाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बरोबरच अगर एखादी रांग मागेपुढे बसून " चौदहवी का चाँद हो " वा " तेरी प्यारी प्यारी सूरत को " ची लज्जत घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संगतींत तोंडात ' मसाला ' पानाचा बागूल अन् हातांत पांढरी कांडी असणाऱ्या, गाईडची पोपटपंची करणाऱ्या, माझ्या खाजगी स्वैर जीवनाकडे बघण्याचें तुम्हास कारण नाही, असें सांगणाऱ्या व क्वचित् देशबाह्य निष्ठाहि शिकवणाऱ्या प्राध्यापकासंबंधीं विद्यार्थ्याने काय म्हणून आदर बाळगावा? या उलट कसाहि विद्यार्थी असो, तो जेथे अक्षरशः नतमस्तक होतो, असे प्राध्यापक आजहि महाविद्यालयांत आहेत. अशा गुरुजनांसमोर विद्यार्थी नेहमीच नम्र राहिला आहे; व त्याने त्यांच्यापासून जीवनांत प्रेरणाहि घेतलेली आहे. पण ज्यांची गणना ' ऐसे आडुयाचे तीन ' यांत होते अशाबद्दलहि तीच नम्रता व तोच आदर राखण्याइतका आजचा विद्यार्थी अन्ध–श्रद्धाळू नाही— आणि तितका तो व्यवहारीहि राहिलेला नाही.

—**प्र. श्रा. चौधरी**, बी.ए., द्वितीय वर्ष

या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या संबंधाबाबत मला असें सांगावयाचे आहे; या दोहोंत अत्यंत मोकळेपणाचें वातावरण असणें फार चांगलें. दोहोंनीहि एकमेकांबद्दल कुठलाच वाईट ग्रह न बाळगतां ज्याप्रमाणे बहिणभावंडे एकमेकांशी घरां वागतात, वावरतात, एकमेकांत मिसळतात, बोलतात, त्याचप्रमाण जर बोलणें वागणें, विचारविनिमय करणें आदि गोष्टी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यांत होऊं लागल्या तर खरोखरच महाविद्यालयीन वातावरण अधिकच पवित्र बनूं लागेल. प्रत्येकाचे एकमेकांविषयीचे विचार बदलतील, पवित्र बनतील, एकमेकांविषयी सात्त्विक भावना निर्माण होऊ लागेल. असें जर होऊ लागलें तर खरोखरच महाविद्या-लयीन वातावरणांत, विद्येच्या प्रांगणांत पावित्र्याची ज्योत पाजळूं लागेल.

आणखी मला सुचवावयाचें तें हें कीं आपण इंग्रजींतून Sorry, Please, Excuse आदि शब्द ताबडतोब उच्चारून जातो, पण त्याच अर्थाचे मराठी शब्द उच्चारतांना आपलें मन कचरतें. हें जसें आहे; याचप्रमाणे जर एखाद्या विद्यार्थ्यास विद्यार्थिनीशी बोलावयाचें झाल्यास त्याने ' सिस्टर ' या शब्दांपासून सुरवात करुन बोलावें; विद्यार्थिनीस जर विद्यार्थ्यास बोलावयाचे झाले तिने ' ब्रदर ' ( Brother ) या शब्दाने सुरवात करावी. हे दोन शब्द महाविद्यालयीन वातावरणांत फारच समर्पक ठरतील.

—**रमेश देशपांडे**, प्रथम वर्ष, कला विभाग

* नानाविध आकर्षक डिझाइन्सचें
* कापड भरपूर स्टॉकमध्यें मिळण्याचें
* सुप्रसिद्ध असलेले एकमेव ठिकाण
सुंदर....आकर्षक........आणि उत्कृष्ट वस्त्रांसाठीं—
आर. राजकोटीया आणि कंपनी
माहेजी बाजार, जळगांव.
मुंबई, अहमदाबाद, व मद्रास मिल्सचें कापड
....तसेंच....
आधुनिक पद्धतीच्या साड्या योग्य किंमतींत मिळतील.

जळगांवकरांचें आवडतें ठिकाण—
पी. व्ही. ॲन्ड को.
गणेश बिल्डींगच्या मागें, नवीपेठ, जळगांव.
सर्व प्रकारचे शर्ट, बुशशर्ट, मनीला, कोट, पॅन्ट शिवून मिळतात.
पी. व्ही. ॲन्ड को.

जळगांवांतील सर्वांत जुनें व आपलें आवडतें—
मधुकर आणि कंपनी
एस. टी. स्टॅन्डजवळ, जळगांव
— आमच्याकडे —
• नवशक्ती • गांवकरी • फ्रीप्रेस •
• जन्मभूमी • मातृभूमि •
आदि दैनिकें व सर्व प्रकारची साप्ताहिकें व मासिकें मिळतात.
सर्व प्रकारचा स्टेशनरी माल व आपल्या संसारास लागणाऱ्या उपयुक्त वस्तू मिळतात.
मधुकर आणि कंपनी, एस. टी स्टॅन्डजवळ, जळगांव.

Photoes by—
Shri F. T. Ghorpade
S. Y. B. A.


Howra Bridge— Calcutta


Dakshineshwar Temple
Calcutta


Victoria Memorial— Calcutta


Kutub - Minar— Delhi.

Shri Yusuf Memon



Inter University Hockey Player for two successive years

Shri V. S. Wagh



1st in 400, 800, 1500, 5000 metres North Group Inter University Athlete.

Shri B. N. Patil



First class first at the B. Sc. Exa. Oct 1961

Miss Suman Oke



1st in Broad Jump North Group Sports

Shri A. S. Mahajan



Our unopposed General Secretary for two successive years.



# अहवाल

## १९६१–६२

## मराठी वाङ्मय मंडळ

या वर्षी मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यास प्रारंभ सुप्रसिद्ध लेखिका सौ. मालतीबाई बेडेकर ह्यांच्या 'माझ्या कादंबऱ्यांची भूमिका' या विषयावरील व्याख्यानाने झाला.

दिनांक २० जुलै ६१ रोजीं कै. वा. म. जोशी स्मृतिदिनीं धुळें येथील प्रा. ह. श्री. शेणोलीकर यांचें व्याख्यान झालें. एम्. ए. (मराठी) परीक्षेंत सुयश मिळविणाऱ्या कु. सुलभा आरस ह्यांचा सत्कार करण्यांत आला.

दिनांक ७ सप्टेंबर ६१ रोजीं श्री. वा. वा. पाटणकर (वकील, यवतमाळ) यांनी आपल्या मराठींत नव्यानेच लिहिलेल्या शेरोशायरीचा 'मराठी मुशायिरा' खूपच रंगविला.

दिनांक ११ सप्टेंबर ६१ रोजीं तृ. व. बी. ए वर्गांतील विद्यार्थिनी कु. शशिकला प्रभुणे ह्यांनी 'प्रा. फडके ह्यांच्या कादंबऱ्या' ह्या विषयावर सुन्दर निबंध वाचला. चर्चेंत प्रा. राजा महाजन, प्रा. चिपळूणकर, प्रा. भावे, प्रा. सु. का. जोशी, श्री. देवकीनंदन सारस्वत, श्री. राठोड यांनी भाग घेतला. अध्यक्ष प्रा. म. ना. अदवंत यांनी आक्षेपांना समर्पक उत्तरें दिलीं.

दिनांक २२ नोव्हेंबर ६१ रोजीं ग्वाल्हेर येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या दुःखद निधनप्रसंगीं घेण्यांत आलेल्या शोकसभेंत प्रा. अदवंत यांनी कै. सौ. कुसुमावती देशपांडे यांस श्रद्धांजली वाहिली. मंडळाने दिनांक २९–११–६१ रोजीं कै. डॉ. माधवराव पटवर्धन स्मृतिदिन साजरा केला. अमळनेरचे प्रा. ल. के. कुळकर्णी यांचें यावेळीं "मी काव्य कां वाचतों" ह्या विषयावर व्याख्यान झालें. प्रा. तारळेकर यांनी प्रारंभीं "मराठी असे आमुची मायबोली" ही कविता पंचरागांत म्हटली.

दिनांक ८–१३–६१ रोजीं प्रथमवर्ष बी. ए. मधील विद्यार्थ्यांनी प्रा. म. ना. अदवंत ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं कै. तांबे स्मृतिदिन साजरा केला.

दिनांक १६-१२-६१ रोजीं प्रा. उ. भा. कोठारी ह्यांनी श्रेष्ठ हिंदी उपन्यासकार जैनेंद्र यांच्या 'कल्याणी' कादंबरीवर आयोजित केलेल्या परिसंवादांत श्री. रा. बा. पाटील (एम्. ए.), श्री. सुंदरलाल जैन (एम्. ए.), प्रा. पुणतांबेकर (अध्यक्ष), श्री. भोई, श्री. ना. भि. वाणी, कु. प्रभा मुंदडे व सौ. नूरजहाँ तडवी ह्यांनी भाग घेतला.

दिनांक १५ ते १८ डिसेंबर ६१ मंडळाची सहल नासिक, गंगापूर, त्रिंबक, भंडारदरा येथे गेली होती. नासिक येथे प्रा. आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली तीन तास प्रा. राजा महाजन, डॉ. अ. वा. वर्टी, डॉ. गोखले कवि कुसुमाग्रज, सौ. लीला कुळकर्णी यांनी मैफल रंगविली.

२७ जानेवारी ६२ रोजीं प्रा. फडके यांस 'पद्मभूषण' हा किताब मिळाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणारा ठराव मंडळातर्फे पाठविण्यांत आला.

१ फेब्रु. ६२ रोजीं 'महाराष्ट्रकवि यशवंत यांच्या अध्यक्षतेखालीं मंडळाने आपलें ४ थें वार्षिक स्नेहसंमेलन साजरें केलें. सुरुवात कु. सोहनी यांनी 'मराठी मायबोली या गीताने केली. प्राचार्य महाजन यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. प्रा. अदवंत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिल्यावर प्रा. सु. का. जोशी यांनी अहवाल वाचून दाखविला. श्री. यशवंत यांनी शब्द व शब्दशक्तींचें सामर्थ्य यावर सविस्तर व सुंदर व्याख्यान दिलें. कविसंमेलनांत फैजपुरचे प्रा. भानु चौधरी, भुसावळचे ज्येष्ठ कवि श्री. के. नारखेड, श्री. पाठक, श्री. शास्त्री, श्री. देवकीनंदन सारस्वत, श्री. भावसार, श्री. रवीन्द्र भेडे, प्रा. राजा महाजन, श्री. दीक्षित, कु. पारकर व श्री. यशवंत यांनी भाग घेतला.

कवि यशवंत ह्यांच्या हस्तें जळगांव जिल्ह्यांतील साहित्य प्रदर्शनाचें उद्‌घाटन झालें.

अल्पोपहारानंतर करमणुकीच्या कार्यक्रमांची सुरवात कु सोहनी यांनी म्हटलेल्या ‘ महाराष्ट्रगीताने ’ झाली. प्रा. कु. राणे यांचें सतारवादन; कु. सोहनी, श्री. राजकोटिया ह्यांची भावगीतें; कु. खांबेटे यांनी शेक्सपीअरच्या ‘ ॲज यू लाइक इट ’ मधील म्हणून दाखविलेलें स्वगत; श्री. र. बा. कुळकर्णी व सारस्वत यांची ‘ आकाशवाणी ’ बातमीपत्रें; श्री. बाहेती ( सूत्रधार ) कु. आरस ( नटी ), श्री. बाळ दीक्षित ( कवि ), कु. सोहोनी ( कविपत्नि ), प्रा. राजा महाजन ( कारकुन ) श्री. सारस्वत ( मास्तर ) यांनी वाचून दाखविलेली मंगेश पाडगांवकरांची संगीतिका ‘ कवि ’; प्रा. राजा महाजन यांनी श्री. सारस्वत व श्री. दीक्षित यांच्या संगतींत पेश केलेली स्वतःची ढंगदार कव्वाली, मराठी नाटकांतील नायिकादर्शनांत शारदा ( कु. पुष्पा चव्हाण ) आनंदीबाई ( कु. केळकर ), निर्मला ( कु. आरस ), लतिका ( कु. प्रभुणे ) ह्यांनी सादर केलेलीं स्वगतें, शेलापागोटे ( फिश्पॉंडस ) हे कार्यक्रम होते. ह्याच वेळीं श्री. सारस्वत ( मनोहर ), श्री. बाहेती ( गुलाब ), श्री. राजकोटिया ( दिगंबरपंत ), कु. प्रभुणे ( मंजिरी ) कु. पोतनीस ( यमुना ), कु. चौधरी ( उषा ) ह्यांनी “ हाच मुलाचा बाप ” ह्या वरेरकर लिखित नाटकांतील दोन प्रवेश सादर केले.

हे कार्यक्रम यशस्वी करण्यांत ज्यांनी ज्यांनी आम्हांस सहकार्य दिलें त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

**श्री. बाळ दीक्षित**
**कु. उषा दीक्षित**

**म. ना. अदवंत**
**सु. का. जोशी**

---

# कलामंडळ

यावर्षी कलामंडळाचें कार्य विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहकार्याने व्यवस्थितपणे चालू ठेवतां आलें. दि. १५ ऑगष्ट रोजीं करमणुकीच्या विविध कार्यक्रमाने मंडळाच्या कार्याचा उत्कृष्ट प्रारंभ झाला. ललित संगीत, शास्त्रीय संगीत, एकांकिका इत्यादि विविध प्रकार यशस्वी रीत्या सादर करण्यांत आले. दि. ४–९–६१ रोजीं ‘कठपुतली’ हा कार्यक्रम मंडळाच्या सदस्यासाठी सादर करण्यांत आला. दि. २६–९–६१ रोजीं युसिसच्या सौजन्याने उद्‌बोधक माहितीपट दाखवण्यांत आले. दि. २३-११-६१ रोजीं प्रथितयश नाटककार श्री. बाळ कोल्हटकर यांनी मंडळाला भेट देऊन मार्गदर्शनपर भाषण केलें. दि. १०–१२–६१ रोजीं मंडळातर्फे ‘ मॅन ऑफ ए थावजंड फेसिस ’ हा उत्कृष्ट इंग्लिश चित्रपट सदस्यांना दाखवण्यांत आला. स्नेह संमेलनप्रसंगीं ‘ अंमलदार ’ हें नाटक मंडळातर्फे यशस्वीपणे सादर करण्यांत आलें. दि. २६–१--६२ रोजीं ‘ कलाप्रदर्शन ’ भरवण्यांत आलें. प्रदर्शनाचें उद्‌घाटन येथील विख्यात डॉक्टर श्री. बेंडाळे यांच्या शुभहस्तें झालें. सुप्रसिद्ध कलावंत श्री. केकी मूस व श्री. वसंतराव केळकर यांच्या कलाकृति तसेंच श्री. हिरोडकर या विद्यार्थ्यांच्या सर्व विभागांतील उत्कृष्ट कलाकृति यांचे मोठेंच आकर्षण कलाप्रेमी रसिकांना या कलाप्रदर्शनांत होते.

पुढील वर्षी यापेक्षाहि अधिक प्रमाणांत कलामंडळाचें काम चालूं राहील असा संकल्प करण्याइतका विश्वास या वर्षीच्या कार्यानें आला आहे.

**श्री. देवकीनंदन सारस्वत**
**कु. ज्योत्स्ना सोहोनी**
कार्यवाह

**ग. ह. तारळेकर**
कार्याध्यक्ष

---



# वादविवाद सभा

वादविवाद सभेच्या या वर्षाचें उद्‌घाटन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सौ. मालतीबाई बेडेकर यांच्या शुभ हस्ते दि. ११ जुलै १९६१ रोजीं झालें. त्यांचें “ आजची सामाजिक स्थिति ” या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान झालें.

दिनांक ५ ऑगष्ट १९६१ रोजीं “ आजचे विद्यार्थी बोलपटांनी बिघडले आहेत ” या ठरावावरील चर्चेत एकूण १८ विद्यार्थी–विद्यार्थीनींनी भाग घेतला होता. ठरावाच्या अनुकुल बाजूचें नेतृत्व श्री. भंडारकर यांनी केलें आणि प्रतिकुल बाजूचे नेते श्री. रघुनन्दन राठोड हे होते. प्रा. भावे यांच्या अध्यक्षतेखालीं ह्या खुपच रंगलेल्या वादविवादाच्या शेवटीं मतमोजणीच्या वेळीं सभागृहाने वरील ठराव बहुमताने फेटाळून लावला.

दिनांक ११ सप्टें. १९६१ रोजीं झालेल्या चर्चेसाठी “ आजची शास्त्रीय प्रगति मानवतेला मारक ठरली आहे. ” हा ठराव सादर करण्यांत आला. अनुकूल बाजूचें नेतृत्व कु. केळकर यांनीं केलें व प्रतिकूल बाजूचे नेते श्री. ए. डी. पाटील हे होते. अध्यक्षस्थानीं प्रा. केळकर होते. सभागृहाने वरील ठराव बहुमताने फेटाळून लावला.

दिनांक २० सप्टेंबर १९६१ रोजीं नाशिक येथे “ कै. सौ. चंदूबाई कुळकर्णी ” वादस्पर्धेचें प्रतिनिधित्व करण्यासाठी श्री. शां. भि. पाटील व कु. केळकर यांची निवड करण्यांत आली. ” उपवासाचे तंत्र लोकशाहीशी विसंगत आहे. ” हा विषय होता. अध्यक्षस्थानीं प्रा. पुणतांबेकर असून परीक्षकांची जबाबदारी प्रा. कोठारी, प्रा. राजा महाजन, प्रा पुणतांबेकर यांनी स्वीकारली होती.

दि. २८ सप्टेंबर १९६१ रोजीं “ आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाची प्रगति व्हावी म्हणून सरकारने बिनशर्त आर्थिक सहाय्य केलें पाहिजे ” या ठरावावर औरंगाबाद येथें होणाऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी श्री. रघुनंदन राठोड आणि श्री. प्र. ल. जोशी यांची प्रति-निधी म्हणून निवड करण्यांत आली. अध्यक्षस्थानीं प्रा. राजा महाजन होते आणि परीक्षकांचे काम प्रा. राजा महाजन, प्रा. पुणतांबेकर, प्रा. शिरसीकर यांनी केलें.

दि. ३० सप्टें. १९६१ रोजीं पुणें येथे होणाऱ्या “ कै. न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धे ” साठी श्री. शां. भि. पाटील व श्री. भांडारकर यांची प्रतिनिधी म्हणून निवड करण्यांत आली. “ सद्यःस्थितींत लोकशाहीचें विकेंद्रीकरण इष्ट व हितकारक आहे ” हा प्रस्ताव होता. प्रा. केळकर, प्रा. क्षीरसागर, प्रा. पी. टी. महाजन हे परीक्षक होते. प्रा. चिपळूणकर यांनी अध्यक्ष स्थान भूषविलें होते.

दि. १–१२–६१ रोजीं नासिक येथें होणाऱ्या “ बॅ. मु. रा. जयकर वक्तृत्व स्पर्धेसाठी ” प्रतिनिधींची निवड करण्यासाठी “ राष्ट्रीय एकात्मता ” हा विषय होता.

दि. १४–१२–६१ रोजीं धुळें येथे होणाऱ्या “ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी ” श्री. भांडारकर व श्री. शां. भि. पाटील यांची प्रतिनिधी म्हणून निवड करण्यांत आली. त्यांनीं पहिल्या क्रमांकाची ढाल तर मिळविलीच शिवाय दोघांना वैयक्तिक पारितोषिकेंहि मिळालीं. श्री. भांडारकर व श्री पाटील यांचें हार्दिक अभिनन्दन !

हे सारे कार्यक्रम यशस्वी करण्याकरितां ज्यांनी ज्यांनी आम्हांस सहाय्य केले त्यांचे आम्ही ऋणी आहोंत.

**रघुनन्दन राठोड**
सेक्रेटरी

**सु. का. जोशी**
चेअरमन

# लेडीज असोशिएशन

ह्या असोशिएशनची स्थापना ही ह्या वर्षांतील नवीन घटना आहे. ह्या वर्षांत ४ कार्यक्रम असोशिएशन तर्फे साजरे झाले.

S. Y. B. A. मधील विद्यार्थिनी कु. साधना देशपांडे हिची कलकत्त्याच्या Sta'istical Institute मध्ये B. Stat. च्या कोर्ससाठी निवड झाल्यामुळें तिला निरोप देण्याचा समारंभ २२ जुलै रोजीं झाला. १ सप्टेंबरला रांगोळी प्रदर्शन व हळदी कुंकवाचा अभिनव कार्यक्रम झाला. ह्या प्रदर्शनांत १४ विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. ह्यापैकीं पहिल्या तीन कलाकृतींना प्राध्यापक मंडळीतर्फे बक्षिसें जाहीर करण्यांत आली. क्रमांक १) कु. चव्हाण, २) कु. आगरवाल, ३) कु. केळकर. समारंभाच्या मुख्य पाहुण्या सौ. वीणा भावे एम. ए. ह्या होत्या. विद्यार्थिनींनी गाणी, नकला वगैरे करमणुकीच्या प्रकारांनी समारंभ फार मनोरंजक केला.

१९ जानेवारीला खाद्य पदार्थांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें. त्यांत १३ विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. विद्यार्थिनींनी हे खाद्य पदार्थ अतिशय कलात्मक रीतीने

कु. विजया जोशी

मांडले होते. ह्यानंतर तिळगूळ समारंभ झाला. त्याकरता बुलढाण्याच्या सौ. शशीताई आगाशे M. A. B. T. ह्या मुख्य पाहुण्या म्हणून आल्या होत्या. खालील तीन नंबरांना बक्षिसें देण्यांत आली. १) कु. भावे, २) कु. पाटणकर, ३) कु. शर्मा. परीक्षक म्हणून सौ. महाजन सौ. पोतनीस व सौ. आगाशे यांनी काम केलें. तिळगूळ समारंभापूर्वी विद्यार्थिनींनी गाणी, नकला, असंबद्ध भाषण वगैरे कार्यक्रम सादर केले.

दिनांक ५ फेब्रुवारीला 'आधुनिक स्त्री समोरील समस्या अधिक बिकट झाल्या आहेत' ह्या विषयावर वादविवाद आयोजित करण्यांत आला. त्यांत खालील ५ विद्यार्थिनींनी भाग घेतला. कु, आरस, कु. प्रभुणे, कु. कांबळी, कु. केळकर, सौ. तडवी. प्रा. कु. पाटणकर ह्यांनी नवीन कायद्यांनी स्त्रीला मिळालेलें संरक्षण हा भाग सभेपुढें ठेवला. प्राचार्य महाजन हे अध्यक्षस्थानीं होते. त्यांनीं अतिशय समर्पक समारोप केला.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्यांनी आम्हाला सहकार्य केलें त्यांची असोशिएशन ऋणी आहे.

ल. मा. पाटणकर

---

# सेवापथक

सेवापथकाच्या ह्या वर्षीच्या कामास १७ जुलै रोजीं प्रारंभ झाला व २६ जानेवारीपर्यंत दर रविवारीं सकाळीं ७ ते ९ पर्यंत सेवापथक काम करीत असे. ह्या वर्षी असेंब्ली हॉल समोरील बाग तयार करण्याचें व त्याच समोरील रस्ता तयार करण्याचें काम केलें. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या बेशिस्तीबद्दल साधना, लोकसत्ता वगैरे पत्रांत आलेल्या लेखांचें वाचन होऊन त्यानंतर त्यावर चर्चा करण्यांत आली. ह्या चर्चेत प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

ह्या वर्षी सेवापथकाची १७ ऑगस्टला पावसाळी सहल गिरणा पंपिंग स्टेशनवर गेली होती. त्याचप्रमाणे दि. २३ व २४ डिसेंबर हे दोन दिवस भंडारदऱ्याच्या रम्य परिसरांत हिंडण्याची संधि सेवापथकाने घेतली. ह्या सहलीमध्ये १४ विद्यार्थी व ४ प्राध्यापक सामील झाले.

२ ऑक्टोबरला सामुदायिक सफाईचा कार्यक्रम झाला. त्यांत बऱ्याच प्राध्यापकांनीहि भाग घेतला. श्री. वसंतराव केळकर ह्यांचें गांधीजयंतिनिमित्त भाषण झालें. २४ डिसेंबरला सानेगुरुजी जयंति साजरी करण्यांत आली. त्याप्रसंगी नामवंत वकील श्री. राणे हे पाहुणे म्हणून लाभले होते.

ह्या वर्षी विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिति २० व प्राध्यापकांची ५ होती.

— ल. मा. पाटणकर

---

## SCIENCE ASSOCIATION
MANAGING COMMITTEE 1961-62



## P. T. LEADERS 1961-62



# INTERCOLLEGIATE SPORTS 1961-62

## HOCKEY WINNERS



"Kamgar Kalyan Kendra" Volleyball Shield Winners.





# अजन्ता

## हिन्दी विभाग

हमारे स्वतंत्र देश के सामने बहुत और भारी भारी काम हैं। हमारी चिर दासता ने हमें दुनिया के और देशों से पीछे रखा है। विदेशी शासक इसी में अपना हित समझते थे। अब सादियों की पिछड़ी यात्रा को हमें वर्षोंमें पूरा करना है। इसमें साहित्य की सहायता सबसे अधिक आवश्यक है। हमें ऐसा साहित्य तैयार करना है, जो दुनिया की दौड़ में आगे बढ़ने में सहायक हो।

— महापंडित राहुल सांकृत्यायन

# ए सावन के विरही बादल !

ए सावन के विरही बादल,
फिर ना रोओ, अब ना बरसो !

इधर दिनोंसे देख रहा हूँ,
धनवानों के प्रासादों को,
झोंपड़ियों की छतसे ऊपर,
उठनेवाली धूम–शिखा को,
आम्रकुंज के पार क्षितिज से
गर्जन – तर्जन करते – करते
बड़े – बड़े हाथी जैसे
आसमान में बढ़नेवाले
वारिद–दल का वक्ष चीरकर,
महानाश की चकाचौंध से
नर–नारी के भग्न हृदय की
जन्मान्तर की विरह व्यथा को
उत्तेजित करनेवाली
सौदामिनी के ताण्डव
को भी देख रहा हूँ,
अतः मुख को अपने कहीं
छिपाए अब ना रोओ,
ए सावन के विरही बादल !

ए वर्षा की सजल दुपहरी
पल में रोकर पल में हँसती,
लुका–छिपी का खेल–खेलकर
लाजवन्ती सी शरमाती बन
क्यों वसुधा के इस घूँघट को
दूर हटाकर छिप जाती हो !

ए नीरद माले
ए गन्ध–वाहिनी,
तुम समय – समय पर
जहाँ – तहाँ सँचार करोगी,
पर दुनियाँ मेरी कितनी छोटी
जीवन मेरा कितना दुखी !

यह शामा–सी रजनी रानी
जो अपने से भी थी लावण्यमयी
जिस के झिल – मिल
आँसू मण्डित मुक्ताँचल में
केलि करते बीत गए हैं
अब जाने संवत्सर कितने !

जब–जब कोई मन्दिर जाकर
घण्टा, शंख, घड़ियाल बजाते
मनको चंचल एक चित्तकर
प्रभुको अपने सम्मुख पाकर
मनोतियाँ कितनी करते !

पर नास्तिक मैं, इन बातोंपर
विश्वास करूँ भी तो कैसे !

इस निरानन्द से जीवन पथ पर
भूले – भटके अगर कहींपर
नियति के संकेतोंपर मिल जाएँगे,
तब यौवन की श्री से विरहित
क्या हम दोनों अपने होंगे !

अब याद न दिलाओ
उन घटनाओं की
वियोग–मिलन के धूप–छाँव की
जिस किसी भी कवि–लेखक की
कुशल लेखनी, लिख न सकेगी
चित्र–लेखिके, उन चित्रों को
कभी नहीं तुम बना सकोगी !

जब कभी कभी मैं हृदय थामकर
घिरी हुई घनघोर घटासे
उदास व्योम या व्यथित विश्वके
करुण–रुदन को सुन लेता हूँ,
तब जल-थल-नभ का कोना कोना
प्रतिपल स्पन्दित क्यों है होता !

चल अचला के इस आँचल में
यह भीषण कैसा विप्लव मचता !

यह आहट किसकी, किसका दर्शन
प्रकृति की इस विकल गोद में
अन्तराल के अणु–रेणु में
यह उत्पीड़न है मचता कैसा !

या अब भी कोई
श्रद्धा नाम्नी आद्या नारी,
नगर–डगर वन–वीथि में
विलाप करती,
अपने मनुको है खोज रही !

या अब भी कोई
पति से त्यागी यह दमयन्ती
कानन–कानन बिलखती हुई,
अपने नल को है ढूँढ़ रही !

या अब भी कोई
काँचन–मृग पर लुब्धा मैथिली
क्रन्दन करती
पछताती सी
नीलाँचल को है भींगो रही !

या अब भी कोई
राधिया भोली
करील कुंज में भटकती हुई
सिसकी भरती
कालिन्दी को है बहा रही !

अतः विरह-मिलन की छाया बनकर
इन्द्रधनु के अवगुंठन में मुख को
अपने कहीं छिपाए,
मणिमुक्ता को अब न लुटा दो
ए सावन के विरही बादल !

—श्रीनिवास शास्त्री



# काश्मीरी गुलाबके चार फूल

ले०– कु. सुषमा जोगळेकर, बी. ए., प्रथम वर्ष

**काश्मीरकी राहपर :** पहला फूल ।

'बनिहाल पास' पीछे गया है। और... मन कहने लगा है कि सामने हरजगह जो घूमता हुआ रास्ता है वह जा रहा है श्रीनगरकी ओर! श्रीनगर? हाँ मेरे सपनोंका नन्दवन श्रीनगर!! रास्ता चलही रहा है मगर मन तो श्रीनगरतक पहुँच चुका है। रास्ता... रास्ता भी तो देखो कैसा हर जगह घूमता हुआ चला है, अगर सीधा होता तो मैं...

मन भी हर मोड़पर आगे आगे देखता जा रहा है, नजर चहक रही है, रास्तेकी एक ओरसे सौदर्यसम्राज्ञी साँवेर रंगकी चिनाब बह रही है। वह तो इतनी चंचल मालूम होती है कि, एक मिनट तकभी अपनेको रोक नहीं सकती। हाँ रोकभी कैसे सके, पिया मिलनकी आस जो है न! चिनाबको आँखोंमें समानेके लिये तो मेरी नज़र अपनी हर कोशिश कर रही है मगर वह आँखोंमें समानेको तैयार नहीं।

और एक मोड़ आ गया। अब रास्तेके दोनों ओर हैं पत्तोंसे लदे हुअे सूचीपर्णके पेड़। कितने ऊँचे ऊँच हैं! मानो नीले आसमानको चूम रहे हैं!

और अब फिर चिनाब नजरोंके सामने आ रही है। कितनी पतलीसी लग रही है ये। पहले देखा था तब तो अंग–अंग यौवनसे मुस्कुरा रहा था मगर अब यह मुग्धासी कुछ सिकुड़सी गयी है। फिरभी इसके मनमें अपने पियाकी तस्वीरं रंग लेती जा रही है। इसे मार्गभी कैसे मिलता है पता नहीं चलता, कहाँ कहाँसे खेलती–फुदकती हुअी चली आ रही है।

चिनाब अदृश्य हुअी और सामने एक निष्पर्ण पेड़ दिखाई दिया, जैसे उसकी प्रेयसीने त्याग दिया हो और विरहाग्निसे जला रहा हो। मेरे मनपर अभीभी चिनाबके सौन्दर्यका असर था और अब यह चित्र था निष्पर्ण पेड़का। सोचा, कैसा अजब चित्र है! एकको पिया मिलनकी आस लगी है और एक विरहाग्निमें जल रहा है।

एक... दो... पुल निकल जाते हैं मगर मनमें हलचल अब भी बनी हुअी है। इतनेमें पवन हमारी जुल्फोंको लहरा जाता है और, जैसे कहता है, 'देखो तुम नन्दनवनके द्वारपर आ गई हो और सचमुच रास्ता खत्म हो चुका है... हम कश्मीरमें हैं... डल–झीलमें पड़े हुअे शिकारेके प्रतिबिंबकी ओर देखती हुअी मैं मुझसेही पूँछती हूँ... क्या हम कश्मीरमें हैं... सचमुच कश्मीरमें !!!

**कश्मीरकी एक सुबह :** दूसरा फूल ।

डल–झीलके चबूतरेपर मैं बैठी हुअी हूँ। चारों ओर कुहासाही कुहासा है... अभीभी पश्चिमकी ओरका अम्बर नीला नहीं और न पूरबका केशरी। कुहासे रंगकी सुबह... कश्मीरकी सुबह। जरासा 'आऽहा' किया तो मुँहमेंसे कुहासोंका फुआरा निकलता है। यह अैसी सुबह देखनेके लिये— यह अनोखी सुबह मेरा मन अबतक कितना अधीर था— कितना उत्सुक !

अब धीरे धीरे पूरबकीं ओर केशरी रंगकी होली खेली जा रही है। उषाकी आरती होनेके बाद अरुण अपनी पत्नीका चुम्बन.... अब उसे देर हो रही है जल्दी जल्दी रथको हाँकता हुआ ऊपर आ रहा है। डल–झीलके पानीपर कुहासा और किरणोंका खेल चल रहा है, हंसके जोड़े क्रीड़ा करते नज़र आ रहे हैं। एक बार मेरे मनमेंभी आया मैं भी पानीमें उतरूँ, मगर ठंडके कारण हिम्मत न हुई।

धूप–छाँवमेंसे एक ओर हाऊसबोट दिखाअी देती है। अब तक कुहासेके सिवा कुछ भी दिखाअी नही देता था। क्या किसी जादूसे यह हाऊसबोट वातावरणमें अवतीर्ण होती है? आहा! उसके लाल लाल परदे कितने आकर्षक हैं और हमें अपनी ओर बुला रहे हैं। उधर बढ़नेकी इच्छा हो उठती है, पर दूसरेही क्षण बचपनमें सुनी वह परियोंकी कहानी याद आ जाती है, जिसमें एक राक्षसने एक सुन्दर राजकुमारीको इस तरहकी एक नांवमें छिपाकर रखा था। बेचारी अपने

राजकुमारके लिये आँसू बहा रही थी। मेरा मन कांप उठा। मै उधर नांवकी ओर जाऊँ और कहीं वह राक्षस आ गया तो...

कुहासा और किरणोंका जैसे संघर्ष हो रहा है और उसमें किरणोंकी विजय हो रही है। सुबहकी सुषमा बढ़ती जारही है और मनको अधिकाधिक लुभा रही है।

**शिकारा :** तीसरा फूल।

'कश्मीर–क्वीन' शिकारा धीरे धीरे आगे बढ़ता जा रहा है। पानीमें हाथ डालकर पानी उड़ानेमें अनोखा आनन्द आता है, चारों ओर कमल पत्तोंका जाला फैला हुआ है। उसपर पानीकी बूँदे जमी हुआी हैं सूर्य किरणोंमें वे मोतीसी चमक रही हैं, जी चाहता है उन मोतियोंको हाथमें नचाऊँ पर पत्ते को स्पर्श होता न होता कि वे लुढक जाते हैं।

दिनकर ऊपर ऊपर आ रहा है। आसमान और और साफ होता जा रहा है, पानी शांत है... पानी और आकाशमें अन्तर मालूम नहीं पडता! मगर हाय! बीचमें पर्वत है उसका प्रतिबिंब इन दोनोंको भिन्न दिखानेका प्रयास कर रहा है। मन न होते हुए भी इधर उधर देखा तो पर्वतोंकी श्रेणियाँही श्रेणिया नजर आ रही हैं और उन्हे देखकर हाय नहीं बल्कि आहाऽ ऐसा उद्गार निकल गया क्योंकि कहा है न कि रूपवती बहूको किसीकी नजर न लगनेके लिये उसके कपोलको कजरेका डिठौना लगाया जाता है उसी प्रकार ये पर्वत श्रेणियाँ पानी और अम्बर के मिलनको नजर न लगे ऐसे कजरेका काम कर रही हैं।

अरे! शिकारा रुक क्यों गया। नाविकने पहाड़ी भाषामें कुछ कहा। हमारी समझमें सिर्फ इतनाही आया कि वह चार–चिनारोंके बारेमें कुछ कह रहा है। डल–झीलके बीचमें एक छोटासा टापू है उसपर चार चिनार के वृक्ष है। चार वृक्ष चार बाजुओंमें खड़े थे और बीचमें बैठनेकी जगही थी। शायद दोपहरके वक्त राजगृहमें गरमी अधिक होनेके कारण राजकुमारी यहाँ आकर बैठती होगी। नाविकने इस टापूके बारेमें यक्षोंकी शापित कहानी सुनायी। सृष्टिसौंदर्य निहारते निहारते हमने वह कहानी सुनी!

शिकारा आगे बढ़ा। बीचमें सेबसे भरी हुआी नांव मिली जिसे कुछ बालक लिये जा रहे थे। उसे रोकलिया और उनसे सेब खरीदे। उन्हे चखकर मुझे तो ऐसा लगा इस फल का 'सेब' नाम बिलकुल नीरस है, ये तो अमृतसेभी बढकर है। हमारा शिकारा आगे बढ़ा। बच्चोंका काम पूरा हुआ। बच्चोंने हमें 'अस्सलाम आलेकुम' किया, हमने उन्हें 'आलेकुम सलाम' किया। उनकी भी नांव चल पड़ी।



वहाँ बस्तीमेंसे पैदल चलनेके लिये पानी केही रास्ते है, उनमें छोटी छोटी नांवें चलती है। ऐसेही रास्तेपर हम चल रहे थे। दोनों ओरके घरोंकी खिड़कियाँ थोड़ी थोड़ीसी खुल गयी थीं और उनमेंसे अनजानी नजरें हमें घूरती चली थीं। यकायक हवाके झोकेसे एक खिडकी पूरी खुलपड़ी और उसमें मैंने जो देखा वह पलक गिराये बिना–अवाक्–देखतेही रह गई। क्या सौंदर्य था वह–वह अनोखी सिर्फ संयोगसे देखी हुआी तस्वीर...

तसवीर तेरी दिलमें, जिस दिनसे उतारी है,
फिर तुझे संग लेके, नये नये रंग लेके सपनोंकी महफिलमें।

ऐसा सौंदर्य सिर्फ सपनोंकी महफिलमेंही रहता है।

**काश्मीरकी रात्रि :** चौथा फूल।

शबनम! किसी लड़कीका नाम नहीं है!! सुबह बन फूलोंपर पड़ी हुआी शबनमकी बूंदें रातको हिम बन जाती हैं, फूलों–पत्तोंपर मोतीसी चमकती हैं ये बूँदे!!!

कश्मीरमें कोई ऐसी जगह नहीं जहाँ गुलाबी रंग न हो। चारों ओर चाँदनी छिटकी हुआी थी इसीके कारण पहाडोंपर फूले हुअे गुलाबके— सुकुमार कोमल फूल— औरभी गुलाबी लग रहे थे। ये तो अष्टमीकी रात थी। मेरे मनमें विचार आया, अगर अष्टमीकी रातमें इतनी सुषमा बिखरी हुआी है तो पूनमके दिन कितनी होगी! मगर नौ नगद् न तेरह उधार!! पहले अष्टमीकी सुषमा देख लूँ, बादमें पूनमकी शोभा!!!

एक चाँद खिल रहा था गगनमें और दूसरा था पानीमें। डल–झीलमें जो चन्द्र खिल रहा था उसकी शोभा अवर्णनीय थी। महसूस हो रहा था शकुंतला कमलके उपवनमें बैठी हुई अपने प्रेमी दुष्यंतको अपनी व्यथाका वर्णन कर रही है। ऐसा महसूस होनेका कारण यह था कि, चन्द्रविकासी कमलफूल खिल रहे थे ओर बीचमे चन्द्रमा विरहिनी शकुंतला जैसा वियोगसे मानो आधा बना हुआ था।





चारों ओर वातावरणमें कुहासा फैला हुआ था गुलाबकी सुमधुर मीठी सुगंध जहाँ–तहाँ महक रही थी। चाँदकी किरणें हिमाच्छादित शिखरोंपर बिखरी हुई थीं। लग रहा था जैसे वे चोटियाँ हिमगौरीके समान तपस्विनी बनकर बैठी हैं और उनकी तपस्या भंग करनेके लिये चाँद मदनके अदृश्य किरणोंके रूपमें अपना उज्वल अस्त्र उनपर फेंक रहा है।

पार्श्वभूमिमें श्री शंकराचार्यके मन्दिरका दीपक प्रज्वलित हो रहा था। मन और भी अधिक मुग्ध हो उठा। इतने अन्धकारमें चाँद–तारोंके साथ यह दीपक भी संसारको अपनी रोशनी दे रहा है। छिटकी हुई चाँदनी मनको बड़ी लुभावनी लगती थी। ऐसी मनोमुग्धकारी थी वह काश्मीर की रात!

———

## सीताजी का गीत!

मैं कहूँ क्या तुम्हें, मैं तो हूँ इक नारी
तुम पूरी करदो, वनकी इच्छा मेरी

मुझे लगता स्वामी, बनमें फिरसे जाना
वनकी कुटियामें, गीत सुहाने गाना
मेरे मनमें उठती अनेक यादें प्यारी ॥१॥
तुम पूरी करदो वनकी, इच्छा मेरी

हिरनों के संगमें हिलमिल हिलमिल करना
कलसोंसे पानी शरयूका फिर भरना
कैसी दुनियाभीं, स्वामी वह तो न्यारी ॥२॥
तुम पूरी करदो वनकी इच्छा मेरी

फूलोंको तोडकर अुसका हार बनाना
फ़ल वनके तोडके मीठे मीठे खाना
आती है मुझको याद वह दुनिया सारी ॥३॥
तुम पूरी करदो, वनकी इच्छा मेरी

अुन वृक्ष लता संग घंटों बातें करना
कुछ सुनना अुनकी अुनसे भी कुछ कहना
रखलो ना रघुवर बात ये आज हमारी ॥४॥
तुम पूरी करदो, वनकी इच्छा मेरी

(अप्रकाशित रचना गीत रामायण से)

देवकीनंदन सारस्वत
बी. ए., तृतीय वर्ष

# सच हुवे सपने तेरे....!!

ले०– अशोककुमार चन्द्रसेन बी. ए., तृतीय वर्ष

आये हुअे खतों को अभय पः रहा था। न जाने कितने खत आते थे उसे रोज, वह उन्हें पःता और रख देता। कोअी पूछता, "आपका भावी उपन्यास कौनसा है? क्या वह भी दुःखान्त होगा?" दूसरा पूछता, "क्या उसकी नायिका भी अल्का ही होगी?" फिर तीसरा पूछता, "क्या आपकी नायिका सचमुच ही है? और आप उससे मिलते हैं?" बस! येही सवाल!! लेकिन अिन सब सवालोंका एक ही तो जवाब था, अभय मन ही मन कहता "यह अल्का मेरी कल्पना है! मैं अल्का की जो छबि चित्रित करता हूँ अपनी प्रतिभा के बल, वही तो मेरी नायिका है! लेकिन वह कौन है, क्या है और कहँ है–मैं भी नहीं जानता! लेकिन मैं कुछ आहट महसूस करता हूँ–शायद जनम जनमके संबंधोंकी आहट–अपनेपनकी हल्चल–मधुर स्मृतियोंके पायलोंकी आवाज और जनम जनम के प्यासे प्रीत का गीत......!! मैं भी उसकी तलाशमें हूँ। मुद्दतसे वह मेरे दिलकी रानी है, हम कभी मिले नहीं, लेकिन यह पहचान पुरानी है, बहुत पुरानी! उसका पंथ निहारती मेरी अधीर आँखें थक गयी हैं......मेरा दिल कहता है...... वह आयेगी... वह आयेगी!"

इतनेमें घड़ीमें दिनके दस बज गये. . टन् टन् आवाजसे कल्पना विश्वमें भटकता अभयका दिल रास्ता भूले पंछी की तरह वापस आ गया! एक अजीब थकावट महसूस की उसके दिलने! फिर उसे खयाल आया। आज उसे सिमला जाना है, सफरकी तैयारी भी करनी है, गाड़ीका समय भी दूर नहीं। लेकिन माधो उसका बूढ़ा नौकर–अबतक नहीं आया था। बेचैनी और परेशानीसे अभयके मस्तिष्कमें एक वेदना उठी! मन ने कुछ ज्वर भाव महसूस किया! और वह वैसाही बैठा रहा......

"सरकार" अभयने आवाज सुनी। चौंककर देखा, माधो खड़ा था। गुस्सेसे उसने माधोको पूछा, "क्यों माधो, कहाँ थे इतनी देर? आज सिमला जाना है......"

"सरकार मैं तो खाना बना रहा था... चलिए सबकुछ तैयार है!" अभयका उबलता मन शान्त हो गया एकाएक। बोला, "अच्छा! चलो, मैं आया!"

अभय उठा! दीवान खानेमें उसकी माँ की तसवीर टंगी थी! उसके पास वह गया। आँखें भर कर उसने देखा, वे सजल हो उठीं... उसे लगा उसकी माँ वही सवाल पूछ रही है, "बेटा! मेरी बुझती आँखोंको बहू कब दिखेगी? इतनी बड़ी जायदाद का मालिक तू है... तेरे बाद कुलदीप की रोशनी कौन बनेगा?"

और... अभयने वही जवाब दिया था... जो वह हमेशा देता था...

..."माँ! वह अल्का है ना... मुझे उसका इन्तजार है... मुझे विश्वास है... अल्का आयेगी... वह जरूर आयेगी! हमने वादा जो किया था... आयेगी माँ! बहू बनकर तुमसे आशीर्वाद मांगने... और......"

"चलिए बापूजी" माधोकी आवाज आयी। अभयके सपनोंका तार टूट गया!......

......गाड़ी चल रही थी... अभय विचारोंमें डूबा था... उसके नये उपन्यास के एक प्रसंगने उसको बड़ी उलझनमें डाल दिया था... उसने सोचा... बहुत सोचा... अपनीही दुनियामें वह चला गया था! उसके नये उपन्यास 'अभिसारिका' का प्रसंग था। नायक नायिका को एक दुर्घटना में बचाता है। सहवासकी मधु बेलामें दोनों एक दूसरे के हो जाते हैं। प्यारके दो पंछियों को अेक शाखापर बसेरा मिल जाता है। लेकिन भगवान को कुछ और ही मंजूर था... दोनों रेल यात्रा कर रहे हैं... दुर्घटना हो जाती है . बस... दो राही वहांसे बिछुड़ जाते हैं...! नायक बच जाता है... उसे यह मालूम नहीं कि उसकी प्रियतमा कहाँ है... उसे ढूंढता हुआ वह मारा मारा भटकता है... लोग कहते हैं अल्का मर गयी... लेकिन वह नहीं मानता... उसका



दिल नहीं मानता... नायिका अल्का की तलाशमें वह भटकता है......!

और सोचते सोचते अभयकी आँखें एकाएक सामने बैठी लड़की पर जा पड़ी! उसके भावपूर्ण नयनोंमें एक प्रकाश रेखा उठ गयी। आँखोमें प्राण डालकर उसने उसको देखा... वह देखता रहा... वही लड़की... उसकी अल्का... हाय! अल्का, तुम कहाँ थीं? वही मुखडा चाँदसा! बादलोंकी जुल्फें बिखरी सावन परी सी सावली लुभावनी। वही कजराली बड़ी बड़ी आँखें... रेशमी पलकों की वैसी ही हल्चल... वही सरल नासिका! नितान्त चिकने गोरे गुलाबी गाल... पँखुडी से रसीले अधर...!! अग अंगसे छलकता वह यौवनमय रूप... असीम स्नेहार्द्र मुग्ध मुखड़ा... नयनोंसे टपकता वही भोलापन... और वही मंद मुस्कान.. अल्का... मेरी अल्का...!! अभय के मनमें ज्योति जगमगा उठी... अजीव आवेग और आवेशसे वह उठा उस लड़कीके पास गया... उसकी बाहों को पकड़ कर बोला,

"अल्का! अल्का, कहा थीं तुम? मैंने कितना देखा तुम्हें? कहो ना, बोलो ना, अब जावोगी तो नहीं?......"

लडकी एकदम घबरा गई! एक नयी आफत, एक बला... उसका चेहरा फीका पड़ गया... फिरभी वह चिल्लाई

"छोड! मुझे... छोड... गुंडे..."

"मैं गुंडा... अल्का... मैं गुंडा नहीं... तुम मजाक करती हो।"

डिब्बेके आदमियोंकी ओर देखकर वह बोली, "देखिये! मैं इसे जानती नहीं, मुझे परेशान कर रहा है।"

अभय एकदम बोला, "नहीं! यह जानती है मुझे। अच्छी तरहसे जानती है। क्या भूल गयी? मैंने तुम्हें बचाया था उस दुर्घटनामें .. फिर हम दोनोंने शादी की थी... मधुचंद्रके लिए जा रहे थे और रेल दुर्घटना हो गई... तुम न जाने कहाँ चली गई? मैं तुम्हें देखता घूमता रहा... और आज तुम दीख गई..."

"झूठ! एकदम झूठ!!" लडकी एकदम चिल्लाती हुई रो पडी! मुसाफिरोंकी ओर देखते वह बोली "मैं इसे नही जानती!" मुसाफिरोंसे एक आदमी आगे आया, "ऐ मिस्टर। लडकीको छेडनेका अच्छा बहाना है!"

मुसाफिरोंसे आवाजें आयीं, "मवाली, गुंडे, चारसौ बीस, मारो इसे!" बहती गंगामें मुसाफिरोंने हाथ धो लिए .. अभयको मार पडी .. खूनसे उसका मुँह भीग गया था... लोग आपसमें बोल रहे थे... लडकी दूरसे उसे देखती रही......

गाडी चल रही थी......

अगला स्टेशन आया... गाडी रुक गयी...मुसाफिर आये...कुछ उतर पडे...! गाडी फिर चलने लगी...!!

